# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मानवतावाद

**डॉ.मनोहर आंबटकर**
विद्या विकास महाविद्यालय
समुद्रपूर जि.वर्धा

**डॉ. मिलिंद कांबळे**
विद्या विकास महाविद्यालय
समुद्रपूर जि. वर्धा

**प्रास्ताविक :—**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यानी आपल्या जिवीत कार्यात समाज प्रबोधन, लोकशिक्षण देण्याचे कार्य केले. त्यांची ग्रामगीता अखिल मानवजातीला जीवन जगण्याचा संदेश देते. ग्रामसुधारणे शिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही या महात्माप्रणीत विचाराचा ध्यास घेऊन आणि विनोबाजी भावे यांच्या आदर्श संस्कृतीतून तुकडोज महाराजांनी आपले विचार, भावना आणि आपल्या पुरोगामी कल्पना सातत्यांने मांडल्या आहेत. ''माणुस द्या मज माणुस द्या, ही भीक मागता प्रभु दिसला'' ही खंत बाळगून माणूस निर्माण करण्याचे वृत्त त्यानी जन्मभर अंगीकारले. समाजातल्या माणसा माणसातील भेद दुर करण्याचे काम राष्ट्रसंतानी केले एकूणच त्यांनी साहित्यांच्या माध्यायातून खऱ्या मानवतावादाची शिकवण दिली. प्रस्तुत शोध निंबधात आपण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील मानवतावादाचा विचार करणार आहोत.

वऱ्हाडात जन्मलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लोककल्याण्याचे काम केले. आपला संपूर्ण देह मानव कल्याण्यासाठी चंदनाप्रमाणे झिजवला. आपल्यावाणी आणि लेखनीतून ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना मांडण्यांचे काम केले. तुकडोजी महाराज हे आजच्या युगाचे प्रबोधनकार होते. त्यांचे समाज प्रबोधन विज्ञाननिष्ठ होते. अंधश्रध्देवर त्यांनी अतिशय घणाघाती प्रहार केला. शेकडो भजनांच्या माध्यमातुन जनजागरण केले. राष्ट्रसंतांचा ग्रामगीता ग्रंथ विश्वकल्यानाचा होता. या बद्दल राष्ट्रसंत सांगतात की,

''ग्रामगीता माझे हृद्य,
त्यात बसले सदगुरुराय !
बोध त्यांचा प्रकाशमय,
दिपवोनी सोडील ग्रामासी !! ''

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वतंत्र बाण्यांचे समाज चिंतक आणि थोर विचारवंत होते. ग्रामीण जीवनाचे महान असे भाश्यकार होते. समाजातील जातीभेद, विशमता नष्ट करण्यासाठी त्यांनी स्वताचे आयुश्य संपवले. भजन कीर्तनातून त्यांनी तळागाळतल्या माणसांना एक करण्याचे काम केले. ते आपल्या भजनात सांगतात,

''या भारतात बंधूभाव नित्यअसूदे
दे वरची असा दे!
नंदोत सुखे गरीब अमीर एकमतांनी

मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वांतश्य सुखा या सकलामाजि वसू दे!
दे वरचि असा दे!!''

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी बंलिदान बंदी, नशाबंदी, हरीजन–मंदिर प्रवेश, गोवधबंदी, हरीजन संमेलन, आदिवासी संमेलन,तमाश परिशद, साधु समेलन इत्यादी उपक्रमातून त्यांनी लोकप्रबोधन करण्याचे काम केले. तसेच त्यांच्या साहित्यातून, राष्ट्रभक्ती,स्त्री–पुरुष समानता, सर्वधर्म समभाव,सैजन्य, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवतावाद प्रकटतो. माणसाला माणूस म्हणून किमंत मिळवून देण्यासाठी त्यांना स्वताःच्या पायाला भिंगरी बांधली म्हणूनते माणसासाठी म्हणतात की,

''माणूस द्या मज माणूस द्या
ही भीक मागता प्रभु दिसला !
लोक दर्शनासाठी जाती,
देव दिसावा म्हणानिया
देव म्हणे मज माणूस ना दिसे,
अजब तमाशा हा असला''

वैश्विक सामंजस्याच्या भाव बंधाने भारावलेले राष्ट्रसंत म्हणजे खऱ्या अर्थाने वैश्विक मानवनिष्ठांच समता दर्शक मांदियाळी होय. आज आपल्या देशाला खऱ्या माणसाची त्याच्या माणुसकीची निंतात गरज आहे.यासाठी राष्ट्रसंतानी आपल्या भजनातून माणूसकीची पेरणी केली ते म्हणतात,

मानव हेचि आपले नाम!
मग स्वधर्म म्हणजे मानवधर्म!!
हे तरी ध्यानी ध्या सत्य वर्म!
साध्य बोल!!
आपण आहोत मानव!
मानण्याचा वाढवावा गैरवा!!
सुखी राहावेत आवाल वृध्द!
हेचि कार्य आपुले!!''

भारतातला माणूस आनंदी व्हावा. त्याचे कल्याण व्हावे, त्याचा उध्दार व्हावा म्हणून अखंड मानवताजीला जागृत करण्यासाठी आणि तळागाळातील माणसाला, आळसाने झपाटलेल्यांनाही त्यांनी भजन कीर्तनाच्या माध्यमातून भावनावर आणले. या देशातील ग्रामीन सुखी व्हावा या साठीच त्यांची ग्रामगीता मानव कल्याणासाठी नवे वरदान ठरली आहे. ग्रामीन संस्कृतीचा आणि ग्रामीण माणसाच्या परिपाठाचा आदर्श म्हणजे ग्रामगीता होय. ईश्वर सेवा म्हणजे राष्टसेवा ही मांडणी घालून त्यांनी राष्टधर्माचे आणि खरे म्हणजे मानवधर्माचे

संस्कार प्रत्येकाचे कर्तव्यपालन म्हणून सर्वसामान्य मानसाला त्यांनी शिकवले आहे.

''व्यक्ति धर्म, कुटुंबधर्म !
समाजधर्म, गावधर्म !
बळकट होईल राष्ट्रधर्म प्रगती पथाचा !
व्यक्ती व्हावी कुटुंबपूरक
कुटुब व्हावे समाजपोशक
समाज व्हावाराष्ट्र सहायक !
राष्ट्र विश्वशांतिदायी !

माणसापासून होणारा आणि कुंटुंब, समाज राष्ट्र अशा कर्तव्यापालन व जबाबदारीचा परीघ विशाल करता—करता विश्वशांतीपर्यंत मानवजात किती सहज पोहचू शकते या विषयीचे हि समाजजागृती आहे समाजाला वळण लावण्यासाठी काय योजना असावी याची स्पष्ट कल्पना त्यांना होती. त्याच्या एका भजनातून कसा मानवतावाद आणि साहित्याविषयी कसे विवेचन येते ते असे,

''वेद—शास्त्र तुम पढे हो
परयह जनभाशा नही जानोंगे !
उसके बिन नही समाज सुधरे,
क्या कहना यह मानागे
हो उचे पंडित और साहित्यरत्न, विव्दान बडे!!
जबतक कद्रनही गरिबों की,
है तब तक सुनसान पडे !
जीवन का साहित्य बिगडकर
गली गली मे सोया है
बिन उसको अब चेत किये,
वह होशन किसको आया है !!

म्हणजे आपल्या देशाला आज खऱ्या मनुष्यत्वाची, माणुसकीची गरज आहे. असा संवेदनशील माणूस वाङ्मय निर्माण करु शकतो विव्दत्तेचे प्रदर्शन न करता देशाची आणि काळाची धुरा वाहणारा माणूस निर्माण करणे हेच त्यांचे ध्येय होत असते. प्रत्येकातला देव जाणा हे सांगता सांगता तुकडोजी श्रोत्यांना अगदी अलगदपणे सर्वधर्म समभावाकडे नेतात. जेव्हा या देशात जातींचा विव्देश भडकतो तो संघर्श पेटतो तेव्हा माणसाने मूळ तत्त्वाची विचार करावा म्हणून ते सांगतात,

''मंदिरी बसोनी ना कदाबावे
त्यापेक्षा मार्गाचे काटे उचलावे !
दु:खतासि प्रमे पाणी पाजावे

हे श्रेष्ठ तीर्थस्थानाहुनि
एक हात खोदावी जमीन
हे पूजना हुनि पूजन
परिणाम शेकडो व्याख्यानांहुन, अधिक त्यांचा''

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी इथल्या माणसांची नाडी ओळखली होती. आपल्या देशात कमालीची जातीयता, धर्मांधंता आहे. जरही वाढत गेली तर एकना एक दिवस आपले राष्ट्र नष्ट होईल इथली माणूसकी नष्ट होईल, इथला मानवता वाद नष्ट होईल असे राष्ट्रसंतांना वाटत म्हणूनच की काय ते आपल्या एका अभंगात म्हणतात,

''मंथन किया— हर धर्मकाहर पंथकाहर देशका
निकला यही मेरा समझमे सार शुभसंदेश का !!
जब विश्वमानव मित्र बनकर पास सबके आयेंगे !
शांती तभी वे पायेंगे नहि तो खत्म हो जायेंगे !!''

तसेच ग्रामनाथाला उद्देशून म्हणातात,

''तुझ्या श्रमास प्रतिश्ठा मिळो
सकळांचे लक्ष तुजकडे वळे !
मानवतेचे तेज झळझळो विश्वामाजि या योगे''

राष्ट्रसंताच्या साहित्यातून बधुत्वाची, न्यायाची आणि समानतेची शिकवण आली आहे. तळागळात रुतून बसलेल्या, भरडलेल्या, चिरडलेल्या माणसांना नव्या प्रकाशाकडे खेचून आणण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे साहित्य म्हणजे खरी मानवतेची मशाल, चालते, बोलते विद्यापीठ. भजन कीर्तन करुन त्यांनी समाजात राष्ट्रभावना निर्माण केली देशाला शांतीचा संदेश दिला. नवराष्ट्र उभारणीसाठी त्यांनी अथक प्रयत्न केले असे म्हणता येईल. जनमाणसांना क्रांतीची हाक देतांना ते म्हणतात,

''अरे उठा उठा, श्रीमंतांनो
अधिकाऱ्यांनो पडितांनो
हाक आली क्रांतीची
गवागावासी जागवा
भेदभाव हा समुळ मिटवा
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा तुकडया म्हणे''

राष्ट्रसंताचे साहित्य आजही आपल्या जीवनाला दिशा देणारे आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्र माणूस आहे. त्याच्या साहित्याची शिकवण मानवतावादाची आहे. भजन, किर्तनातून त्यांनी प्रबोधनाची पेरणी केली. ती येणाऱ्या काळात राष्ट्रउभारणी साठी आणि नव्या मानवासाठी नक्कीच उपकारक असेल असे म्हणता येईल.

**सारांश :—**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन आणि कार्य मानवी उध्दारांचे होते. समाजातील जे जे चांगल वाईट ते ते त्यांनी साहित्याच्या माध्यमातून शब्दबध्द केल. भजन, कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी समाजजागृतीकेली सामान्य माणसांचे प्रश्न त्यांनी ग्रामगीता ग्रंथातून मांडले. ग्रामगीता ग्रंथ माणूसकीचा झरा आहे. एकुण त्यांच्या संपूर्ण साहित्यातून मानवतावादी दृष्टिकोन बघायला मिळतो. ग्रामीण संस्कृती, ग्रामीण माणूस यांचे भावविश्व त्यांनी आपल्या समग्र साहित्यातून प्रकट केले आहे.

**निष्कर्ष :—**

१) राष्ट्रसंताची भजने, अभंग आणि ग्रामगीता मानवजीवनाचे खूप मोठे तत्त्वज्ञान

२) राष्ट्रसंताचे साहित्य म्हणजे प्रबोधनाचे, परिवर्तनाचे हत्यार

३) राष्ट्रसंताचे विचार आणि साहित्य राष्ट्रउभारणीस उपकारक

४) राष्ट्रसंताच्या साहित्यातून सामान्य माणूस दिसतो.

५) राष्ट्रसंतोच साहित्य मानवतेचा खळखळणारा नितळ झरा आहे.

६) राष्ट्रसंताचे मानवतावादी विचार वैश्विक आहेत.

७) राष्ट्रसंत भारतांच भूषण तर साहित्य मोठे संचित

८) राष्ट्रसंत जीवनाचे भाश्यकार

९) राष्ट्रसंत समाजाचे चालते बोलले विद्यापीठ.

**संदर्भग्रंथ :—**


१) ग्रामगीता :— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरित्र, लेखक— डॉ. भास्कर गिरधारी

३) राष्ट्रसंताची अमृतधारा — भाग १,२,३ तुकडोजी महाराज

४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ — रा.तु.भागवत/सुभाश सावरकर

५) राष्ट्रसंताच्या सहवासान—मोहोडबाबा

६) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : व्यक्ती आणि वाङ्:मय—डॉ. अक्षय कुमार काळे

७) ग्रामगीता सुबोध निरुपण—डॉ.अशोक कामत.


◆◆◆

# विमुक्त भटक्यांच्या चळवळीला दिशा देणारे आत्मकथनः 'कत्ती'

**डॉ.मारोती कसाब,**
मराठी विभाग
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर.

'भारत हा कधी कधी माझा देश आहे ', असं विनोदानं कवी रामदास फुटाणे म्हणाले होते. त्याआधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही 'आय ह्याव नो मदर लँड ' म्हणजे मला मातृभूमी नाही, देश नाही असं विधान केलं होतं. स्वातंत्र्यानंतर भारतात लोकशाही आली. राज्यघटना आली. कायदे कानून आले; मात्र हे सर्व कागदावरच राहिले. राज्यघटनेच्या पहिल्या पानावर, सरनाम्यात दिलेले समतेचे वचन वास्तवात पूर्ण झालेच नाही. " आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन; आमच्या संविधान सभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत" अशी स्वतःलाच उद्देशून केलेली ही उद्घोषणा केवळ कागदावरच राहिली आहे. जरी सगळेच या देशाचे रहिवासी या देशाचे नागरिक असले तरी या नागरिकांमध्ये कमालीची आणि प्रचंड तफावत आढळून येते. ही तफावत आणि दरी कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. आज तर कधी नव्हे एवढी माणसाची किंमत कमी झाली आहे. जातीच्या, धर्माच्या, लिंगाच्या आणि गरिबीच्या कारणावरून काही माणसांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नाकारला जात आहे. त्यात दलित, आदिवासी, स्त्रिया आणि विमुक्त भटक्यांचा बळी या व्यवस्थेकडून पद्धतशीरपणे घेतला जात आहे. आणि निर्लज्जपणे त्याचे समर्थनही केले जात आहे. निर्ढावलेल्या शोषकांची संघटना वाढीस लागली असून, शोषित मात्र दिवसेंदिवस विभागले जात आहेत.

' ज्याची जात त्याचीच बात ' अशी आजची परिस्थिती असताना शेकडो जाती- उपजातीत विभागलेल्या विमुक्त भटक्यांची अवस्था फारच बिकट झाली आहे. राहायला घर नाही आणि सांगायलाही गाव नाही अशी त्यांची परिस्थिती. ही परिस्थिती बदलण्यासाठी 'उपरा'कार लक्ष्मण माने यांनी साताऱ्यातून विमुक्त भटक्या जातींची संघटना बांधली आणि या संघटनेला मराठवाड्यातून निलंगा येथील विलास माने यांनी पाठबळ दिले.

१९८० ते ९० या दशकात विमुक्त भटक्यांची चळवळ जोर धरू लागली होती. दलित पँथर मुळे समाजातील दबलेले, पिचलेले सर्व समूह जागे होत होते. याच काळात मराठवाड्यात नामांतर आंदोलन सुरू झाले आणि त्यानंतर दलितांच्या घरांच्या राख रांगोळी आणि कत्तलीही झाल्या. याच काळात समांतरपणे दलितांबरोबरच विमुक्त भटक्यांवरही अनन्वित अत्याचार सुरू

झाले. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीच लक्ष्मण माने यांनी सुरू केलेल्या चळवळीला विलास माने यांनी आपल्या संपूर्ण ताकदीचा वापर करून मराठवाड्यात सर्वदूर पोहोचविले. विलास माने केलेल्या चळवळीचा लेखाजोखाच 'कत्ती' या आत्मकथनात मांडला आहे. १४ एप्रिल २०१८ या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मुंबईच्या ग्रंथाली प्रकाशनाने विलास माने यांचे हे दोनशे बत्तीस पानांचे आत्मकथन प्रसिद्ध केले आहे.लेखकाने हे आत्मकथन 'भटक्या- विमुक्तांच्या व्यथा-वेदनेस ' अर्पण केले आहे. ही अर्पण पत्रिकाच मोठी बोलकी आहे.' उपरा'कार पद्मश्री लक्ष्मण माने यांची प्रस्तावना या आत्मकथनास लाभली असून, लेखकाचे चळवळीतले साथीदार 'उघडा दरवाजा' कार रामराजे आत्राम यांचे 'दोन शब्द' या आत्मकथनाची सत्यता सिद्ध करणारे आहेत. 'कत्ती' तली ही कहानी ५ जून १९५६ रोजी हलगरा ता. निलंगा जि. लातूर येथे 'काडी काडी जमवून आपला संसार चालविणाऱ्या कैकाडी' जमातीत जन्मलेल्या विलास माने यांची आहे. लेखक लिहितो, " माझी माय महाराष्ट्रातल्या मातीतली तर बाप कर्नाटकातला. महाराष्ट्रातल्या मातीत बाप पाय खवून बसला. त्यानं चक्क माझ्या आजोळात संसार मांडला. माईनं कर्नाटकी माणसाचा उद्धार केला. हा उद्धार जन्मभराचा भोग झाला. बाप आणि माय भटकत भटकत संसाराचा खेळ सुरू होता. जिथं गावाची हागनदारी तिथं आमची वतनदारी." लेखकाचे वडील बाबुराव हे कर्नाटकातील भालकी जवळच्या मस्कल या गावचे. म्हणून त्यांचं आडनाव मस्कले. बाबुराव मस्कले हे भटकंती करत करत निलंगा तालुक्यातील हलगरा येथे आले आणि तिथेच त्यांचं लग्न झालं. त्यांनी संसार थाटला. आधीच उपरे त्यात सोयऱ्यांच्या गावात राहणारे म्हणून जाती कडूनही उपरेपणा बाबुरावांच्या वाट्याला आला. बनात असलेल्या शिंदीच्या फोकांपासून टोपले, गुमे, सलद, कणगी आदी वस्तू बनवायच्या आणि त्या गावात नेऊन विकायच्या. त्यावरच या कुटुंबाची उपजीविका चालत असे. 'दारू पिणे' हा कैकाडी आणि इतर सर्व ४२ भटक्या जमातींचा जणू हक्कच. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत कोणताही विधी असो दारू ठरलेलीच. व्यसनांबरोबरच कमालीची अंधश्रद्धा आणि देवभोळेपणा त्यांच्या पाचवीलाच पूजलेला.

वर्षभर मरमर करायची आणि जमलेला पैसा देवाच्या कंदुरीत खर्च करायचा. कोंबड्या बकऱ्यांचा बळी द्यायचा. लेकरांना शिक्षणापासून वंचित ठेवून पोटापाण्यासाठी पिटाळायचे. जो धर्म आपल्या सावलीलाही उभं राहू देत नाही, त्याच्यासाठी जीव द्यायचे. अज्ञानी राहून प्रचंड दुःख, दैन्य आणि दारिद्र्य भोगायचं. हे सगळं भटक्यांच्या वाट्याला आलेले जीवन बदलण्यासाठी विलास माने यांनी चळवळ सुरु केली. अनेक अडचणींवर मात करत ते दहावी पास झाले. पुढे पदवीधर झाले. सोयरीक जमल्याबरोबर दावणीचं गाढव मेलं म्हणून सोयऱ्यांनी नाकारलेल्या कलावतीशी विलासरावांनी अंधश्रद्धा नाकारून विवाह केला. धनेगावच्या लक्ष्मण गायकवाड आणि दवन हिप्परग्याच्या उत्तम माने यांच्यासोबत चळवळीला प्रारंभ केला. निलंग्यात राहायला गेल्यावर हरिश्चंद्र सुडे यांच्यासारखा सामाजिक गुरु लाभला. सुडे यांनी

विलासरावांना सामाजिक कार्याच्या प्रशिक्षणासाठी नागपूरला पाठविले आणि तिथून विलासरावांचे जीवनच बदलून गेले.दरम्यान निलंगा येथे एका वासुदेवाच्या बायकोच्या अंगावर असलेले चांगले लुगडे पाहून पोलिसांनी तिला चोर ठरवले. तिच्या अंगावरचे लुगडे फेडून घेतले. तेव्हा या अन्यायाविरोधात विलास माने यांनी निलंगा पोलिसांवर मोर्चा काढला आणि चळवळीची सुरुवात झाली. हरिश्चंद्र सुडे, श्रीपतराव सोळुंके, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, उत्तम माने, टी.एम.कांबळे ,जयप्रकाश दगडे, बाबा आढाव, मोतीराज राठोड, आसाराम जाधव गुरुजी आणि रामराजे आत्राम यांच्या उपस्थितीत निलंग्याला दोन दिवसांचे भटके-विमुक्त कार्यकर्त्यांचे शिबिर झाले. विलास माने यांनी निलंगा, किल्लारी, लातूर, उदगीर, जळकोट, अहमदपूर, भालकी, बिदर परिसरात जिथे कुठे विमुक्त भटक्यांवर अन्याय होईल, तिथे धाव घेऊन प्रशासनाच्या विरोधात मोर्चे काढले. लोकांना न्याय मिळवून दिला. त्याच बरोबर आश्रमशाळा, साक्षरता अभियान, बौद्ध धम्म प्रचार- प्रसार, व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा निर्मूलन सारख्या कार्यातून रचनात्मक कार्यही केले. विमुक्त भटक्यांना शासकीय सोयी सुविधा मिळाव्यात, त्यांच्यावरील अन्याय- अत्याचारांना प्रतिबंध करावा, त्यांचा अनुसूचित जाती जमाती मध्ये समावेश करावा या मागण्यांसाठी विलास माने यांनी कित्येकदा नागपूर, पुणे, मुंबई पर्यंत जाऊन उपोषण केले. आंदोलनात सहभाग घेतलेला आहे.

१९७८ ते २००६ या पंचवीस-तीस वर्षांतील घटना या आत्मकथनात असल्या तरी एकूणच महाराष्ट्राचे सामाजिक जीवन या ग्रंथामध्ये आलेले आहे. विमुक्त भटक्यांच्या चालीरीती, त्यांचं दुर्लक्षित उपेक्षित जीवन, त्यांच्या अंधश्रद्धा, त्यांच्या जातपंचायती, त्यांची व्यसनं, त्यांचं जगणं मरणं याचा आलेखच विलास माने यांनी यामध्ये रेखाटला आहे. विशेषतः या आत्मकथनाची साधी सरळ भाषा ही वाचकाला पकडून ठेवते. कैकाडी भाषा, बेरडांची बेरडी भाषा, पारधी भाषा, मसजोग्यांची भाषा अशा विविध भाषांचा परिचय वाचकांना होतो. 'तीन दगडांच्या चुलीची भावकी' मानणाऱ्या चाळीस भटक्या जमातींची एक वज्रमूठ विलास माने यांनी मोठ्या विश्वासाने उभारलेली या ग्रंथातून दिसून येते. भटक्यांच्या वरील अन्यायाच्या विरोधात लढताना प्रसंगी विश्वनाथ बिराजदार, बालाजी सावरे, भालचंद्र बिराजदार, डांगेवाडीकर महेबूब सारखे जात दांडगे आणि पालीवाल सारखे मस्तवाल माजलेले पोलीस अधिकारी, डुक्कर बंदी करणारे देशमुखासारखे प्रशासकीय अधिकारी अंगावर येतात, मात्र कायद्यापुढे त्यांना चळवळीमुळे झुकावे लागते.

विलास माने यांनी अनेक बलात्कारित स्त्रियांना न्याय मिळवून दिला. अनेक भटक्यांच्या खुनांना वाचा फोडली. अनेकांना स्मशानभूमीची जागा मिळवून दिली. राहण्यासाठी जमिनीचे कबाले मिळवून दिले. १९८६ साली भटक्यांच्या शोधासाठी संपूर्ण महाराष्ट्रात शोध यात्रा काढली.स्वतःच्या जातीचा व इतर सर्व समाजाचा विरोध पत्करून २००१ साली स्वतःच्या मुलीचे बौद्ध पद्धतीने लग्न लावले. त्याकाळात जातीचा रोष पत्करून केलेली ही धम्मक्रांती पुढील

काळात भटक्यांसाठी जीवनज्योत ठरली. त्यानंतर एक पाऊल मागे येत आपल्या दुसऱ्या मुलीचे लग्न सत्यशोधक पद्धतीने लावले. २००६ साली लक्ष्मण माने ,एकनाथ आव्हाड आदी कार्यकर्त्यासह नागपूरच्या दीक्षाभूमीवर विधिवत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. २००७ साली मुंबईच्या रेसकोर्स मैदानावर मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, रामदास आठवले, लक्ष्मण माने यांच्या प्रमुख उपस्थितीत लाखो भटक्यांना धम्मदीक्षा दिली. २००८ साली आपल्या मुलाचा वाजत-गाजत बौद्ध पद्धतीने विवाह घडवून आणला. चळवळीत अनेक चढ-उतार आले. मात्र विलास माने आजही न थकता विमुक्त भटक्यांना परिवर्तनाच्या मार्गाने घेऊन निघालेले आहेत. या प्रवासात त्यांच्या जीवावर अनेकदा बेतले. त्यांच्यावर मोठमोठे आघात झाले. स्वतःच्या भावाला त्यांच्या विरोधात फीतऊन देण्याचे काम दुष्मनांनी केले. या आत्मकथनातील महत्वाचा भाग म्हणजे विलास माने यांची राजकीय कामगिरी होय. मुख्यमंत्री राहिलेल्या एका व्यक्तीच्या विरोधात एक सामान्य कार्यकर्ता उभा करून त्याला निवडून आणण्याची किमया विलास माने यांनी केलेली आहे. कामगार नेते माणिक जाधव हे आमदार होणे म्हणजे भारतीय लोकशाहीचा मोठा विजय होय. विलास माने यांची पत्नी निलंगा नगरपरिषदे वर निवडून आली हा सुद्धा लोकशाहीचा विजय होय.विलास माने सारखा कार्यकर्ता अनेकदा अडचणीत येतो. मात्र चळवळीच्या निष्ठेने हा कार्यकर्ता 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या संत तुकारामांच्या भूमिकेतून लढत आहे. विमुक्त भटक्यांना अंधश्रद्धेच्या, गरीबी, लाचारी, दैववादाच्या आणि अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी गौतम बुद्धाच्या शील आणि शांतीच्या मार्गावरुन पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करीत आहे. एकूणच 'कत्ती' हे आत्मकथन आजवरच्या दलित, विमुक्त भटक्यांच्या आत्मकथन यापेक्षा वेगळे असून, परिवर्तनाच्या चळवळीला दिशा देणारे आहे. लेखकाचा बेडरपणा आणि तेवढाच प्रांजळपणा वाचकाच्या अंतःकरणाला भिडल्याशिवाय राहत नाही. आणि हेच या आत्मकथनाचे यश आहे. विलास माने यांना पुढील लेखनासाठी आणि चळवळीसाठी माझ्या मन भरून शुभेच्छा...!

संदर्भ १. माने विलास 'कत्ती' , ग्रंथाली पब्लिकेशन, माटुंगा (पश्चिम) मुंबई, प्रथम आवृत्ती २०१८

◆◆◆

# कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता: एक आस्वाद

**प्रा.डॉ.विनोद उत्तमराव भालेराव.**
मराठी विभागप्रमुख
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा,
ता.कळमेश्वर जि.नागपूर —४४१५०२

**प्रस्तावना:**

कुसुमाग्रज म्हणजेच वि.वा. शिरवाडकर, यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे निंबाळकर तालमीजवळच्या लिमये वाडयात झाला.त्यांचे आजोबा नागेश गणेश शिरवाडकर पुण्याला शिक्षण खात्यात नोकरी करीत होते.व वडील नागेश गणेश शिरवाडकर पण ते आपल्या चुलत्याकडे दत्तक गेल्यामुळे विष्णू वामन शिरवाडकर असे संबोधिले गेले.

कुसुमाग्रज हे केशवसूत ते मर्ढेकर या आधुनिक मराठी कविता ते नवकविता या मध ील प्रमुख सांधा आहे.प्रेम,निसर्ग,गुढगुंजनात्मक व स्थडील संप्रदायाची रसपूर्ण कविता यांनी मराठीला दिली.जीवनातील शाश्वत मांगल्यपूर्ण अंतिम नि: संदिग्ध कैवल्यपूर्ण मूल्यभावावरचा आविष्कार करणारी त्यांची आत्मनिष्ठेतून वस्तुनिष्ठतेकडे नाटयात्मकतेकडे प्रवास करणारी कविता आहे.मानवी जीवनातील चैतन्यावर व मांगल्यावर तिची असिम श्रध्दा आहे.त्यांच्या या अपार्थिव व्यक्तिमत्त्वाची जडणघडण नाशिकच्या परिसरात कशी होत गेली.याचाही परिवर्तनाचा प्रवास त्यांच्या लोकिक जीवनातून येतो.

कुसुमाग्रजांनी, प्रेमकविता,सामाजिक कविता,निसर्ग कविता,गुढगुंजनात्मक कविता इत्यादी कवितांचे लेखन केले.पण त्यांची' राष्ट्रीय कविता'ही स्वातंत्र्योत्तर पारतंष्यात राष्ट्र या संकल्पनेचा ददय ब्रिटीश संस्कृतीने झाला यातूनच कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता निर्माण झाली.

**राष्ट्रीय कविता:**

वि.वा.शिरवाडकरांच्या कवितेत राष्ट्रीयत्त्वाची जाणीव ही पाश्चात्य संस्कृतीच्या संविध ाानातून उदयाला आली.अभिजातवादानंतर पारलौकिकतेनंतर डार्वीन व रुसोच्या वैचारिक क्रांतीतूनच केशवसुतांचा व्यक्तिवाद आला मानवी ऊर्जस्वल स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या या कवीला ब्रिटिश सत्तेतील पारतंष्याची काळोखी रात्र जाचक वाटली असणार पारतंत्र्यामुळे आम्हाला पहायला डोळे राहिलेले नाहीत व ऐकायला कान राहिले नाही.'गोष्टी घराकडील मी वदता गडयारे' मध्ये कवी म्हणतात.

''बापू! गडया ध्वज उभा करशील काय
तू देशकारण करुं झटशील काय
बापू! जनांत दिवटी धरशील काय
स्वातंत्र्यदेव मानसा भजशील काय''[१]

आधुनिक मराठी कवितेत राष्ट्रीय भावनेचा उत्कट आविष्कार रेव्हरंड ना.वि. टिळक

विनायक, कवी, गोविंद व स्वा.सावरकर यांच्या कवितेत. झालेला दिसून येतो. १९३२ ते १९४१ या काळात कुसुमाग्रजांच्या प्रतिभेला बहर आलेला दिसून येतो.केशवसुत आपल्या कवितेत समाजाविषयी आपली व्यक्तिगत प्रतिक्रिया कवितेतून व्यक्त करीत होते. कुसुमाग्रज आपल्या कवितेतून प्रत्यक्ष समाजाचीच प्रतिक्रिया व आशाआकांक्षा व्यक्त करीत होते. काव्यपरंपरेचे संस्कार स्वीकारुन समाजाचे सुख दुःख वस्तुनिष्ठपणे व्यक्त करणाऱ्या या अभिजात कविता नाटयात्मक प्रतिभेच्या वीणेने विणलेल्या आहेत.

व्यक्तिगत व समूहात्मक प्रतिक्रियांचे सामर्थ्य घेत त्या आपले स्वतंष अस्तित्त्व सिध्द करतात.१९४२ पर्यत समाजमन क्रांतीच्या अग्नीने धगधगले होते.प्रत्येक श्रेष्ठ कवीजवळ एक नवी काव्यदृष्टी असते केशवसुत.बालकवी,गोविदाग्रज,तांबे,मर्ढेकराप्रमाणे ती कुसुमाग्रजाजवळही आहे.आपल्या कवितेला त्यांनी यज्ञातील समाधीची उपमा दिलेली आहे. समाधी या यज्ञातील अग्नी फुलवितात आपल्या कवितेत रसिकांच्या हृदयातील आंतरअग्नी त्यांना चेतवायचा व फुलवायचा आहे.समीधामध्ये ओलावा व मकरंद नसतो तर समीधा मुळातच रुक्ष असल्या तरी रसिकांची आंतरअग्नी फुलविण्याचे त्यांचे सामर्थ्य असते. म्हणूनच आपले काव्यविषयक प्रयोजन सांगतांना कुसुमाग्रज म्हणतात.

''समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा
कोठून फुलापरी वा मकरंद मिळावा
जात्याच रुक्ष या ,एकच त्या आकांक्षा,
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा''[२]

कुसुमाग्रजांच्या राजकीय कविता एका कालखंडाची चौकट भेदेन तोच आशय सार्वकालिक करण्याचा प्रयत्न करतात.कुसुमाग्रजांच्या कवितेचा विचार करतांना त्या काळातील पार्श्वभूमीचा विचार करावा लागतो. स्वातंष्यपूर्व काळातील घडामोडी समजून घेतांना त्या काळाची पार्श्वभूही लक्षात घ्यावी लागते. अहि— नकुल ,क्रांतीचा जयजयकार, कोलंबसाचे गर्वगीत,टिळकाच्या पुतळयाजवळ,किनारा,मायदेशीचा वारा,फेरीवाला.आग्राच्या किल्यात ,'खाकी' या कवितेत 'दृष्टिने पाहण्यायोग्या आहेत' 'अहि — नकुल' ही कविता वरवर सर्प व मुंगुसाचा संघर्ष व्यक्त करणारी असली तरी तिच्यातील आशय अतिसुक्ष्म व व्यापक तसाच अंतर्भेदी आहे.कितीही अवाढव्य मजबूत व व्यापक तसाच अंतर्भेदी आहे.कितीही अवाढव्य मजबुत व बलाढय साम्राज्यशाही असली तरी,सर्वसामान्य जनतेच्या उठावापुढे ती फार काळ टिकू शकत नाही.शेवटी या संघर्षात सामान्य जनतेच्या क्रांतींचाच विजय होत असतो हे चिरंतन सत्य या कवितेत कवीने प्रतीकबध्द योजनेतून व अलंकार शैलीतून सांगितलेले आहे. शेवटी जनताजनार्दन हीच सर्वश्रेष्ठ शक्ती आहे.

''संग्राम सरे रक्ताचे ओघळ जाती
आनंदे न्हाती त्यात तृणाची पाती
पिंजून कापसापरी पडे तो नाग''

ते खंड गिळाया जमले कीटक भोंती''[३]

अहि — नकूल मधील नाटयबीज म्हटले तर सामाजिक आणि राजकीय आहे.मुळात पाहिले तर दोन सनातन विरोधी प्रवृत्तीच्या ठिकाणी असणाऱ्या शक्तीचा हा संघर्ष आहे. ज्याच्या मार्गावर तृणाची पाती लवत होती,पर्णावर फुले माना टाकून पडत होती,झुडपे थरथरायची व नववेली जणू या सर्पाच्या साम्राज्यापुढे गुलाम व्हायच्या तोच सर्प क्षणभरात छिन्नविछिन्न झाला त्याची विषधार धूळीत व्हायला लागली ऊर शतखंडित झाले,त्याच्या विछिन्न झालेल्या तनूतनू नकुलाने दात काढले व वनात वाऱ्यासारखा संचार केला स्पर्धकाला —प्रतिस्पर्धक शेराला सव्वाशेर जगात मिळतोच हे सम्यक सत्य इथे कवीने सांगितलेले आहे. मूळ संघर्षाचे अस्तित्त्व इथे अखंड कायम राहते.दोन विशिष्ट अर्थातील चातुर्याने खेळविलेले रुपक किंवा प्रतिक एकसंघतेमुळे कलात्मक पातळीवर जाते.

'क्रांतीचा जयजयकार'या कवितेत कवीने राजबंधाच्या भावनांचे व समूहात्मक समागमनाच्या आशाआकांक्षाचे प्रतिनिधिक चित्रण केलेले आहे. गांधीजीच्या अहिंसक क्रांतीच्या दैवीगुणांचा आलेख असला तरी विश्वातील पुरोगाामी क्रांतीचे समर्थन या कवितेत केलेले आहे.मातृभूमीच्या भारतमातेच्या रक्षणासाठी १९४२ साली जे स्वातंत्र्याचे आंदोलन झाले त्यातील जिवंतपणीच मृत्यूला जिकणाऱ्या क्रांतिविरांची अथांग श्रध्दा व आवेश या कवितेत प्रगट झालेला आहे.

''कशाच आई भिजविसी डोळे उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतिल त्या ज्वालांतुनी भावी क्रांतीचे नेते''[४]

या शब्दात कवीने राजबंद्याच्या भावनासह समाजमनाच्या समूहात्मक आशआकांक्षाचे चित्रण केलेले आहे. 'जालियनवाला बाग' या कवितेत ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीत भारतातील जनतेने स्वातंत्र्यासाठी उठाव केलेला असतांना डायरने कसा नृशंस संहार केला.या घटनेचे काव्यात्मक वर्णन आहे. या कवितेतील नाटयात्मकता व उपहासप्रचूर शैली लक्षणीय आहे. जालियनवाला बागेतील अमानुष हत्याकांड व हिंदी बांधवाची झालेली क्रुर कत्तल खिस्ताचे करुणेचे अनुयायी म्हणविणाऱ्या ब्रिटिश सैनिकाकडून व्हावी याचे नवल वाटते, दया, क्षमा व शांतीचा उपदेश करणाऱ्या क्रुसावर चढणाऱ्या खिस्ताचे अनुयायी म्हणणाऱ्याांनी एवढा माणुसकीचा संहार करावा.

'जा जरा पुर्वेकडे' चीन आणि जपानी युध्दात राक्षसी अत्याचारांचे चित्रण आहे. कुसुमाग्रजांच्या जाणिवा राष्ट्रापुरत्या मर्यादित नसून त्या विश्वव्यापक आहेत. पूर्वेची संस्कृती दया,करुणा त्यागावर आधारलेली असल्यामुळे पौर्वात्य दानवी संस्कृतीचे दर्शन कवीने उपरोधिक व उपहासगर्भक शैलीतून केले आहे.अरे वाळवंटातले ते कुत्र्याचे सडलेले मढे कुरतडीत काय बसलाय सडलेले मढे कुरकुरीत काय बसलात रक्ताच्या नद्या वाहवणे व मानवी संहार

करणे हीच प्रगती आहे काय.पौर्वात्य संस्कृतीतील सत्ताकांक्षी मानवी पशूतुल्य कोटीत शिरुन अत्याचाराची परमावधी गाठतो, हे विदारक सत्य कवीन आपल्या प्रतिभेने व्यगात्मक व उपहासपूर्ण चित्रण केले आह

''वाळवंटी कोरता का एक श्वासाचे मढे
जा गिधाडांनो पुढे
जेथ युध्दाची धुमाळी गंज प्रेतांची पडे,
जा जरा पूर्वेकडे''[५]

त्याच प्रमाणे 'सात' ही कवीची अशीच राष्ट्रीय वृत्तीची कविता आहे.कथासूत्र लहानसे असूनही राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करण्याची वीरवृत्ती इथे दिसून येते.प्रतापराव गुजर यांनी रणात पाठ फिरविल्यामुळे शिवाजी महाराजांनी त्यांना पाठविलेल्या शिवाजी महाराजांनी त्यांना पाठविलेले पत्र,त्या पत्रामुळे आपल्या अपराधाचे परिमार्जन करण्यासाठी आपल्या प्राणाची होळी पेटविणारे ते सात मराठी गडी,यामुळे त्यांच्या त्यागाचे महत्त्व कवीने वर्णन केले आहे.दगडावर पाण्यावर,क्षितीजावर,वाऱ्यावर सर्वत्र ही कहाणी वज्रलेप ठरली.तसेच 'टिळकांच्या पुतळयाजवळ' या कवितेत टिळकांच्या मृत्यूंजय जीवनाचे चित्र इथे हुबेहूब रेखाटले आहे.टिळकांच्या पुतळयांचे जीवन उर्जस्वल जीवन व क्षणोक्षणी मृत्यूची उजळणी करणारे आपले पामर — जीणे यामधील विसंवाद कवीला जाणवितो आहे कवी कुसुमाग्रज म्हणतात.

''ते होते जीवित — हाती णरुनि हताश
खळवळतो ज्यावर द्रुढ पोलादी पाश
ध्वज चढावयाची एक अदम्य मनीषा
ते होते जीवित. अन् हा जीवित भास''[६]

टिळकांचे जीवन हेच खरे जगणे होते. आपले जीवन हे जगणे नसून जगण्याचा नुसता आभासमात्र आहे.असे कठोर आत्मपरिक्षण कवीने इथे केलेले आहे. 'किनारा'या कवितेत ज्या ध्येयासाठी श्रेष्ठ नेत्यांनी स्वत:च्या जीवनाचा होम केला,ते पदरी पाडण्याची वेळ आलेली असल्यामुळे झालेला आनंद व्यक्त झालेला आहे.'तमाला जणू अग्निचा ये फुलोरा' या ओळीत हा आनंद व्यक्त होतो.या आनंदामुळे स्वातंष्याच्या नाविकांना शिथिलतेची बाधा होऊ नये म्हणून ज्यांनी हौताम्य पत्करले त्यांचे स्मरण केलेले आहे. संग्रामाची शेवटची शर्थ हीच पराक्रमाची व निष्ठेची कसोटी असते. हे या कवितेत सांगितले आहे.'फेरीवाला' या कवितेत संस्कृतीचे पवाडे गाणारेच युध्द करुन मानवी मूल्यांची होळी करीत असतात.या कवितेत युध्दाचा भस्मासूर म्हणजे प्रत्येक्ष काळच — फेरीवाल्याचा वेष घेऊन येतो.त्याचे रुप,वेष व गती व आपला माल खपविण्यासाठी ते वापरीत असलेली थंड पण काळजाचे तोडणारी भाषा आपल्यापुढे त्यांचे निघृण व क्रूर असे चित्र उभे करते.

आजच्या वरवरच्या पोशाखी संस्कृतीमागील ढोंगी प्रवृत्ती कवीने प्रगट केलेली आहे.

आग्रयाच्या किल्यात शिवाजीराजांचे पाल पडले तो क्षण कुसुमाग्रजांच्या दृष्टिने युगप्रर्वक वाटतो या क्षणीच सरळपणाने कपटाचा कपटाचा नि:पात केला.शिवनेरीच्या सिंहाचा दर्शन होताच संगमरपरी जिच्यात स्पंदने निर्माण झाली असावीत.

कुसुमाग्रजांनी 'खाकी'या कवितेत सैनिकांचे दैनंदिन कष्टमय जीवन व रणांगणावरील त्याचे उदात्त जीवन यांच्या विरोधातील महतीचे वर्णन करुन मध्यमवर्गीय वर्ग सैनिकांच्या शौर्याविषयी किती उदासिन असतो हे खालील काव्यपंक्तितून दिसून येते.

''संसाराच्या सीमेवरती
बर्फाच्या मरणाळ कळावर तटावर
तिथे पहा ती गर्द लाल रक्ताची धार
वहात आहे
स्फटिकावरती उन्हात धूसर
अविवेकाचा गर्भ तांबडा
उत्सवतेने
नहात आहे''[७]

'खाकी' या कवितेतील सैनिकाची थोरवी व त्यांचा ध्येयवाद रेखाटला आहे.विजयी सेनापतीचे गुणगााण अनेकांनी गाायले पण वि. वा. शिरवाडकरांनी' सैनिक आणि खाकी' या दोन्ही कवितांमधून सामान्य सैनिकांच्या हौतात्म्याचे वर्णन केलेले आहे.'स्मरण' या कवितेत पारंतष्याचा काळोख संपून स्वातंष्याचा प्रकाश पाहिला,पण ज्यांच्यामुळे प्रकाश पाहिला त्यांच्या त्यागाची  व हौताम्याची आठवण देऊन आपली कृतज्ञत: व्यक्त केली पाहिजे.

''त्या जिवांची जिवंत व मृत राख इथे सांचली
विस्मरणाच्या धुक्यात त्यांची आज कथा लोपली
खुशाल लोपो काळरथाची अखंड आहे गती
पांथा, क्षणभर थांबुन केवळ आठव ती आहुती''[८]

कुसुमाग्रजांच्या या राजकीय कवितांत प्रखर राष्ट्रनिष्ठा व स्वदेशप्रीतीची क्रांतिकारी उत्कट जाणीव आहे.अलंकार्य प्रतिभा व समुहमनसच्या आकांक्षा वस्तुनिष्ठ व नाटयात्मकता प्रतिभेने कल्पनारम्य भाषाशैलीत व्यक्त करण्याचे अभिनव सामर्थ्य आहे.अभिजातवादाला जवळची अशी ही वस्तुनिष्ठ प्रतिमा आहे.स्वातंष्यवीर वि.दा.सावरकरांच्या कवितेतील यज्ञकल्पनेने त्यांच्या मनावर खोल संस्कार केलेले आहे. कुसुमाग्रजांची कविता म्हणूनच स्थंडित संप्रदायाची कविता असल्यामुळे ती कविता नवकाव्याच्या विफलतावादी दृटिकोनापासून दूर राहिली वा. रा.कांत, कृ. ब. निकुम्ब , वसंत बापट व कुसुमाग्रज या सर्व कवीजवळ एका आदर्शवादी मन असल्यामुळे त्यांच्या कविता दुर्बोधतेपासून अलग राहिल्या.स्वत: कुसुमाग्रज आपली काव्यविषक भूमिका सांगतांना म्हणतात.''कविता म्हणजे केवळ अर्थात्मक विधान नसते, एखाद्या विधानाचे केवळ सालंकृत पद्यमय स्वरुपही नसते. तर एखाद्या अनुभवाच्या गाभ्यापर्यत आपल्याला घेऊन जाणारी ती नैसर्गिक शक्ती असते.''[९]

**सारांश :**

अशाप्रकारे कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता ही अग्नी व प्रकाशाची उपासक ,तशीच समुहमनाच्या आाशा —आकांक्षा व्यक्त करणारी आहे.रसिक मनातील आंतर अग्नि ते सतत पेटवित राहते आणि समाज मनाला एक उभारी देण्याचे काम सातत्याने कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता करतांना दिसून येते.

**संदर्भ सूची.**


१) बोरकर— वैद्य (संपादक)‘ कुसुमाग्रजांची निवडक कविता’कॉन्टीनेन्टल प्रकाशन ,पुणे, प्रथमावृत्ती १९६९ पृ.क्र.५०

२) तत्रैव. पृ.क्र.९०

३) तत्रैव. पृ. क्र.५५

४) तत्रैव.पृ.क्र.६५

५) तत्रैव.पृ.क्र.६७

६) तत्रैव.पृ. क्र.८९

७) तत्रैव. पृ. क्र. १६५

८) तत्रैव. पृ. क्र. १६९

९) ठाकरे रमेश, ‘वि. वा. शिरवाडकरः एक आस्वाद’ मुंबई प्रकाशन. १९६८, प्रथमावृत्ती. पृ. क्र.१११

१०) नसिराबादकर, ल. रा. ‘प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास’ फडके प्रकाशन,कोल्हापूर सहावी आ. १९९७

११) उपासे डॉ.शिवशंकर, ‘काव्यशास्त्र परिचय’ फडके प्रकाशन कोल्हापूर, दुसरी आ. २०१७

१२) गोवीलकर डॉ.लीला ‘भारतीय साहित्यविचार’ स्नेहवर्धन प्रकाशन पुणे,२००३

१३) काळे अक्षयकुमार :अर्वाचीन मराठी काव्यदर्शन’ प्रथमावृत्ती,पा. ना. बनहट्टी. प्रकाशन, नागपूर. १९९९

१५) सावदेकर आशाः ‘कविता विदर्भाची’ प्रथमावृत्ती, वि. सा. संघ, नागपूर १९९९

१६) संत इंदिराः शेला’ प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुबंई, १९६६


◆◆◆

# संत साहित्यातील संतकवियित्री

**प्रा. डॉ. सुनंदा चरडे**
मराठी विभागप्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी

**भूमिका :**

सत् म्हणजे सत्य ज्यांच्यामध्ये सत्प्रवृत्ती आहे असा तो संत संतपदाला पोहोचणे मग ती स्त्री असो वा पुरूष संतपदाला पोहोचणे साधी गोष्ट नाही. कबीरजींनी म्हटले आहे की, 'जो मानव न बन सका वो संत क्या बनेगा' त्यांचे हे मत आजही तितकेच महत्त्वाचे आहे. याचे कारण असे की आज २१ व्या शतकात स्वत:ला संत म्हणवून घेणारे अनेकजण आहेत. परंतु त्यांच्यात आंतरिक संतत्वाची प्रतीती असते का? हा खरा प्रश्न उद्‌भवतो. त्यामुळे आजच्या संतांपेक्षा मला तत्कालीन संतपंरपरेतील संत कवियित्रीची सत्प्रवृत्ती इथे उद्‌धृत करावीशी वाटते.

आपल्या प्राचीन मराठी वाङ्‌मयात मोलाची भर घालणाऱ्या संतकवयित्री या मोजक्याच आहेत. परंतु या मोजक्याच संत कवयित्रींच्या साहित्यावर तत्कालिन राजकिय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा परिणाम नक्कीच झाल्याचे जाणवते. या संत कवयित्रींच्या वाङ्‌मयीन जीवनावर भोवतालच्या वातावरणाचा परिणाम झाल्याचे जाणवते. या संत कवियित्रींची दृष्टी साहित्याभिमुख असली तरी पुरूष प्रधान संस्कृतीमुळे एक स्त्री म्हणून त्यांच्यावरही बंधन आलीत आणि त्या बंधनाचा जाचक परिणाम कुठेतरी त्यांच्यावर झाल्याचं वाचनाद्वारे लक्षात येतं.

अशा या थोर संतकवयित्रींचा या पेपरच्या माध्यमातून थोडक्यात परिचय आणि कार्य व्यक्तिमत्त्वाचा थोडक्यात आढावा या लेखाद्वारे घेण्याचा उद्‌देश.

स्त्री एका टप्प्यावर आपलं स्थान शोधू पाहते (पूर्वी पासूनच), तोच तिला बंधनात जखडल्या जाते कधी ती बंधन जाचक असतात तर कधी ती सैल झाल्यास सारखीच फक्त वाटतात.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रामध्ये अकराव्या—बाराव्या शतकात संत संस्कृतीचा उदय झाला. तो यादव काळ होता. प्रत्येक देशातील धर्मसंस्कृती वेगवेगळी असली तरी त्या त्या पंथाच्या संतसंस्कृतीचा उदय आणि विकास होतच असतो. ''ऋषि संस्कृती आणि संतसंस्कृती यांच्यामधील भेद असा की ऋषि संस्कृती भोवती जे पौराणिकतेचं वलय होतं ते संत संस्कृतीभोवती नव्हतं. ऋषी स्वत: ध्यान—मनन, चिंतन—तप करीत, आपल्या शिष्यांना ज्ञान दान करीत व त्यांच्यावर सुसंस्कार करून त्यांची जडण—घडण करीत त्यांचे आश्रम जनसमुदायात नसून त्यापासून दूरवर निसर्गाच्या सान्निध्यात, एकांतात असत. संत हे जनसामान्यातलेच असून, ते जनसमुदायातच राहत. आपण त्यांच्यापैकीच एक आहोत ही त्यांची धारणा व मानसिकता होती त्यामुळं ज्यांच्यामध्ये आपण राहतो, त्याचंच प्रबोधन नि त्यांचाच उद्धार करण्याचं व्रत संतांनी घेतलं होतं. संत संस्कृतीच्या उद्याचे मूलस्त्रोत संतांच्या या सामाजिक मानसिकतेत

आढळतात. स्वोद्धाराप्रमाणंच लोकोद्धार हे संतसंस्कृतीचं प्रमुख उद्दिष्ट होतं. त्यामुळे संत लोकांतच राहिले. त्यांच्या सुखदु:खांशी समरस झाले. त्यांच्या ऐहिक समस्यां संतांना माहीत होत्या. त्यासाठी संतांनी त्यांना मार्गदर्शन केलं'' या यु.म. पहाणांच्या उद्‌गारावरून सामान्य माणसांबद्दल वाटणारी कळकळ संतांच्या उद्‌भवास कारण असल्याचे जाणवते. आपल्या निर्मळ विचारांच्या हेतूतून जनसमुदायाचे हित साधले जावे असाच विचार संतांच्या सत्प्रवृत्तीत दिसतो. स्वहितापेक्षा जनहित संतांना महत्त्वाचे वाटते. परंतु तत्कालीन परिस्थितीचा विचार केला तर किंवा काल, आज आणि उद्या अशाप्रकारच्या विचारांमधून एक लक्षात येते की स्त्री ही संतपदाला पोहोचली असली, समाजहिताचा विचार स्वाभाविकपणे कळकळीने करित असली तरी पण एक सत्य नाकारता येत नाही की स्त्री ही स्त्रीच असते. आधी स्त्री नंतर तिचे पद यासाठी सुमती अरकडी आपल्या 'भारतीय स्त्री संत, रत्न' या पुस्तकात म्हणतात. ''संतपदाला पोहोचताना या स्त्रियांना सासरच्या लोकांकडून तसेच समाजाकडून किती संकल्पाना तोंड द्यावे लागले. किती हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. पण त्यांनी जो परमेश्वर भक्तीचा मार्ग स्विकारला होता त्याकरिता सासरची, समाजाची बंधने झुगारून देऊन आपल्या अभंगातून भक्ती मार्गाचा प्रसार केला. संत मीराबाई संत वेताळाबाई यांना आपली भक्ती सिद्धकरताना विषही पचवावे लागले. सोयराबाई, निर्मळा या अस्पृश्य समाजातील जन्माला आलेल्या स्त्रियांना छळ, हालअपेष्टा किती सहन कराव्या लागल्या. साक्षर नसताना त्यांनी अभंग रचना केली. मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, लललेश्वरी अशा कितीतरी स्त्रिया आहेत की त्यांना समाजाने नाकारले. पण परमेश्वराने तारले व समाजाला परमेश्वर भक्तीचे महत्त्व पटवून दिले व संत पदाला पोहोचवून समाज जागृतीचे कार्य केले.'

वरिल अवतरणावरून असे लक्षात येते की स्त्रियांना संत पदापर्यंत पोहोचायला वेगवेगळ्या संघर्षातून जावे लागले. कधी घरातील संघर्ष तर कधी समाजातील. तत्कालीन स्थिती लक्षात घेता स्त्रियांना बंधनं होती, आहे आणि राहिल असे वाटल्यावाचून राहत नाही. (ज्याप्रमाणे चित्रपटात नायकाबरोबर खलनायक असावा लागतो. मग हा खलनायक कधी व्यक्ती तर कधी परिस्थिती असू शकतो.)

अशा या संत स्त्रियांनी स्वत: संघर्षमय जीवन अनुभवून सुद्धा समाजाला सन्मार्ग दाखवून सत्‌विचाराने प्रेरित केले. समाजासमोर उदात्त अशा जीवनाचा आदर्श उभा केला. संत कवयित्रींनी त्याग आणि सत्प्रवृत्तींचा स्वीकार करण्याची शिकवण दिली. भक्तिसाहित्याचा वारसा आपल्याला संत संस्कृतीमुळेच मिळाला. या संत कवयित्री आज आपल्यात नसल्या तरी त्यांचे विचार, त्यांचे जीवनचरित्र आपल्याला अतिशय मौलिक असे मार्गदर्शक ठरतात. 'संस्कृतीनं केवळ कर्तव्यपरायणतेचं भानच समाजाला दिलं नाहीतर हे जीवन कसं जगावं, किती चांगल्या प्रकारे जगावं त्या उदात्त जीवनशैलीचंही भान दिलं. प्रत्येकात सत्प्रवृत्ती असतात नि दुष्प्रवृत्ती असतात. दुष्प्रवृत्तींना नकार नि सत्प्रवृत्तींना होकार देण्याची मानसिकता संत संस्कृतीनं समाजात निर्माण केली, हे तिचे थोर उपकार होत. संत संस्कृतीनं पवित्र विचारसंहिता नि आचारसंहिता निर्माण केली व समाजाच्या आचार—विचारांना योग्य दिशा देऊन त्यातील भरकटलेपण नाहीसं केलं. त्यामुळे समाजातील स्खलमप्रवृत्तीला काही प्रमाणात का होईना आळा बसला.''[३] एवढे संतांचे कार्य समाजाप्रती महत्त्वाचे आहे. तेव्हा

आपल्या भारतात झालेल्या स्त्री संतकवयित्रींचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**महदंबा —**

महानुभाव पंथात १३ व्या शतकात होऊन गेलेली आद्य मराठी कवयित्री महदंबा, महदाईसा ऊर्फ रूपाई या नावाने ओळखली जाणारी ही महाराष्ट्रातील आद्य मराठी कवयित्री गोदावरी नदीच्या तीरावर पूरी या गावी राहणाऱ्या वामनाचार्य या ब्राह्मणाची ती पत्नी होती. ती वेदविद्या पारंगत होती. ही सुरूवातीपासूनच धार्मिक वृत्तींची होती. ती व तिचे दोघेही ब्राह्मण घराण्यातील सर्व धामिक  सर्व धामिक कृत्ये करीत असत.

देवगिरीच्या राजाकडे आलेल्या विद्वान पंडितासोबत महदंबा वादविवाद करून जिंकली होती. तेव्हा राजाने खुश होऊन महदंबेला पाच गावे बक्षिस दिली होती. कवयित्री महदंबा हिला थोडयाच काळात वैधव्य आले होते. ती वामनाचार्य यांची नात होती. वैधव्यप्राप्तीनंतर ती आपल्या आई—वडिलांकडेच राहत होती. महदंबा सुरूवातीपासूनच धार्मिक वृत्तीची असल्यामुळे महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर महाराष्ट्रात आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी आले आणि महदाईसा त्यांची शिष्या बनली. ती चक्रधरांना त्यांच्या जीवनाविषयी आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल अनेक प्रश्न विचारत असल्यामुळे यासर्व प्रश्नांची माहिती ग्रंथरूपाने लिळा चरित्रात उपलब्ध आहे. महदाईसा ही महानुभाव पंथाची कटट्र पुरस्कर्ती होती.

चक्रधरांचे गुरू गोविंदप्रभू, चक्रधर ज्यावेळी बद्रिकेदारच्या यात्रेला गेले त्यावेळी चक्रधरांचे गुरू गोविंद प्रभू यांची तिने सेवा केली. चक्रधरांच्या मृत्युनंतर महदंबेने आपले ऊर्वरित आयुष्य चक्रधरांचे शिष्य नामदेव यांच्यात घालविले. नामदेव महदाईचे चुलतेच होते. तिचा जन्म—मृत्यु शका उपलब्ध नाही. पण नवगाव (हैद्राबाद) येथे तिचा अंत झाल्याची माहिती मिळते. महदंबेचे उत्तरायुक्त संत पुरूषांची सेवा करण्यात आणि तीर्थयात्रा करण्यात गेले.

**संत मुक्ताबाई :**

भारतात अनेक ंसत होऊन गेले त्यापैकी एक संत मुक्ताबाई या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत कवयित्री होत्या. तीन भावांमध्ये असणारी ही धाकटी बहीण संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे मुक्ताबाईचे थोरले भाऊ श्री विठठ्ल व रूखमाई या दांपत्याची ही कण्या. त्यांच्या आई वडिलांनी देहत्याग केला. संत मुक्ताबाई यांचे ताटीचे अभंग प्रसिद्ध आहेत. त्यात एकूण ४२ अभंग आहेत. संत ज्ञानेश्वर भावडांचा समाजातील धर्ममार्तंडांकडून छळ सहन न झाल्यामुळे संत ज्ञानेश्वर दरवाजा बंद करून बसतात. तेव्हा त्यांनी दाराची ताटी उघडण्यासाठी ज्ञानेश्वरांना केलेली विनवणी म्हणजे मुक्ताबाईचे 'ताटीचे अभंग' होय.

संत मुक्ताबाईने आपल्या अलौकिक ज्ञानामुळे योगी चांगदेवाचा अहंकार गळून पाडला होता आणि म्हणूनच चांगदेवाने मुक्ताबाईला आपले गुरू मानले. 'ज्ञानप्रबोध' हाग्रंथही, मुक्ताबाईच्याच नावावर सांगितला जातो. ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईला दिलेली सनद बघून विसोबा खेचर शरण आले. मुक्ताबाईच्या काव्यातूत जीवन आणि प्रतिभेचे निरनिराळे पैलू आढळतात. 'मुक्तपणे मुक्त १ मुक्ताई पैरत। हरिनाम स्मरत। सर्वकाळ।' असे स्वत:च्या अवस्थे चे नवीन मुक्ताबाई करतात. मुक्ताबाईच्या अभंगामध्ये योगाच्या खुणा आहेत,

अध्यात्माची उंची आहे. तसेच साक्षात्काराचे प्रतिबिंब उमटले आहे. मुक्ताबाईच्या स्वभाव सोपानदेवाप्रमाणे परखड असल्याचे सांगितले जाते.

मुक्ताबाईचा जन्म महाराष्ट्रातील आपेगाव येथे इ.स. १२७९ साली झाला असून त्यांनी जळगाव जिल्ह्यातील मेहूण येथे इ.स. १२९७ मध्ये समाधी घेतली.

**संत जनाबाई :**

संत जनाबाई या वारकरी संप्रदायातील नामदेवांच्या समकालीन होऊन गेलेल्या संत कवयित्री त्यांचा जन्म अंदाजे इ.स. १२५८ मध्ये परभणी येथिल गंगाखेड येथे झाला, वडिल दमा अणि आई कुरूंड असे नावे होती. त्यांचे घराणे हे विठठ्ल भक्तीतच रमणारे होते. 'माझ्या वडिलांचे दैवत। तो हा पंढरीनाथ।।' असे जनाबाई म्हणतात. संत जनाबाई संत कवयित्री म्हणून प्रसिद्ध होत्या. आजही महाराष्ट्राच्या खेड्या—पाड्यातून ज्यात्यावर दळण दळताना स्त्रिया जनाबाईच्या ओव्या गाताना दिसतात. त्यांच्या वडिलांनी जनाबाईला बालपणीच नामदेवाचे वडील दामाशेट यांच्याकडे ठेवले. तेव्हापासून संत जनाबाई स्वत:ला 'नामयाची दासी' म्हणवून घेत. संत जनाबाई या संत नामदेवांच्या कुटुंबातील एक सदस्य होत्या.

संत जनाबाईचे कुटुंब विठठ्लभक्त असल्यामुळे संत जनाबाईनीही विठठ्लभक्तींचा ध्यास घेतला. 'दकिता कांडिता तुज गाईन अनंता' असे त्या म्हणत असत. संत नामदेवांनाच त्या आपले गुरू मानत असत. संत ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील सर्व संतांचा त्यांना परिचय होता. त्यांची गुरूपरंपरा श्री संत ज्ञानदेव विसोबा खंचर—संत नामदेव—संत जनाबाई अशी होती.

'विठू माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा।।' हा त्यांचा प्रसिद्ध अभंग होय. नामदेवाच्या सहवासामुळे त्यांना संतसंग घडलेला होता. घरची कामे करता करता त्या सतत देवाचे नामस्मरण करत. संत जनाबाईचे एकूण ३५ अभंग प्रसिद्ध आहेत. जनाबाईच्या काव्याविषयी ज्येष्ठ अभ्यासक रा.चि. ढेरे म्हणतात., 'वात्सल्य, कोमल ऋजुला, सहनशीलता, त्यागीवृत्ती, समर्पणवृत्ती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात.' त्याचं काव्य विठठ्लभक्तीने ओजप्रोत भरलेलं आहे. त्यांच्या अभंगाची भाषा साधी, सोपी आणि सामान्य माणसाला समजणारी आहे. अशा या संत जनाबाई यांनी श्रीश्रेला पंढरपूर येथे महाझारी आषाढ कृष्ण त्रयोदशी शके. १२७२ या दिवशी समाधी घेतली.

**कान्होपात्रा :**

संत ज्ञानेश्वरांना समकालीन असणारी भागवत संप्रदायातील एक कवयित्री कान्होपात्रा, तज्ञांच्या मते तिचा सांगितला जाणारा काळ म्हणजे शके १३९०, इ.स. १४६८ असा आहे. कान्होपात्रा ही मंगळवेढे येथे राहणाऱ्या गणिकेची मुलगी होती. एका गणिकेची मुली असूनही तिने आपले तन—मन—धन विठठ्लाला वाहून टाकले. 'विषय त्याग करून नामाभक्ती करण्याचा संदेश कान्होपात्रा आपल्या अभंगातून देतात, उपदेश करतात.

संतांचे दर्शन म्हणजे कान्होपात्रेला पर्वणी वाटते. आळंदीला ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन झाल्यानंतर ती स्वत:ला भाग्यवान समजते. तिच्या अभंगाद्वारे समाजिक दु:ख प्रकट होताना दिसतात. काही अभंगांद्वारे कान्होपात्रेच्या व्रतस्थ व उज्वल व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. कान्होपात्रेच्या अभंगांमधून एका उत्कट भक्ताच्या उत्कट अनुभूतीचा साक्षात्कारच घडतो.

पंधराव्या शतकात होऊन गेलेल्या संत कान्होपात्रेचे 'सकल संत गाथा' या ग्रंथात ३३ अभंग समाविष्ट झाले आहेत. कान्होपात्रेचं भक्तिरसपूर्ण अभंग काव्य हे खूप थोड्या प्रमाणात उपलब्ध असलं तर इतर विठठ्लभक्त स्त्रियांहून कान्होपात्रेचं जीवन पूर्णत: वेगळं होतं. शामा नावाच्या आईच्या पोटी जन्माला येऊन अतिशय श्रीमंत घराणं आणि ऐषोआराम तिला मिळाला असला तरी ती त्यात न रमता (वेशाकुळातील भोगविलासू आयुष्य न जगता) ती परमार्थाकडे वळली.

कान्होपात्रा दिसायला सुंदर, रूपवती होती तशीच ती बुद्धिमानही होती. जणू काही मेनका आणि अप्सरेचा अवतारच होतो. असे काही लोककथांमधून सांगितले जातात. गायन आणि नृत्यात ती लहाणपणापासून प्रवीण होती. तिच्या सेवेत अनेक दासी होत्या. लहाणपणापासून प्रवीण होती. तिच्या सेवेत अनेक दासी होत्या. तिच्या शिक्षणाची व्यवस्था तिची आई घरीच करते. शामाचा गणिकेचा व्यवसाय तिने पुढे न्यावा असे आईला वाटत असले तरी याचा कान्होपात्रेला फार तिटकारा असतो.

कान्होपात्रेने आईला स्वत:च्या लग्नाविषयी घातलेली अट म्हणजे 'माझ्यापेक्षा सुंदर रूपवान पुरूष असेल तरच मी विवाह करेल.' पण कालांतराने मंगळवेढयाचा नगराध्यक्ष सदाशिव मालगुजार यांची वाईट नजर कान्होपात्रावर पडते. अशावेळी मायलेकी दोघींनाही भयानक प्रकाराला सामोर जावे लागते. पण कान्होपात्रा डगमगत नाही ती रात्रभर देवासमोर हात जोडून जप करते. आणि अचानक पहाटे डोळा लागतो तोच तिला वारकऱ्याच्या भजनाने जाण येते. हौसा नावाच्या तिच्या म्हताऱ्या दासीच्या संगनमताने फाटके—विटके कपडे घालून पंढरपूरच्या वारीला निघते. तिच्या मनाला विठठ्लाची ओढ लागलेली असते. एका दासीच्या वेशात ती मध्यरात्री मंगळवेढे सोडते. विठठ्लचरणी एकाग्र होते. विठोबाच्या चरणी ती अनेक अभंग गाते. तिचा आवाज ऐकूण हजारो वारकरी तल्लीन होतात. कान्होपात्रा व तिची दासी होसाबाई दोघीही पंढरपूरात झोपडी बांधून राहतात. कान्होपात्रा दिवसातून दोनदा विठठ्लाचे देऊळ, झाडून स्वच्छ करते. ती विठठ्लभक्तीत लिन होते. त्याच्या सेवेसाठी ती तळमळते.

कान्होपात्राच्या जीवन आणि मृत्युची तारीख निश्तिच नसली तरी ती अशी एकमेव व्यक्ती आहे. ज्यांची समाधी विठोबा मंदिराच्या आवारात आहे.

**संत वेणाबाई :**

संत वेणाबाई यांचा जन्म अंदाजे इ.स. १६२८ रा. चै वैध शके १६०० मध्ये एकाका देशस्थ ब्राम्ह्मण कुटुंबात कोल्हापूर येथे झाला. तर इ.स. १६७८ समाधी घेतली. वेणाबाईचे वडिल कोल्हापूरचे गोपाजीपंत देशपांडे होते. त्यांचे लग्न बालवयातच ८ व्या वर्षी झाले. वेणाबाई लग्न होऊन मिरज येथे सासरी गेल्या. परंतु दुदैवाने त्यांच्या नशिबी बालविधवेचे जीवन येते. त्यांच्या काळात विधवेने घरकाम करून देवाचे नाव घेणे, धार्मिक ग्रंथांचे वाचन करून आपले जीवन व्यतीत करणे असे होते. वेणाबाईंना स्वामी समर्थांचे प्रथम ओझरते दर्शन ते वेणाबाईकडे भिक्षा मागायला आले तेव्हा झाले. स्वामी समर्थ दुसऱ्यांदा जेव्हा वेणाबाईकडे भिक्षा मागायला आले तेव्हा त्यांना वेणाबाई तुळशीवृंदावनाजवळ एकनाथी भागवत वाचताना दिसल्या. वेणाबाईची ही समर्थासोबत होणारी भेट वेणाबाईचे आयुष्य

बदलणारी होती. इथेच त्यांना समर्थ रामदासांमध्ये त्यांचा गुरू भेटतो. आणि 'देह माझे मन माझे। सर्व नेले गुरू राजे' अशी अवस्था झाली. रामदासांचे शिष्यत्व त्या पत्करतात आणि परत कोल्हापूरला येतात. (वडिल गोपाजीपंत तर आई राधिकाबाई) समर्थ वेणाबाईला कीर्तन करण्यास प्रवृत्त करतात. वेणाबाईला काळ हा मध्ययुगीनकाळ होता. त्या काळात विधवेने कीर्तन करणे ही वेगळी घटना होती. यामुळे समर्थांना जननिंदेला सामोरी जावे लागले. एवढेच नव्हे तर तेथील मंडळींनी वेणाबाईलचा विषप्राशन करण्यास भाग पाडले. परंतु वेणाबाईची विषही पचवून दाखविले. प्रसंगी कणखर बनल्या. शेवटी वेणाबाईची निंदा करणाऱ्यांना पश्चाताप झाला. अशांनाही वेणाबाई मोठया मनाने माफ करतात.

रामनवमी उत्सवाची तयारी एक वर्ष वेणाबाईकडे असते. वेणाबाई या उत्सवाच्या तयारीत विविध कामांमुळे उत्सव सुरू होण्याच्या पंधरा दिवस आधी आजारी पडतात. तापाने फणफणत असताही त्या रामाजवळ प्रार्थना करतात. वेणाबाईची अशी अवस्था बघून राममूर्तीच्या डोळ्यात अश्रू येतात. आणि काय आश्चर्य विठठ्लाप्रमाणे श्री राममूर्तीही आपल्या भक्तासाठी धाऊन जातात. (विठठ्ल ज्याप्रमाणे विविध रूपे धारण करून संत जनाबाई, संत एकनाथ, या संतांची सेवा करतात, त्याप्रमाणे रामचंद्रांनी रामबाईच्या रूपाने येऊन उत्सवाची सर्व तयारी केलेली असते.) असा परमेश्वर भक्तीचा साक्षात्कार वेणाबाईच्या बाबतीतही घडतो. इ.स. १९५६ मध्ये रामदास स्वामींनी मिरज येथे वेणाबाईच्या मठाची स्थापना केली. वेणाबाईंना 'वेणास्वामी' असेही म्हटले जायचे.

**निष्कर्ष :**

१. स्त्री ही कोणत्याही काळातील असली तरी स्वतःच अस्तित्व सिद्‌ध करण्यासाठी संघर्ष करावा लागतो.
२. काल, आज आणि उद्या स्त्री स्वतःचे अस्तित्व शोधणारच.
३. पती निधनानंतर होणारा छळ, त्यावर भक्ती, शक्ती आणि बुद्धिने केलेली मात.
४. शेवटी कुटुंब आणि समाजाचा पाया स्त्रीच असते हे सत्य नाकारता येत नाही.
५. सहनशक्ती हे तिला मिळालेलं वरदान आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. 'संतसाहित्य नवचिंतन' — यु.म. पठाण, दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक १०८—१०९.
२. 'भारतीय स्त्री संत रत्न' — सुमती अरकडी, आपलं प्रकाशन
३. उप. नि.
४. '१० संत कवयित्री'— डॉ. सौ. शैला कृष्णराव गावंडे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
५. विक्किपिडीया.

◆◆◆

# राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता'निर्मिती मागील भूमिका

**डॉ. अविनाश श. धोबे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय, शेंदुरजनाघाट,
ता.वरुड, जि.अमरावती, पिन—४४४ ९०७

**प्रस्तावना —**

महाराष्ट्रातील विदर्भाची भूमी ही संतांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेली आहे. सांप्रत काळात खंजेरीच्या निनादाने समाज प्रबोधनाचे व राष्ट्रउद्धाराचे महनीय कार्य करणारे एक तेजस्वी क्रांतिकारक संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज! त्यांनी लिहिलेला 'ग्रामगीता' हा ग्रंथ मौलिक असा वाङ्मयीन महाप्रसाद आहे. ग्रामीण जनतेला पचेल, रुचेल, भावेल अशा पदध्तीने महाराजांनी जीवनाचे मौलिक तत्त्वज्ञान 'ग्रामगीते'च्या एकूण ४१ अध्यायातून स्पष्ट केलेले आहेत. राष्ट्रसंतांनी जनपरिवर्तनासाठी व लोकप्रबोधनासाठी केलेले कार्य, भारताच्या स्वातंष्य चळवळीतील त्याचा क्रांतिकारी सहभाग, ग्रामसुधारणेसाठी गावागावात उभारलेले 'गुरुदेव सेवा मंडळ', समाज उन्नयनासाठी त्यांनी निर्माण केलेल विशाल अमृतमय साहित्य हे आजही आपल्याला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक व सदैव प्रेरणा देणारे आहेत. 'ग्रामोन्नती ते विश्वोन्नती' हा परिवर्तनाचा महान मूलमंत्र त्यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून आपणास दिलेला आहे.

**विषय विवेचन —**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा 'ग्रामगीता' निर्मितीमागील उद्देश अत्यंत व्यापक आणि उदात्त आहे.

> ''ईश्वरे व्यापिले हे विश्व। म्हणोनि जगचि आम्हा देव।
> विश्वाचा मूळ घटक गाव। ग्रामगीता त्यासाठी।
> यात ग्रामाचा जयजयकार। सर्व तीर्थक्षेत्रांचे ग्रामचि माहेर
> ग्राम हा विश्वाचा पाया सुंदर। ग्राम नसता प्रलयचि।।''

भारत हा कृषीप्रधन देश आहे. देशातील ६५ टक्के जनता ही खेडयात वास्तव्य करते. ग्रामातील शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. खेडे हे शहरांचे जनक आहे. उन्नतीसाठी प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व्हायला हवे, खेडे हे एक स्वयंपूर्ण स्वतंत्र घटक म्हणूनच भारतात असायला हवे तरच भारत प्रगत राष्ट्रांत मान्यता पावेल. खेडयातील शेतकऱ्यांची परिस्थिती सुधरावी, त्यांच्या मालाला, श्रमाला योग्य तो मोबदला मिळावा. गावाची सुधारणा व्हावी. शेतकरी व शेतीव्यवसायाला प्रतिष्ठा मिळावी. गावातच शिक्षणाच्या सोयी — सवलती उपलब्ध व्हाव्यात, खेडयातील कच्चा माल बाहेर न पाठविता तेथेच पक्का माल तयार करण्याचे शिक्षण मिळावे. गावातच लघुउद्योग, कुटीर उद्योग निर्माण व्हावे, गावातील बेकारीचे सावट कमी होऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. एकूणच गाव हे स्वयंपूर्ण आणि आदर्श व्हावे या उद्देशाने,

> ''म्हणोनी केली ग्रामगीता। जागृत व्हावी ग्रामदेवता।।
> संबंध यावा सागरसरिता। ऐसा तुझा सर्वांशी।।

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो। सकळांचे लक्ष तुजकडे वळो।।
मानवतेचे तेज झळझळो। विश्वामाजी या योगे।।
म्हणोनि तुजचि करितो अर्पण। तू विश्वाचे अधिष्ठान।।
तुझेचि व्हावे आधी उत्थान। विश्वामाजी म्हणोनिया।।''

खेडयातील जनतेला शहराप्रमाणे सर्व सुखसोयी प्राप्त व्हाव्यात, प्रत्येक गाव हा समृध्द व संपन्न व्हावा व ग्रामातील शेतकऱ्याला प्रतिष्ठेचा दर्जा प्राप्त व्हावा हे महाराजांच्या 'ग्रामगीता' निर्मितीमागील मुख्य उद्दिष्ट आहे. महाराजांनी आपली 'ग्रामगीता' ग्रामनाथाला अर्पण केली आहे. ''राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता हा एक नित्यनूतन स्फूर्तीचा झरा आहे. देहत्वाकडून देवत्वाकडे नेणाऱ्या ज्या मानवी मूलभूत प्रेरणा त्याचे समाजाभिमुख उन्मयन महाराजांनी ग्रामगीतेतून केले आहे. अशिस्त, असंघटित, अशिक्षित अशा समाजाला मार्गदर्शन करणारी ग्रामगीता जणू दीपस्तंभ होय. सुलभ, सुबोध तथा सर्वस्पर्शी असा ग्रामगीता केवळ वाचावयाचा नव्हे तरच जगावयाचा ग्रंथ आहे.''[१]

राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेचा उद्देश मानवाला त्यांच्या कर्तव्याची व जबाबदारीची जाणीव करुन देण्याचा आहे. 'ग्रामगीता' हा ग्रंथ मानवधर्म वाढविणारा आहे. सर्व गावांत व मानवांमध्ये सहकार्याचे वातावरण निर्माण करणारा हा ग्रंथ आहे. तो दु:खाचा नाश करणारा व मृत्यूलाही हासविणारा ग्रंथ आहे. तो मानवधर्माचा पुरस्कार करणारा मानवतावादी ग्रंथ आहे.

''ग्रामगीता दु:खासि नाशवी। ग्रामगीता मृत्यूसि हासवी।।
ग्रामगीता सहकारी तत्व वाढवी। मानवधर्मा फुलवाया।।''

संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. राम घोडे यांनी महाराजांच्या ग्रामगीतेचा पुढील शब्दांत गौरव केला आहे. ''ग्रामगीता ही संसार सागरातील दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी मानव समाजाला महाराजांकडून मिळालेली एक परमेश्वरी देण आहे.''[२]

राष्ट्रसंताचा 'ग्रामगीता' हा ग्रंथ म्हणजे अमोल संस्कारधन आहे. आत्मज्ञानाची व आत्मबोधाची प्रचिती करुन देणारा हा ग्रंथ आहे.

''ग्रामगीता वाचूनि करी चिंतन। त्यास होईल आत्मज्ञान।।
दिव्य दृष्टीची संत खूण। कळे त्यासि आचरता।।''

वंदनीय राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेचा उद्देश समाजाला सर्वांगसुंदर बनविण्याचा आहे. समाजातील आचार विचार रुपी विकार नष्ट करुन एक विधायक विचार समाजामध्ये पेरण्याचा त्यांचा उद्देश आहे. जीवनाला नवी दिशा व प्रेरणा प्रदान करण्याचा उद्देश ग्रामगीतेत आहे.

''ग्रामगीता नव्हे पारायणसि। वाचता वाट दावी जनासि।।
समूळ बदलवी जीवनासि। मनी घेता अर्थ तिचा।।''

महाराजांची 'ग्रामगीता' ही केवळ पारायणासी नसून कृतीत आणण्यासाठी आहे. महाराजांच्या ग्रामगीतेतील विचार भव्य — दिव्याची प्रचिती करुन देणारे आहेत. मानवाने हे विचार आत्मसात करुन त्या प्रमाणे समाजात कृती केली तर त्याला जीवनाचे एक निश्चित ध्येय मिळेल. त्याला आत्मज्ञानाची आत्मबोधाची प्रचिती येईल व त्याचा व्यक्तिमत्व विकास होईल. महाराजांच्या ग्रामगीतेचा उद्देशच मानवाच्या लौकिकाला अलौकिकात भिनविणारा आहे.

राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेचा उद्देश गावाला स्वयंपूर्ण, संपन्न व आदर्श बनविण्याचा आहे.

महाराजांचे ग्रामगीतेतील तत्वज्ञान फार मौलिक स्वरुपाचे आहे. गावाला समृध्द बनविण्याचा महामंत्र या ग्रामगीतेत आहे. आधुनिक युगाला नवी प्रेरणा, नवे तत्वज्ञान व नवी दिशा देणारा हा ग्रंथ संजीवनी बुटी आहे. अनेक विकृत विचारांना अमृतमयी बनविण्याचे सामर्थ्य या ग्रामगीतेत आहे. समाजाच्या आचारविचारात क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य या 'ग्रामगीते'त आहे. मरगळलेल्या जीवनात नवचैतन्य निर्माण करण्याचे सामर्थ्य या ग्रामगीतेत आहे.

''ही नव्हे फुले टाकण्यासाठी। ही ग्रामाची उध्दारदृष्टी।
आजच्या युगाची संजीवनी बुटी। मानतो आम्ही ग्रामगीता।।''

महाराजांची 'ग्रामगीता' ही समाजाभिमुख आहे. मानवी जीवनाचा वेध आणि शोध घेण्याचे उदंड सामर्थ्य या ग्रामगीतेत आहे. दु:खी व्यक्तींना धीर देण्याचे, जो संसारग्रस्त आहेत, संकटात आहेत, त्याला मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य या गीतेत आहे. जो स्वत: मालक समजून इतरांवर वर्चस्व गाजवितो त्याला अंतर्मुख करुन नमविण्याचे सामर्थ्य या ग्रामगीतेत आहे.

महाराजांच्या 'ग्रामगीते'चा उद्देश मानवाला चारिष्यसंपन्न व समाजनिष्ठ बनविण्याचा आहे. मानवाला सुख व शांती प्रदान करण्याचा त्यांचा उद्देश आहे. ''मराठीतील सुप्रसिध्द साहित्यिक डॉ. वि.भि. कोलते म्हणतात, ''ग्रामगीता हा भगवद्‌गीतेचा पुनरावतारच होय. सुंदर वाङ्मय अंत:करणाच्या पिळातून निर्माण होते, त्याचे हे प्रात्यक्षिक आहे. ग्रामगीतेचा सुसंगत बोध हृदयाच्या पिळातून प्रगट झाला म्हणूनच हे खरे काव्य आहे. महाराज हे जीवन ढवळून काढणारे द्रष्टे कवी आहेत.''[३]

''याने संस्कार बनतील उत्तम। मनुष्य होईल चारिष्यक्षम।
सुख, शांती लाभेल करिता उद्यम। सांगितले जे या ग्रंथी।।''

महाराजांच्या ग्रामगीतेचे प्रयोजन गावातील वर्गकलह दूर सारण्याचे आहे. समाजातील आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट होऊन सर्वत्र समता प्रस्थापित व्हावी हा महाराजांचा उद्देश आहे. गावातील एखाद्या वर्गाची मक्तेदारी नष्ट होऊन समतेचे वातावरण निर्माण व्हावेत, मानवाच्या मनातील एकमेकांविषयी असलेले द्वेष, पूर्वग्रह नष्ट होऊन बंधुत्वाची भावना, एकीची भावना निर्माण व्हावी हा महाराजांचा व्यापक उद्देश आहे. एकूणच समाजातील कुटुंब 'विश्वकुटुंब' व्हावे हा महाराजांच्या ग्रामगीतेचा उद्देश आहे.

महाराजांच्या ग्रामगीतेचा उद्देश ग्रामाला उज्ज्वल बनविण्याचा आहे. समाजात आदर्शवादी विचार निर्माण व्हावे, प्रत्येक मानव हा समर्पणाच्या भावनेतून जगला पाहिजे, त्याने राष्ट्राचे हित जोपासले पाहिजे, त्याने स्वउद्धाराबरोबरच समाजोध्दार केला पाहिजे हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे. म्हणून महाराज जनतेला आवाहन करतात,

''ग्रामगीता ग्रंथ सुंदर। निर्मावया गावाचे चारिष्य।
प्रचार करावा सर्वत्र। होऊनि पवित्र आपणही।।
जे कोणी माझे स्नेही प्रेमळ। त्यांनी करावा ग्रंथाचा सुकाळ।।
घरोघरी चालवावा प्रचार। ग्रामगीता — वाचनाचा।।''

महाराजांच्या ग्रामगीतेतील विचार समाजापर्यंत पोहोचणे ही एक काळाची गरज आहे. महाराजांचे विचार केवळ वाचून चालणार नाहीत तर त्याला आपल्या कृतीची जोड द्यावी लागेल. महाराजांच्या ग्रामगीतेचा उद्देश विश्वकल्याणाचा आहे. मराठीतील सुप्रसिध्द

जनसाहित्यकार डॉ. सुभाष सावरकर म्हणतात, ''महाराजांची साहित्यसेवा ही स्वान्त:सुखाय किंवा मनोविनोदाय अशीच नसून ती प्रामुख्याने बहुजनहितायही आहे. ती तपोभूमी किंवा पुष्पवाटिकाच नव्हे तर बहरलेली लोकोपयोगी फळबागही आहे.''[४]

राष्ट्रसंतांना ग्रामगीतेच्या माध्यमातून सम्यक् क्रांती अभिप्रेत आहे. त्यासाठी ते समाजातील व्यक्तींना आवाहन करतात,

''अरे! उठा उठा श्रीमंतांनो। अधिका यांनो। पंडितांनो।।
सुशिक्षितांनो। साधुसंतांनो। हाक आली क्रांतीची।।
गावागावासि जागवा। भेदभाव हा समूळ मिटवा।।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। तुकडया म्हणे।।''

ही महाराजांनी समाजाला दिलेली आर्त हाक आहे. ही हाक सम्यक् क्रांतीची आहे, नवविचारांची आहे. समताधिष्ठित समाज निर्माण करण्याची आहे. ही हाक ग्रामाला उज्ज्वल, स्वयंपूर्ण व आदर्श बनविण्याची आहे. एकूण महाराजांच्या ग्रामगीतेचा उद्देश समाजाला आदर्शवादी व सर्वांगसुंदर बनविण्याचा आहे.

**निष्कर्ष —**

१. राष्ट्रसंतांची ग्रामगीता ही जनप्रवर्तनक्षम असून ती मानवतावादाचे मुर्तिमंत प्रतीक आहे. अखिल मानवतेविषयीची कळकळ त्यांच्या कार्यातून व काव्यातून प्रत्ययास येते.

२. 'ग्रामोन्नती ते विश्वोन्नती हा सर्वंकष परिवर्तनाचा मूलमंत्र त्यांनी 'ग्रामगीता' या युगग्रंथातून दिलेला आहे. बंधूभाव, समता, राष्ट्रप्रेम व सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा पुरस्कार करतांना त्यांनी 'विश्वकुटुंबा'ची संकल्पना मांडलेली आहे.

३. 'ग्रामाला' विश्वाचे मुख्य केंद्र मानून ग्रामगीतेची निर्मिती झालेली आहे. राष्ट्रसंतांची ग्रामविकासाची तळमळ, ग्रामसुधार योजना व ग्रामविकासाची संकल्पना ग्रामाला 'भूवैकुंठ' बनविणारी आहे.

४. राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता'निर्मिती मागील भूमिका ही विश्वकल्याणाची आहे. समताधिष्ठित समाजनिर्माणाची आहेत. राष्ट्रसंतांचे ग्रामगीतेतील विचार जनतेला प्रेरणादायी व दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे आहेत.

५. राष्ट्रसंतांची शैली ही सुरस, सुबोध व प्रासादिक आहे. ग्रामीण जनतेला समजेल अशा पध्दतीने त्यांनी जीवनाचे तत्वज्ञान ग्रामगीतेतून सांगितले आहे. ग्रामविकासाची प्रचंड तळमळ व कळकळ त्यांच्या ग्रामगीतेतून प्रत्ययास येते.

**संदर्भग्रंथ —**

१. ग्रामगीता (प्रस्तावना) — राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, प्रथमावृत्ती १९५५.

२. संत रामदास : संत तुकडोजी तौलनिक दर्शन — डॉ. राम घोडे, राजीव प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती १९८८, पृ.क्र. १९२.

३. उनि, पृ.क्र. १५

४. राष्ट्रसंत तुकडोजी : व्यक्तित्व आणि कर्तृत्व — डॉ. सुभाष सावरकर, जनसाहित्य परिषद, अमरावती. पृ.क्र. ४४

◆◆◆

# एकोणिसावे शतक : स्त्री व समाज

**जागृती अरुण बधान**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**प्रास्ताविक :**

स्वांतत्र्यप्राप्तीच्या चळवळीबरोबरच इतर अनेक चळवळींचा पाया एकोणिसाव्या शतकात घातला गेला. सत्यशोधक चळवळ, स्त्रीमुक्तीची चळवळ, दलित चळवळ इत्यादी चळवळी या शतकातच सुरु झालेल्या दिसतात. सुधारक व सनातनी या दोन गटात वाद—प्रतिवाद झाले. वर्षानुवर्षे चालत आलेल्या जाचक रूढींमुळे स्त्रीजीवन आणि एकूणच समाजजीवन दयनीय अवस्थेत पोहचले होते. स्त्रियांचे प्रश्न हजारो वर्षांपासून चालत आलेले होते. सतीप्रश्न, बालविवाह, केशवपन, सक्तीचे वैधव्य, बाला—जरठ विवाह यांसारख्या जाचक रुढीनी स्त्रियांचे जीवन क्लेशदायक झाले होते. रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले, आनंदीबाई कर्वे यांसारख्या स्त्रियांनी आपल्या आत्मचरित्रातून तत्कालीन समाज व स्त्रीजीवनाचे यथार्थ दर्शन घडवले आहे. एकोणिसाव्या शतकातच पुरुष व स्त्री समाजसुधारकांनी स्त्री—प्रश्नांची सर्वांगीण चिकित्सा केली. स्वतःच्या कार्यकर्तृत्वाने समाजापुढे आदर्श ठेवला. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर यांच्याप्रमाणेच सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई यांसारख्या समाजसुधारक स्त्रियांनी तत्कालीन समाजात स्त्रीशिक्षण, स्त्रीमुक्ती यांसारख्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधून आपल्या जीवनकार्याचा आदर्श तत्कालीन स्त्रियांसमोर ठेवलेला दिसून येतो. या सर्वच समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे अनेक बदल तत्कालीन समाजात घडून आले.

**विषय प्रवेश :**

व्यापार आणि धर्मप्रसाराच्या हेतूने पोर्तुगीज, फ्रेंच, डच यांच्याप्रमाणेच इंग्रजही भारतात आले. इंग्रज राजवटीचा पहिला पन्नास वर्षांचा म्हणजेच १८५० पर्यंतचा काळ हा 'संक्रमणाचा काळ' म्हणून ओळखला जातो. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाला. “कोणतेही सत्तांतर होताना किंवा एक राजवट जाऊन दुसरी राजवट येताना काही एक वर्षांचा काळ असा असतो की, ज्यात जुन्या गोष्टी हळूहळू नाहीशा होत असतात पण पूर्णपणाने नाहीशा झालेल्या नसतात आणि नव्या गोष्टी हळूहळू येत असतात पण पूर्णपणे रुजलेल्या नसतात. ”१ डॉ. गं. ना. जोगळेकरांचे हे विधान तत्कालीन समाजजीवनातील बदलावर नेमके भाष्य करणारे आहे. इंग्रज राजवटीच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात कित्येक नव्या गोष्टी सुरु झाल्या असतानाही समाज जुन्या रूढी परंपरांमध्येच अडकून

पडल्याचे दिसून येते. रेल्वेमुळे दळणवळण झपाट्याने वाढले. व्यापारास चालना मिळाली. नवी न्याययंत्रणा प्रस्थापित झाली. मुद्रणकला उदयास आली. इंग्रजांनी भारतात घडवून आणलेल्या भौतिक सुधारणा राज्यकारभार सोयीचा होण्यास इंग्रजांनाच फायदेशीर होत्या पण त्याचा फायदा सर्वसामान्य भारतीयांनाही होत होता. नियतकालिके आणि वृत्तपत्रांमुळे वैचारिक संघर्ष निर्माण झाला. त्यातून समाजाचा विकास होईल, अशी वृत्ती समाजात रुजू लागली. सामाजिक, सांस्.तिक आणि भौतिक सुधारणांचे चक्र गतिमान होऊ लागले. सनातनी विरुद्ध सुधारक असे दोन गट या काळात निर्माण झाले. एका बाजूला औद्योगिक क्रांती आणि दुसऱ्या बाजूला बदललेली राजकीय सत्ता यांमुळे महाराष्ट्रात आमुलाग्र बदल झाला.

१८९१ मध्ये समंती वयाच्या बिलावरून परंपरावादी व सुधारक यांच्यातील वाद पेटला. सरकारने असल्या गोष्टीत हस्तक्षेप करू नये, असे कायदे केले जाऊ नये असे टिळकांचे म्हणणे होते, तर समाजसुधारणेसाठी असे कायदे करावेत, असे सुधारकांचे मत होते. लोकमान्य टिळक व गोखले यांच्यातले वाद याच काळात वाढत गेल्याचे दिसते. आंतरजातीय विवाहा संदर्भातील पटेल बिलास देखील टिळकांचा विरोध होता. “२० नोव्हेंबर १९१८ रोजी पुण्यात किर्लोस्कर थिएटरात पटेल बिलाचा निषेध करण्यासाठी परांजपे, दामले, करंदीकर या टिळक अनुयायांनी शंकराचार्य, डॉ. कूर्तकोटींच्या अध्यक्षतेखाली सभा भरवली. ”२ आंतरजातीय विवाह करणाऱ्यांची मुले पिंड देण्यास, क्रियाकर्म करण्यास, मालमत्तेचा वारस होण्यास लायक नसतात, असे टिळकांचे मत होते. संमती वयाचा कायदा, पटेल बिल यांबरोबरच १९२९ साली ‘शारदा बिल’ देखील पास झाले. गोविंद बल्लाळ देवल यांच्या ‘संगीत शारदा’ या नाटकाच्या आधारे हा कायदा ‘शारदा बिल’ या नावाने ओळखला जातो. या कायद्यानुसार लग्नाच्या वेळी मुलाचे वय १८ व मुलीचे वय १४ निश्चित केले गेले. प्रत्यक्ष मात्र, बालविवाहाची प्रथा समाजात रूढ होती. वयाच्या ८ व्या किंवा ९ व्या वर्षीच मुलींची लग्ने वयोवृद्धाशी करून दिली जात होती.

आजच्या काळात स्त्रिया सर्वच क्षेत्रात कार्यरत आहेत. आपापल्या क्षेत्रात प्रत्येक स्त्री आपली स्वतंत्र ओळख तयार करताना आज दिसून येते. परंतु, एकोणिसाव्या शतकातील परिस्थिती आजच्यापेक्षा खुप वेगळी होती. देवी, सीता, पतिव्रता अशा आदर्श स्त्रीत्वाच्या भूमिकेतूनच स्त्रीकडे बघितले जात होते पण, सामाजिक नीतीनियमांचे, रूढी—प्रथेचे बंधन मात्र प्रत्येक स्त्रीला पाळावे लागत होते. रमाबाई रानडेंनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे, “आमच्या आईने पूर्ववयात बराच जाच सोसलाय पण आपल्या मर्यादेच्या वागणुकीने व शांत आणि सोशिक स्वभावाने तिने त्यांची मर्जी सदोदित प्रसन्न ठेवली होती. तिची समजूत अशी असे की, बायकांचा देव व गुरु सर्व काही पती आहे. म्हणून तिने गुरुमंत्रही माझ्या

वडिलांकडून घेतला होता, व त्याचा ती मोठ्या निष्ठेने जप करी."[३] तत्कालीन समाजात पतीलाच देव व गुरु मानण्याची प्रथा असल्याचे येथे दिसून येते. स्त्रियांच्या शिक्षणाचा संबंध वैधव्याशी जोडला जात होता. स्त्रिया शिकल्या तर नवऱ्याचे आयुष्य कमी होते या समजूतीने व विधवा होण्याच्या भीतीने स्त्रिया स्वतःच शिक्षणापासून दूर राहत होत्या. केशवपनासारख्या जाचक रूढीचाही संबंध शास्त्रांशी जोडला गेला होता. विधवेने अनीतीने वागू नये म्हणून ही प्रथा रूढ होती. विधवेने जर केशवपन केले नाही तर तिला खुप त्रास सहन करावा लागत होता. 'यमुना पर्यटन', 'पण लक्षात कोण घेतो' यांसारख्या कादंबऱ्यांमधून या भयानक प्रथेचे चित्र बघायला मिळते.

तत्कालीन समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्री शिक्षणाला सुरुवात झाली. आपल्या पत्नीलाच शिकवण्यापासून समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. पण, तत्कालीन समाज व्यवस्थेमुळे या स्त्रियांना शिकण्यासाठी घरातूनच संघर्ष करावा लागल्याचे चित्र रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, सावित्रीबाई फुले, यांसारख्या स्त्रियांच्या जीवनचरित्रांमधून दिसून येते. बायकांना शिकवले तर त्या उद्धट होतात, असा समज रूढ असल्यामुळे स्त्रियांना शिक्षण तसेच सभांना जाणे, सभेत बोलण्यालाही बंदी होती. "सासरच्या लोकांना विचारल्याशिवाय सासुरवाशिणीने घराच्या बाहेर पाऊल टाकावयाचे नाही व मी व्याख्यान ऐकावयास जाऊ का? म्हणून विचारले तर केवळ सुळावरची पोळी काढून खाण्याइतके सोपे..."[४] स्त्रियांना माजघराबाहेर येणेच निषिद्ध होते. मुलींचे लग्ने बालवयातच होत असल्याने त्यांना मोकळेपणाने जगता येत नसे. वयाच्या १३–१४ व्या वर्षापासूनच मुली मुल जन्माला घालून 'आई' बनत होत्या. मग, त्या शाळेत कशा जाणार? स्त्रीने फक्त प्रजोत्पादन व बालसंगोपन करावे, अशी धारणा तत्कालीन समाजाची होती. समाजाची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी समाजशिक्षणाची, प्रबोधनाची गरज आहे या जाणिवेतून राजाराम मोहन रॉय यांनी सर्वप्रथम सतीच्या चालीविरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या पुढाकाराने १८२९ साली सती प्रथा कायद्याने बंद झाली. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा पास झाला. फक्त कायदे करून बदल होणार नाहीत तर स्त्रियांच्या प्रगतीसाठी 'शिक्षण' ही गरजेचे असल्याचे तत्कालीन सुधारकांनी ओळखले. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे यांसारख्या सुधारकांनी स्वतःच्या पत्नीला शिकवले. पुढे फुले दांपत्याने मुलींसाठी शाळा उघडल्या. १८९६ मध्ये महर्षी कर्वेंनी पुण्यात अनाथ बालिकाश्रम स्थापन केला. रमाबाई रानडेंनी 'सेवासदन' सुरु केले. पंडिता रमाबाईंनी 'शारदासदन' सुरु करून विधवा, अपंग, अनाथ स्त्रियांना समर्थ बनविण्यासाठी प्रयत्न केले. १८९१ मध्ये संमती वयाचा कायदा पास झाला. यात पंडिता रमाबाई व काशीबाई कानिटकरांनी प्रयत्न केले होते. आपल्या संमतीविना बालवयात झालेले लग्न नाकारून सासरी जाण्यास स्पष्टपणे नकार देऊन तत्कालीन समजाला धक्का पोहचवणारी स्त्री म्हणजे— डॉ. रखमाबाई. पुढे वैद्यकीय

शिक्षण घेऊन समाजासमोर नवा आदर्शही रखमाबाईंनी मांडलेला दिसून येतो.

तत्कालीन समाजात पुरुष सुधारकांसोबतच स्त्री सुधारकांनीदेखील शिक्षणाचे महत्त्व समाजाला आपल्या कार्य—कर्तृत्वातून पटवून दिल्यामुळे स्त्रीशिक्षणाची गरज समाजवर्गाला वाटू लागली. सुधारकांच्या अथक प्रयत्नांमुळे सामाजिक सुधारणा घडून आल्या. मुलींची शाळा स्थापन झाल्यानंतर मुलींसाठी विशेष अभ्यासक्रमाची मागणी होऊ लागली. मिशनरी संस्थामार्फत सुतिकागृह, नर्सिंग यांचे शिक्षण सुरु झाले. १८८०—८१ साली 'आर्य महिला समाज' स्थापन होऊन स्त्रीशिक्षणाला गती मिळाली. पुढे डॉ. अॅनी बेझंट यांच्या प्रयत्नांनी 'अखिल भारतीय महिला परिषद' १९२७ मध्ये स्थापन झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी स्त्रीशिक्षणाचे महत्त्व वाढले. विसाव्या शतकात स्त्रीशिक्षणाची प्रगती झाली. १९०७ साली स्त्री डॉक्टरांच्या संघटना आणि १९१६ मध्ये दिल्ली येथे स्त्रियांसाठी मेडिकल कॉलेज सुरु करण्यात आले. स्वातंष्यप्राप्तीनंतर स्त्रीशिक्षण मोफत व सक्तीचे झाले. समाजातील स्त्रिया शिकून स्वतंत्र झाल्या तरच समाजाचाही विकास होईल हा विचार समाजात रुजू लागला. स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देण्याचे काम स्त्रीमुक्तीची चळवळ आजही करतांना दिसते. पण, स्त्रीमुक्ती चळवळीची बीजे प्रामुख्याने एकोणिसाव्या शतकातच रुजली गेल्याचे दिसून येते.

**संदर्भ:**


१. जोगळेकर गं. ना., 'मराठी वाङमयाचा अभिनव इतिहास', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे. द्वितीय आवृत्ती : १९९५, पृ. ३.

२. गाठाळ एस. एस., 'भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्रीजीवन', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रथमावृत्ती : २०१३, पृ. १४१.

३. रानडे रमाबाई, 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी', वरदा प्रकाशन, पुणे. आवृत्ती चौथी : २०१२, पृ. २२.

४. वैद्य सरोजिनी (संपादक), 'काशीबाई कानिटकर: आत्मचरित्र—चरित्र', पॉप्युलर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९८०, पृ. ७७.


◆◆◆

# ‘होळी’ बंजारा समाजाचा सांस्कृतिक उत्सव

**प्रा.डॉ.विनोद दे. राठोड**
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, ता.शिराळा जि.सांगली
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

भारतातील प्राचीन जनजातींमधील ‘बंजारा’ हा एक प्रमुख समाज आहे. भारतातील वीस प्रांतांमध्ये सतरा नावाने व उपनावाने हा समाज ओळखला जातो. बंजारा या शब्दाच्या उपपत्तीविषयी अभ्यासकांमध्ये काही मतभेद असले तरी बनज, बंजारा, बनजारा, बनजारे, बनजारी, बंजारी, लमान, लमाणी, लभाण, लभाणी, लंबाडा, लदेणीया, गवार, गवारी, गोर, गोरमाटी, गवारीया अशा विविध नावांनी हा लोकसमूह ओळखला जातो. भारतात एकमात्र बंजारा समाज आहे तिची बोलीभाषा, वेशभूषा, गोत्र हे एकसारखेच आहे. हा आपली स्वत:ची एक आगळीवेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जपणारा समाज आहे. बोलीभाषा, पोशाख, हस्तकला कौशल्य, शिवणकला, नृत्य, गाणी, दागिने यातून या समाजाच्या सांस्कृतिक जीवनातील वेगळेपणाची जाणीव होते. या समाजाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भाषिक एकता हे आहे. कोणत्याही प्रांतात राहणारा बंजारा जी भाषा बोलतो तिला ‘गोरबोली’ असे संबोधले जाते. बंजारा भाषेत कोणत्याही प्रांतातील बंजारा स्वत:ला ‘गोरमाटी’ म्हणून संबोधतो. हा समाज वास्तव्य करत असलेल्या वस्तीला ‘तांडा’ म्हणून संबोधले जाते.

बंजारा समाजातील काही लोक आज नोकरी—व्यवसायानिमित्त शहरात वास्तव्यास असले तरी अधिकांश समाज आजही शहरापासून, शिक्षणापासून कोसो दूर आहे. या समाजात ऐतिहासिक साधनांची उणीव, शिक्षणाचा अभाव आणि लेखनाची परंपरा नसल्यामुळे या समाजाचा मूळ इतिहास आज उपलब्ध नाही. केवळ ऐकिव माहिती, काही ऐतिहासिक पुरावे आणि प्राचीन संदर्भ ग्रंथांच्या आधारे या समाजाची पार्श्वभूमी अवगत होते. बंजारा बोलीमध्ये अतिशय व्यापक प्रमाणात लोकवाङ्मय सामावलेले आहे. ज्याकडे अजूनही इतर साहित्यिकच नव्हे तर या समाजातील साहित्यिकांना सुद्धा वळता आलेले नाही. जी साहित्यनिर्मिती या समाजाकडून झाली ती मौखिक स्वरूपातच राहिली. जे सण—उत्सव, पूजा, विधी प्रसंगी बंजारा तांड्यांमध्ये विशेष प्रमाणात अनुभवावयास मिळते.

हिंदू धर्माचे पालन करणारा हा समाज विविध प्रांतात विभागलेला असला तरी त्यांच्या पूर्वीच्या सण—उत्सव साजरे करण्याच्या पद्धतीत फारसे परिवर्तन झालेले आढळत नाही. हा समाज कित्येक वर्षे जंगल—निसर्गाच्या सानिध्यात, दऱ्याखोऱ्यात वावरला—जगला. त्यामुळे त्यांचे सण उत्सव साजरे करण्याच्या स्वतंत्र अशा पद्धती आहेत. या सण उत्सवांमध्ये धार्मिक श्रद्धा महत्वाची असून ती प्रेम आणि भीती या दोन्हींशी निगडित आहे. मुळात हा समाज उत्सवप्रिय आहे. त्यांच्या सण उत्सवांमध्ये मानवी जीवनमूल्ये तसेच धार्मिक, सामाजिक संदर्भ आढळतात.

बंजारा समाजाचा मुख्य सण म्हणजे ‘होळी’ होय. वसंतऋतुच्या मोहक वातावरणात

हा सण मोठ्या उत्साहात आणि उल्हासात साजरा केला जातो. तांड्यातील बंजारा नुकतीच शेतीची कामे आटोपून मोकळा झालेला, रखरखत्या उन्हातही प्रसन्नतेने होळीच्या सणाची जोमाने तयारी करीत असतो. होळीच्या महिनाभर अगोदरपासूनच होळीची लगबग सुरू होते. होळीला पारंपारिक वाद्यांच्या तालावर 'लेंगी' हा गीत प्रकार गायला जातो. या लेंगीगीत प्रकारात देवीस्तवन, गणेशस्तवन, सेवालाल महाराज स्तवनाला प्राधान्य असते. काही लेंगी या सवालजवाब, प्रश्नोत्तर, शाहिरांच्या फटक्यांसारख्या स्वरूपाच्या असतात. होळीच्या पूर्वी तांड्यातील तरूण नायकाच्या (तांड्याचा प्रमुख) घरी जाऊन डफाच्या तालावर 'लेंगी' सादर करतात. नायकाच्या पत्नीस 'नायकण' म्हणतात. नायकाप्रमाणे नायकाच्या पत्नीचा मान सणाला अधिक असतो. 'लेंगी' गीताचे दोन प्रकार आढळतात. 'हुबी लेंगी' या गीत प्रकारात डफाच्या तालावर समूहाने उभ्याने नृत्यगान केले जाते तर 'बेसी लेंगी' या गीत प्रकारात बसून गीत गायले जाते. या समाजाचे धर्मगुरू संत सेवालाल महाराज यांना वंदन करण्याची प्रथा या लेंगी गीतातून पार पाडली जाते. लेंगी लोकगीतांमधून सुखदु:खांच्या आठवणींना उजाळा देण्याचाही प्रयत्न केला जातो.

'गोरूरे तांडेमाही वाज नंगारा ठोळी
नंगारारे तालेप रमलो होळी'

तांड्यामध्ये होळीच्या दिवसात नंगारा (ढोल) वाजत असतो. एका ठिकाणी नंगारा वाजवणारा नंगारा वाजवतो आणि त्याच्या चहूबाजूने गोल वर्तुळ करून स्त्रीया व पुरूष होळीचा खेळ खेळतात. ज्या ज्या पद्धतीने नंगारा वाजेल तसतसे या खेळाची रंगत अधिक वाढत जाते. होळीप्रसंगी म्हटली जाणारी गीते होळीचा उत्सव संपल्यानंतर गाऊ नये, असा एक धार्मिक संकेत हा समाज बाळगत असतो.

होळी तयार करण्यासाठी गावातून तसेच रानावनातून लाकडांची जमवाजमव करण्यात येते. होळीचा उत्सव पार पाडण्यासाठी होळीचा 'गेरीया' (प्रमुख) असतो. हा गेरीया म्हणजे तांड्यातील अविवाहित तरूण असतो. होळी नंतरच लग्नविधी सुरू होतात. त्यामुळे होळीनंतर ज्या तरूणाचे लग्न होणार असेल त्याला होळीचा गेरीया हा मान दिला जातो.

'होळीरो गेरीया तांडेरो पोरीया
गेरीयारे साथ रमलो होळी'

प्रत्येक होळीला वेगळा गेरीया असतो. हल्ली गेरीया होण्याची चढाओढ लागल्यामुळे शक्यतो दोन गेरीया नेमण्यात येतात. दोन्ही गेरीया वेगवेगळ्या पोटजातीचे म्हणजे वेगळया आडनावाचे असतात. होळीचा सण पूर्ण होईपर्यंत सर्व कारभार हे गेरीया पाहतात. तांड्याच्या बाहेर पूर्वेस संपूर्ण गावची एक सामुहिक होळी तयार करण्यात येते. फाल्गुनकृष्ण प्रतिपदेच्या दिवशी काही ठिकाणी सूर्योदयापूर्वी तर काही ठिकाणी सूर्यास्तापूर्वी होळीचे दहन करण्याची प्रथा आहे. होळीला पेटविण्याचा मान गेरीयाचा असतो. सर्व लोक होळीची सामूहिक पूजा करतात.

'साई वेस होळी याडी, साई वेस
जीव जगतेनं बरकत देस
किडी मुंगीन साई वेस
आयो झकट झोल, संकट दूर करेस'

होळी पेटल्यानंतर बोंब मारण्याची प्रथा या समाजात रूढ आहे. बोंब मारणे याला 'बुमडी मारणो' असे म्हणतात. होळीच्या प्रसंगी बोंब मारणे शुभ मानले जाते तर इतर वेळेस बोंब मारणे अशुभ मानले जाते. बोंब मारून गावच्या सर्व इडापीडा होळीने घेवून जाव्यात आणि पुढील होळी पर्यंतचे वर्ष सुखसमाधानाचे आणि आनंदाचे जावो अशी होळीला विनवणी करतात.

बंजारा समाजात होळी हा सण त्यावर्षी जन्मास आलेल्या मुलांच्या बारशाचा उत्सव म्हणूनही साजरा केला जातो. त्याला 'धूंड' असा शब्दप्रयोग केला जातो. मुलाला होळीच्या ठिकाणी नेऊन होळी कडून मुलासाठी आशीर्वाद मागीतला जातो.

'हे होळी माता हरो भरो रकाड
मारे विरानं हरो भरो रकाड
हासती हासती वर आयेस
रोती रोती पर जायेस'

होळीला धुंडाचे नैवेद्य म्हणून खीर, पुरी आणि नारळ दिले जाते. पुरीला बंजारा बोलीभाषेत 'सुवाळी' असे म्हणतात. होळीचा गेरीया ते सगळे नारळ जमा करून दुसऱ्या दिवशी होळीचा प्रसाद म्हणून गावाला वाटतो.

होळीच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी खेळण्याचा दिवस असतो. याला 'फाग रमणो' असे म्हणतात. रंगपंचमीचा रंग तयार करण्यासाठी पळसाच्या फुलांचा वापर केला जातो. या फुलांना 'केसुला' असा शब्द वापरला जातो. स्त्री—पुरूष ऐकमेकांवर रंग टाकून 'फाग गीत' गातात. हे गीत गात प्रत्येकाच्या घरून पैसे जमा केले जातात. हे पैसे एकत्र करून बोकड आणला जातो. बोकड कापून मटनाचे समान हिस्से करून सर्वांना वाटले जातात. याला 'गेर' असे म्हणतात. 'गेर' झाल्यावर होळी उत्सवाचा समारोप होतो. होळी सणाला निरोप देतांना अखेरचे गीत गाईले जाते,

'होळी आयीरे होळी डगर चली
गेरणीन गेरीया दे चली
होळी आयी रे होळी डगर चली
गेरीयान बेटा दे चली
होळी आयी रे होळी डगर चली'

बंजारा समाजाच्या सांस्कृतिक जीवनात होळी सणाचे महत्त्व अगाध आहे. आज तांड्यातील बंजारा नोकरी, उद्योगांसाठी शहरांकडे स्थिरावलेला असला तरी मात्र होळीच्या

सणासाठी त्याची ओढ सतत गावाकडे असते. होळीला जवळपास सर्वच गोर—बंजारे गावात दाखल झालेले असतात.

हा समाज दैववादी असल्याने विविध सण—उत्सवप्रसंगी देव—देवतांची पूजा करून अरिष्ठ निवारणासाठी बोकड बळी देण्याची प्रथा बंजारा समाजात प्रचलित आहे. प्रत्येक सणांचा समारोप 'कर' साजरा करून केला जातो. या समाजात सर्वच सण उत्सवांमध्ये मांस—मद्याला फार महत्त्व आहे. सामूहिकपणे बोकड कापून मटनाचे समान हिस्से करून प्रत्येक कुटुंबाला वाटप करण्याच्या पद्धतीला 'कर' म्हटले जाते. प्रत्येक सणाला 'कर' साजरा करण्याची पद्धत या समाजात रुढ आहे.

बंजारा समाजात होळी, दिवाळी, तीज, दसरा, बैलपोळा हे सण—उत्सव मोठ्या आनंदाने, भक्तीभावाने उत्स्फूर्तपणे साजरे केले जातात. या समाजाच्या सण—उत्सवांमध्ये लोकगीतांना अगाध महत्व आहे. ही लोकगीते बंजारा समाजाची भाषा आणि संस्कृतीचे दर्शन घडवतात.

**आधार :—**

१. पवार रुक्मिणी:— बंजारा लोकजीवन पद्धती, कैलाश पब्लिकेशन्स,औरंगाबाद

२. चव्हाण रामनाथ:— भटक्या विमुक्तांचे अंतरंग, सुगावा प्रकाशन पुणे

३. राठोड सुनील:— बंजारा जमात : लोकजीवन आणि लोकगीते, मधुराज पब्लि. पुणे

◆◆◆

# दलित आत्मकथनातील प्र.ई.सोनकांबळे यांचे समाजव्यवस्थेतील स्थान

**प्रा.नामदेव शिनगारे**
मराठी विभाग
महिला महाविद्यालय, गेवराई

**प्रास्तावीक**

दलितांच्या दु:ख भोगाचे मूळ कारण हे वर्णव्यवस्थेवर आधारीत समाजव्यवस्थेत सापडते. पदोपदी दलितांच्या वाट्याला अपमानच आलेला आहे. दलितांना जेव्हा आत्मभान आले. तेव्हा त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली व अस्पृश्यतेविषयीची आपली कडवट भावना, राग, संताप लेखनातून व्यक्त होऊ लागला. अस्पृश्यतेमुळे भोगलेल्या दु:खाचे अनुभव व त्या विरोधात दिलेला संघर्ष त्यांच्या लेखनातून चित्रीत झाला आहे.

'आठवणींचे पक्षी'मध्ये लेखकाला बालपणी अनेक जातीच्या मुलांचा सहवास लाभलेला आहे.त्यांच्यावर त्या परिसराचा तिथल्या संस्कृतिचा प्रभाव पडलेला आहे.त्यांची गरीबी आणि पोटासाठीचा संघर्ष भयंकर आहे.अस्पृश्यतेची दाहकता त्यांनी अनुभवलेली होती.

मराठी दलित आत्मकथनातील बालकांच्या विविध गुणधर्माचा त्यांच्या स्वभावाचा त्यांच्या बालपणातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा विविध पातळ्यांवर त्यांना कसा संघर्ष करावा लागला. बालपण हे निरागस असते. मान-अपमान यापेक्षा त्यांना अनेक वेळा अन्नासाठी संघर्ष करावा लागला, अस्पृश्यतेशाठी संघर्ष करावा लागला. बालवयात शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. यासाठी कित्तेक वेळा अपमान सहन करावा लागला आहे.

**समाजव्यथा-**

दलितांच्या वाट्याला आलेले जे दु:खभोग आहेत; त्यात अस्पृश्यतेचा फार मोठा वाटा आहे.चातुर्वर्णावर आधारित समाजव्यवस्थेत अतिशूद्रांना अस्पृश्य मानले. त्यांच्या सावलीचाही स्पर्श उच्चवर्णियांना चालत नव्हता. माणसाने माणसाचा स्पर्श नाकारावा ही केवढी अमानुष कल्पना ! पण तिच्यामुळेच दलितांची जीवने करपून गेली. चोखामेळा, कर्ममेळा या सारख्या संतांनीही आपले याबाबतचे दु:ख अभंगातून मांडले आहे. दलितांना जेव्हा आत्मभान आले तेव्हा त्यांना याची प्रकर्षाने जाणीव झाली. अस्पृश्यतेविषयीच्या आपल्या कडवट भावना, राग, संताप त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त करणे साहजिक होते.अस्पृश्यतेमुळे भोगलेल्या दु:खाचे अनुभव त्यांच्या लेखनातून वेगवेगळ्या प्रसंगाच्या माध्यमातून चित्रित झालेले आहेत.

लेखक ज्या समुहातील आहे त्या समुहाचेही ते 'आत्मकथन' असते. लेखक ज्या प्रदेशातील आहे त्या प्रदेशाचेही ते आत्मकथन असते. लेखकाचे दु:ख हे एकट्याचे दु:ख नसून ते त्याच्या दलित समाजाचेही दु:ख आहे. आत्मकथनात एका व्यक्तीचे म्हणजे निवेदकाचे जीवनचरित्र मध्यवर्ती असते. हे खरे तथापि आत्मकथा वा आत्मचरित्र म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या भावजीवनाची कथा नसते.कारण कोणत्याही व्यक्तीचे जीवन हे अनेक संदर्भांशी निगडित असते.प्रत्येक व्यक्तीजीवनाला सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक,आर्थिक आणि या सर्वांना अर्थपूर्णता देणारा कालसंदर्भ असतो.एवढेच नव्हे तर दलित समाजाचे सुख-दु:ख, आशा आकांक्षा, चालीरिती,समज आणि श्रध्दा इत्यादींनी रंगलेले विराट चित्रही आत्मकथनातून साकार होते.घरची अत्यंत गरिबी,त्यातून अस्पृश्य- जातीत झालेला जन्म. म्हणून पदरी

आलेली भूक आणि अस्पृश्यता याबध्दलची दाहकता अनेक आत्मकथनातून आलेली आहे. पूर्वीचे दलितांचे आर्थिक जीवन गुहा मानवासारखे होते.

मेलेली जनावरे कापून खाणे, 'लाकोशी'धरणे वगैरे प्रकार सर्रास चलत.त्यातून रोगराईचा फैलाव होईल;परंतु भुकेचा डोंब एवढा पेटलेला असे की, विचार करायला वाव मिळत नसे.काहीही करून पोटाची खळगी भरून पोटाची आग विझवणे एवढेच त्या भुकेल्या कंगालांना कळत होते. आत्मकथनातून केवळ लेखकाचेच दु:ख अभिव्यक्त होते असे नाही तर समाजाची सुख-दु:खे, आशा-आकांक्षा,ताणतणाव याचे विराट रूपच त्यातून व्यक्त होते. भारतीय समाजव्यवस्थेच्या तळाशी खदखदणाऱ्या जातिभेद, अंधश्रध्दा, अज्ञान,रूढीग्रस्तता,श्रेष्ठ-कनिष्ठता या प्रश्नांनी वेढलेल्या एका प्रचंड समुहाचे प्रत्ययकारी दर्शन घडते, हे पानतावणे यांचे मत अमान्य होऊ शकत नाही. १

**जगण्यासाठीचा संघर्ष**

लेखक लहाण असूनही अक्काची मर्जी सांभाळण्यासाठी मिळेल ते
काम करतो. तो सांगतो,

मी जरी शाळकरी व न्हानगा तरी तसाच आक्कानं काही म्हणू नये व शिव्याफिव्या हासडू नये म्हणून लोकांना लावून घेऊन गुत्त्यात जायचो तर एखाद्या वेळी पात वगैरे लागली नाही व मागे पडलो की म्होरके लोक कधी मांग तर कधी पातरूड ज्यांना कमी लेखलं जातं त्यांना माझी कीव येऊन ते मला पात लावायला मदत तर करतच पण दाणे वाटायच्या वेळीही लई गरीब पोरगं व गुणाचं है,माय,वनवासी म्हणून बायापेक्षा कमी काम करूनही मला बायाच्या एवढे दाणे देतासत. २

प्र.ई.सोनकांबळे अस्पृश्यतेच्या अनेक आठवणी सांगतात.तहाण लागली म्हणून लहानगा प्रल्हाद एका खड्ड्यातले साचलेले पाणी पीत असतो.कोणी पाहील की काय ही भीती त्याच्या मनात असते.तो महार आहे ना जिथे सवर्णाची गुरे पाणी पितात ते पाणी पिऊन तो बाटवीत होता.आणि पाणी पीत असताना एक शेतकरी येतो,रोखतो,सांगतो.

असं करू नको पाणी बाटवू नको.मार पडल.......

दुसरी घटना आहे.मित्राचा निरोप घेऊन तो गावी त्याच्या घराकडे निघालेला असतो आणि मित्राची बहीण नांदायला निघालेली असते.महार आडवा आला.अशुभ आडवे आले असे वाटून सर्वानाच वाईट वाटते आणि पाऊस आणि पूर आडवा येऊन त्या मुलीचे सासरी जाणे रद्द होते. प्र.ई.ही आणि अस्पृश्यतेच्या अशाच आठवणी सहजपणे सांगतात. त्यांच्यातील संघर्ष वाढवीत नाही.कारण त्यावेळी तो संघर्ष नसतोच.जे येईल ते सहन केले पाहिजे........म्हणून. ३

दलित आत्मकथनातून केवळ लेखकाचेच दु:ख अभिव्यक्त होत नाही तर एकून समाजाच्या व्यथा वेदना त्यातून डोकावताना दिसतात.हे वरील विवेचनावरून लक्षात येते.

जिथं जनावरांना पाणी पिण्याचा अधिकार आहे.तिथे माणसाला पाणी पिण्याचा अधिकार नव्हता.हे लादलेलं जीवन निमुटपणे सहन करावं हीच भावना तत्कालीन दलितांची होती.यावरून तत्कालीन समाजव्यवस्था लक्षात येते.

**अस्पृश्यता**-

**अस्पृश्यता-**

'आठवणीचे पक्षी' मधून भुकेचा तीव्र जाणीव जशी प्रकट होते त्याप्रमाणेच अस्पृश्यतेचे चटकेही लेखकाला सहन करावे लागतात.

लेखक बालपणीचा प्रसंग सांगतो. मोठ्या बहिणीकडून लहान बहिणीकडे जाताना वाटेत घडलेला प्रसंग हृदय पिळवटून टाकणारा आहे.

" मला वाटले आता वाटेतच चेलमा है व पाणीबी काळभोर दिसतंय व उतीम लोक कोणीबी दिसत नाही तर पिऊन घ्यावं पाणी व चालतं व्हावं.पुढे बऱ्याच अंतरावर पाणी होतं पण तितक्या लांब जाण्यापेक्षा इथंच प्यावं पाणी असं वाटू लागलं.कारण त्या चेलम्यात हमेशा कुणब्याचे माणसं तर पाणी पीत नाहीत.पण त्याचे ढोरंगुरं मातर जरूर पितात हे मी

त्या रस्त्याने जातासताना पाहिलं होतं.

एकीकडे मन म्हणायचे की अरे पाणी पिऊन घे व चालता हो,कोण काय करणार वाटायचं मुशाफराला.पण दुसरीकडे असे वाटायचे की जर कोणी कुणब्या-फिणब्यांनी फायलं तर उगीच बला येईल कारण खेड्यांत लोक लई जलदी वळकतात कोण कोणत्या जातीचा है म्हणून.

मी मन धुकूड पुकूड करीत असतानाही ओंजळीने पाणी पिऊ लागलो तरच आजूबाजूनं झाडाझुडपाचा आवाज येऊ लागला.जसं म्हणतात ना चोराच्या मनात चांदणं पण मी थोडीच कुणाची चोरी करीत होतो.फक्त तहान लागली म्हणून पिढ्यान् पिढ्या रस्त्यावर असलेल्या रानातील चेलम्याचे पाणी पीत होतो.तितक्यात झुपकेदार मिशावाल्याने दरडावून बोलून समज दिली. आणि पाच ओंजळी पाणी बाहेर फेकून 'चेलम्या'ला पवित्र केले.४

केवळ दलित म्हणून 'चेलम्या'वर जनावरांचे पिण्याचे पाणी लेखकाने खूप तहान लागल्यामुळे पिले. म्हणून त्यांना पशूपेक्षाही हीन वागणूक देण्यात आली. यावरून लक्षात येते की, अस्पृश्यतेची मुळं किती खोलवर रूजली होती.

केवळ या देशात आम्ही हिंदू म्हणून जन्म घेतला म्हणून एका निष्पाप मुलाला-पापपुण्याची ज्याच्या मनात जागती जाणीव आहे.त्याला पुष्कळ सहन करावे लागते.तो ते सहन करीत राहतो.त्याची ही सहनशीलता संतापेक्षाही मोठी आहे.एकनाथाच्या त्या कौतुक केलेल्या सहनशीलतेचे आणि या आठवणीतील प्रसंगांची तुलना केली तर एकनाथांची सहन- शीलता काहीच नसते. त्या घटनेला महत्व येते ते एकनाथ नामवंत आणि ब्राह्मण असूनही त्यांच्या अंगावर ते कोणी तरी थुंकत होते.एकनाथ ब्राह्मण नसते तर त्या थुंक्याला तसे महत्व प्राप्त झाले नसते.गरिबांवर कोणीही थुंकत असतेच.

'आठवणींचे पक्षी' मध्ये लेखक प्र.ई.सोनकांबळे यांच्या बरोबरच समवयस्क परंतु इतर जातीची बालकंही डोकावतांना दिसतात.त्यामध्ये पुंडा कोळयाचा बाबू,शेषप्पाचा दत्ता,बाबू जरा मनाचा भोळवटच व्हता पण दत्ता जरा हुशार व चेंगट,एक तर त्याचा बाप वारलेला व त्याची रंडकी माय कसतरी त्याला शिकवत व्हती.त्याचबरोबर स्वजातीचा म्हणजे महाराचा धर्मा.त्याची आई वारकरी सांप्रदयाची माळकरीन बाई,भजन, कीर्तन व पंढरीच्या वाऱ्या करणारी,दिंड्यापत्याकं घेऊन फिरणारी परंतु धर्माच्या शिक्षणाची कळकळ असणारी म्हणूनच तर तिनं धर्माला हडोळतीला गिरणीत झाडलोट करणाऱ्या म्हातारीजवळ ठेवलं होतं. त्याचबरोबर बामणाचा परबु,येलमाचा भानू,मारवाडायाचा बाबू यांची दप्तरं लेखक वागवायचा अन् ही

पोरं खेळत चालायची त्याबदल्यात जेवते वेळेस थोडी थोडी रोटी व मिरचू देयाचे,मारवाड्याचा बाबू मातर चपात्या आणायचा त्यावर तूप साखर असायचे हे सारं लेखकाला अपरूक वाटायचं. ५

लेखकाला बालपणी अनेक जातीच्या मुलांचा सहवास लाभलेला आहे.त्यांच्यावर त्या परिसराचा तिथल्या संस्कृतिचा प्रभाव पडलेला आहे. त्यांची गरिबी आणि पोटासाठीचा संघर्ष भयंकर आहे.अस्पृश्यतेची दाहकता त्यांनी अनुभवलेली होती.या सर्व गोष्टीमुळे प्र.ई.सोनकांबळे यांचे बालपणीचे समाजव्यवस्थेतील स्थान निश्चित होते.

**समारोप**

समाजव्यवस्थेच्या स्वयंघोषित ठेकेदारांनी आपले हितसंबंध जोपासण्यासाठी जाणीवपूर्वक जातीच्या चौकटीचे षडयंत्र निर्माण केल्यामुळे अस्पृश्यांची कोंडी होऊन तो समाजजीवनाच्या मूळ प्रवाहापासून कोसो दूर फेकला गेला. यामुळे जीवनाशी निगडित असलेल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी क्षेत्रांपासून वंचित राहिला. त्याची चोहोबाजूंनीच नाकेबंदी झाल्यामुळे त्यांनाही मूळ प्रवाहापासून वेगळी अशी नवीन पध्दती निर्माण केली. यातून त्यांची अर्थार्जनाची साधने, धार्मिक-सांस्कृतिक विधी, जातपंचायत, रूढी, परंपरा, संकेत, चालीरीती वेगळे ठरले. निमूटपणे गुलामगिरी सहन करत असताना एखाद्या वेळी या अस्पृश्यांनी स्वअस्तित्वासाठी प्रस्थापितांविरूध्द ब्र शब्द काढला तर त्याला समूळ नष्ट करण्यात आले. त्यामुळे अस्पृश्यांचे अन्यायाविरूध्द प्रतिकार करणारे मनोबल कायमस्वरूपी पंगू झाले. आठवणींचे पक्षी या आत्मकथनातून पदोपदी जानवते.

संदर्भ


१. कांबळे कमलाकर, 'आठवणींचे पक्षी'-ग्रंथाली कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद,प्रथमावृत्ती २५मार्च २०१०पृ.क्र.७८-७९
२. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी',चेतना प्रकाशन,औरंगाबाद -पृ.क्र.४८
३. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी', चेतना प्रकाशन,औरंगाबाद,पुनर्मुद्रण ६जानेवारी २०११ -पृ.क्र.४०
४. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी',चेतना प्रकाशन,औरंगाबाद, पुनर्मुद्रण ६ जानेवारी २०११-पृ.क्र १२७
५. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी,चेतना प्रकाशन,औरंगाबाद, पुनर्मुद्रण ६ जानेवारी २०११-पृ.क्र ८२-८३
6. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी',चेतना प्रकाशन,औरंगाबाद, पुनर्मुद्रण ६ जानेवारी २०११-पृ.क्र १२७


◆◆◆

# महाराष्ट्रातील दत्त संप्रदायकालीन सामाजिक स्थिती.गती : एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ.राजेंद्र सुखदेव चौधरी**
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

मध्ययुगीन काळापासून भारतात अनेक भक्ती संप्रदायांची परंपरा सुरू झालेली असून; त्यातील काही भक्तीसंप्रदाय हे महाराष्ट्रात आले व इथल्या भूमीत स्थिर होऊन विस्तारित पावले. जसे शैव, वैष्णव, नाथपंथी, कृष्ण, दत्त, विरशैव, जैन, लिंगायत इत्यादी, अनेक भक्तीसंप्रदाय भारतातील अनेक भागात धर्माचरणाचे कार्ये करीत होते. यातूनच महाराष्ट्रामध्ये काही भक्तीसंप्रदायाची निर्मिती झाली. त्यात नाथसंप्रदाय, दत्तसंप्रदाय, विरशैव संप्रदाय यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येण्यासारखा आहे. त्यात 'दत्तसंप्रदाय' हा एक प्रमुख संप्रदाय मानला जातो. यालाच 'अवधूत संप्रदाय' असेही संबोधले जाते. 'श्रीदत्तात्रेयप्रभू' हे या संप्रदायाचे आराध्य दैवत. शैव,वैष्णव व षाक्त या तीनही उपासना प्रवाहांना व्यापणारा दत्तात्रेयांचा प्रभाव सर्वश्रृत आहे. महाराष्ट्रातील महानुभाव,नाथ,वारकरी आणि समर्थ संप्रदायात दत्तात्रेयांविशयी उत्कट श्रध्दाभाव दिसून येतो. यासंदर्भात दत्तसंप्रदाय व तत्कालीन स्थिती. गतीबद्दल जाणून घेता येण्यासारखे आहे.

**दत्तसंप्रदाय व तत्कालीन सामाजिक स्थिती :**

मध्ययुगीन काळात हिंदु राजांचे प्राबल्य कमी होऊन मुसलमानी राजवटी स्थिर झाल्या. सनातन वैदिक धर्म पाळणाऱ्या ब्राह्मण पुरोहितांचा राजाश्रय लोप पावला. अशावेळी ब्राह्मनांनी मुसलमानी राजांची नोकरी पत्करली. त्यांच्यात कर्मभ्रष्टता आली. तेव्हा सनातन धर्माचे पुनरूज्जीवन करून स्वधर्म रक्षणासाठी खरा आचारधर्म शिकवण्याचा प्रयत्न दत्तसंप्रदायाने केला. ''हा संप्रदाय चौदाव्या शतकाच्या अखेरीस श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वती या दोन सिध्द् पुरूषांच्या पुण्याईने उत्कर्ष पावला. 'गुरूचरित्र' हा या पंथाचा प्रमाणग्रंथ असून; त्यात मुख्यत: कर्मकांडाचेच विवरण आहे. लोकांच्या मनावरील वर्णाश्रम धर्माची पकड कायम ठेऊन,सनातन वैदिक परंपरेचे पुनरूज्जीवन करण्याची उत्कंठा या ग्रंथात दिसून येते. नृसिंह सरस्वतींची परंपरा आद्य शंकराचार्यापासूनची आहे.''[१] अर्थात योगसाधना व भक्ती यांस समान महत्व देणारा दत्त संप्रदाय हा बहामनी काळात अधिक पुढे आलेला दिसत असला; तरी त्यापूर्वी दत्तोपासना ही महाराष्ट्रात होतांना दिसते. या संप्रदायाचे प्रवर्तक 'श्रीनृसिंह सरस्वती' हे होते. कृष्ण.सरस्वती या एका वृध्द संन्यास्याकडून त्यांना धर्मदीक्षा मिळाल्यानंतर त्यांचे नरहरी हे नाव बदलून दीक्षांत नाव नृसिंह सरस्वती हे ठेवले आणि ते लोकप्रसिध्द झाले. नृसिंहानी काही काळ ज्ञानदानाचे कार्य केले. भक्तांना परमार्थाची वाट दाखविली. ते भटकंती करीत असतांना; त्यांना माधव,बाळकृष्ण,उपेंद्र,सदानंद,ज्ञानज्योती या नावाचे षिश्य लाभले. त्या सर्वांच्या नावापुढे 'सरस्वती' हे नाव लावले. सात शिष्यांसह श्रीगुरू तीर्थयात्रा करीत महाराष्ट्रातही आले. गाङ्गापूरला आले. त्यावेळी बेदरचा क्रुर व ब्रह्मव्देशी मुसलमान राजा मुत्यू पावल्यानंतर (इ.स.१४३५) त्याचा मुलगा अल्लाउद्दिन हा गादीवर बसला असे

राज्यांतर घडून आले होते.

अल्लाउद्दिन हा नवीन राजा सहिष्णु आणि उदारवृत्तीचा होता. हिंदुविषयी त्याच्या मनात चांगल्या भावना होत्या. मात्र श्रीगुरूंचा आधिचा अनुभव वाईट होता. त्यासंदर्भात असे सांगता येईल की, ''अहमदशहांच्या असुरी लीलांचा प्रत्यक्षानुभ श्रीगुरूंनी घेतला होता. त्यांच्या काळात महाराष्ट्रात सर्वत्र विशेषत: गोदा.कृष्णेच्या मधल्या भागात सुफींचा धर्मप्रचार वेगाने चालू होता. हेही श्रीगुरूंनी उघडया डोळयांनी पाहिले होते. त्यांचा निवास ऐकेकाळच्या सुलतानी राजधानीच्या जवळच होता. इ.स.१४३२ पर्यंत बहामनी सुलतानांची राजधानी गुलबर्ग्यास होती आणि गाङ्गापूर गुलबर्गा यातील अंतर केवळ चार योजनांचे होते. या वातावरणात श्रीगुरूंच्या जागृत विचारांचा आवेग कोणत्या दिशेने वाहत असेल; याची कल्पना करणे कठीण नाही. त्यांनी स्वत: आपल्या अनेक शिष्यांना यवनांकित भूमीत राहुनहि निर्भय जिणे जगण्याची ज्वंलत प्रेरणा दिली होती.''[२] म्हणून पैशाच्या लोभाने मुसलमान राजाच्या दरबारी वेदपठण करणाऱ्या ब्राह्मण पुरोहितांची ते निर्भर्त्सना करीत. त्यातून त्यांची धर्मनिष्ठा प्रबळ होती. धर्मावर आलेले सुलतानी संकट त्यांना धार्मीक तत्वज्ञानाच्या प्रसारातूनच परतावून लावायचे होते. ''ते मुसलमानांच्या आक्रमणाचे दिवस होते. राजकीय,धार्मिक,सांस्कृतिक अशा विविध स्तरावर हे आक्रमण सुरू होते. खरे म्हणजे हिंदू धर्माचे अर्ध्वर्यू म्हणविणाऱ्या वेदविद ब्राह्मणांनी यवनांच्या आक्रमणाविरूध्द लढाऊ आघाडी उघडावयाची; लोकांत तद्नुकूल जागृती घडवून आणावयाची ते तर राहिलेच; पण हे वेदपाठी ब्राह्मण द्रव्यलोभाने म्लेंच्छ राजास शरण जात होते. महाक्रुर ब्रह्मव्देशी यवनराजा ब्राह्मणांना आपल्या सभेत वेदपठण व वेदचर्चा करावयाला बोलवी. द्रव्यलोभी,लाचार ब्राह्मण त्याच्याकडे जात. तो त्यांना टोमणे हाणी. ते त्यांना सहन करावे लागत.

''म्हणे विप्र यज्ञ करिती ।
पशुहत्या करणे रीती ।
आम्हा म्लेंच्छाते निंदिती ।
पशुवधी म्हणुनीया ।।''

म्लेंच्छ राजाचा हा ब्राह्मणांवरचा आक्षेप निरूत्तर ठरण्यासारखा नाही काय? असल्या स्वाभिमानशुन्य सत्वभ्रष्ट ब्राह्मणांचा पाठराखेपणा नृसिंह सरस्वतींनी केलेला नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.''[३] श्रीगुरूंच्या साधुत्वाची मुसलमान शासकांना जाणीव झाली होती. त्यावेळी समाजात एक नवे चैतन्य निर्माण झाले होते.

अल्लाउद्दिन दुसरा हा राजा सहिष्णु बनला होता; म्हणुन तो ब्राह्मण पुरोहितांना आपल्या दरबारात वेदपठणाला बोलवित असे; परंतु मुस्लिम धर्मगुरूंना ते अधोगतीचे लक्षण वाटायचे त्यावर राजा त्यांना म्हणायचा.

''त्याते तुम्ही निंदा करिता।
तरी सर्वांठायी परिपुर्ण म्हणतां।

प्रतिष्ठावया आपुल्या मता।
व्द्ेश आम्ही का करावा।।''[४]

अल्लाउद्दिन हा सहिष्णु असल्याने त्याचे आणि श्रीगुरूंचे संबंध प्रस्थापित झाले. तो एका फोडाच्या विकाराने त्रस्त झाला असता; त्याच्या उपचारासाठी श्रीगुरूंपुढे त्याने लोटांगण घातले आणि आपली व्यथा सांगितली. त्यावेळी श्रीगुरूंच्या अमृतदृश्टीत हा राजा निरामय झाला. तेव्हा तो श्रीगुरूंच्या चरणी लिन होऊन, त्याने श्रीगुरूंना सन्मानपुर्वक आपल्या नगरीत नेले. त्यावेळी हिंदू आणि यवन समाजात परस्पर विरोधी जे पडसात उमटले ते असे,

''लोक म्हणती म्लेंच्छयाती। पहा हो विप्रपूजा करिती।
राजा अनाचारी म्हणती। जातिधर्म सांडिला आजी।
ज्याचे पाहू नये मुख। त्याची सेवा करितो हरिखे।
राजा नश्ट म्हणोनी सकळिक। म्लेंच्छयाती बोलती।।''[५]

पुण्यश्लोक असलेल्या या राजाच्या नगरीत प्रवेश केल्यानंतर त्यांना सिंहासनावर बसवून राजा त्यांची पूजा करतो. त्याचे हृदय गुरूभक्तीने ओतप्रोत भरून जाते. श्रीगुरू त्याचा निरोप घेतात; तेव्हा त्यांच्या चरणाचा वियोग राजाला असहय होतो. अशाप्रकारे हिंदू संत आणि मुसलमान राजा यांच्यातील सहीष्णूतेचे प्रत्यंत्तर या प्रसंगातून येते. अशा धामधुमीच्या काळात सुलतानी संकटांनी भयभीत झालेल्या हिंदू समाजजीवनात श्रीगुरूंनी आपल्या राज्यात महापातके घडतात असे यवन राजाला सांगितले होते. तो यवन राजा म्हणजे बेदरचा 'अल्लाउद्दिन दुसरा' हा श्रीगुरूंच्या चरणी लिन व्हावा; ही विशेष बाब मानावी लागते. कारण ते सर्व जाती धर्माच्या लोकांना जवळ करीत असत. श्रीगुरूनंतर जनार्दनस्वामी,एकनाथ आणि दासोपंत यांनी श्रीगुरूंची सांप्रदायिक परंपरा पुढे सुरू ठेवली. याचबरोबर दत्तोपासनेत अनेक षिश्य परंपरा निर्माण झाली. या शिष्यांमध्ये काहींचे जीवन उन्मुक्त चिंतनाने भारून गेले होते. तर विधीनिषेधातील वृत्ती, विधी—विधानांचा व्यापक प्रपंच, आचारधर्म व उपासनातंत्र अशा वेगवेगळया घटकांना दत्तोपासक महत्व देत असत. जनार्दनस्वामी हे अहमदनगरच्या निजामशाहीत दौलताबादच्या किल्ल्यावर अधिकारी होते. त्यांच्या साधुत्वाचा प्रभाव हिंदु आणि मुस्लिम दोघांवरही होता; परंतु ''जनार्दनस्वामी हे जसे परमार्थवीर होते तसेच रणविरही होते. एकदा किल्यावर शत्रूचे आक्रमण झाले असता; ते परतवून लावण्यासाठी जनार्दन स्वामींना बोलविण्यात आले होते. त्यावेळी ते ध्यानस्थ असल्यामुळे एकनाथच त्यांच्या ऐवजी तलवार गाजवून आणि रणात यश मिळवून आले. जनार्दनस्वामी हे प्रसंगविशेशी रणांगणावर जाऊन युध्दात सहभागी होत असत; असे या प्रसंगावरून अनुमान काढणे शक्य आहे.''[६] म्हणजेच राजकीय स्वाऱ्यांची जाणीव यावरून होते. ते मुसलमान राजाकडे चाकरीस असले; तरी राजकीय स्वातंत्र्याचा विचार त्यांच्या मनात असावा असे वाटते. कारण,

''जालो परधर्मी रत । अधर्म करिता वाटे हित ।
जन्ममरणाची खंत । कैसी आता वाटेल ।

सोडूनिया मी स्वधर्म। आचरलो निच कर्म।
सेवा केली हीच ख्याती। द्रव्यलोभे यातायाती।।''[७]

पैशाच्या लोभापायी परधर्मीयांची नोकरी करण्याबद्दलची खंत जनार्दनस्वामी बाळगतात आणि स्वधर्माविषयी मात्र त्यांच्या मनात नितांत प्रेम दिसते. म्हणून सुलतानी संकटाला तडजोड करण्याची मानसिकता त्यांची दिसून येते.

दासोपंतांचे वडील दिगंबरपंत देशपांडे हे बेदरच्या राजाकडे अंदाजे १५६२ मध्ये चाकरीस होते. सारा वसुलीचे काम त्यांच्याकडे होते. पण दुष्काळ पडला असता; त्यावेळी ते राजाकडे सारा भरू शकले नाहीत. म्हणून त्यांना राजाकडून विचारणी झाली आणि त्रासही झाला. कारण साऱ्याची रक्कम भरली नाही; तर त्यांच्या मुलाला मुसलमान धर्माची दीक्षा देण्याची धमकी राजाने दिली होती. म्हणूनच या कारणास्तव बादशहाने त्यांच्या मुलास आपल्या ताब्यात ठेवून घेतले होते. दासोपंतांचे देखणे रूप पाहून त्याला आपल्या धर्मात आणून; आपला उत्तराधिकारी म्हणून राजगादीवर बसवावे; असे निपुत्रीक मुसलमान राजाला वाटले होते. धर्मांत्तराची वेळ जवळ येतांना मात्र दासोपंतांने दत्तात्रेयांचा धावा केला. त्यावेळी 'दत्तात्रेय' प्रकट होऊन त्या राजाला हुंडया आणि द्रव्यराशी देतो असे सांगितले जाते. तेव्हा दासोपंत राजाच्या तावडीतून सुटला. हा वृत्तांत दासोपंतांनी घरी सांगितला. नंतर दासोपंतांने दत्तात्रेयालाच आपले स्वर्वस्व मानले. अशा प्रकारे ते दत्तोपासक बैरागी बनले. अशी माहिती मिळत असली तरी मुसलमान राजवटीतील सारा पध्दत आणि धर्मांत्तराची भावना या ठिकाणी वाचकांच्या प्रत्ययास येते आणि हिंदू लोक त्यांच्या चाकरीस असल्याचे स्पश्ट होते. दासोपंतांनी नंतर वेदान्त ग्रंथावर टिका करून मराठीत धर्मग्रंथाचे रूपांतर केले आणि लोकांना उपदेश केला. हे तत्कालीक सुलतानी संकटाला अप्रत्यक्षपणे प्रत्युत्तर होते.

अशाप्रकारे दत्तसंप्रदाय हा सर्व धर्मांना घेऊन चालणारा संप्रदाय असून मुस्लिमांच्या आक्रमणामुळे सांस्कृतिक संघर्ष उद्‌भवला असला; तरी आपल्या स्वधर्माला उजाळा देत परधर्मालाही सोबत घेऊन चालणारा असा हा संप्रदाय आहे. दासोपंतानंतर मुक्तेश्वर, निरंजनरघुनाथ, माणिकप्रभु, अक्कलकोटकर स्वामी, वासुदेवानंद सरस्वती इत्यादी महापुरूषांनी या संप्रदायाची परंपरा पुढे चालु ठेवली. आजही महाराष्ट्रात अनेक दत्तोपासक भक्त आढळून येतात. यातूनच महाराष्ट्रात दत्तसंप्रदाय व तत्कालीन स्थिती.गतीचे दर्शन घडतांना दिसून येते असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ.**


१. संत वाङ्मय फलश्रृती : गं.भा.सरदार, पृ. १३२
२. दत्त संप्रदायाचा इतिहास : रा.चिं. ढेरे, प्र.दा.रानडे, पृ. १०४
३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड.चौथा : अ.ना.देशपांडे, स.कृ.पाध्ये, पृ.१५
४. दत्त संप्रदायाचा इतिहास : उ.नि.पृ.१०५
५. तत्रैव : पृ.१०७
६. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : उ.नि. पृ. २४
७. तत्रैव : पृ. २४


◆◆◆

# आदिवासी नायकांचे स्वातंत्र्यासाठीचे योगदान

**डॉ. विठ्ठल केदारी**
मराठी विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आदिवासी मराठी आत्मकथनांतून लेखकांनी जीवनानुभव व्यक्त केले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वातावरणाचा परिचय वाचकांना त्यांतून होतो आहे. स्वातंत्र्यांची भावना अथवा स्वातंत्र्यांपूर्वीच्या परिस्थितीचे चित्रण त्यांतून वाचकांसमोर येत नाही. साहजिकच स्वातंत्र्य प्राप्तीचा लढा या साहित्यिकांनी पाहिलेला अनुभवलेला नाही. स्वातंत्र्य प्राप्तीची प्रेरणा चरित्र वाङ्मयांतील नायकांच्या मनातील स्वातंत्र्यांची भावना प्रखरपणे पहायला मिळते. आदिवासी मराठी साहित्यामध्ये चरित्र वाङ्मयाचे वेगळेपण सांस्कृतिक लढ्याच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरते. स्वातंत्र्याची भावना प्रत्येक आदिवासी माणसाच्या मनामध्ये भरली होती. परंतु गावकुसाबाहेर, जंगलामध्ये राहणारा आदिवासी इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरोधी लढे देत होता. त्यांच्या जुलमी, शोषण व पिळवणुकीच्या वागणुकीला कंटाळलेला होता. त्यामुळे त्या त्या भागांतील आदिवासी इंग्रजांविरोधी लढे देत होते. सरंजामशाहीला विरोध करुन तत्कालीन राज्यव्यवस्थेला धक्के देण्याचे कार्य केले. स्वातंत्र्याच्या प्रेरणेने आदिवासी समाजातील क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य लढ्यांमध्ये सुरुवातीपासून योगदान दिले. परंतु या आदिवासींच्या योगदानाची स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये कोठेही उल्लेख आलेला नाही. तत्कालीन इतिहास लेखकांनी त्यांची नोंद घेतली नाही. त्यांची संकुचित मानसिकता आदिवासींच्या कार्याची दखल घेण्यासाठी इच्छुक नव्हती. किंबहुना त्यांना ती जाणीवपूर्वक घ्यावीशी वाटली नाही असेच चित्र पहावयास मिळते.

आदिवासी जमातींचा इतिहास फार जुना आहे. आदिवासी समाजातील विरांचा इतिहास स्वातंत्र्यापूर्वीपासूनचा आहे. त्यासंबंधी डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात की, च्आदिवासी जमातींना चळवळींचा फार जुना इतिहास आहे. इ.स. १३४० मध्ये महंमद तुघलकाने पूर्वीचा कोंडाणा आताचा सिंहगड व अहमदनगरचा डोंगरी किल्ला महादेव कोळी जमातीच्या नायकाचा पराभव करुन ताब्यात घेतल्याचा उल्लेख सापडतो. कोंडाणा हा किल्ला नागनाथ नावाच्या आदिवासी नायकाच्या ताब्यात होता. त्याने शत्रुविरुद्ध आठ महिने किल्ला लढविला. पुढे रसद तुटल्यामुळे त्याला किल्ला सोडून पळून जाणे भाग पडले. त्यानंतर नागनाथने आपल्या निवडक साथीदारांच्या मदतीने दोन वेळा हल्ला करुन आपली संघटीत शक्ती पणाला लावल्याचा इतिहास साक्षीला आहे.छ१ अशा प्रकारे डॉ. रोंगटे यांनी आदिवासी माणसांचा पराक्रती इतिहास वाचकांसमोर आणला आहे. अगदी इ.स. १३४० पासूनचा हा आदिवासी माणसांचा ज्वाज्वल्य इतिहास सांगता येतो.

तसेच अगदी देवगिरीच्या यादवांच्या कारकिर्दीतही बिदरच्या राजाने पौपेरा नावाच्या महादेव कोळ्याला जव्हारच्या राजाचे अधिपत्य दिलेले दिसून येते.. यावेळी म्हणजे इ.स. १३४० ते १४९० या कालखंडात बहामनी राजांनी इ.स. १५४० ते १६३७ मध्ये निजामशाहीने आदिवासी नायकांचे स्वतंत्र अस्तित्त्व मान्य केले होते. अशा पद्धतीने आदिवासी विरांचा परिचय वाचकांसमोर येताना आदिवासींकडील स्वातंत्र्याची भावना

महत्त्वपूर्ण ठरली. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाली. त्यावेळी या चळवळीमध्ये संपूर्ण भारतातील आदिवासींच्या चळवळी सहभागी झाल्या. स्वातंत्र्य प्राप्तीच्या प्रेरणेने त्या इंग्रजाविरोधी लढे देत राहिल्या. प्रथमतः बंगालमध्ये आदिवासींची चळवळ सुरु झाली आणि यावेळी भारतीय स्वातंत्र्यालढ्यामध्ये विविध प्रांतातून आदिवासींचे लढे सुरु झाले. च्भारतीय स्वातंत्र्याचा पहिला उठाव २९ मार्च १८५७ रोजी बैरकपूर (बंगाल) येथे झाला. त्याच्या ज्वाला भारतभर पसरल्या ह्या रोमांचकारी समराची सुवर्णाक्षरांनी भारतीय इतिहासात नोंद घेण्यात आली असली, तरी त्याआधी कितीतरी आदिवासी क्रांतिकारांनी इंग्रजांना देशातून कायमचे हाकलण्यासाठी जिवाची बाजी लावत अभूतपूर्व लढाया केलेल्या आहेत. त्यातीलच सिद्धू, कान्हू, चाँद आणि भैरो या संथाळ बंधूनी कान्हुच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची पहिली उद्घोषणा केली. या संथाळ बंधूच्या नेतृत्वाखाली इतके व्यापक आणि सशक्त बंड या देशात घडून यावे की ज्याने भविष्यसूचक ठरावे, भारतवासीयांची आणि इंग्रजांची झोप मोडवी, भल्याभल्यांनी धसका घ्यावा आणि दुसरीकडे बऱ्याच विद्वानांना (?) ह्या बंडाच्या मागमूसही असू नये. काय म्हणावे इथल्या वांझोट्या संवेदनेला!छ२ अशा रीतीने भारतातील आदिवासींचे लढे विविध भागांतून सुरु होते. आदिवासींचा हा संथाळ बंधूनी दिलेला लढा दैदिप्यमान असाच आहे. संथाळांनी केलेला हा लढा इतिहासामध्ये कोठेही नोंदला गेला नाही. जागतिक पातळीवर या लढ्याची नोंद घेतली गेली. परंतु भारतीय अभ्यासकांना त्या लढ्याचे महत्व लक्षात आले नाही. यासंबंधी जगद्विख्यात साम्यवादाचे जनक घ्कार्लमार्क्सङ आपल्या 'Notes on Indian History' या ग्रंथात आदिवासींच्या लढ्यासंबंधी मत नोंदवताना म्हणतात, च्संथाळांनी सात महिन्यापर्यंत गणिमी काव्याने लढा दिल्यानंतर १८५६ च्या फेब्रुवारी महिन्यात ते बंड मोडून काढणे शक्य झाले.छ३ या आदिवासींनी इंग्रजांविरोधी सुरु केलेला हा क्रांतीचा लढा प्रखर स्वरुपाचा बनला. संथाळांनी चालू केलेल्या या संघर्षाबद्दल थॉमसन आणि गॅरट या तत्त्ववेत्यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे की, च१८५५ चे भारतातील संथाळांनी केलेले क्रांतिकारी बंड म्हणजे इंग्रजांच्या भविष्याला गदगदा हलवणारे होते.छ४ या व्यक्त केलेल्या तत्त्ववेत्यांच्या मताचा परामर्श घेतला की, आदिमांच्या संघर्षाची प्रचीती येते. आदिमांच्या मनामध्येही ब्रिटिशांविषयी भूमिका दूषित होती हेच लक्षात येते. ब्रिटिशांच्या धूर्त धोरणांविषयी आदिवासींनी सुरु केलेला संघर्ष स्वतःच्या अस्तित्त्वासाठीचा होता असे निदर्शनास येते. आदिवासी जमातीचे १७७५ ते १८९९ या कालावधीत इंग्रजांविरोधी अनेक लढे सुरु होते. कारण ईस्ट इंडीया कंपनीने बंगालमध्ये आपले बस्तान बसविण्यासाठी सुरुवात केल्यावर आदिवासींचा इतर समाजांशी व इंग्रजांशीही संपर्क वाढत होता. एकीकडे परस्परांशी संबंध वृद्धिगत होतानाच दुसरीकडे संघर्षही वाढत गेला. अशा परिस्थितीत आदिवासींच्या जनजीवनात, समाजजीवनात या दोनही घटकांकडून ढवळाढवळीचे प्रयत्न सुरु झाले होते. म्हणूनच बंगालमधील आदिवासींनी आपल्या समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य सुरु केले. ह्या घटकांकडून इंग्रजांकडून आपले स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे याकरीता आदिवासी समाजातील नेतृत्त्वांनी समाजहिताचे रक्षण करण्यासाठी चळवळी निर्माण करण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने बिहारमधून आदिवासी समाजाने प्रथमता या स्वरुपातून एकत्र येवून इंग्रजांविरोधी चळवळ निर्माण केली. इ.स. १८२० ते १८३२ या कालावधीमध्ये भारताच्या ईशान्येकडील आदिवासी समाजाकडे इंग्रजांचे लक्ष वेधले गेले. या भागांत विविध आदिवासी समाज आपापले जीवन जगत होते. इंग्रजांनी त्यांच्या

प्रदेशात प्रवेश केला आणि आदिवासींच्या जीवनामध्ये हळूहळू त्यांच्या हस्तक्षेप व्हावयास लागला. हा हस्तक्षेप आदिवासींना आवडला नाही. साहजिकच या भागात आदिवासी सुख-संपन्नतेचे जीवनाला या विघ्नाला सामोरे जावे लागले. साहजिकच या प्रदेशातील "सिंगपो, मिशिपी, लुशाई, डफळा, खम्पा, खाशी, नागा, मिझो, इत्यादी जमातींना पसंत नव्हती त्यांनी इंग्रजांना कडाडून विरोध केला. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष वाढले."[५] अशा प्रकारे ह्या आदिवासी समाजाची नाराजी इंग्रजांविरोधी सातत्याने वाढत गेली. साहजिकच हळूहळू प्रत्येक आदिवासींनी आपले लढे इंग्रजांविरुद्ध द्यावयास सुरुवात केली.

डॉ.बाबासाहब आंबेडकर हिंदू धर्म के कट्टर समीक्षक थे। उनका मानना था कि धर्म मानव के लिए हैं न मानव धर्म के लिए। हिंदू धर्म के अनुसार चलनेवाला धर्म हैं। हिंदूओं का पूजा-पाठ, धर्म-नीति, रीति-रिवाज या संपूर्ण समाज व्यवस्था की गौरवगाथा जो हिंदू करता हैं। पत्थर की

पुजा करता हैं, परंतु किसी दलित को अपना नहीं समझता बल्कि उसकी परछाई से भी दूर भागता हैं। दलितों को गाँव के बाहर जीवन जिने के लिए विवश किया। यही वजह हैं कि दलितों के जीवन में अँधेरा हैं। दलितों की आर्थिक दशा का कारण वर्णव्यवस्था द्वारा लादी हुई संस्कृति हैं। दलितों की आर्थिक विपन्नता का यथार्थ चित्रण ओमप्रकाश वाल्मीकि ने ' तुम्हारी गौरवगाथा' कविता में किया हैं -

"न जाने कितना दूध
बहा दिया तुमने नाली में।
भूखे बच्चों से छीनकर
अरे, तुम्हारे इन्हीं कुकर्मो ने हमें
कंगाल बना दिया हैं।" [7]

डॉ.बाबासाहब आंबेडकर ने अपने सामाजिक जीवन में महिलाओं के अधिकारों के लिए कार्य करते समय देखा था कि भारतीय समाज व्यवस्था में महिलाएँ सबसे उपेक्षित हैं। उन्होंनें भारतीय महिलाओं की स्थिति के दो भागो में विभाजित किया हैं। एक सवर्ण महिलाएँ और दुसरी दलित महिलाएँ। दलित महिलाएँ भारतीय समाज की दृष्टि से दीन-दलित हैं। सवर्ण महिलाओं की स्थिति उनसे भिन्न हैं। दलित महिलाओं के प्रति काफी संवेदनाएँ थी। डॉ.बाबासाहब आंबेडकर भारतीय महिलाओं के लिए ' हिंदू कोड बिल' यह कानून प्रस्तूत किया था। यह कानून महिलाओं को मानव बनकर रहने की प्रेरणा देता हैं। उनके हक-अधिकार,शिक्षा और सुरक्षा दिलाने की माँग करता हैं।

आर्थिक विपन्नता के कारण दलित परिवारों में लड़कियाँ शिक्षा से वंचित रह जाति हैं। वह बचपन से ही परिवार के बोझ तले दब जाती हैं। भारतीय समाज व्यवस्था में महिलाओं को शिक्षा और ज्ञान का अभाव होंने से उनकी समझ में यह नहीं आता कि कब क्या करना हैं ? वह अंधविश्वास से घिरी होती हैं। वह सदैव अपने हिस्से का सुख ढूँढती रहती हैं। परंतु वर्तमान समाज ने निरंतर उसे शक्तिहीन करने का कार्य किया हैं। उसके मन के भीतर ही भीतर उस समाज व्यवस्था का भय हैं कि वह उसे शक्तिहीन कर देता हैं। इसीलिए ओमप्रकाश वाल्मीकि लिखते हैं -

"बाहर एक दुनिया हैं
जिसे वह पकडना चाहती हैं
भीतर एक दुनिया हैं
जिसे वह जानना चाहती हैं।" [8]

अत:ओमप्रकाश वाल्मीकि ने अपनी कविताओं में सदियों से लेकर आज तक दलितों की दयनीय स्थिति का वास्तविक चित्रण प्रस्तुत किया हैं। उच्चवर्णीयों द्वारा हमेशा दलितों पर अन्याय,अत्याचार, घृणा आदि का शिकार होना पड़ा। इसके साथ-साथ आर्थिक अभाव, दुर्बलता,

भूखमरी उनके जीवन का अर्थ बन चुका हैं। ओमप्रकाश वाल्मीकि की सभी कविताओं में तथाकथित सर्वश्रेष्ठ, उच्च-कुल के लोगों की सैंकडो-हजारो वर्षो से गुलामगिरी करने वाले एक बहिष्कृत दलितों की यातना हैं, प्रताडना हैं, उत्पीडन हैं, शोषण हैं, ऊँच-नीच, भेदभाव और तिरस्कार हैं। भारतीय समाज व्यवस्था में डॉ.बाबासाहब आंबेडकर ने दलित एवं अछूत समाज को समता और न्याय का मार्ग दिखाया। सदियों से चली आ रही वर्णव्यवस्था ने मनुष्य की प्रगति में रुकावट पैदा की हैं। इस मानव निर्मित वर्णव्यवस्था को तोंडने में डॉ.आंबेडकर का योगदान सर्वश्रेष्ठ रहा हैं।

निष्कर्ष :-

ओमप्रकाश वाल्मीकि की कविताओं में आंबेडकरवादी दलित चेतना स्पष्ट झलकती हैं। उनकी कविता परिवर्तनवादी विचारधारा को अभिव्यक्त करती हैं। मनुष्य के संपूर्ण उत्थान में लक्ष्य केंद्रित करनेवाले डॉ.बाबासाहब आंबेडकर चाहते हैं , जाति विहीन समाज व्यवस्था में समता, बंधुता, स्वतंत्रता आदि से नवभारत का निर्माण हो, जाति विहीन, वर्गविहीन समाज के निर्माण का प्रभाव कवि ओमप्रकाश वाल्मीकि के कविताओं में स्पष्ट रूप से दिखाई देता हैं। उनकी कविताओं ने सौंदर्य के नये प्रतिमान गढे हैं। इसी का परिणाम हैं, कि ओमप्रकाश वाल्मीकि की कविता भारतीय समाज व्यवस्था से जवाब चाहती हैं और यथार्थ को उजागर करके बाह्य आडंबरों का पर्दाफाश करना चाहती हैं। वाल्मीकि का संपूर्ण साहित्य मानवतावादी साहित्य हैं, जो स्वतंत्रता, समानता और बंधुत्व की भावनाओं को उजागर करता हैं।

संदर्भ सूची:-

1) बस्स! बहुत हो चुका, ओमप्रकाश वाल्मीकि, कविता बस्स! बहुत हो चुका, वाणी प्रकाशन, नई दिल्ली , प्र.सं.1997,पृ.-80

2) पूर्ववत , कविता, कभी सोचा हैं , पृ.-03

3) सदियों का संताप, ओमप्रकाश वाल्मीकि, कविता, ठाकुर का कुआँ, किलहाल प्रकाशन, देहरादून, प्र.सं.1998,पृ.-07

4) बस्स! बहुत हो चुका, ओमप्रकाश वाल्मीकि, कविता,घृणा तुम्हें मार सकती हैं, वाणी प्रकाशन, नई दिल्ली, प्र.सं.1997,पृ.-3

5) पूर्ववत , कविता, खामोश आहटे , पृ.-53

6) पूर्ववत , कविता, बस्स ! बहुत हो चुका , पृ.-50

7) पूर्ववत , पृ.-103

8) पूर्ववत ,पृ.-52

◆◆◆

Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# समकालीन दौर में साहित्य और सिनेमा की भूमिका

**प्रोफेसर डॉ.आबासाहेब राठोड**
विभाग प्रमुख एवं शोध-निर्देशक
सौ.के.एस.के.महाविद्यालय, बीड ता.जि.बीड

साहित्य समाज का दर्पण होता है | समाज में जो घटित होता है वही साहित्य के द्वारा प्रस्तुत किया जाता है | इसमें ही मनुष्य का हित समाहित किया जाता है | साहित्य और सिनेमा के माध्यम से मनुष्य के साथ साथ सामाजिक दायित्व को भी निभाया जाता है | जीवन और साहित्य का सम्बन्ध जितना सूक्ष्म है उतना व्यापक भी है | साहित्य की व्यापकता इस बात में है कि किसी भी देश जाति अथवा युग का साहित्य समूची मानवता को प्रभावित करने की शक्ति रखता है | अत: विश्वव्यापी मानवता की भावना के विकास के लिए साहित्य का कार्य महत्त्वपूर्ण है | साहित्य बाहरी दुनिया के साथ-साथ हमारे मन के भीतर की दुनिया का भी चित्रण करता है | वह हमारे जीवन को हमेशा नई-नई प्रेरणाओं से भरता है | इसलिए साहित्य का मानव जीवन में शाश्वत महत्त्व है | सिनेमा लोकप्रिय और रचनात्मक माध्यम है | वह प्रतिकों में गढ़ता है | उसमें कला और तकनीक का सम्मिश्रण है | कई विद्वान सिनेमा को आधुनिक युग का जादू कहते है | सिनेमा कला में एक तरह की व्यापकता है | वह अपनी बात को करोड़ो लोगों तक आसानी से पहूँचाता है | मनोरंजन के साथ समाज निर्माण में भी सिनेमा की भूमिका अग्रणी है |

साहित्य प्राचीन कला है और सिनेमा आधुनिक कला | मनुष्य की वृत्तियों के उदात्तीकरण और संवेदनशीलता के विकास में साहित्य की जो भूमिका है, नव प्रौद्योगिकी के युग में सिनेमा की भी ही है| जिस प्रकार साहित्य का समाज, संस्कृति, सभ्यता, इतिहास, भाषा आदि से गहरा रिश्ता है उसी प्रकार सिनेमा का भी है | साहित्य से हमें जीवन जीने की प्रेरणा और आनंद मिलता है | सिनेमा से हम मनोरंजन के साथ-साथ संदेश भी ग्रहण करते हैं| साहित्य और सिनेमा समाज के अभिन्न अंग है | दोनों के कैंद्र में समाज ही होता है | साहित्यकार और फिल्मकार दोनों समाज से प्रभावित होते है और अपनी कला के माध्यम से समाज को प्रभावित भी करते हैं | भारतीय समाज पर सिनेमा का व्यापक प्रभाव है | वह सिनेमा से सबसे ज्यादा प्रभावित है | लेकिन मानव और मानव समाज के विकास में साहित्य की भूमिका विशेष रुप से उल्लेखनीय है | साहित्य का ध्येय समाज का हित है और सिनेमा का ध्येय समाज का मनोरंजन करना है और उसे आईना दिखाना है |

साहित्य और सिनेमा दो अलग कलारुप है | साहित्य एकल कला है तो सिनेमा सामूहिक कला है | साहित्य तकनीक पर निर्भर नहीं, लेकिन सिनेमा अधिकतर तकनीक पर ही निर्भर है | साहित्य सस्ता माध्यम है, पर सिनेमा अति महँगा माध्यम है | साहित्य के पाठकों को यह अच्छी तरह से समझना होगा कि साहित्य और सिनेमा में अंतर है | साहित्य की कसौटी पर सिनेमा का मूल्यांकन नहीं किया जा सकता | साहित्य में जिस प्रकार शब्द, वाक्य, अनुच्छेद होते है, उसी प्रकार सिनेमा में शॉट, सीन, सीक्वेल होते हैं | साहित्य में कथा-कथोपकथन होता है | वैसे सिनेमा में पटकथा-संवाद होते हैं | साहित्य में जिस प्रकार कविता होती है, उसी प्रकार सिनेमा में गीत होते है | साहित्य की एक विधा

नाटक और सिनेमा में स्पष्ट अंतर होने के बावजूद भी सिनेमा का स्वरुप नाटक के अत्यन्त निकट प्रतीत होता है | सिनेमा में विशेषत: हिंदी सिनेमा में कहानी, उपन्यास, नाटक, जीवनी, आत्मकथा, कविता, पत्र-डायरी, संस्मरण, गजल आदि साहित्य की कई विधाएँ प्रयुक्त होती हैं| दुनिया की अधिकांश आबादी आज सिनेमा से प्रभावित है | सिनेमा के सम्मोहन से आज कोई भी राष्ट्र अछूता नहीं है | आज भारत में हर वर्ष औसतन एक हजार फिल्में बनती है | फिल्म निर्माण के क्षेत्र में भारत का दुनिया में पहला क्रमांक है | बॉलीवूड या हिंदी सिनेमा आज भारतीय सिनेमा की पहचान बन गया है |

भारत में सिनेमा की शुरुआत धार्मिक विषयों को लेकर हुई | इन फिल्मों ने समाज प्रबोधन का कार्य किया | उसके बाद हम देखते हैं कि निर्देशकों ने धार्मिक विषयों को छोड़कर तत्कालीन सामाजिक समस्याओं पर अपना ध्यान केंद्रित किया | देशभक्ति पर फिल्में भी बनने लगी | इन फिल्मों ने अंग्रेजों के खिलाफ वातावरण तैयार किया और जनता में आजादी की ललक जगाई | साथ ही कुछ फिल्मों ने सामाजिक बुराईयों के प्रति देशवासिओं को जागरुक किया | आजादी के बाद सिनेमा में राष्ट्रवाद का पुट दिखाई देने लगा | इक्कीसवीं सदी तक आते-आते हिंदी सिनेमा हिंसा और अश्लीलता के भँवर में इस कदर फँस गया है कि आज भी वह इसी के इर्द-गिर्द चक्कर काट रहा है | हिंदी सिनेमा के विभिन्न विषय समाज से गहरा संबंध रखते हैं | भारतीय समाज-जाति व्यवस्था, भ्रष्टाचार, नक्सलवाद, संगठित गुनहगारी, आतंकवाद, साम्प्रदायिकता, किसान आत्महत्या, कन्या शिशुहत्या, वेश्यावृत्ति, बलात्कार, विवाहेत्तर संबंध, समलैंगिकता आदि कई समस्याओं से घिरा हुआ है | फिल्म निर्देशकों ने इन समस्याओं को फिल्मों के माध्यम से समाज के सामने रखा | अपने दृष्टिकोन से समस्या का समाधान देने का प्रयास भी किया | स्पष्ट है कि सिनेमा के विविध विषयों में भारतीय समाज का प्रतिबिम्ब झलकता है | सिनेमा का समाज पर सकारात्मक और नकारात्मक प्रभाव देखा जा सकता है, समाज में बढ़ रही हिंसा और अश्लीलता के लिए सिनेमा बहुत हद तक जिम्मेदार है | सिनेमा के कारण आज अधिकांश युवा वर्ग पथभ्रष्ट हो रहा है |

सिनेमा जगत ने पारंपारिक भारतीय मूल्यों को बचाकर रखने में भी मदद की है | हिंदी सिनेमा ने समाज में रचनात्मक परिवर्तन लाने को प्रयास किया और अब वह मनोरंजन के साथ जागरुकता और सामाजिक परिवर्तन का भी महत्त्वपूर्ण कार्य कर रहा है |

सिनेमा भी आधुनिक युग की ही उपलब्धि है | तकनीकी विकास के साथ सिनेमा का विकास हुआ है | दृश्य-श्रव्य होने के कारण फिल्म आज एक लोकप्रिय माध्यम है | जनमानस पर इसका गहरा और व्यापक प्रभाव है | एक अच्छी साहित्यकृति भी चंद पाठकों तक ही पहूँचती है, लेकिन एक अच्छी फिल्म को दुनिया के कोने कोने में लोग देखते हैं | एक अच्छा लेखक भी कुछ पाठकों तक सीमित होकर रह जाता हैं लेकिन एक अच्छा फिल्मकार लाखों-करोड़ों लोगों तक पहूँचता है | साहित्य और फिल्म दोनों की विषयवस्तु मानवीय जीवन प्रसंग या घटना प्रसंग होते हैं | साहित्यकार सृजन करते समय शब्दों के माध्यम से घटना प्रसंगों को पाठकों तक पहुँचाने का प्रयास करता है, किंतु उसी कथा पर फिल्म निर्माण की प्रक्रिया शुरु होती है तब पटकथा तथा संवाद लेखक शब्द नहीं बल्कि दृश्य लिखता है | दृश्यों के माध्यम से वह दर्शकों तक कथा को पहूँचाता हैं | इस कारण एक ओर साहित्य और सिनेमा

की दुनिया परस्पर पूरक बनेगी तो दूसरी ओर सिनेमा के लिए आवश्यक कथाभूमि का योगदान साहित्य देता रहेगा |

हिंदी उपन्यास पर आधारीत जिन फिल्मों का सफल फिल्मांकन हुआ है वे फिल्में हैं - गबन, डाक बंगला, आंधी, मौसम, बदनाम बस्ती, सारा आकाश, सत्ताईस डाऊन, तमस, सूरज का सातवाँ घोड़ा, नौकर की कमीज साथ में जिन फिल्मों का असफल फिल्मांकन हुआ है वे फिल्में हैं - गोदान, सेवासदन, रंगभूमि, आपका बंटी, चित्रलेखा, धर्मपुत्र, त्यागपत्र, नदिया के पार | हिंदी कहानी पर बनी जिन फिल्मों का सफल फिल्मांकन हुआ है वे फिल्में है - हीरा मोती, शतरंज के खिलाड़ी, सद्गति, उसकी रोटी, तीसरी कसम, माया दर्पण, रजनीगंधा, पतंग, मोहनदास और जिन फिल्मों का असफल फिल्मांकन हुआ है वे फिल्में है - तलाश, रंग-बिरंगी, उसने कहा था, त्रिया चरित्र, पंचवटी, सतह से उठता आदमी, अनवर | हिंदी नाटक पर आधारित फिल्म धूपछाँव और आषाढ़ हा एक दिन का सफल फिल्मांकन हुआ है |

बांग्ला लेखक शरतचंद्र के उपन्यास 'देवदास' पर हिंदी में चार फिल्में बनी और कमोवेश सभी सफल रही, प्रेमचंद की कहानी 'शतरंज के खिलाडी' पर सत्यजीत रॉय ने इसी नाम से फिल्म बनाई, जो वैश्विक स्तर पर सराही गई | भगवतीचरण वर्मा के अमर उपन्यास 'चित्रलेखा' पर भी फिल्में बनीं, जिनमें एक सफल रही | बाद में साहित्यिक कृतियों पर आधारित फिल्मों को आर्ट फिल्मों के खांचे मे रखकर इनका व्यावसायिक और हिट फिल्मों से अलगाव कायम करने का प्रयास किया गया, जिससे ऐसी फिल्मों का आर्थिक पहलू प्रश्नचिन्हांकित हो गया और फिल्मकारों ने साहित्यिक कृतियों पर फिल्म बनाने से परहेज करना शुरु कर दिया | इसका परिणाम यह हुआ कि 'एंग्री यंग मैन' युग आ गया और यथार्थ से कटी हुई अतिरंजनापूर्ण 'अमिताभीय' फिल्मों का दौर आ गया | मैं इस दौर को हिंदी सिनेमा का 'अंधकार युग' मानता हूँ, जिससें हमें नवें दशक में आकर मुक्ति मिल सकी, यह युग वस्तुत समाज की सोच, उसकी आकांक्षाओं एवं उसकें स्वप्नों से कटा हुआ था और इसमें आम जनता की सहभागिता नगण्यप्राय थी | साहित्य और सिनेमा के अन्तर्सम्बन्धों पर गुजराती फिल्म समीक्षक **बकुल टेलर** ने बेहद सारगर्भित टिप्पणी की है | उनका कहना है, "**साहित्यिक कृतियों पर बनी फिल्म अपने आप अच्छी हो, ऐसा नहीं होता | वास्तविकता यह है कि साहित्यिक कृति का सौन्दर्यशास्त्र और सिनेमा का सौन्दर्यशास्त्र अलग-अलग हैं** |"

एक अन्य तथ्य यह भी उल्लेखनीय है कि कई बार गलत पात्र चयन से भी साहित्यिक फिल्मों की आत्मा मर जाया करती है | इसका सबसे सटीक उदाहरण '**गोदान**' फिल्म का है | जिसमें होरी की भूमिका में अभिनेता राजकुमार को ले लेने से यह फिल्म अविश्वसनीय लगने लगी क्योंकि दमदार डायलॉग बोलने वाले राजकुमार कहीं से भी दीन-हीन होरी के रोल में फिट नहीं थे | इसके अलावा कृति के मुताबिक परिवेश का अंकन भी फिल्मकारों के लिए बड़ी चुनौती होती है | उदाहरण के लिए बंकिमचंद्र की कृति पर बनी '**आनंदमठ**', विमल मित्र कृत '**साहब बीबी और गुलाम**', आर.के. नारायण के अंग्रेज़ी उपन्यास पर बनी '**गाइड**', उड़िया लेखक फकीर मोहन सेनापति की रचना पर बनी '**दो बीघा ज़मीन**' और मिर्ज़ा हादी की उर्दू कृति पर बनी '**उमराव जान**' फिल्मों की सफलता का सबसे बड़ा कारण परिवेश की समनुरूपता रहा है |

साहित्यकारों की एक बड़ी समस्या यह भी है कि वे प्राय:बन्धनों में बँधकर सृजन करना पसन्द नहीं करते | यही कारण है कि वे सिनेमा में जाने से दूर भागते हैं | क्योंकि उन्हें पता है कि उन्हें फिल्म के निर्माता अथवा निर्देशक के दबाव में कहानी में बदलाव करने पड़ सकते हैं | दूसरी समस्या पटकथा लेखकों की है | वे अक्सर अतिनाटकीयता और अतिरंजना को ही फिल्मों की सफलता की एकमेव कसौटी मान लेते हैं | इसका सबसे बड़ा उदाहरण दूरदर्शन धारावाहिक '**चन्द्रकान्ता'** का है, जिसमें अतिनाटकीयता और अतिरंजना को बढ़ाने के लिए बाबू देवकीनंदन खत्री के मूल उपन्यास की आत्मा ही नष्ट कर दी गई | एक अन्य बड़ी समस्या यह है कि अधिकांश साहित्यकार फिल्म निर्माण के विभिन्न तकनीकी पहलुओं से प्राय: अनभिज्ञ होते हैं और वे कैमरे की ज़रूरत के मुताबिक कथ्य दे पाने में असफल हो जाते हैं |

नवें दशक में आई भूपेन हजारिका की फिल्म '**रूदाली'** ने समाज, साहित्य और सिनेमा की त्रयी को 'आर्ट सिनेमा' के सीमित सांचे से बाहर निकालने में अहम् भूमिका निभाई और इस धारणा को पुन: स्थापित किया कि साहित्य से जुड़ी हुई और समाज का वास्तविक अंकन करने वाली फिल्में भी हिट हो सकती हैं | बशर्ते उनमें निहित साहित्यिक संवेदनाओं का सिनेमाई रूपांतरण सफलतापूर्वक किया जाए | बाद में '**परिणीता'** और '**थ्री ईडिएट'** जैसी फिल्मों ने इसी धारणा को पुष्ट किया | 'मोहल्ला लाइव' कार्यक्रम में **अनुराग कश्यप** जैसे आज के दौर के फिल्मकार तो यह बात कहने में नहीं हिचके कि हिन्दी का अधिकांश लेखन फिल्मों की दृष्टि से अनुपयोगी है और समकालीन लेखक सिनेमा की ज़रूरतों के मुताबिक लेखन कार्य नहीं कर रहे हैं | कमोबेश यही राय निर्देशक **सुधीर मिश्रा** और फिल्म समीक्षक **अजय ब्रह्मात्मज** की भी है |

एक कारण और भी था कि इस दौरान साहित्यिक कृतियों पर बनने वाली फिल्में एक-एक कर असफल होने लगी थीं | प्रेमचंद की रचनाओं पर बनीं **'गोदान', 'सद्गति', 'दो बैलों की कथा', फणीश्वरनाथ रेणु के उपन्यास पर बनी 'तीसरी कसम', मन्नू भंडारी की रचनाओं पर आधारित 'यही सच है', 'आपका बंटी' और 'महाभोज', शैवाल की कहानी पर आई फिल्म 'दामुल', धर्मवीर भारती के उपन्यास पर आधारित 'सूरज का सातवाँ घोड़ा', चन्द्रधर शर्मा 'गुलेरी' की कहानी पर आधारित 'उसने कहा था'** आदि का असफल होना सिनेमा और साहित्य से दूरी की एक बड़ी वजह बन गया | इसके कारण समाज से भी फिल्मों की दूरी बढ़ने लगी| यद्यपि कमलेश्वर को फिल्म जगत में काफी सफलता मिली लेकिन एक साहित्यिक लेखक न होकर जब वे फॉर्मूलाबद्ध कथानक रचने लगे, तभी उनकी फिल्में सफलता का स्वाद चख सकीं और निर्देशकों ने उनकी कहानियों पर फिल्में बनाईं | '**द बर्निंग ट्रेन', 'राम-बलराम', 'सौतन'** आदि उनकी फिल्में कहीं से भी साहित्य के चौखटे में फिट नहीं होतीं | यहाँ एक तथ्य यह भी महत्त्वपूर्ण और रेखांकित करने योग्य है कि हिन्दी फिल्म जगत में जितनी सफलता कवियों और शायरों को मिली, उतनी सफलता कथाकारों को नहीं मिल सकी | इसका एक कारण यह हो सकता है कि कथाकारों की कथा का कैनवॉस अत्यधिक विस्तृत होता है और इनमें 'शब्दों की महत्ता' सर्वोपरि होती है, जबकि सिनेमा में ऐसा नहीं होता. सिनेमा को अपने समूचे विस्तार को दो से तीन घण्टों के भीतर दृश्यों के माध्यम से समेटना होता है और यहाँ शब्द से अधिक महत्त्वपूर्ण 'अभिव्यक्ति' और 'प्रस्तुति' होती है | सिनेमा दृश्य-श्रव्य

माध्यम है और साहित्य पाठ्य माध्यम | यह अन्तर न समझ पाने वाले लेखक अथवा फिल्मकार इस रास्ते पर चलकर असफलता का स्वाद चखते हैं| फिल्मी नज़रिए से नाटक और एकांकी ही सिनेमा के सबसे नज़दीकी सम्बन्धी दिखाई देते हैं| वहीं कवियों और शायरों के लिए ऐसी कोई बन्दिश है ही नहीं | उन्हें तो किसी 'सिचुएशन' के मुताबिक गीत या गज़ल भर लिखनी होती है और सिनेमा के अन्य ज़रूरी आयामों से उन्हें कोई लेना-देना नहीं होता |

हिंदी साहित्य पर आधारित अनेक फिल्मों का निर्माण हुआ है | जब बोलती फिल्मों का दौर शुरु हुआ था तब स्वयं प्रेमचंदजीने फिल्मों की और अपना रुख बदल दिया था | प्रेमचंद की कहानी पर मोहन भावनानी ने सन् 1934 में मजदूर फिल्म बनाई | इस फिल्म में क्रांतिकारी तेवर होने के कारण अनेक जगहों पर प्रतिबंध लगाये गये | सिनेमा एक बहुत सशक्त विधा है जो स्वयं में संपूर्ण है | परंतु उसका सृजन साहित्य के समान स्वांत: सुखाय या व्यक्तिगत संतुष्टि के लिए नहीं किया जा सकता | साहित्य पढ़ते समय हम सिर्फ मनोरंजन की उम्मीद नहीं रखते हैं पर सिनेमा देखते समय हम मनोरंजन की एक बडी उम्मीद देखते हैं | सिनेमा में मनोरंजन को प्राथमिकता है | सिनेमा की पहली मांग है मनोरंजन | साहित्य में मानव जीवन की विभिन्न अनुभूतियों को अभिव्यक्ती दी जाती है| साहित्य तो विचारों का संवाहक होता है | समाज में मूल्यों की स्थापना या एकता स्थापित करने के लिए साहित्य की महत्त्वपूर्ण भूमिका रही है | उसी प्रकार सिनेमा में भी समाज में भिन्न परिवर्तन होते हम देख रहे है | सिनेमा के अपने उद्देष्यों को लेकर समाज के सामने आता है | सिनेमा के द्वारा मनोरंजन के साथ साथ ज्ञानप्राप्ती भी होती है | इस प्रकार समाज विकास में सिनेमा एवं साहित्य दोनों की महत्त्वपूर्ण भूमिका है | सिनेमा से और साहित्य से समाज, जनजीवन आदी घटकों की जानकारी आसानी से होती है | दोनों भी समाज से जुडे हैं | सिनेमा समाज तक गतिशिलता से पहूँचता है | आज लोगों के पास समय की कमी होने से साहित्य पढने की बजाए लोग कम से कम समय में सिनेमा देखना अधिक पसंद करते है |

निष्कर्ष रुप में कहा जा सकता है कि सिनेमा और साहित्य के बीच संवाद एक ऐसी प्रक्रिया है जो निरंतर चलती रहती है | लेकिन आज जो बदलाव हमारे सामने आये हैं उससे यही बताया जा सकता है कि दोनों माध्यमों को अपनी सृजनात्मक संभावनाओं को ध्यान रखकर एक दूसरे को साथ लेकर चलना है | इसलिए डॉ. जगदीप शर्मा कहते हैं साहित्य और सिनेमा दोनों ही समाजरुपी सिक्के के दो पहलु है | इनके बीना समाज की भावना एवं संवेदनाओं का कोई मूल्य निर्धारीत नहीं हो सकता | सिनेमा और साहित्य समाज में घटीत घटनाओं और जीवन का एक आईना होता है | इसमें सामाजिक गतिविधिओं और क्रियाकलापों के अक्स प्रतिबिंबित होते हैं | कोरी कथाओं और मिथ्या कथाओं वाले साहित्य और सिनेमा को कोई ख्याती प्राप्त नहीं हो पाती |

◆◆◆

# महाराष्ट्रातील जलसिंचनातील असमोल : एक दृष्टिक्षेप

**प्रा.रासकर भीष्मा रंगनाथ**
अर्थशास्त्र विभाग
महिला महाविद्यालय, गेवराई.

**प्रस्तावना :**

तिसरे महायुध्द पाण्यावरुन होईल असे भाकीत केल्या जाणाज्या पृथ्वीचा ७१ टक्के भाग पाण्याने व्यापला आहे. असे असतानाही पृथ्वीवर पाण्याचा तुटवडा मोठया प्रमाणात आहे. कारण या पाण्यापैकी ९७ टक्के पाणी हे खाज्या स्वरुपात आहे. उर्वरित ३ टक्के गोडया पाण्यापैकी २ टक्के बर्फ स्वरुपात तर केवळ १ टक्के गोडे पाणी पृथ्वीवरील जीवन सृष्टीसाठी उपलब्ध आहे. या ०.६६ टक्के गोडे पाणी वापरणे शक्य आहे. यापैकी बरेच पाणी भूजल साठयाच्या स्वरुपात भूगर्भात खूप खोलवर आहे. यामुळेच पृथ्वीवरील जीवनसृष्टीसाठी गोडया पाण्याचे महत्त्व खुप जास्त आहे.

पाणी ही प्रमुख व मौल्यवान नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. महाराष्ट्रातील पाणी उपलब्धतेचा अभ्यास केल्यास लक्षात येते की, महाराष्ट्रात सरासरी पाणी उपलब्धता १६३८२० दलघमी इतकी आहे. राज्यातील कोकणातील पश्चिम वाहिनी नदया वगळता इतर ४ प्रमुख नद्यांनी खोरी आंतरराज्यीय आहेत. आंतरराज्यीय करारानुसार १२५९३६ दलघमी पाणी वापरण्यास राज्याला अनुज्ञेय आहे. राज्याच्या वाटयाला आलेल्या पाण्यापैकी ५५ टक्के पाणी कोकणातील पश्चिम वाहिनी नद्यातून उपलब्ध होते.

महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ ३०७ लक्ष हेक्टर असून लागवडीलायक क्षेत्र २२५लक्ष हेक्टर एवढे आहे. हे भारताच्या लागवडी क्षेत्राच्या ९.४ टक्के एवढेच आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील प्रगत राज्यापैकी एक राज्य आहे. राज्यामध्ये शेतीचे प्राबल्य आहे. राज्याच्या स्थुल उत्पादनामध्ये प्राथमिक क्षेत्राचा १३.५ टक्के हिस्सा असला तरी त्यामध्ये शेती क्षेत्राचा जवळपास १२ टक्के वाटा आहे. महाराष्ट्रात ३६ जिल्हे असून सहा विभाग आहेत. महाराष्ट्रातील ४५ टक्के लोकसंख्या शहरात राहते. कृषि क्षेत्र हा आर्थिक विकासातील महत्त्वाचा भाग आहे.५५ टक्के लोकसंख्या शेतीवर आधारित आहे. एकूण भौगलीक क्षेत्राच्या ५७.५५ टक्के भूक्षेत्र कृषि साठी वापरली जाते. त्यापैकी १७.३ टक्के भूक्षेत्र जलसिंचनाखाली आहे. महाराष्ट्रातील ८२.७ टक्के एवढे शेती क्षेत्र पावसाच्या अवलंबून आहे. फक्त १/३ क्षेत्र पर्जन्य छायेखालील क्षेत्र आहे. मात्र त्याचे वितरण राज्याच्या विभागात विषम प्रमाणात आढळते. कोकण, मुंबई, नाशिक व पश्चिम महाराष्ट्राचा काही भागात पर्जन्यमान सरासरी पेक्षा अधिक आहे. तर मराठवाडा विदर्भ अमरावती येथे सरासरीपेक्षा कमी आहे. महाराष्ट्रामध्ये जलसिंचनाचा असमतोल मोठया प्रमाणात निर्माण झाला आहे. प्रमुख कारण नैसर्गिक असले तरी त्याला राजकीय वर्चस्वामुळे हा असमतोल मोठया प्रमाणात वाढलेला आहे. या संशोधन पेपरमध्ये असमतोलचा अभ्यास करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये :**

१. महाराष्ट्रातील जलसिंचनाचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील जलसिंचनाचा असमतोल अभ्यासणे.

३. महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय सिंचन क्षेत्रातील अनुशेषाच्या प्रवृत्तीचा आढावा घेणे.

४. जलसिंचनाचा असमतोल दूर करण्याचे उपाय सुचवणे.

**गृहितके :**

१. महाराष्ट्रात जलसिंचन क्षेत्रात असमतोल आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी आवश्यक असणारी माहिती प्राप्त करण्यासाठी सामग्री संग्रहणाच्या द्वितीयक साधनाचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे विविध अहवाल, संशोधन निबंध,जलसंपदा विभागाचे विविध अहवाल यातील माहिती संकलीत करुन त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. या प्राप्त माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**जलसिंचनाचा पूर्व इतिहास :**

इतिहास काळात जलसिंचनासाठी प्रयत्न निश्‍चित झालेले दिसतात. पण ज्या प्रमाणात प्रयत्न केले गेले त्या प्रमाणात विकास झालेला दिसून येत नाही. औद्योगिकरणाच्या वाढीने झालेल्या बेकारीत तरुण कारागीर वर्ग मोठया प्रमाणात होता. हा वर्ग उपजिविकेचे साधन म्हणून शेती व्यवसायाकडे मोठया प्रमाणात वळला. यामुळे शेतीवरील ओझें दिवसेंदिवस वाढत गेले. त्याप्रमाणात सिंचन सुविधांचा विकास झालेला दिसून येत नाही.

महाराष्ट्रात अवर्षणग्रस्त परिस्थिती व वारंवार पडणारा दुष्काळ निवारण करण्यासाठी पेशव्यांच्या काळापासून जलसंचयासाठी प्रयत्न केलेले दिसतात. जलसंचयाकरीता पेशवेकालीन जुन्नर तालुक्यातील नारायणराव बंधारा, साताज्याजवळील रेवजे बांधारा पुणे जिल्हयातील सुप्या जवळच्या मोढाळा तलाव, वाईजवळचा किनरे बांधारा, विदर्भातील हजारो मालगुजारी तलाव असे प्रयत्न करण्यात आलेले दिसतात. ब्रिटीश कालखंडात सिंचनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला गेला. सिंचन कायदे, सिंचनासाठी आयोग नेमध्यात आले. शासनामार्फत पाटबंधारे योजनेची कामे हाती घेण्यात आली. त्याचबरोबर या काळात नवीन बंधारे बांधण्यात आली.

दुष्काळग्रस्त भागाला एक किंवा दोन संरक्षक पाण्याच्या पाठया देता याव्यात याकरीता ब्रिटीश काळामध्ये भाटधर धरण, भंडारदरा, दारणा, ढोरशी अशी धरणे बांधली गेली. तसेच मध्यम प्रकल्प पूर्ण करण्यात आले. यामध्ये भादलवाडी व शेटफळ जिल्हा पुणे, मुसळवाडी एकरुखे, अहमदनगर तसेच मायाणी सातारा, आष्टी, सोलापूर असे प्रकल्प बांधले गेले. अशाप्रकारे महाराष्ट्रात इतिहास काळात जलसंपदेसाठी प्रयत्न झालेले दिसतात.

**महाराष्ट्रातील जलसंपदा :**

कोणत्याही प्रदेशात पाण्याची उपलब्धतता ही त्या प्रदेशात होणाज्या पर्जन्यमानावर अवलंबून असते. महाराष्ट्राला प्रामुख्याने पावसाद्वारे पाणी मिळते. महाराष्ट्रात सर्वत्र सारखा पाऊस पडत नाही. महाराष्ट्र राज्याचे सरासरी पर्जन्यमान १४२ सेमी इतके आहे. महाराष्ट्रात वेगवेगळया ठिकाणी होणारे पर्जन्यमान वेगवेगळया स्वरुपाचे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२३ कोटी एवढी आहे. महाराष्ट्र राज्याचे नागरीकरण झपाटयाने होत आहे. त्यामुळे शेतीवर आधारित लोकांची संख्या कमी होत चालली आहे. हे विकासाचे प्रमुख लक्षण असले तरी शेतीवर आधारित लोकांची संख्या ५४.८ टक्के एवढी आहे. या लोकसंख्येचा उदारनिर्वाह शेती व शेतीवर आधारित उद्योगावरच चालतो. या लोकसंख्येच्या विकासासाठी शेती विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शेतीमध्ये जलसिंचन होणे गरजेचे आहे. कारण जलसिंचनामुळे शेती उत्पादन, रोजगार निर्मिती व उत्पन्न यामध्ये वाढ होत असते. यामुळेच महाराष्ट्र शासनाने जलसिंचनाला महत्व दिलेले दिसून येते.

महाराष्ट्राचे प्रशासकीय दृष्टया कोकण, पुणे, मराठवाडा, नाशिक, नागपूर व अमरावती असे सहा विभाग पडतात. या विभागाचे तीन विभागात वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ते म्हणजे उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ होय. या सर्वच विभागात होणारे पर्जन्यमान हे वेगवेगळे आहे ते पुढीलप्रमाणे

| विभाग | लोकसंख्या | भौगलिक क्षेत्र (लक्ष हेक्टर) | लागवडीयोग्य क्षेत्र (लक्ष हेक्टर) | दरडोई लागवडी योग्य (लक्ष हेक्टर) | सरासरी पर्जन्य मि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| उर्वरीत महाराष्ट्र | ७०६४२०४५ | १४५.५ | १०३.७ | ०.१५ | १४७५ |
| मराठवाडा | १८७२७७४८ | ६४.८ | ५९.३ | ०.३२ | ८२५ |
| विदर्भ | २३०००३१७९ | ९७.४ | ६२.५ | ०.२७ | १११०.५ |
| एकूण | ११२३७२९७२ | ३७०.७ | २२५.४ | ०.२० | १३६० |

**संदर्भ :** जनगणना २०११ व हवामान विभाग महाराष्ट्र राज्य उर्वरीत महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या विभागाच्या हिस्स्यास अनुक्रमे १४५.५ लक्ष हेक्टर, ६४.८ लक्ष हेक्टर व ९७.४ लक्ष हेक्टर एवढे भौगलिक क्षेत्र आलेले आहे. हे भौगलिक क्षेत्र शेती करण्यासाठी योग्य आहे असे म्हणता येत नाही. त्यापैकी उर्वरित महाराष्ट्रास १०३.७ लक्ष हेक्टर, मराठवाडयास ५९.३ लक्ष हेक्टर तर विदर्भास ६२.५ लक्ष हेक्टर लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे. लोकसंख्येचा विचार करता या विभागातील प्रत्येक दरडोई लागवडी योग्य जमीन ही अनुक्रमे ०.१५ हेक्टर, ०.३२ हेक्टर व ०.२७ हेक्टर एवढी आहे.

महाराष्ट्रामध्ये पाऊस सर्वत्र सारखा पडत नाही हे वरील तक्त्यातील आकडेवारीवरुन दिसून येते. उर्वरित महाराष्ट्रामध्ये इतर विभागाच्या तुलनेत सर्वात जास्त म्हणजे १४७५ मि.मी. एवढा पाऊस पडतो. तर

मराठवाडा व विदर्भामध्ये अनुक्रमे ८२५ मिमी व १११०.५ मि.मी. एवढा पाऊस होतो. कोकण विभागात सर्वात जास्त म्हणजे ३००० मि.मी. पर्यंत पाऊस पडतो. यावरुन लक्षात येते की, महाराष्ट्रामध्ये जलसिंचनामध्ये फार मोठया प्रमाणात विषमता असलेली दिसून येते.

**महाराष्ट्र राज्याची प्रदेशनिहाय पाण्याची उपलब्धता**

| प्रदेश | लागवडी योग्य क्षेत्र (लाख हेक्टर) | न्यायधिकरणाच्या मते पाण्याची उपलब्धता | पाण्याची उपलब्धता (दरडोई घनमीटर) | लागवडी योग्य क्षेत्र प्रति हेक्टर |
|---|---|---|---|---|
| कोकण मुंबईसह | १७.९ | ६५३५७ | २२८३ | ३६४५१ |
| कोकण(मुंबई वगळून) | १७.६ | ६४२०९ | ३९८० | ३६५०७ |
| नाशिक | ४०.२ | १३६३५ | ७३४ | ३३९५ |
| पुणे | ४५.६ | १६०८७ | ६८६ | ३५३१ |
| औरंगाबाद | ५९.३ | ८२०२ | ४३८ | १३८३ |
| अमरावती | ३५.६ | ७०३३ | ६२४ | १९७४ |
| नागपूर | २६.९ | १५६२२ | १३३१ | ५८१८ |
| एकूण | २२५.४ | १२५९३६ | १२९१ | ५५८७ |

**संदर्भ :** विजय केळकर समिती अहवाल २०१३.

वरील आकडेवारी वरुन लक्षात येते की, महाराष्ट्रात जलसिंचनामध्ये मोठया प्रमाणात विषमता असलेली दिसून येते.

**महाराष्ट्रात कृषि क्षेत्रात जलसिंचनाचे महत्त्व :**

महाराष्ट्रातील शेती नैसर्गिक पर्जन्यावर मोठया प्रमाणात अवलंबून आहे. यायाच परिणाम म्हणून महाराष्ट्राच्या शेतीची उत्पादकता कमी असून ती निश्चित स्वरुपाचे उत्पादन देऊ शकत नाही. त्यासाठी पाणी पुरवठयाच्या कृत्रिक सोयी उपलब्ध करणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी पुरवठयामुळे शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे आणि आधुनिक पध्दतीने लागवड करणे शक्य होते. महाराष्ट्राच्या शेतीत पाणी पुरवठयाची असणारी गरज पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

**१) अनियमित पर्जन्यवृष्टी :**

पाऊसातील अनियमिततेमुळे शेतीच्या उत्पादनात अनिश्चिता व जोखीमीमुळे शेतकज्याचे उत्पन्न अतिशय निम्न स्वरुपाचे झाले आहे. ही अनिश्चितता दूर करण्यासाठी कृत्रिम पाणी पुरठवठयाची सोय करणे आवश्यक ठरते.

**२) पीक लागवडीतील विविधतता :**

हवामान फरकामुळे महाराष्ट्रात वेगवेगळया पीकांची लागवड केली जाते. पीकांना जेंव्हा पाणी

लागते तेंव्हा ते पावसापासून मिळत नाही. अशा स्थितीमध्ये सिंचनाच्या सोयी उपलब्ध असणे गरजेचे आहे.

**३) साधन शेती :**

शेतीचा पुरवठा अलवचिक आहे. त्यामुळे उत्पादन वाढीसाठी सखोल शेतीशिवाय पर्याय नाही. वाढीव अन्नध्यान्याची कच्च्यामालाची वाढत्या मागणीसाठी सधन शेती आवश्यक ठरते.

**४) उत्पादकता वाढ :**

कमी उत्पादकतेचे कारण म्हणजे पावसावरील अवलंबून उत्पादन वाढण्यासाठी कृत्रिम पाणी पुरवठयाची सोय होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्या धारणाक्षेत्रात एकापेक्षा अनेक पिक लागवड, उत्पादन वाढ व उत्पादकता वाढवण्यासाठी सिंचन सोयीत वाढ होणे आवश्यक आहे.

**५) रोजगार वृध्दी :**

महाराष्ट्रात शेती हा ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय असून रोजगार निर्मितीचे स्त्रोत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात रोजगार निर्मितीसाठी शेतीची उत्पादकता वाढण्यासाठी सिंचन सुविध आवश्यक आहे.

**६) नैसर्गिक असंतुलनावर उपाय :**

पावसाच्या असमानतेमुळे पर्यावरण असंतुलन निर्माण होते. हे असंतुलन नाहिसे करण्यासाठी जलसिंचन आवश्यक आहे.

**७) शेती व्यापारीकरण :**

शेती फायदेशीर होण्यासाठी तिची उत्पादकता ही खर्चापेक्षा अधिक राहण्यासाठी सिंचनाची आवश्यकता आहे.

**असमतोलाची कारणे :**

**१) भौगोलिक कारणे :**

महाराष्ट्रात जो असमतोल निर्माण झाला त्यासाठी भौगलिक घटक कारणीभूत आहे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये पावसाचे प्रमाण हे जास्त आहे. तसेच नद्यांची खोरे मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत. याउलट मराठवाडयाची स्थिती आहे.

**२) राजकीय कारणे :**

लोकशाही राज्य पध्दतीमध्ये आर्थिक विकासाची गती योग्य व महत्त्वकांक्षी राजकीय नेतृत्वावर अवलंबून असते. उर्वरित महाराष्ट्राच्या विकासामध्ये या विभागातील राजकीय नेत्यांचा सिंहाचा वाटा आहे. विदर्भात तलाव निर्मितीच्या बाबतीत हीच गोष्ट दिसून येते. मराठवाडा या बाबतीत उदासिन असलेला दिसून येतो.

**३) विकास कामात दिरगांई :**

मराठवाडयामध्ये सिंचन क्षेत्रामध्ये पाहिजे त्या प्रमाणात वाढ करण्यात आलेली नाही. नैसर्गिकरित्या

पाण्याच्या स्त्रोतापैकी नदीचे पाणी हा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. परंतू मराठवाडयात बारामाही वाहणारी एकही नदी नाही. त्यामुळे पाटबंधाऱ्याच्या निर्मितीसाठी मोठया प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्याचबरोबर कालव्याची गरज असणारे दुष्काळी व निमदुष्काळी भाग धरणाच्या योग्य जागेपासून लांब असल्याने खर्च वाढतो. त्याच बरोबर प्रकल्प तयार होण्यास बराच कालावधी लागतो. त्यामुळे मराठवाडयातील सिंचन क्षेत्रमध्ये मंद गतीने वाढ होत आहे.

**जलसिंचन असमतोल दूर करण्यासाठीचे उपाय :**

**१) आंतरखोरे पाणी वाटप लवादाच्या निर्णयाचे पुनर्विलोकन :**

गोदावरी, कृष्णा व तापी खोरे लवाद निर्णयाचे पुनर्विलोकन होणे महत्त्वाचे आहे. या तिन्ही खोऱ्यात महाराष्ट्राला कमी पाणी मिळालेले आहे. त्यातील जाचक अटीमुळे मराठवाडयातील उपलब्ध अ.घ.फु. पाणी यापैकी फक्त ४६ अ.घ.फु. पाणीच वापता येते. त्यामुळे मराठवाडयाचे नुकसान झालेले आहे. ते पाणी मराठवाडयाला मिळवून देणे महत्त्वाचे आहे.

**२) कृष्णा खोऱ्यातील पाणी वाटपाची कार्यवाही करावी :**

कृष्णा खोऱ्यात मराठवाडयाचे लागवडी क्षेत्र १० टक्के असल्यामुळे कृष्णा खोऱ्यातील एकूण ८०० अ.घ.फु. पाण्यापैकी १० टक्के म्हणजे ८० अ.घ.फु. पाणी मराठवाडयाचे असताना फक्त २५ अ.घ.फु. पाण्याचे नियोजन झाले आहे. उर्वरित पाणी वाटपाची कार्यवाही त्वरीत होणे आवश्यक आहे.

**३) तापी खोऱ्यातील पाणी वाटपाची कार्यवाही :**

तापी खोऱ्यात मराठवाडयाचे ३ टक्के क्षेत्र असून तापी खोऱ्यातील एकूण उपलब्ध पाण्याच्या १९१ अ.घ.फु. पैकी ६ अ.घ.फु. म्हणजे ३ टक्के पाणी मिळणे आवश्यक आहे. परंतू फक्त १.५ ते २ अ.घ.फु. पाणी मिळत असून उर्वरित पाणी मिळण्याविषयी कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**४) मुबलक पाणी खोऱ्यातून टंचाईग्रस्त खोऱ्यात जलपरिवहन :**

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने राज्यातील अति उपलब्ध खोऱ्याकडून अतितुटीच्या खोऱ्यात राज्याच्या गरजेनुसार पाणी परिवहन पध्दती सांगितली आहे. यातून ३७० अ.घ.फु. पाणी उपलब्ध होऊ शकते. मराठवाडयात गोदावरी मांजरा स्थैर्यीकरण प्रकल्प राबविणे गरजेचे आहे.

**५) प्रलंबित प्रकल्प पूर्ण करावे :**

मराठवाडयात निधी अभावी रखडलेले प्रकल्प पूर्ण करावेत. मराठवाडयात लहान मोठे एकूण २९ प्रकल्प निधी अभावी रखडत पडले आहेत. ज्यांची किंमत २००५ रोजी २६०७ कोटी रुपये होती. २०१२ मार्च अखेर ३१७४० कोटी रु. झाली आहे. त्यामुळे पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा.

**६) गोदावरी, पूर्णा, मांजरा स्थेयीकरण प्रकल्प :**

सिंचन आयोगाच्या मतानुसार मराठवाडा अति तुटीचा प्रदेश आहे. अनेक लहान-मोठी धरणे आहेत

पण ती आता नावालाच उरली आहेत. न्यायलयाच्या आदेशाप्रमाणे पाणी वाटपाची कार्यवाही होऊन प्रत्यक्ष आंमलबजावणी करुन मराठवाडयाला पाणी देणे आवश्यक आहे.

**७. राज्यातील भूजल पुनर्भरण :**

मराठवाडयातील भूजल पुनर्भरणासाठी योग्य आहे. म्हणून मराठवाडयात ही प्रक्रिया राबवण्यात यावी.

**८. कालवे व धरणातील गाळ उपसा करावा :**

वरील उपाययोजना केल्यास जलसिंचनातील असमतोल निश्चितपणे दूर होईल.

**निष्कर्ष :**

१) महाराष्ट्रातील विभागातंर्गत जलसिंचनाच्या विकासात मोठया प्रमाणात तफावत आढळते.

२) महाराष्ट्रातील उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ व मराठवाडा जलसिंचनात मागे दिसतात.

३) मराठवाडा व विदर्भातील राजकीय इच्छा शक्तीचा अभाव मोठया प्रमाणात दिसतो.

**समारोप :**

महाराष्ट्रात जलसिंचना असमतोल मोठया प्रमाणात दिसून येतो. भौगलिक व राजकीय कारणामुळे हा असमतोल मोठया प्रमाणात दिसून येतो. सहयाद्रीच्या पडछायेखाली मराठवाडा येत असल्यामुळे पावसाचे प्रमाण अतिशय कमी आहे. त्याचबरोबर मराठवाडा व विदर्भाच्या वाटयाला आलेले पाणी मिळवण्यासाठी राजकीय शक्ती कमी पडते. त्यामुळे असमतोल हा कमी न होता तो वाढतानाच दिसतो.

**संदर्भ :**

१) जनगणना २०११ व हवामान विभाग महाराष्ट्र राज्य.

२) विजय केळकर समिती अहवाल २०१३.

३) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ : वार्षिक अहवाल २००८-२००९ औरंगाबाद, महाराष्ट्र राज्य.

४) महाराष्ट्र शासन : आर्थिक शासन आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४.

५) राज्यातील सिंचनाची प्रगती व भविष्यातील वाटचाल : महाराष्ट्र शासन, श्वेतापत्रिका, नोव्हेंबर २०१२ (खंड २)

६) डॉ.तळेकर एस.डी., मराठवाडयातील सिंचन सुविधा: एक अवलोकन, अर्थसंवाद २००५.

७) विजय दिवाण, (ऑक्टो २०१५) नद्यांच्या शाश्वत व्यवस्थापनाची गरज, परिवर्तनाचा वाटसरु, द युनिक अकॅडमी, पुणे.

◆◆◆

# भारताच्या नियोजन कालखंडातील शेतीचा विकास

**डॉ. मुळे पी.एम.**
अर्थशास्त्र विभाग
कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरूर (का) जि. बीड.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजाला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळ पास ५८ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्याचे दिसून येते. भारताचे एकूण भौगोलीक क्षेत्रफळ ३२,८७२६३ चौ कि.मी. आहे. वनाखालील क्षेत्रफळ ७१८००० चौ.कि.मी. आहे. जवळपास २२ टक्के क्षेत्र वनाखाली असल्याचे दिसून येते. भारताच्या आर्थिक नियोजनांच्या सुरूवातीस एकूण अन्नधान्य उत्पादन ५०८ लाख टन होते त्यात वाढ घेऊन २०१५—१६ मध्ये २५१५ लाख टन इतके आले यातील वाढ ५ पटीने झालेली दिसून येते परंतू लोकसंख्येमध्ये मात्र जवळपास ९० कोटीची वाढ झालेली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान हे महत्वपूर्ण आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पान्नात शेतीचा वाटा महत्वाचा आहे. तसेच या देशातील वाढीव लोकसंख्येला रोजगार देण्यात शेती महत्वाची भूमिका बजावत असल्याचे स्पष्ट होते. तसेच शेतीच्या माध्यमातून अन्नधान्य उपलब्ध उद्योगाना कच्चा माल परकीय चलन प्राप्ती इत्यादी बाबतीत शेतीचे योगदान महत्वाचे आहे. आर्थिक नियोजन काळापासून आजपर्यंतचा मागोवा घेतल्यास शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. लागवडीखालील क्षेत्रफळात अन्नधान्ये आणि बिगर अन्नधान्य उत्पादनात आणि उत्पादकतेत हरितक्रांतीनंतर आमुलाग्र असे बदल झालेले दिसून येतात. एकंदरीत नियोजन काळापासून शेतीच्या विकासाचा आलेख वाढत असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) भारताच्या नियोजन कालखंडातील शेती क्षेत्रावरील खर्चाचा आढावा घेणे.

२) भारतातील प्रमुख पिकांच्या उत्पादन प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

३) भारतातील .षिमालांच्या निर्यातीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

वरील शोध निबंधाचा अभ्यास करत असताना दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला असून त्यामध्ये प्रामुख्याने भारताची आर्थिक पाहणी, इंटरनेट, वर्तमान पत्रे संदर्भ ग्रंथ, योजना मासिक इत्यादीचा वापर केला आहे.

**नियोजनांच्या कालखंडातील शेती क्षेत्रावर केलेला खर्च :**

१९५०—५१ पासून आर्थिक नियोजनाला सुरूवात झाली पंचवार्षिक योजनेच्या

माध्यमातून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचा विशेष आराखडा तयार केला जात होता. प्रत्येक पंचवार्षीक योजनेमध्ये शेती आणि शेती संबंधीत क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी विशेष तरतूद केली जात होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्राला अग्रक्रम देण्यात आला. या योजनेतील एकूण खर्चापैकी ३१ टक्के खर्च शेती क्षेत्रावर खर्च करण्यात आला. प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये शेती क्षेत्रावर केलेला खर्च खालील तक्त्यामध्ये आहे.

**भारताच्या नियोजन काळातील शेती क्षेत्रातील खर्च (कोटी रूपयात)**

| पंचवार्षिक योजना | पंचवार्षिक योजनेचा कालावधी | एकूण योजना खर्च | शेती क्षेत्रावरील खर्च | एकूण खर्च हा शेती क्षेत्रासाठी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ पहिली | १९५१—५६ | १९६० | ६०० | ३१ |
| २ दुसरी | १९५६—६१ | ४६०० | ९५० | २१ |
| ३ तिसरी | १९६१—६६ | ८७७७७ | १७५० | २० |
| ४ चौथा | १९६९—७४ | १५७९९ | ३६७० | २४ |
| ५ पाचवी | १९७४—७९ | ३७४२६ | ८७४० | २२ |
| ६ सहावी | १९८० — ८५ | १०९२९२ | २६१०० | २४ |
| ७ सातवी | १९८५—९० | २१८७२९ | ४७१०० | २२ |
| ८ आठवी | १९९२—९७ | ४७४१२१ | १०१५९९ | २१ |
| ९ नववी | १९९७—२००२ | ९४१०४० | १६८८०० | १८ |
| १० दहावी | २००२—२००७ | १६१८४६० | ३०५०५५ | १९ |
| ११ आकरावी | २००७—२०१२ | ३६४४७१८ | १०६३१८० | २१ |
| १२ बारावी | २०१२—२०१७ | ९१६०८८८ | | |

**संदर्भ :** भारताची आर्थिक पाहणी २०१६—१७.

नियोजन काळात शेती क्षेत्रावर जो खर्च करण्यात आलेला आहे. तो सुरूवातिच्या कालखंडात जास्त असलेला दिसून येतो. परंतू नंतरच्या काळात शेतीवरील खर्चात घट आलेली आहे.

**भारतातील प्रमुख पिकांचे उत्पादन :**

भारतामध्ये प्रामुख्याने नियोजनाच्या काळापासून ते आजतागायत अनेक पिकांचे उत्पादन घेतले गेले. परंतु त्यामध्ये प्रामुख्याने गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, मक्का, बाजरी, तूर, कडधान्य, तेलबिया याचे उत्पादन करत असतांना काही पिकांच्या उत्पादनात वाढ झाली परंतू काही पिकांच्या बाबतीत म्हणावी तेवढी वाढ झालेली नाही ते आपणाला खालील तक्त्यावरून लक्षात येते.

**भारतातील प्रमुख पिकांचे उत्पादन : (लाख टनामध्ये)**

| प्रमुख पिक | १९५०—५१ | २०१५—६१ |
|---|---|---|
| एकूण अन्नधान्य | ५०८ | २५१५ |
| गहू | ६४ | ९२३ |
| तांदूळ | २०५ | १०४४ |
| ज्वारी | ६३ | ४२ |
| मक्का | २४ | २२६ |
| बाजरी | २७ | ८१ |
| कडधान्य (सर्व) | ८४ | १६४ |
| बटाटा | १७ | ४३४ |
| उस | ५७० | ३४८४ |
| तुर | .. | २६ |
| तेलबिया | ५१ | २५३ |

भारतातील प्रमुख पिकांच्या उत्पादनांचा अभ्यास करत असताना वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, नियोजनांच्या सुरूवातीच्या काळात उत्पादन कमी प्रमाणात असलेले दिसून येते परंतु नियोजनांचा वापर करून देखील सर्व पिकांच्या बाबतीत उत्पादक्तेत वाढ न होता काही ठराविक पिकांच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते प्रामुख्याने गहू, तांदूळ, बटाटा, उस, मक्का या पिकांच्या उत्पादकेत वाढ झाली. परतू तेलबिया, कडधान्य (सर्व) या पिकांच्या उत्पादक्तेत हरित क्रांतीचा देखील म्हणावा तेवढा परिणाम झालेला नाही म्हणजेच यांची उत्पादकता कमी असलेली दिसून येते.

**भारतातील काही कृषी पिकांचा जागतिक निर्यातीमधील वाटा : (टक्केवारी मध्ये)**

| वस्तू | १९९० | २०१० | २०१५ |
|---|---|---|---|
| तांदूळ | ६.४ | ११.३ | २८.०० |
| अन्नधान्य निर्मित खादय वस्तू | ०.६ | ३.३ | ६.२ |
| भाजीपाला व फळे | ०.८ | १.३ | १.४ |
| चहा | २२.१ | १०.०० | ८.४ |
| मसाले | ७.७ | १५.४ | १७.३ |

**संदर्भ** : India Economic Survey 2016-17.

भारताने सन १९९१—९२ मध्ये जागतिकरणाचा अंगिकार करून खुल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली. मात्र जागतिक बाजारपेठेत भारतीय कृषीमालाचा निर्यातीतील वाटा हा कमी असलेला दिसून येतो. १९९० मध्ये तांदळांच्या निर्यातीतील वाटा ११.३ टक्के इतका होता. त्यात वाढ होऊन २८.०० टक्के इतका झाला. मसाले आणि चहा यांची निर्यात १९९० मध्ये अनुक्रमे ७.७ टक्के, २२.१ टक्के होती परंतू २०१५ मध्ये अनुक्रमे १७.३ टक्के, ८.४ टक्के असलेली दिसून येते. म्हणजेच चहाच्या निर्यातीमध्ये घट व मसालेच्या निर्यातीमध्ये वाढ झालेली वरील तक्त्यावरून स्पष्ट होते.

भारत हा देश कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कृषि मालाच्या उत्पादन आणि उत्पादक्तेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली मात्र जागतिक पातळीवर कृषि मालाची निर्यात ही अत्यंत कमी असलेली दिसून येते.

**संदर्भ सुची** :

१) भारतीय अर्थव्यवस्था (समस्या आणि भवितत्व) — डॉ. एस.के.ढगे २०१३.
२) कृषी अर्थशास्त्र — प्रा.डॉ. दत्तात्रय भुतेकर २०१५.
३) भारतीय अर्थव्यवस्था — रूद्र दत्त आणि सुंदरम.
४) India Economic Survey 2016-17.
५) कृषी अर्थशास्त्र — विजय कविमंडल.
६) भारतीय अर्थव्यवस्था — एस.के मिश्रा.

◆◆◆

# धुळे जिल्ह्यातील धरणप्रभावित क्षेत्रांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास

**संशोधक**

**संजय नामदेवराव तोरवणे**

कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य आणि

कै. एन. के. पाटील सायन्स वरिष्ठ महाविद्यालय,

पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे ४२४३०६

**मार्गदर्शक**

**प्राचार्य. डॉ. डी. एस. पाटील**

टी.ई.एस. महिला महाविद्यालय,

नंदुरबार ता. जि. नंदुरबार

**प्रस्तावना :**

भारतात एकुण २९ घटक राज्ये व ०७ केंद्रशासीत प्रदेश आहेत. त्यातील भारताच्या पश्चिमेकडील एक प्रमुख राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य ओळखले जाते. जसे अनेक जिल्हे मिळून राज्य तयार होते तसे महाराष्ट्र राज्य सुद्धा अनेक जिल्हे मिळून तयार झालेले आहे. महाराष्ट्रात आज पूर्ण झालेली मोठी १७ प्रकल्प (धरणे), मध्यम १७३ तर लहान १६२३ प्रकल्प तर अपूर्ण प्रकल्पात मोठे ६५, मध्यम १२६ तर लहान १८३ काम सुरू आहेत. महाराष्ट्रातील धुळे जिल्हा हा खानदेशातील एक प्रमुख जिल्हा म्हणून धुळे जिल्ह्याची ओळख आहे व १९९८ पुर्वी धुळे ते नंदुरबार हे दोघे जिल्हे एकत्रित होते. १ जुलै १९९८ मध्ये धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन धुळे व नंदुरबार असे दोन स्वंतत्र जिल्हे अस्तित्वात आले. धुळे जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असुन अनियमित पर्जन्यमान व सतत दुष्काळसदृश परिस्थितीमुळे धुळे जिल्हा अवर्षग्रस्त आहे. धुळे जिल्ह्याचा समावेश तापी खोज्यामध्ये होतो. जिल्ह्याचे आठ लाख बावीस हजार हेक्टर भौगोलिक क्षेत्र तापी खोज्यामध्ये समाविष्ट असून त्यापैकी ४ लाख ३७ हजार ६०० हेक्टर क्षेत्र लागवडीलायक आहे. हे प्रमाण ५३.१८ टक्के आहे. खान्देशातील सिंचन प्रकल्पांना विनासायास निधी उपलब्ध व्हावा आणि रखडलेल्या प्रकल्पांची उभारणी जलद गतीने व्हावी. विद्यमान शासन व्यवस्थेने तापी पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना केली. महामंडळाच्या स्थापनेपुर्वी जिल्ह्यात पुर्ण झालेल्या प्रकल्पामुळे १५.१ टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली होती. म्हणजेच लागवडीस योग्य क्षेत्रापैकी केवळ ६५ हजार ६७५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते. महामंडळाच्या स्थापनेनंतर पुर्ण झालेल्या बांध वा बांधीव प्रकल्पामुळे ४.७६ टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. जून २००८ अखेर जिल्ह्यात एकुन १९. ७७ टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सध्यस्थितीत आज जिल्ह्यात अनेक उपयुक्त प्रकल्प कार्यान्वित असुन त्यांची व्याप्ती सातत्याने वाढत आहे.[१] संशोधक विद्यार्थी हे अशा धरण प्रभावित परिसरातीलच असल्यामुळे विविध गावांचा, लोकांचा तसेच त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**विषयाचे महत्त्व :**

धुळे जिल्हा हा तसा अवर्षन प्रवण भाग आहे. येथे अनियमित पाऊस पडतो तसेच बारमाही नद्या नसल्याने बराचसा भाग नापिक जमिनीखाली असून जंगलव्याप्तही आहे. त्यातुन स्थंलातर, बेकारी, दारिद्र्य, औद्योगिकरणाची कमतरता, शेती उत्पादनाचे अल्प प्रमाण तसेच सततच दुष्काळ अशा समस्या जिल्ह्यात दिसून येतात यावर उपाय म्हणून जिल्ह्यात विविध धरण प्रकल्प बांधले गेले आहेत. आज त्यामध्ये मोठे,

लहान व लघुसिंचन प्रकल्प मिळून एकूण ६१ प्रकल्प आहेत. त्यामध्ये साक्री तालुक्यातील लाटीपाडा, मालनगांव, अक्कलपाडा, काबज्याखडक, फोफरे व जामखेली तसेच शिंदखेडा तालुक्यात अमरावती, वाडीशेवाडी, सुलवाडे व सोनवद, शिरपूर तालूक्यात अनेर, करवंद तर धुळे तालूक्यात कनोली, नकाणे तलाव असे प्रमुख प्रकल्प उभारले गेले आहेत तर काहीचे काम सुरु आहेत त्यामुळे या प्रकल्पानांही जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे. साक्री तालुक्यातील अक्कलपाडा प्रकल्पामुळे तालूक्यातील जवळपास पाच गावे पूर्णतः विस्थापीत झाली आहे.[२]

अशा धरण प्रभावित क्षेत्रातील विस्थापीत गावाचा तसेच गावातील कुटुंबांचे सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करून त्यांची सत्य परिस्थिती जाणून घेणे महत्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) धुळे जिल्ह्यातील धरणप्रभावित शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक उत्थानात धरणाचे योगदान अभ्यासणे.

२) धुळे जिल्ह्यातील धरणप्रभावित शेतकरी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

**गृहितकृत्ये :**

१) धुळे जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासात धरणांची निर्मिती अनुकुल ठरत असली तरी आर्थिक नुकसान अधिक होतांना दिसून येत आहे.

२) धरणाच्या प्रभावामुळे जिल्ह्यातील शेतकरी कुटूंबाच्या विस्थापनात अनेक समस्या दिसुन येतात.

**संशोधन पद्धती :**

कोणत्याही प्रकारच्या संशोधनामध्ये वैज्ञानिक ज्ञानाच्या दिशा रुंदावण्याचा प्रयत्न केला जातो. संशोधने वैज्ञानिक पद्धतीने झाले पाहिजे, त्यासाठी संशोधन पद्धती अंगिकारणे महत्त्वाचे असते. विषयाच्या संदर्भात संशोधकाला वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करुन निष्कर्ष मांडावे लागतात. सामाजिक संशोधनात वास्तवाचा शोध हा शास्त्रीय पद्धतीनेच घ्यावा लागतो. त्यामुळे "बौद्धिक व व्यावहारिक समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी संशोधन केले जाते व त्यामध्ये वैज्ञानिक पद्धतीचा वापर केला जातो. संशोधनाद्वारे अचूक माहिती जाणून घेता येते. परंतु असे असले तरी नैसर्गिक शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्रांमध्ये अचूकता येणार नाही कारण सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधनाचा विषय मानवी वर्तन असल्यामुळे संशोधनात पूर्णतः अचूकता आणणे अवघड असते."[३] हे जरी खरे असले तरी सामाजिक संशोधनात वैज्ञानिक पद्धतीचा वापर करुन अचुकता प्राप्त करता येते.

**विश्लेषणात्मक अभ्यास :**

धरणग्रस्तांना लाभ क्षेत्राखाली जमीन उपलब्ध होत नाही. कारण त्या जमिनीचे आधीच खातेफोड करुन तिचे कुटुंबातील इतरांच्या नावावर हस्तांतर झालेले असते. जी जमीन उपलब्ध असते तिची प्रत निकृष्ट स्वरुपाची असते. विस्थापितांना नव्या ठिकाणी अनेक समस्यांना सामना करावा लागतो. धरणग्रस्तांना देण्यात येणाऱ्या जमिनीची किंमत कमी असते. परंतु त्यांना जी जमीन खरेदी करावी लागते. त्यासाठी अधिक किंमत मोजावी लागते. या दोहोंतील फरक शासन देत नाही. या अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी न्यायालयं आहेत. पण ते सर्वांनाच शक्य होत नाही. विस्थापितांना जीवनाची नव्याने उभारणी करण्यात असंख्य अडचणी

येतात. त्यात गरीब अधिक भरडले जातात. शहरात मोलमजूरी करून कसेबसे जगणे त्यांच्या नशिबी येते. जागतिक बँकेच्या अहवालनुसार बहुसंख्या विस्थापितांची स्थिती अधिक वाईट होण्याची शक्यता अधिक आहे.

पुनर्वसन धोरणबाबत सरकारी मतभेद झाल्याने नर्मदा विकास प्राधिकरणाचे 'अध्यक्ष सुशीलचंद्र वर्मा यांनी राजीनामा दिला'. पैशाच्या स्वरुपात नुकसान भरपाई देणे सर्वथा निरर्थक आहे. जमिनीच्या बदल्यात जमीनच दिली पाहिजे. जेवढी जमीन पाण्याखाली जाईल तेवढीच व त्याच प्रतीची जमीन दिली पाहिजे. उपलब्ध नसेल तर सरकारी विकत घेऊन दिली पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. शेतमजूर, कारागीर, स्वयंरोजगारातील लोक उघड्यावर पडतात. गावातील फार मोठा भाग नुकसान भरपाई मिळण्यास आपत्र ठरतो. या सर्वांच्या उदरनिर्वाहाची साधने त्यांच्यापासुन हिरावून घेतली जात असतात.[४]

यामुळे पशुपालन करणारे अडचणीत येतात. कारण नवीन जागेवर पशुपालनासाठी चरण्यासाठी गायरान नसते. लोहार, सुतार, चांभार, कुंभार, यांसारख्या छोटे-छोटे दुकानदार यांच्या पारंपारिक व्यवसायावर परिणाम होतो. उदा. हरितक्रांतीनंतर धरणांमुळे बागायती क्षेत्रांत वाढ, उत्पादन, उत्पन्नात वाढ बागायतीमुळे जोडधंदे, दुग्ध पशु, कुकुट, शे्ळी पालन व्यवसायात वाढ परिणामी कुशल अकुशल श्रमिकांच्या रोजगारात वाढ असे अनुकूल परिणाम दिसतात.

तसेच प्रतिकुल परिणाम म्हणून ज्या गावांच्या व्यक्तिच्या तसेच कुटूंबाच्या जमिनी गेल्या. त्यामुळे त्यांचे उत्पन्नाचे महत्वाचा स्त्रोत गेला. लाभ मात्र धरणांखाली असलेल्यांना झाला. धरणांचे पाणी खालील लोकांना बागायती उद्योगांसाठी वापरता आले.

तसेच अक्कलपाडा प्रकल्पामुळे धुळे येथील पाणी प्रश्नासाठी पाणी वापरुन लाटीपाडा धरणाचे आरक्षित पाणी साक्री तालूक्यात बागायती शेतीसाठी वापरल्याने बागायती क्षेत्र वाढून उत्पादन उत्पन्नात वाढ होतांना दिसते.

लोकांच्या विकासासाठी धरणे बांधली जात आहेत आणि यामुळे गावे उजाड होत आहेत. परंतू त्यांच्या पुनर्वसनाचे ठोस असे धोरण अंमलात आणले जात नाही. धरणांमुळे जंगलातील प्रदेशातील विविध सामाजिक परिणाम होणार असेल तर तेथील विस्थापित होणाऱ्या लोकांची परिस्थिती फार भयानक असते. आदिवासी समुदाय आणि जंगलासोबत एकरूप असतात. विस्थापनामुळे त्यांचे संपूर्ण जीवनच उद्ध्वस्त होत असते. सुरत येथील 'सेंटर ऑफ सोशल स्टडीज' ने गुजरातमध्ये होत असलेल्या भीमकाय सरदार सरोवराच्या आणि श्रीशैल्यमच्या लोकायन परियोजनेचा अभ्यास केला. त्यात पुनर्वसनामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे केलेले विवेचन पाहिले म्हणजे हा प्रश्न किती गंभीर आहे याची खात्री पटते. जेव्हा एखाद्या धरणाच्या कामाला प्रारंभ होतो. तेव्हाच त्यात बुडण्याची शक्यता असलेला प्रदेश उजाड होऊ लागतो. तेथे विकासाठी कामे होत नाहीत.

डोगर, दऱ्या-खोऱ्यात, जंगलात राहणाऱ्या आदिवासी लोकांना शहरी भागात स्थंलातर करावे लागते. या संस्कृतीशी ते समरस होत नाहीत आणि ही शहरी संस्कृती त्यांना जवळ करीत नाही. त्यांची जीवनशैली, सस्कृती आणि अस्मिता या स्थंलातराने मृत होते. विस्थापन त्यांना एक प्रकारचे मरणच असते.

आदिवासी समाजाच्या परंपरागत स्थानापासून विस्थापित झालेल्यांना शहरी भागात मजूर म्हणून काम करणे भाग पडते. त्याचा प्रदेश, त्यांची नैसर्गिक परिस्थिती, त्याचे सामाजिक जीवन आणि संस्कृती संकटात सापडल्याने भीक मागणे किंवा चोरीचपाटी करण्यासाठी त्यांना व्यवस्थेने भाग पाडलेले असते. तसेच आर्थिक विकासाची शक्ती त्यांच्या पारंपरिक जीवन पद्धतींना खंडित करीत आहेत. अत्यंत गुंतागुंतीची जंगली, डोंगराळ किंवा कोरडवाहू पर्यावरण व्यवस्थेमध्ये संसाधनाचे व्यवस्थापन कसे करावे याबाबतीत या पारंपरिक जीवन पद्धती आधुनिक समाजाला बरेच काही शिकवू शकतात.

ज्या संवेदनाहिन विकास प्रक्रीयेवर त्यांचे नियंत्रण नाही. त्या विकास प्रक्रीयेनें त्यातील काहिंना विनाशाच्या कड्याशी आणून ठेवले आहे. त्या लोंकाचे पारंपरिक अधिकार मान्य करण्यात आले पाहिजे व त्याच्या क्षेत्रातील साधनसंपत्तीच्या विकासाची धोरणे बनवण्यात त्यांचा प्रमुख वाटा असला पाहिजे. असे असले तरी शासन मात्र आदिवासीच्या पुनर्वसनाला पद्धतीशीरपणे बगल देत असल्याचे दिसून येते."[५]

**निष्कर्ष :**

मागील जवळ जवळ ५० वर्षापूर्वी सुरु झालेले धरण बांधकाम व धरणाचे पुर्नवसनामध्ये जवळपास ७० टक्के लोकांचे पुर्नवसन पूर्ण स्वरुपात झालेले नाही. प्रत्येकाची ह्या बाबतीत काही तरी समस्या आहे. ह्या समस्यांबाबत विविध लेखकांनी केलेले लिखाण संशोधकाने जाणून घेतले आहे. देशातील व महाराष्ट्रातील विविध धरणांचा मुख्य उद्देश सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या वापरासाठी ठरविण्यात आला आहे. बांधलेल्या धरणामुळे लाभक्षेत्रातील लोकांना त्यांच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्याचे दिसून येते परंतु त्याचबरोबर धरणामध्ये ज्यांचे सर्वस्व गेले त्या धरणग्रस्तांना लाभ क्षेत्रात त्या धरणाच्या पाण्यामुळे सिंचनाचा झालेला फायदा हा अतिशय कमी प्रमाणात दिसून येत आहे. त्याबाबत विविध लेखकांनी प्रकल्पग्रस्तांच्या मांडलेल्या अडचणी, समस्या याची केलेली मांडणी संशोधकाने अभ्यासली आहे.

**संदर्भ साहित्य ग्रंथ :**

१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१२ - जिल्हा धुळे, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, धुळे

२. महाराष्ट्र शासन, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, लघु पाटबंधारे विभाग, धुळे, सर्व पाटबंधारे योजनांची प्रगती आणि सद्यस्थिती दर्शवणारी जिल्हा पुस्तिका सन २०१७

३. भांडारकर पु.ल., 'संशोधन पद्धती शास्त्रे, तंत्रे', पुणे विद्यार्थीगृह, प्रकाशन पुणे, १९८७, पृ.१

४. भारंबे नंदकुमार, मानवी हक्क, निराली प्रकाशन पुणे, २०१२

५. चोळकर पराग मोठी धरणे - पर्यावरणीय व सामाजिक, आर्थिक दुष्परिणाम, परिसर प्रकाशन पुणे, डिसेंबर १९८९.

◆◆◆

# नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकज्यांच्या कृषी उत्पादनाची प्रवृत्ती (कालखंड २००९-१० ते २०१८-१९)

**प्रा.डॉ. वायसे शामराव भगवान**
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
ग.तु.पाटील महाविद्यालय, नंदुरबार

**सारांश -**

प्रस्तुत संशोधनात नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकज्यांच्या कृषी उत्पादनाची प्रवृत्ती संबंधीत अध्ययन, निरीक्षण, मुलाखतीच्या माध्यमातून निष्कर्ष काढून उपाययोजना सुचविल्या आहेत. नंदुरबार हा आदिवासी बहुल जिल्हा असून कृषी विकासाच्या स्थितंतराचा परिणाम जिल्ह्याच्या कृषी उत्पादनावर झालेला असून जिल्ह्याची पिक रचना बदलत आहे. आदिवासी शेतकरी हा अन्नधान्य पिकांकडून व्यापारी पिकांकडे आकर्षित होत असून तो जीवन जगण्यासाठी शेती करण्याऐवजी व्यापारी पद्धतीने शेती करण्याकडे वाटचाल चालू आहे. आदिवासी शेतकज्यांनी आधुनिक कृषी आदाने नाममात्र किंमतीत उपलब्ध करून दिल्यास कृषी उत्पादनातून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होण्यास मोठी संधी आहे.

**बिज शब्द - आदिवासी, कृषी, उत्पादन, विपणन, शर्थी.**

**प्रस्तावना -**

मुंबई राज्यातील ब्रिटीश प्रशासक स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली १९३० मध्ये आदिवासी विकासाचा आढावा घेण्यासाठी समिती नेमली. या समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ठक्करबाप्पा यांचा समावेश होता. त्यांनी आदिवासी व दलितांच्या शिक्षण, आर्थिक आणि सामाजिक स्थिती याविषयी अहवाल सादर केला. १९३८ मध्ये दि. सिमिंग्टन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पश्चिम खानदेशातील नवापूरपेठ, नंदुरबार, शहादा, तळोदा (मेवासी इस्टेटसह) अक्राणी महल यांचा समावेश असणारा रचनेत नंदुरबार जिल्हा निर्माण करावा अशी शिफारस केली होती. मुळ सिमिंग्टन समितीच्या शिफारशीवरून ६० वर्षांनी १ जुलै १९९८ रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन करून सातपुडा पर्वत रांगातील आदिवासी बहुल नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती केली. अक्राणी (धडगांव), अक्कलकुवा, नंदुरबार, नवापूर, तळोदा, शहादा या सहा तालुक्यांचा जिल्ह्यात समावेश असून एकूण लोकसंख्येच्या ६९.२८ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. जिल्हा नैसर्गिक साधन संपत्तीने विपूल असून देखील आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. मानव विकास निर्देशांकानुसार महाराष्ट्रात (०.७५२) नंदुरबार जिल्ह्याचा शेवटचा क्रमांक असून मानव विकास निर्देशांक ०.६०४ एवढा आहे. जिल्ह्यात ९४७ गावांचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १६,४८,२९५ एवढी असून दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या ९७८ आहे. साक्षरतेचे प्रमाण ६३.०४ टक्के असून पुरूष सारक्षरता ७१.९८ टक्के व स्त्री साक्षरता ५३.९० टक्के आहे. तर जिल्ह्यात ग्रामीण लोकसंख्या ८३.२८ व नागरी लोकसंख्या १६.७२ टक्के आहे. शासनाने २०१८-१९ मध्ये ७२ वनगावांना महसुली दर्जा दिल्याने अक्कलकुवा व अक्राणी तालुक्यातील शेतकज्यांची कृषी वित्त पुरवठ्यातील ७/१२ ची समस्या संपुष्टात येण्यास मोठा हातभार लाभला आहे. जिल्ह्यातील आदिवासी जमात प्राथमिक व्यवसायावर अवलंबून असून शेतीचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. पारंपरिक, सेंद्रिय पद्धतीने शेती करण्याचा कल दिसून येत आहे.

नंदुरबार जिल्ह्यास आदिवासी जिल्हा म्हणून संबोधले जाते. राज्याच्या एकूण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येपैकी १०.८६ टक्के लोकसंख्या नंदुरबार जिल्ह्यात असून राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यात आदिवासी जमातीमध्ये भिल्ल, पावरा, नाईक, गावीत, मावची, कोकणी, कोकणा, वसावे, वसावा यांचा प्रमुख समावेश होतो. पोशाख, आहार, देवदेवता, चालीरीतीमध्ये या सर्व जमातीमध्ये विभिन्नता आणि अंतरभेद आहे. आदिवासी समाज हा निसर्गपूजक, स्त्रीपूजक असून इतर समाजापेक्षा (शाहू) स्त्रियांना कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत समान दर्जा दिला जातो. आदिवासी जमाती प्रामुख्याने होळी, दिवाळी, गावदिवाळी, दसरा यासोबतच वाघदेव, गिंबदेव, डोंगज्यादेव आदी सणांबरोबर अलीकडील काळात नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे. नवापूर तालुक्यात ख्रिश्चन धर्मांतरण झाले असून शिक्षणाचा प्रसार वाढल्याने शेती कसण्याच्या पद्धतीवर परिणाम दिसून येतो. आदिवासी सर्व उत्सवांमध्ये नृत्याला अधिक महत्त्व दिले जाते. नृत्यातून आदिवासींमध्ये हर्ष, आनंद, दुःख, राग, लोभ ह्या भावना प्रकट केल्या जातात. होळी, नृत्य, गेर, हिंडण, भोंगज्या इत्यादी नृत्याचे प्रकार आहेत. भिल्ल आणि पावरांमध्ये होळी निमित्त अनेक गावातील नृत्यपथके एकाच ठिकाणी उपस्थित राहून होळी नृत्ये सादर करतात. जिल्ह्यात काठी संस्थानची होळी देशात प्रसिद्ध आहे. आदिवासी शेतकऱ्यांचे जीवन अन्न, दारू, सावकार, स्थलांतर यांच्या भोवती फिरत असून आजही जिल्ह्यात कुपोषण व सिकलसेल सारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. आदिवासी जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी १ एप्रिल १९७७ पासून आदिवासी उपयोजना सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राशी ७०.४३ टक्के क्षेत्रावर ५९४ गावात राबवली जाते. केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विकासाच्या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी उपयोजनांतर्गत विविध कृषी आदाने पुरवली जात आहेत. आदिवासी शेतकरी हा आजही स्पर्धेच्या जागतिकीकरणाच्या काळात पारंपरिक व जुनाट पद्धतीने शेती करत असून तो शेतीकडे व्यवसायाच्या दृष्टीने न पहाता जीवन जगण्याचा मार्ग म्हणून पहात आहे. पर्यायाने त्याचा विक्रीय वाढावा हा अत्यल्प राहत असून त्याचा परिणाम त्याच्या राहणीमानावर होत आहे. पुरेशा उत्पन्न व रोजगाराच्या अभावी तो गुजरात, मध्यप्रदेश राज्याबरोबर पश्चिम महाराष्ट्रात ऊस तोडणीसाठी स्थलांतर करत आहे. आदिवासी शेतकरी घरातीलच परंपरागत वाणांचा वापर करत असून घराच्या परिसरात, परसबागेत भाजीपाला, फळझाडे यांचे उत्पादन घेत आहे. आदिवासी शेतकऱ्यांना नव्या ज्ञान-तंत्रज्ञानाचा अभाव, विविध आदाने, वित्त पुरवठ्याच्या सोईचा अभाव, बाजारपेठा, साठवणुकीविषयी अज्ञान, माहिती प्रशिक्षणाचा अभाव, व्यसनाधिनतेचे वाढते प्रमाण, स्थलांतर, प्रक्रिया-पूरक उद्योगांची कमतरता, वाहतूक-दळणवळणातील अडचणी, वीज, जलसिंचन इ. कृषी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सूचविण्यासाठी, जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादन खर्च पद्धतीत सुधारणा होऊन त्यांच्या उत्पन्न वाढीस चालना मिळण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**उद्देश –**

१. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाच्या प्रवृत्तीचे अध्ययन करणे.

२. नवीन कृषी आदानांचा आदिवासी शेतकऱ्यांवरील परिणामांचे अध्ययन करणे.

३. आदिवासी शेतकऱ्यांची कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

**गृहितके -**

१. पहाडी व सखल भागातील शेतकऱ्यांच्या उत्पादन पद्धती व रचनेत भिन्नता आहे.

२. आधुनिक आदानांचा वापर वाढल्याने शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे.

३. कृषी उत्पादन पद्धतीचा शेतकऱ्यांच्या राहणीमानावर परिणाम होत आहे.

**अध्ययन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड पद्धतीचा वापर करून जिल्ह्यातील सहा तालुक्यातील २०० आदिवासी शेतकऱ्यांची जमातीनिहाय निवड केली आहे. पहाडी व सखल भागातील शेतकऱ्यांचे निरीक्षण केले असून प्राथमिक सामग्रीत प्रामुख्याने मुलाखत अनुसूचीचा वापर केला आहे. संशोधन कालखंड २००९-१० ते २०१८-१९ असा १० वर्षांचा आहे. द्वितीय साधन सामग्रीत प्रकाशित व अप्रकाशित साधनांना आधारभूत मानण्यात आले आहे.

**नंदुरबार जिल्ह्याची कृषी स्थिती -**

जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ५,९५,५०० हेक्टर एवढे असून लागवडीखालील क्षेत्र ३,१७,९९५ हेक्टर आहे. बिगर शेतीखालील क्षेत्र ११,१८४ हेक्टर असून शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र २८,११७ हेक्टर तर जंगल व्याप्त क्षेत्र १,०३,९३० हेक्टर असून एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २०.६४ टक्के आहे. जिल्हा नर्मदा व तापीच्या खोऱ्यात नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असून एकूण ओलीताखालील क्षेत्र २०.३४ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण जमिनीच्या ४० टक्के जमीन हलक्या प्रतीची, ३५ टक्के मध्यम प्रतीची व २५ टक्के जमीन काळी कसदार आहे. जिल्ह्यात एकूण शेतकरी खातेदारांची संख्या १८१३३९ एवढी आहे. शहादा व नवापूर तालुक्यात ओलीताखालील क्षेत्र सर्वाधिक असून प्रगत पद्धतीने शेती केली जाते.

जिल्ह्यात शेतीस खाजगी व संस्थात्मक मार्गाने वित्त पुरवठा होत असूनं आदिवासी शेतकरी आजही खाजगी सावकारांवर कृषी कर्जासाठी अवलंबून आहे. खाजगी कृषी कर्जाच्या दोषांचा परिणाम त्याच्या उत्पादकतेवर होत आहे. जिल्ह्यात संस्थात्मक कृषी कर्ज पुरवठ्यात राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांमार्फत वित्त पुरवठा होत असून जिल्ह्यात १०५ बँक शाखा असून स्टेट बँक ऑफ इंडिया अग्रणी बँक म्हणून कार्यरत आहे. तर जिल्ह्यात विविध ११९९ सहकारी संस्था, १२२७३ बचतगट असून दारिद्र्य रेषेखालील ६७८९ व दारिद्र्य रेषेखालील ३८०८ आहेत. बचत गटांच्या माध्यमातून महिला व शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणास मोठा हातभार लागला आहे.

**नंदुरबार जिल्ह्यातील कृषी उत्पादन -**

जिल्ह्यातील शहादा, तळोदा, नवापूर या तालुक्यात सुपिक, गाळाची शेतजमीन आहे. तर अक्राणी, अक्कलकुवा, नंदुरबार तालुक्यात मध्यम हलक्या स्वरूपाची शेतजमीन आहे. जिल्ह्यात अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया, व्यापारी पिके, भाजीपाला यांचे उत्पादन शेतकरी घेत आहेत. जिल्हा मिरची उत्पादनाबाबत प्रसिद्ध होता. मात्र हमी भावामुळे अलिकडील काळात कापूस, मका, तूर या उत्पादनाकडे वळला आहे. आदिवासी शेतकरी व्यापारी पिकांकडे आकर्षित होत आहे. महाराष्ट्रातील दोन नंबरचे थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ

येथील शेतकरी स्ट्रॉबेरी, लेटोसा या पिकांचे उत्पादन घेत आहे. विशेषतः आदिवासी जमातीतील कोकणी जमातीने नवीन कृषी तंत्रज्ञानाचा अंगीकार केला असून ते व्यापारी पिके घेत असून भाजीपाला उत्पादनात अग्रेसर आहेत. सुरत, अहमदाबाद, इंदूर याठिकाणी भाजीपाला विक्री करत आहेत. तर कोकणी स्त्रिया स्वतः मंडई, आठवडे बाजारात भाजी विक्री करत आहेत. जिल्ह्यातील शेतकरी कृषी उत्पादनाबरोबरच कृषीपूरक व्यवसाय करत आहेत. यामध्ये दुग्ध उत्पादन, गोपालन, कुक्कुटपालन, मासेमारीर, कडकनाथ याबरोबरच कृषीमाल प्रक्रिया करत आहेत. अक्कलकुवा व अक्राणी, नवापूर, तळोदा तालुक्यातील शेतकरी फळ झाडांपासून उत्पादन घेत असून यामध्ये महू, आंबा, सिताफळ, काजू, फणस यांच्याबरोबरच वनौषधांचे उत्पादन घेत आहेत. साक्षेपदृष्ट्या शहादा व नंदुरबार तालुक्यात फळझाडांचे उत्पादन नाममात्र आहे. सातपुड्यात अलिकडील काळात एनजिओच्या माध्यमा ातून शेतकरी फळझाडांकडे आकर्षित होत आहे. आंबा व काजूची सर्वाधिक लागवड झाली आहे. आदिवासी जमातीतील राजकारणी, नवश्रीमंत, नोकरदार वर्ग ग्रामीण भागात भोळ्या-भाबड्या गरीब समाज बांधवांची शेतजमीन अल्प किंमतीत खरेदी करत असून शेतीस तार कंपाऊंड करत आहेत. सातपुड्यात आमसूल उद्योगास चालना मिळत असून रोजगार वाढण्यास मदत होत आहे.

**जिल्ह्यातील प्रमुख पिकांचे उत्पादन -**

जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी शेतजमीनीनुसार सर्वच पिकांचे उत्पादन घेत असून तो ३९ पिकांचे उत्पादन घेत आहे. यामध्ये अन्नधान्य, कडधान्ये, व्यापारी पिके, तेलबिया यांचा समावेश असून संशोधनाच्या १० वर्षाच्या कालावधीत जिल्ह्याची पिक रचना बदलली आहे. शेतकरी रोख व्यापारी पिकांकडे आकर्षित झाला असून सेंद्रिय शेती ऐवजी रासायनिक शेतीकडे त्याचा कल आहे.

**जिल्ह्यातील पिकांचे दर हेक्टरी व एकुण उत्पादन**

| अ.क्र. | पिकाचे नाव | 2009-10 | | 2014-15 | | 2018-19 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति हेक्टरी उत्पादन किलो मध्ये | एकूण उत्पादन 00 मे. टन मध्ये | प्रति हेक्टरी उत्पादन किलो मध्ये | एकूण उत्पादन 00 मे. टन मध्ये | प्रति हेक्टरी उत्पादन किलो मध्ये | एकूण उत्पादन 00 मे. टन मध्ये |
| 1) | एकूण तृणधान्ये | 1491 | 2015 | 6336 (224.94) | 1388 (-31.11) | 9222.46 (518.54) | 1901.94 (-5.61) |
| 2) | एकूण कडधान्ये | 619 | 433 | 1861 (200.65) | 247 (-42.96) | 2758.01 (345.56) | 315.46 (-27.15) |
| 3) | एकूण तेलबीया | 1227 | 519 | 3059 (149.71) | 283.42 (-45.39) | 3221.10 (162.52) | 769.80 (48.32) |
| 4) | ऊस | 73.71 | 8100 | 70 (50.3) | 9451 (16.68) | 86.63 (17.53) | 7530 (-7.04) |
| 5) | कापूस | 1891 | 1076 | 621 (228.57) | 2444 (127.14) | 324.74 (71.71) | 381.41 ()254.46 |

संदर्भ - नंदुरबार जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन (२००९-१०, २०१४-१५ व २०१८-१९)

जिल्ह्यातील शेतकरी जमिनीच्या प्रतिनुसार सर्वच पिकांचे उत्पादन घेत असून २००९-१० प्रति हेक्टरी तृणधान्य १४९१ किलो होते. त्यात वाढ होऊन २०१८-१९ मध्ये ९२२२.४६ किलो पर्यंत वाढले. प्रति हेक्टरी उत्पादनातील

वाढ ५१८.५४ टक्के पर्यंत झाली. तर याच कालावधित एकूण उत्पादनात -५.६१ टक्के घट झाली. जिल्ह्यात दहा वर्षाच्या काळात एकूण तृणधान्य उत्पादनात प्रतिहेक्टरी वाढ झाली आहे. मात्र एकूण जिल्हा उत्पादनात घट झाली आहे. याच कालावधीत एकूण कडधान्य प्रति हेक्टरी उत्पादनात ३४५.५६ टक्के वाढ झाली. तर एकूण उत्पादनात -२७.१५ टक्के घटक झाली आहे. एकूण तेलबिया उत्पादनात प्रतिहेक्टरी उत्पादन १६२.५२ टक्के वाढ झाली तर एकूण उत्पादनात ४८.३२ टक्के वाढ झाली आहे. प्रति हेक्टरी ऊस उत्पादनात १७.५३ टक्के वाढ झाली तर एकूण उत्पादनात -७.०४ टक्के घट झाली आहे. जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील ऊसाखालील क्षेत्र घटत आहे. कापूस उत्पादनात प्रति हेक्टरी ७१.७१ टक्के वाढ झाली तर एकूण उत्पादनात २५४.४६ टक्के वाढ झाली आहे. कापसाच्या बी.टी. वाणाची सर्वाधिक शेतकरी लागवड करत आहेत व यामध्ये राशी-२ महिको या वाणांचा सर्वाधिक वापर करत आहेत. जिल्ह्यात तृणधान्य उत्पादनात अजवान (ओवा) पिकाचे उत्पादन नामशेष होत असून नंदुरबार तालुक्यातील धानोरा परिसरात घेतले जाते. जिल्हा मिरची उत्पादनात अग्रेसर होता. मात्र काळानुसार मिरची उत्पादनातील लागवड क्षेत्र कमी होत चालले असून प्रति हेक्टरी उत्पादनात ५% पर्यंत वाढ व एकूण उत्पादनात १२ टक्के पर्यंत वाढ झाली आहे.

**जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांची पीक रचना, उत्पादन -**

जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी आपणाकडे असणाऱ्या धारण क्षेत्रानुसार, आदानांनुसार पिके घेत असून जिल्ह्यातील डोंगरी व सखल भागात पिक पद्धती व शेती करण्याच्या पद्धतीत फरक आहे. सर्वेक्षीत २०० शेतकऱ्यांपैकी अन्नधान्य उत्पादन ४९ शेतकरी घेत असून त्यांचे धारण क्षेत्र १ ते २.५ एकर पर्यंत आहे. त्यांनी एकूण ३५२ एकर क्षेत्रावर अन्नधान्य उत्पादन घेतले असून लागवडीखालील क्षेत्राची एकूण टक्केवारी २४.८८ आहे. व्यापारी पिके ६४ शेतकरी घेत असून त्यांचे सरासरी धारण क्षेत्र २.६ ते ५ एकर असून त्यांनी एकूण ४७८ एकर क्षेत्रावर व्यापारी पिके घेतली असून व्यापारी पिकाखालील लागवडीची टक्केवारी ३३.७८ टक्के आहे. कडधान्य उत्पादन ४६ शेतकरी घेत असून त्यांचे सरसरी धारण क्षेत्र ५ ते १० एकर असून एकूण ३८४ एकर क्षेत्रावर कडधान्य उत्पादन घेतले आहे व कडधान्य पिकाची लागवडीखालील टक्केवारी २७.१४ टक्के आहे. यामध्ये सर्वाधिक तूर उत्पादनाचा हिस्सा ४८.६१ टक्के आहे. गळीत धान्य उत्पादन २१ शेतकऱ्यांनी घेतले असून त्यांचे सरासरी धारण क्षेत्र १० ते २० एकर असून एकूण १४१ एकर क्षेत्रावर गळीत धान्य उत्पादन घेतले आहे. कडधान्य उत्पादनाची लागवडीखालील टक्केवारी ९.९६ आहे. भाजीपाला वर्गीय उत्पादन २० शेतकऱ्यांनी घेतले असून त्यांच्याकडे सरासरी २० एकरच्या पुढे शेतजमीन आहे. एकूण ६० एकर क्षेत्रावर भाजीपाला पिके घेतली असून त्याचे ४.२४ टक्के अल्प प्रमाण आहे. आदिवासी शेतकरी हा स्वतःसाठी, अल्प प्रमाणात भाजीपाला पिकांचे उत्पादन परसबागेत घेत असून घरांवरती वेलवर्गीय भाज्यांचे उत्पादन घेत आहे. सर्वेक्षित २०० शेतकऱ्यांनी एकूण १४१५ एकर क्षेत्रावर पिकांचे उत्पादन घेतले असून सर्वाधिक व्यापारी पिकांचे उत्पादन ३३.७८ टक्के क्षेत्रावर असून सर्वात अल्प उत्पादन भाजीपाला वर्गीय शेतकऱ्यांचे ४.२४ टक्के क्षेत्रावर आहे. जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी आजही जीवन जगण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी शेती करत असल्याने त्याचा विक्रीय वाढावा अल्प असल्याने त्याला अल्प उत्पन्न मिळत आहे. जिल्ह्यातील सर्वेक्षित शेतकऱ्यांचे सरासरी उत्पन्न ३७६४० रू. असून व्यापारी पिके घेणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्न ६०,४९० रू. एवढे आहे.

आदिवासी शेतकऱ्यांची शेती कसण्याची पद्धत पारंपारीक असल्याने तो घरगुती अदानांचा वापर करत आहे. मात्र बदलत्या काळानुसार त्यास खते, बी-बियाणे, अवजारे, औषधे, मजूरी, वीजबिल, इंधन, वाहतुक, साठवणूक, विक्रीकाठी खर्च करावा लागत असून सर्वाधिक खर्च खते व बी-बियाण्यांवरी आहे. आदिवासी शेतकरी सेंद्रिय शेतीकडून रासायनिक शेतीकडे वळल्याने त्याचा युरिया व सुफला या खतांवरील खर्चाबरोबर सिडच्या बियाण्यांवरील खर्च वाढ असून एकूण कृषी खर्चात याचे सर्वाधिक २९ टक्के प्रमाण आहे.

**निष्कर्ष -**

सर्वेक्षित कालखंडात जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ होताना दिसून येत आहे. आदिवासी शेतकरी हा अन्नधान्य पिकाऐवजी व्यापारी पिकांकडे आकर्षित झाल्याने जिल्ह्याची पिकरचना बदलत आहे. जिल्ह्यात मिरची उत्पादनाऐवजी कापूस, तूर, मका, सोयाबिन, ऊस या पिकांखालील क्षेत्र वाढत असून उत्पादन वाढत आहे. जिल्ह्यातील सखल तालुक्यातील शेतकरी आधुनिक व्यावसायिक पद्धतीने सुधारित तंत्रज्ञानाच्या, रासायनिक खतांच्या साह्याने शेती करत आहे. तर सातपुड्यातील आदिवासी परंपरागत पद्धतीने शेती करत असून फळझाडांचे उत्पादन घेण्याबरोबर कृषी पुरक अल्प स्वरूपात कोंबडी, बकरी पालन करत आहे. आदिवासी सामान्य आर्थिक दुर्बल, भोळ्या, अशिक्षित, गरिब शेतकऱ्यांची शेती आदिवासी जमातीतील नवश्रीमंत नोकरदार, राजकारणी अल्प किंमतीत खरेदी करून शेतीला लोखंडी, जाळीचे कंपाऊंड करून नवीन फळझाडांची लागवड करत आहेत. जिल्ह्यात धारण क्षेत्रानुसार कृषी उत्पादन होत आहे. उत्पादनात नवीन वानांचा अंगीकार वाढला असून आदिवासी शेतकऱ्यांचे जीवन निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. तो शेतीबरोबर घराच्या परिसरात कुटुंबाच्या गरजेपुरता भाजीपाला घेत असून सर्वाधिक फळवर्गीय भाजीपाल्याची लागवड करत आहे. सातपुड्यातील आदिवासी शेतकरी सण-उत्सवामध्ये महुपासून घरीच दारूचे गाळप कुटुंबासाठी करत आहे. तर आंबे विकण्याऐवजी आमसूल तयार करून त्याची विक्री २०० रू. किलोपर्यंत करत आहे. सातपुड्यात महू व आंबा उद्योगावर प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी मोठी संधी उपलब्ध आहे. आदिवासी शेतकऱ्यांनी सर्वेक्षण काळात ३९ पिकांचे उत्पादन घेत असून सापेक्षदृष्ट्या शहादा, नवापूर, तळोदा तालुक्यातील शेतकऱ्यांना कापूस, ऊस उत्पादनांमुळे कृषी व्यापार शर्थी अनुकूल आहेत. त्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे. मात्र अक्राणी, अक्कलकुवा या तालुक्यातील शेतकऱ्यांना अन्नधान्य पिकांमुळे कृषी व्यापार शर्थी प्रतिकूल होतांना दिसत आहेत. सर्वेक्षित काळात जिल्ह्यातील तरूण शेतकऱ्यांच्या वैचारिक भूमिकेत बदल होतांना दिसून येत असून तो पुरोगामी, आधुनिक विचारसरणी अंगीकारत आहे.

**कृषी उत्पादन वाढवण्यासाठी उपाययोजना -**

जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांमध्ये आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात असून विषमता कमी करण्यासाठी केंद्र-राज्य सरकारच्या आदिवासी उपयोजनांतर्गत योजनांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी. आदिवासी विभागाचा १०० टक्के निधी खर्च करण्याबरोबर त्यातील अनियमितता व अकार्यक्षमता, भ्रष्टाचार यावर प्रतिबंध घालावा. आदिवासी शेतकऱ्यांच्या जमीन विक्रीवर पायबंद आणण्यासाठी घटनात्मक तरतुदीची कार्यक्षम अंमलबजावणी करावी, कायद्यातील पळवाटांना छेद द्यावा. कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी नवीन

तंत्रज्ञान, आदाने, जलसिंचनाबरोबर संस्थात्मक वित्त पुरवठा, सौर विजेचा सातपुड्यात वाढता वापर करून सौरपंप शेतकऱ्यांना द्यावेत. शेतकऱ्यांनी उत्पादन वाढीसाठी माती व पाणी परीक्षण करावे. पिक पशुविमा, बचतगटांची कार्यक्षमता वाढवणे, शेतकऱ्यांना कृषी माल विक्रीसाठी कृषी बाजारपेठांचा विस्तार करावा. आदिवासी संशोधन संस्था पुणे व एन.जी.ओ. यांनी संयुक्तपणे कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना उत्पादन ते विक्रीपर्यंत मार्गदर्शन करावे. महाराष्ट्राच्या वाट्याचे नर्मदा, तापी नदीचे पाणी सातपुड्यात उपसासिंचन योजनांच्या माध्यमातून द्यावे. साठवण गृहाबरोबर शितगृहांची व्यवस्था करावी, जिल्ह्यात आदिवासी शेतकरी मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात याला प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यात कृषी प्रक्रिया उद्योगाबरोबर कृषी पर्यटन, तोरणमाळ पर्यटन क्षेत्राचा विकास, कॉटन पार्क, चिलीपार्क यासारख्या प्रकल्पांची अंमलबजावणी करावी. महू उत्पादनासाठी जिल्ह्यातील वातावरण अतिशय अनुकूल असून त्यापासून इथेनॉल, हर्बल लिकर, बरोबर ५६ प्रकारचे औषधी गुणधर्म असल्याने त्यावर व्यावसायिक प्रक्रिया करावी. कृषी विकासातून जिल्ह्यात परिवर्तनाची मोठी संधी आहे.

**संदर्भ :-**

१) Nandurbar Human Development Report, २०१४

२) Mutatkar - Maharashtra Human Development Action Research Study, Maharashtra Association of Anthropological Sciences, Pune २००४.

३) सोनक सुषमा, जोग सुधीर - सिमिंग्टन अहवाल, १९३८. शिफारशी व निष्कर्ष आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे

४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन नंदुरबार २००९-१० ते २०१८-१९

५) जिल्हा ऋतू व पिके अहवाल, २०१८-१९ जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

६) डॉ. शामराव भगवान वायसे - कृषी वित्त पुरवठ्याचा नंदुरबार जिल्ह्यातील कृषी उत्पादनावरील परिणाम - एक सर्वेक्षणात्मक अध्ययन, अप्रकाशित २०१५

७) हाकारा, अर्थसंवाद, बळीराजा, शरद कृषी अंक

८) लोकमत, सकाळ नंदुरबार आवृत्ती

९) Mahades.Maharashtra.gov.in

◆◆◆

# नोबेल पारितोषिक विजेते : डॉ.अभिजीत बॅनर्जी

**डॉ.श्री.धेडे डी.आर.**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**नोबेल पारितोषिक पार्श्वभूमी**

सन १९६८ पासून स्विडनची मध्यवर्ती बँक अर्थातच सेवेरिजस रिक्स बँकेने नोबेल पुरस्काराचे संस्थापक अल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ अर्थशास्त्रातील पुरस्कार स्थापित केला. बँकेच्या ३०० व्या वर्धापन दिनानिमित्त १९६८ मध्ये सवेरीज रिक्स बँकेकडून नोबेल फाऊंडेशनला मिळालेल्या देणगीवर हा नोबेल पारितोषिक आधारित आहे. आल्फ्रेड नोबेलच्या स्मरणार्थ स्विडनची मध्यवर्ती बँक १९६९ पासून अर्थशास्त्राचे नोबेल पुरस्कार देत आहे. अर्थशास्त्रामध्ये मौल्यवान योगदान देणाऱ्या व्यक्तीला/व्यक्तींना हे पारितोषिक देण्यात येते.

'for his contributions to welfare economics' या विषयावर १९९८ मध्ये अमर्त्य सेन या भारतीय अर्थशास्त्राज्ञाला नोबेल पुरस्कार प्राप्त झाला.

अभिजीत बॅनर्जी आणि मायकेल यांच्या जागतिक दारिद्र्य निर्मूलनाच्या प्रयोगात्मक दृष्टीकोनाबद्दल त्यांना अर्थशास्त्रातील २०१९ चे नोबेल स्मारक पुरस्काराने सन्मानित केले.

**उद्दिष्ट्ये**

१) अभिजीत बॅनर्जी यंची विकासवादी अर्थव्यवस्था अभ्यासणे.
२) डुफ्लो बॅनर्जी यांचा नोबेल विजेता सिद्धांत अभ्यासणे.
३) अभिजीत बॅनर्जी यांचे भारतीय अर्थव्यवस्थेबाबतचे विचार अभ्यासणे.

**गृहितक**

गरीबीची आर्थिक स्थिती व गरीबीचे उच्चाटन याबाबत डॉ.अभिजीत बॅनर्जी यांनी जे आर्थिक विचार मांडलेले आहेत ते इतर अर्थशास्त्राहून अतिशय महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले आहे.

**अभ्यास पध्दती**

"नोबेल पारितोषिक विजेते : डॉ.अभिजीत बॅनर्जी" या विषयावर शोधनिबंध लिहिलेला आहे. या शोधनिबंधामध्ये प्रामुख्याने डॉ.अभिजीत बॅनर्जी यांचा विकासवादी अर्थव्यवस्थेचा, डुफ्लो बॅनर्जी यांचा नोबेल विजेचा सिद्धांत आणि त्यांचे भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी विचार अभ्यासण्यात आलेले आहेत. सदरचा शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. यामध्ये प्रामुख्याने इंटरनेटवरील विविध वेबसाईटचा, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ, नियतकालिका यांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**डॉ.अभिजीत बॅनर्जी**

अभिजीत विनायक बॅनर्जी हे त्यांचे संपूर्ण नाव आहे. २१ फेब्रुवारी, १९६१ मध्ये मुंबई येथे त्यांचा जन्म झाला. प्रेसिडेन्सी कॉलेज, कोलकाता, कलकत्ता विद्यापीठ (विज्ञान शाखेचे पदवीधर) जवाहरलाल नेहरु विद्यापीठ (मास्टर ऑफ आर्टस्) हार्वर्ड विद्यापीठ १९८८ (तत्वज्ञान पीएच.डी. मार्गदर्शक एरिक मस्किन) पत्नी अरुंधती तुली (घटस्फोटित) पत्नी ईस्तर डुफ्लो (२०१५ पासून). सध्या ते मॅसाचुसेट्स इंन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे फोर्ड फांऊडेशनचे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. अभिजीत यांना इल्थर ड्युफ्लो आणि मायकेल क्रेमर यांच्या समवेत आर्थिक विज्ञानातील २०१९ चे नोबेल मेमोरियल पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांना हे पारितोषिक जागतिक दारिद्रय दूर करण्याच्या त्यांच्या प्रायोगिक दृष्टीकोनासाठी देण्यात आले.

अभिजीत यांनी गरीबांची आर्थिक स्थिती व गरीबीचे उच्चाटन इत्यादी संदर्भात लेखन केलेले पुअर इकॉनॉमिक्स हे पुस्तक जगातील १७ भाषांमध्ये भाषांतरित झाले आहे. त्यांच्या या ग्रंथास 'गोल्डमन सॅश बिझ ानेस बुक ऑफ दि इयर' हा सन्मान मिळाला आहे. त्यांच्या अनन्यसाधारण कामगिरीमुळे २००९ मध्ये त्यांना इन्फोसिस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांना २०१३ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस बान की मून यांनी २०१५ नंतरच्या विकासासंबंधीची उद्दिष्ट्ये अद्ययावत करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने जी उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती त्या समितीच्या सचिवपदी अभिजीत यांची निवड करण्यात आली होती. अमेरिकी ॲकडमी ऑफ आर्टस अँड सायन्सेस आणि दि इकॉनॉमिक सोसायटी या दोन संस्थेत रिसर्च असोसिएट म्हणून त्यांनी काम केले आहे. बॅनर्जी ब्युरो फॉर दि रिसर्च इज दि इकॉनॉमिकल ॲनॅलिसिस ऑफ डेव्हलपमेंट या संस्थेचे ते अध्यक्ष होते.

अभिजीत यांनी कॅन इन्फॉमेशन कॅम्पेन्स स्पार्क लोकल पार्टीसिपेशन ॲन्ड इम्प्रुव्ह आऊट कम्स (२००६), मेकिंग ए वर्क (२००७), पिटफॉल्स ऑफ पार्टीसिपेटरी प्रोग्राम्स (२००८), पुअर इकॉनॉमिक्स (२०११), गुड इकॉनॉमिक्स फॉर हार्ड टाईम्स (२०१९), व्हाट दि इकॉनॉमी नीड्स नाऊ (२०१९) हे ग्रंथ लिहिले.

**एस्थर डुफ्लो**

एस्थर डुफ्लो यांचा जन्म २५ आक्टोबर १९७२ मध्ये फ्रान्समधील पॅरिसमध्ये झाला. त्यांनी इकोले नॉर्मल सुपरप्राइअर, पॅरिस (कला शाखेची पदवी इतिहास/अर्थशास्त्र), प्रगत सामाजिक विज्ञान शाळा (डीईए), मॅसेच्युसेटस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पीएच.डी. मार्गदर्शक अभिजीत बॅनर्जी, जोशुआ ॲग्रिस्ट), पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (डेल्टा) पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

**मायकाल क्रेमर**

१२ नोव्हेंबर १९६४ मध्ये संयुक्त राष्ट्रात जन्म झाला. त्यांचे शिक्षण हार्वर्ड विद्यापीठात पूर्ण झाले. त्यांना पुरस्कार अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक, मैकआर्थर फेलोशिप मिळाले. त्यांच्या अभ्यासाचे क्षेत्र विकास अर्थशास्त्र, स्वास्थ्य अर्थशास्त्र हे आहे.

**डॉ.अभिजीत बॅनर्जींचे आर्थिक विचार**

अभिजीत यांचा 'विकासवादी अर्थव्यवस्था' हा अभ्यासाचा मूळ विषय आहे. त्यांनी २००३ मध्ये

अब्दुल लतीक जमीन प्रॉव्हर्टी ॲक्शन लॅब (जे.पाल) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह जागतिक गरीबी दूर व्हावी यासाठी आपल्या संशोधनाद्वारे सिद्धांत व व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्यक्ष गरीब क्षेत्रांना भेटी देवून त्यांच्यात वास्तव्य करुन संबंधित घटकांशी संवाद साधून आखलेल्या योजनांचा वस्तूनिष्ठ अभ्यास करुन त्यांनी गरीबीच्या निर्मुलनासाठी सैद्धांतिक मांडणी केली. उदा. भारतामध्ये पोलिओचे लसीकरण स्वतंत्रपणे उपलब्ध करुन सुद्धा राजस्थानातील काही भागातील महिला आपल्या बाळांना लसीकरणासाठी केंद्रावर आणत नव्हत्या. ही बाब अभिजीत व डुफ्लो यांनी लक्षात घेवून त्यावर एक योजना आखली. त्यामध्ये त्यांनी मुलांना लसीकरणासाठी आणणाऱ्या महिलांना डाळीची पिशवी दिली. या प्रयोगामुळे तेथील लसीकरणाची संख्या वाढल्याचे दिसून आले.

अभिजीत यांच्या संशोधनामुळे भारतातील ५० लक्ष विद्यार्थ्यांना 'उपचारात्मक अध्यापनाचा' (रिमेडिअल टिचींग) लाभ मिळत आहे. त्यांच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाबद्दल गौरवोद्‌गार काढत म्हटले की, अभिजीत यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमातून गरीबीशी लढण्याचा नवा दृष्टिकोन जगाला दिला आहे. अनेक देशांमध्ये आरोग्य सुविधांसाठी दिले जाणारे भक्कम अनुदान हे त्यांच्याच संशोधनाचा परिणाम आहे.

सन २०१९ मध्ये भारतात झालेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात दारिद्र्य निर्मुलनाच्या उद्देशाने प्रत्येक गरीब कुटुंबाला अर्थसहाय्य म्हणून महिन्याला ६००० रुपये तर वर्षाला ७२ हजार रुपये देण्याची जी 'न्याय योजना' आणली होती ती संकल्पना अभिजीत यांची होती. मात्र त्यांनी वर्षाला ७२,००० ऐवजी ३०,००० रुपये द्यावेत अशी सूचना केली होती. त्यांच्या मते, मदतीचा आकडा वाढविल्यास ही योजना अव्यवहार्य ठरु शकते. २०१६ मधील भारतामधील नोटाबंदीला त्यांनी विरोध दर्शविला होता कारण नोटाबंदीमुळे देशातील गरीब व सर्वसामान्य जनतेला त्रास सोसावा लागेल आणि तो अपेक्षेपेक्षा जास्त असेल अशी त्यांची भूमिका होती.

गरीबी दूर करण्यासाठी सूक्ष्म वित्त पुरवठा, आरोग्य सेवा, शिक्षण, साक्षरता, पोषण सेवा, लसीकरण या कार्यक्रमांचा सर्वत्र आधार घेतला जातो. या कार्यक्रमांची परिणामकारकता तपासण्यासाठी अभिजीत यांनी यादृच्छित (सर्वसाधारण) नियंत्रण चाचणी (रँडमाइज्ड कंट्रोल ट्रायल-आरसीटी) या सर्वेक्षण पद्धतीचा प्रथमच अवलंब केला. आतापर्यंत ८३ देशांमध्ये मिळून सुमारे १००० सर्वेक्षण या पद्धतीने घेण्यात आली असून त्यापैकी सुमारे २५ टक्के सर्वेक्षण भारतात घेण्यात आली होती. परंतू विविध क्षेत्रांमधून अशा पद्धतीने प्राथमिक सांख्यिकी माहिती संकलित करीत असताना अनेक प्रमाद होऊ शकतात व त्यामुळे या आरसीटी सर्वेक्षण पद्धतीला अनेक मर्यादा आहेत असे प्रसिद्ध अर्थशास्त्र सर अँगस एस. डेटन व प्रसिद्ध तत्वज्ञ नॅन्सी कार्टराईट यांनी आपल्या शोधनिबंधातून दाखवून दिले आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था डळमळीत :नोबेल विजेते डॉ.अभिजीत बॅनर्जी**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांच्यानंतर अर्थशास्त्राचे नोबेल पुरस्कार विजेते आणि भारतीय वंशाचे अर्थतज्ञ अभिजीत बॅनर्जी यांनीही भारतीय अर्थव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आहे.

त्यांच्या मते, भारतीय अर्थव्यवस्था ही पूर्णपणे डळमळीत झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्था लवकरच सुधारेल अशी आशाही सध्याच्या आकडेवारीतून निर्माण होत नाही. असेही ते म्हणाले गेल्या पाच सहा वर्षांमध्ये आम्ही तेजी पाहिली आहे आता हा विश्वास करु शकत नाही असे ते म्हणाले.

**नोटाबंदीला होता विरोध**

केंद्रातील मोदी सरकारच्या नोटाबंदीच्या निर्णयाला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांसह अभिजीत बॅनर्जी यांचाही विरोध होता. बॅनर्जींच्या म्हणण्यानुसार नोटाबंदीमुळे सुरुवातीला ज्या नुकसानीचा अंदाज लावण्यात येत होता त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक ते होणार आहे. म्हणून त्यानी नोटाबंदीच्या निर्णयावर कडाडून टिका केली होती. या निर्णयाचा सर्वाधिक फटका हा असंघटित क्षेत्रांना बसेल असे म्हणाले होते.

**डुफ्लो बॅनर्जी : नोबेल विजेता सिद्धांत**

डुफ्लो आणि बॅनर्जी यांनी "गरीबी निर्मुलन" या विषयाचा अभ्यास केला आहे. त्यांनी हा अभ्यास केनिया, भारत, रवांडा इत्यादी ठिकाणी प्रयोग आणि निरीक्षण करुन पार पाडला आहे. भारतात त्यांनी बंगाल, राजस्थान, आंध्र, हिमाचल इत्यादी ठिकाणी दोनशे पेक्षा अधिक कार्यक्रमांचा अभ्यास केला. डुफ्लो बॅनर्जी यांनी रँडमाईज्ड कंट्रोल ट्रायल या पद्धतीचा वापर केला. या पद्धतीमध्ये अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभिन्नता आहे. डुफ्लो बॅनर्जींनी मतभेद लक्षात घेऊनही ही पद्धत निवडली. गरीबी निर्मूलनाच्या कार्यक्रमाचे फलित तपासणं हा त्यांचा उद्देश स्पष्ट होता. विविध प्रकारच्या योजना अंमलात आणल्या. तेथील लोकांच्या जीवनाचा अभ्यास करुन बॅनर्जी यांनी त्यांचा अभ्यास सिद्धांत मांडला आहे. गरीबी निर्मूलनाच्या प्रचलित असलेल्या सिद्धांतापेक्षा डुफ्लो बॅनर्जी सिद्धांत वेगळा आहे तो सिद्धांत प्रचलित सिद्धांताच्या विरोधात नाही. त्या सिद्धांतांचं अपुरेपण सांगणारा, गरीबी निर्मूलन कार्यक्रमाचा अंमल वेगळ्या पद्धतीने करता येण्यासारखा आहे हे सांगणारा आहे.

डुफ्लो बॅनर्जी सिद्धांताचं वर्णन एका वाक्यात करता येईल. विकास ही गोष्ट अभ्यासपूर्ण अनेक छोट्या नियोजित पावलांनी समाजात असलेल्या प्रस्थापित आर्थिक धोरणांची अंमलबजावणी करुन शक्य होईल.

गरीबी निर्मूलनाचे तीन प्रमुख विचार प्रवाह दिसतात. एक प्रवाह जेफ्रे सॅक्स यांचा (बिग) पुश सिद्धांत गरीबी हा सापळा आहे. मोठ्या प्रमाणावर पैसा ओतून मोठ्या योजनांद्वारे विकास होईल आणि तो विकास तळापर्यंत झिरपत जाईल असा काहीसा सॅक्स यांचा सिद्धांत. या सिद्धांताच्या आधारे गरीब देशांमध्ये श्रीमंत देशांनी मदत ओतली.

विल्यम ईस्टरली यांचा सिद्धांत नेमका दुसऱ्या टोकाचा. पैसे ओतून वरुन होणाऱ्या प्रयत्नातून गरीबी दूर होणार नाही उलट त्यामुळे गरीबी वाढेलच. तळात विकेंद्रीत, लोकशाही पद्धतीत होणारे प्रयत्न आणि मार्केट हे दोन घटक गरीबी नाहीशी करतील असा त्यांचा सिद्धांत. नियोजन न करणे हेच नियोजन **अशी त्यांची घोषणा.**

मोठा रेटा आणि विकेंद्रीत प्रयत्न या दोन टोकांपासून काहीसा वेगळा सिद्धांत अमर्त्य सेन यंनी

मांडला. लोकांना त्यांच्या क्षेत्राची जाणीव नसते. शिक्षणातून जी जाणीव करुन दिली आणि आरोग्याची व्यवस्था केली तर गरीबी निर्मूलन शक्य आहे असे सेन यांनी मांडले.

जगभरचे देश वरील तीन पैकी एकदा विचार किंवा तीनही विचाराचं मिश्रण असणारी धोरणं अमलात आणतात. देशोदेशींची सरकारे आपापल्या देशात त्यासाठी साधनं खर्च करतात आणि श्रीमंत देश इतर देशांमध्ये त्यासाठी साधनं दान करतात किंवा कर्जाऊ देतात. साधने म्हणजे रिसोर्सेस.

डुफ्लो-बॅनर्जींनी वरील तिन्ही प्रकारच्या कार्यक्रमांचा अभ्यास केला. त्यांचा निष्कर्ष असा की, विकास ही कुठल्याही एका ढोबळ धोरणाची अंमलबजावणी नसते तर अनेक छोट्या छोट्या पावलांची विचारपूर्वक आणि अभ्यासपूर्वक केलेली सावली म्हणजे विकास असतो. गडबड अशी होते की, धोरणांचा अभ्यास झालेला नसतो. कार्यक्रमांची मांडणी नीट झालेली नसते. संबंधित लोकांकडे योग्य माहिती पोहचलेली नसते. त्यांच्या श्रद्धा आणि विश्वास यात योग्य बदल केलेले नसतात. हेतू कितीही चांगला असला, साधनंही भरपूर योजलेली असली तरी गरीबी जात नाही.

डुफ्लो-बॅनर्जी यांनी केलेला अभ्यास महत्त्वाचा आहे. एक अभ्यास भारतातलाच आहे. अतिसाराची लागण झाल्यानंतर मुलाला जलसंजीवनी हा घरगुती आणि स्वस्त उपाय प्रभावी ठरत असतो. तरीही गरीब माण्सं डॉक्टरकडे जात असतात. पैसे खर्च करतात. कधी कधी त्यातून घात होतो. लोकांना अतिसाराचा धोका कळत असतो. उपाय केले पाहिजेत हे ही कळते आणि उपायासाठी लोकांकडे पैसेही असतात. तरीही लोक अयोग्य खर्चिक वाटेकउे जातात. स्वतःच नुकसान करुन घेतात तेंव्हा लोकांना याची माहिती देणे, त्यांना ज्ञानी करणे, त्यांच्या श्रद्धात बदल घडवणे या गोष्टी न होणे हा एक महत्त्वाचा घटक आहे.

एक अभ्यास केनियातला आहे. खतं वापरली तर मक्याचं उत्पन्न वाढतं हे शेतकऱ्याला माहित होतं. सरकारनं फुकट स्वस्त खतं वाटली. शेतकऱ्यानं एका मोसमात ती वापरली. पण नंतर खतांचा वापर थांबला. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली नाही. कारण! शेतकऱ्यानं खतांचा वापर केला खळं झालं. उत्पन्न आलं. झालेलं उत्पन्न शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजा भागवण्यातच खर्च झालं. पुढच्या पिकाची वेळ आली तेव्हा पुन्हा खत विकत घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसे उरले नव्हते. शेतकऱ्यांची गरीबी आणि एकूण सरासरी योजनेची रचना यामुळे शक्य झाले नाही. खतं फुकट! स्वस्तात देणे यातून शेतकरी समृद्ध होत नाही. शेतकऱ्याला जगण्याची खात्री असणं आणि उत्पन्न व गुंतवणूक याचा मेळ त्याला सांभाळता येणं आवश्यक असते. मर्यादित जमीनीवर थोडीच खतं वापरुन उत्पन्न वाढवावं आणि नंतर त्या उत्पन्नाचा थोडा भाग पुढच्या खतांसाठी राखून ठेवावा अशी उपाययोजना त्यांच्याकडून असायला हवी होती आणि अर्थातच शेतकऱ्यांना जगण्याची खात्री असायला हवी होती खतं देण्याच्या कार्यक्रमांवर पैसा खर्च झाला पण अपेक्षित परिणाम प्रत्यक्ष झाला नाही.

एक अभ्यास इथियोपियातला आहे. कॉफी उत्पादक शेतकऱ्याचं उत्पन्न वाढावं यासाठी त्याला जमीन सुधारणेच (मार्ल्टिंग) तंत्र शिकविण्यात आलं. शेतकऱ्याचं उत्पन्न वाढलं पण उत्पादन झालेल्या कॉफीचा दर्जा आणि त्यामुळे किंमत ठरविणारी यंत्रणा घोटाळयाची होती. कॉफीला योग्य भाव मिळत नाही.

शेतकऱ्यांकडून कॉफीच्या बिया गोळा करणाऱ्यासह संस्थेला योग्य तोच भाव नाकारला गेला. सह. संस्थेने मिळालेले अपुरे पैसे स्वतःकडच ठेवले आणि शेतकऱ्यांना पैसे देण्यात चालढकल केली. शेतकरी जमिनीची सुधारणा करेनासा झाला सर्वच कार्यक्रम कोसळला. बाजारातील घोटाळ्यामुळे एक चांगली योजना कोसळली.

डुफ्लो-बॅनर्जी यांच्या अभ्यासाचं वैशिष्ट्य असं की, त्यांनी जगभरातल्या गरीबी निर्मूलन कार्यक्रमांचा अभ्यास करुन त्या योजना फेल का गेल्या याची धारणा मांडली. सॅक्स, एस्थर, मायक्रो फायनान्स या कार्यक्रमांवर डुफ्लो-बॅनर्जी टिका करत नाहीत किंवा ते कार्यक्रम चुकीचे आहेत असे म्हणत नाहीत. कार्यक्रम प्रभावी का ठरले नाहीत याचा अभ्यास ते करतात. त्यातूनच त्यांचा सिद्धांत तयार झाला. जर तो कार्यक्रम गरीबी दूर करु शकत नसेल तर तो उपक्रम नाही असं ठरवले पाहिजे आणि त्रूटी दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे हा त्यांचा सिद्धांत. गरीबी कार्यक्रमाची आखणी करत असताना डुफ्लो-बॅनर्जी सिद्धांताचा उपयोग होऊ शकतो.

भारत मोठ्या मंदीच्या अगदी जवळ पोहोचलाय : नोबेल विजेत्या अभिजीत बॅनर्जींचे सूतोवाच

बॅनर्जी म्हणाले, आपला देश सध्या मोठ्या आर्थिक मंदीच्या अगदी जवळ पोहोचला आहे. १९९१ च्या आर्थिक संकटापेक्षा सध्याचा विकास दर कमी असल्याने मागणीच्या वाढीसाठी आपल्याला प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. अर्थव्यवस्थेची खरी अडचणी ही माणसाशीच जोडलेली आहे. ते म्हणाले आपल्याला बजेट संबंधीची तूट आणि लक्ष्य पूर्ण करण्याच्या गोष्टी विसराव्या लागतील. इतकेच नव्हेतर आपल्याला महागाईशी संबंधीत जुने टार्गेटसही सोडून द्यायला हवेत. उलट आपण अर्थव्यवस्थेला थोडं वेगळे पुढे जाण्यास वाव दिला पाहिजे.

कॉर्पोरेट टॅक्सच्या कपातीच्या केंद्रसरकारच्या निर्णयावर टिप्पणी करताना बॅनर्जी म्हणाले, मला वाटत नाही की, सरकारचे हे पाऊल अर्थव्यवस्थेला वाचवू शकेल. कारण, कार्पोरेट क्षेत्राकडे रोकडीची कमी नाही मात्र ते ही रोकड योग्य कारणासाठी वापरत नाही.

**मूल्यमापन**

डॉ.अभिजीत बॅनर्जींनी २००३ मध्ये "अब्दुल लतीफ जमील प्रॉव्हर्टी ॲक्शन लॅब" या संस्थेची स्थापना केली. आपल्या सहकाऱ्यांसह या संस्थेच्या माध्यमातून जागतिक गरीबी दूर व्हावी यासाठी त्यांनी आपल्या संशोधनाद्वारे सिद्धांत व व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल "रॉयल स्विडीश अकादमी" या संस्थेने अभिजीत यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमातून गरीबीशी लढण्याचा नवा दृष्टिकोन जगाला दिला असे गौरवोद्‌गार काढले.

गरीबी दूर करण्यासाठी सूक्ष्म वित्तपुरवठा, आरोग्य सेवा, शिक्षण, साक्षरता, पोषण सेवा, लसीकरण या कार्यक्रमांचा सर्वत्र आधार केला जातो. या कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी अभिजीत यांनी याच यादृच्छित (सर्वसाधरण) नियंत्रण चाचणी या सर्वेक्षण पद्धतीचा प्रथमच अवलंब केला. डुफ्लो-बॅनर्जी यांनी 'गरीबी निर्मूलन' या विषयाचा अभ्यास केला. डुफ्लो बॅनर्जी यांनी 'रँडमाईज्ड कंट्रोल ट्रायल' या पद्धतीचा वापर केला. गरीबी निर्मुलनाच्या कार्यक्रमाचे फलित तपासणे हा त्यांचा उद्देश स्पष्ट होता.

गरीबी निर्मूलनाचे तीन प्रमुख विचार आहेत. त्यामध्ये जेफ्रे सॅक्स यांचा बिग पुशचा सिद्धांत, विल्यम

ईस्टर यांचा तळात विकेंद्रीत लोकशाही पद्धतीने होणारे प्रयत्न आणि मार्केट हे दोन घटक गरीबी नाहीशी करतील असा त्यांचा सिद्धांत आहे. अमर्त्य सेन यांनी शिक्षणातून जी जाणीव करुन दिली आणि आरोग्याची व्यवस्था केली तर गरीबी निर्मूलन शक्य आहे. परंतू डुफ्लो-बॅनर्जी यांच्यावरील उपाययोजना कितीही चांगल्या असल्या तरी अनेक अडचणी किंवा समस्यांमुळे गरीबी संपत नाही. डुफ्लो-बॅनर्जी यांच्या अभ्यासाचे वैशिष्ट्ये असे की, त्यांनी जगभरातल्या गरीबी निर्मूलनाच्या कार्यक्रमांचा अभ्यास करुन त्या योजना फेल का होतात याची कारणे मांडली आहेत.

डुफ्लो-बॅनर्जी यांच्या गरीबी निर्मूलन विचारात एक गोष्ट राहून गेलेली दिसते. समाजात राजकीय सत्ता कशाप्रकारे वागते, तिथले राजकारण कसं असते यातही गरीबी निर्मूलन कार्यक्रमाचे अपयश दडलेले असते. याचा अभ्यास डुफ्लो-बॅनर्जी यांच्या सिद्धांतात राहून गेला आहे. सत्तेत जाण्यासाठी राजकीय पक्षांना नाना भानगडी कराव्या लागतात. सत्तेच्या शिडीवर वरच्या पायरीवर पोहचणारे पुढारी भ्रष्ट असतात. त्यांना सत्ता महत्त्वाची असते. कार्यक्रम वगैरे गोष्टी कळत नसतात. तसं आढळून येते. जगभर त्यामुळे ही कार्यक्रमाची सदोष आखणी होते. सदोष अंमलबजावणी होत असते.

गरीबी निर्मूलनासाठी सिद्धांत आवश्यक आहे. तो सिद्धांत अंमलात आणण्यासाठी विचाराभ्यासपूर्वक योजलेल्या अनेक छोट्या पावलांची आवश्यकता आहे. डुफ्लो-बॅनर्जीमुळे गरीबी निर्मूलन विचार इथवर पोहचला. गरीबी नष्ट होण्याला एक सुचलेला उपाय म्हणजे गरीबी निर्मूलनाच्या आड येणारे राजकारण आणि सत्ता यांचा अभ्यास हा तिसरा घटक सिद्ध झाला तर गरीबी दूर होण्याची शक्यता वाढेल.

**संदर्भ**

१) marathivishwakosh.org Date ३/४/२०२०
२) https://www.loksatta.com>nob Date ३/४/२०२०
३) m.maharashtratimes.com Date ३/४/२०२०
४) s://m.marathi.thewire.in Date ३/४/२०२०
५) ttps: //www.google.com Date ३/४/२०२०
६) अर्थसंवाद त्रैमासिक, जुलै-सप्टेंबर २०२०

◆◆◆

# मध्ययुगीन भारत : इतिहास साधन एक अभ्यास

**डॉ.देवकाते बी.एन.**
इतिहास विभागप्रमुख
एम.एम.जोशी कॉलेज हडपसर, पुणे २८.

**प्रस्तावना :—**

भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा शोध घेणे म्हणजे इतिहास होय.साधना शिवाय इतिहास नाही. ''छव क्वबनउमदज छव भ्पेजवतल'' ना कागद ना इतिहास. इतिहास लिहिण्यासाठी साधनांना फार महत्व आहे.अशीच मध्ययुगीन काळातील इतिहास जाणून घेण्यासाठी साधने अत्यावश्यक असतात.मध्ययुगाचा अभ्यास करण्यासाठी साधने महत्वाची आहेत. त्याद्वारे आपणाला तत्कालीन राजकीय,सामाजिक स्थितिची माहिती कळते.

सल्तनतशाहीचा इतिहास पहात असताना त्याची धोरणे,स्वाऱ्या ई.माहिती साधनातून मिळत असते. तुर्की, फारशी लेखकांनी लिहून ठेवलेले ग्रंथ, वृतांत ही संदर्भ साधने म्हणून ओळखली जातात. शिलालेख, ताम्रपट,नाणी या साधनाचा इतिहासलेखन करत असताना उपयोग होत असतो.

प्राचीन भारताचा इतिहास उलघडून पहात असताना पुराभिलेखीय साधनांचा उपयोग होत असतो. इतिहास मधून ज्ञान, इतिहसिक घटना,पराक्रम या विषयीचे ज्ञान प्राप्त होते. आठव्या शतकात मुस्लीम राजवटीच्या इतिहासास विशेष महत्व आहे.कारण या शतकात इस्लामी महमद बिन कासीमने भारतावर स्वारी केली.या स्वारीत दाहीरच्या राजाचा पराभव करूनअरबी सत्तांनी सिधवर विजय मिळविला.त्यांनंतर महमद गझनीने भारतावर भारतावर घक्त स्वाऱ्या करून भारताची लुट करून निघून गेला.परंतु भारतीय संपत्तीत घट पडली नाही. त्यानंतर दीडशे वर्षांनी महमद घोरीने भारतावर राजकीय सत्ता स्थापन करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन आला होता.भारतात सत्ता स्थापन करणारा पहिला मुस्लीम शासक होय. प्रो.ब्युरी म्हणतो कि, इतिहास हे शास्त्र आहे."history is a science No more and No less"

इतिहास हा साधनांच्या आधारे लिहिला जातो.त्यास ऐतिहासिक साधने असे म्हणतात. मध्ययुगीन भारताचा इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी साधने महत्वाची आहेत.

अमीर खुस्त्रो हा सल्तनशाहीच्या कालखंडातील मोठा विदवान लेखक होता.केकुबादपासून सुलतान ग्यासुदिन, मुस्लीम संत निजामुद्दीन अवलियाचा त्यास सहवास लाभला.अमीर खुसरोने गद्य, पद्य या ग्रंथात तत्कालीन भारतीय संपत्तीत घट पडली नाही.त्यानंतर दीडशे वर्षांनी महमद घोरीने भारतावर राजकीय सत्ता स्थापन करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन आला होता. भारतात सत्ता स्थापन करणारा पहिला मुस्लीम शासक होय.प्रो.ब्युरी म्हणतो कि,इतिहास हे शास्त्र आहे. “history is a science No moreand No less” भारतात सत्ता स्थापन करणारा पहिला मुस्लीम शासक होय.

इतिहास हा साधनांच्या आधारे लिहिला जातो. त्यास ऐतिहासिक साधने असे म्हणतात. मध्ययुगीन भारताचा इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी साधने महत्वाची आहेत अमीर खुस्त्रो हा सल्तनशाहीच्या कालखंडातील मोठा विदवान लेखक होता.केकुबादपासून सुलतान ग्यासुदिन, मुस्लीम संत निजामुद्दीन अवलियाचा त्यास सहवास लाभला.

अमीर खुसरोने गद्य, पद्य या ग्रंथात तत्कालीन अनेक राजकीय घटनांची वर्णने दिलेली आहेत.त्याचे खजाइन उल—फुतुहत, तारीखे—इ—इस्लामी या तत्कालीन गोष्टीवर भर दिला आहे. जियाउदीन बरनी—तारीख—ए—फिरोजशाही या आपल्या ग्रंथात दिल्लीच्या बल्बन पासून फिरोजशाह तुघलक पर्यंतचा इतिहास मांडला आहे.

खुद फिरोजने आपल्या कारकीर्दीवर फुतुहते फिरोजशाही नावाचे आत्मचरित्र लिहिले असून ते त्याच्या कडव्या धार्मिक धोरणावर प्रकाश टाकते.ह्म मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास करताना लिखित साधना बरोबरच अलिखित पुरातत्वीय साधनाचा उपयोग महत्वपुर्ण ठरतो.इतिहास अभ्यासासाठी नाणी हे प्राथमिक साधन म्हणून त्या त्या कालखंडातील नाण्यांना अनन्यसाधारण असे महत्व आहे.कारण त्या नाण्यावरून त्या कालखंडातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती, लिपी, भाषा सुलतानाचे नाव,टाकसाळीचे ठिकाण इ.ची माहिती मिळते. अलाउद्दीन खिलजीने स्वारी केल्यानंतर सोन्याची नाणी निर्माण केली. त्यावरून त्या काळातील आर्थिक, धार्मिक स्थिती लक्षात येते.शेरशाहने दाम नावाचा चांदीचा रुपया व्यवहारात आणला होता.महमद तुघलकाने ''दोकोनी'' नावाचा शिक्का १७५ ग्रेन चांदीचा रुपया तयार केला.दोकोनी नावाचे नाणे व २०० ग्रेन वजनाची दिनार सुवर्ण मुद्रा व १४४ ग्रेनची अदली नावाची चांदीची मुद्रा तयार केली.तसेच ताब्याचे शिक्केही तयार केले.

बाबर व हुमायून यांनी ताब्याचे नाणे १०० ग्रेन वजनाचे बनविले.त्याला ढबु हे नाव देण्यात आले.अकबराने दिल्ली सरकारचा प्रमुख ख्वाजा अब्दुल समरची नियुक्ती करून सोने,चांदी व ताब्याची अनेक नाणी शिक्के तयार केले गेले.जवळपास सोन्याच्या वस्तूचे शिक्के तयार केले. जहागीरने स्वत: नाण्यावर राशीचक्र,स्वत:चे चित्र कोरले होते.पूर्वमध्ययुगीन नाण्याचा अभ्यास एडवर्ड थोमस याने "The chronical of the pthan kings of Delhi" या ग्रंथात मुस्लीम सुलतानाच्या नाण्यावरून शासनाचा काळ,राज्यविस्तार,धर्मिक स्थिती याविषयी माहिती मिळते.

हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेच्यावेळी विजापूर सत्तेची नाणी चलनात होती.परंतु राज्याभिषेका नंतर शिवरायांची 'होन' हे सोन्याचे २८४ ग्रेम वजनाचा शिक्का तयार करून 'शिवराई' हे नाणे प्रचारात आणले.[३] मध्ययुगीन मुसलमानी कालखंड संघर्षाचा असला तरी या काळात दरबारात लेखक, कवी यांना आश्रय दिला जाई परंतु संस्कृत साहित्याचा फारसा विकास झाला नाही. वल्लभाचार्यांनी संस्कृत ग्रंथ लिहून भक्ती मार्गाचा प्रसार केला.

बाराव्या शतकात जयदेवने गीतगोविंद लिहिले तर मुघल बादशहा शहाजनच्या दरबारात जगनाथ पंडीत हा संस्कृत कवी होता.रस गंगाधर व गंगालहरी या रचना त्यांनी केल्या.

यावर शिलाहाराचे पाच–सहा शिलालेख तेराव्या शतकात आढळून येतात. हिंदू मुस्लीमांच्या सपर्कामुळे संस्कृत,अरबी,फारसी या भाषांच्या मिश्रणातून उर्दू भाषेचा उदय झाला.[४] कृष्ण देवरायचे आमुक्तमाल्यदा हे तेलगु भाषेतील साहित्य अप्रतिम अशा स्वरूपाचे आहे.

मध्ययुगीन काळ हा मुस्लीम राजवटीचा काळ मानला जातो.याकाळात हिंदी, तेलगु, फारसी परकीय भाषांचा प्रभाव जाणवतो.साधनांचा आढावा पुढल प्रमाणे आहे

• **चचनामा—** हा अरबी भाषेतील ग्रंथ असून अरबांचा सिंधवरील विजयाची माहिती या ग्रंथात दिली आहे.

• **ताजूर मासीर—** इ.स.११९१ ते १२१७ या कालखंडातील राजकीय इतिहास हसन निजामी याने या ग्रंथाची रचना केली असून अलंकारीक भाषेचा वापर केला आहे.वीस वर्षाचा इतिहास अरबी,फारसी भाषेतील गद्य पद्य रुपात रेखाटला आहे.

• **तारीखे फिरोजशाही—** शम्स–ए–अफीफ यांनी या ग्रंथाची रचना केली.परंतु याचे अपूर्ण काम जियायुद्दिन बरनीने पूर्ण केले. १२६५ ते १३५३ या कालखंडातील इतिहास मांडला आहे. फिरोजशहाचे गुण, कल्याणकारी योजना इ.ची उद्दिष्टे या ग्रंथात आढळतात.

• **नूर सिपेह्नरनामा—** अमीर खुस्त्रोने हा ग्रंथ इ.स.१३११ मध्ये लिहिला यात अल्लाउद्दीन खिलजीचे राज्यारोहण,मंगोल आक्रमणे तसेच देवगिरी, राजस्थान, गुजरात इ.प्रांताच्या विजयाची माहिती मिळते.

• **तुघलकनामा—** अमीर खुस्त्रो हा या ग्रंथाचा कर्ता होय.ग्यासुद्दीन तूघलकाने खुस्त्रोवर मिळवलेल्या विजयाची माहिती यात आहे.ऐतिहासिक कालगणनाक्रम,युद्ध घटना क्रम याचे वर्णन केले आहे.

• **तहकिक—ए—हिंद—** इ.स.९३७ ते इ.स.१०४८ हा त्याचा कालखंड होय. समकालीन इतिहासकारांशी तुलना करताना अल्बेरुनी वस्तुनिष्ठ व प्रामाणिक वाटतो कारण त्याने कोणत्या उद्देशाने किवा लालसेने लिखाण केले नाही.तहकिक–ए–हिंद या ग्रंथात भारतीय धर्म रूढी, परंपरा, सण–उत्सव चालीरीती इ.विषयावर लिखाण केले.तसेच भारतीय लोकांचा आहार, पोशाख,विवाह संस्कार इ.ची माहिती या ग्रंथात आढळते.[५]

• **रहेला—** हा ग्रंथ इब्न बतुता याने लिहिला आहे.इ.स.१३०० ते १३७८ महमद बिन तुघलकाच्या काळात चौदा वर्ष भारतात राहिला.सामाजिक,न्यायालयीन,लष्करी इतिहासाचा एक अमोल ठेवा होता.या सुमारास निकोलस कोटी व अब्दुल रझाक या इराणी राजदूताने विजयनगरच्या साम्राज्यास भेट दिली होती.

• **तुझुक—** ए–बाबरी–बाबराचे हे आत्मचरित्र असून त्याला जागतिक वाङ्मयात महत्वाचे स्थान आहे.यात बाबराच्या राजकीय घडामोडी, तत्कालीन भारताचे सामाजिक, आर्थिक, निसर्गा विषयाचे चित्रण या साहित्यात आढळते. तुर्की भाषेत लिहिले आहे.

• **हुमायूननामा—** गुलबदन बेगमने या ग्रंथाची रचना केली आहे.फारसी भाषेत हा ग्रंथ असून

बादशाहचा जनानखाना,मुले,मुली व इतर रीतीरिवाज सांगितलेले आहे

• **अकबरनामा—** अबुल फजलने या ग्रंथाची निर्मिती केली आहे.अकबर बादशहाच्या कारकिर्दीचा आढावा यात घेतला आहे.

• **ऐन—ए—अकबरी—** सुलतान निजामुद्दीन अहमद याने या ग्रंथाची रचना केली आहे. अकबरा पर्यन्तचा इतिहास तीन कालखंडात लिहिला आहे.

• **तुजूक—ए—जहागीर—** जहांगीरन स्वत: आत्मचरित्र लिहिले आहे. व्यक्तिमत्व, राज्यकारभार, ध्येय धोरणे, अठरा वर्षाच्या कारकिर्दीचे वर्णने जहांगीरने तुर्की भाषेत लिहिले आहे.गुण/दोषाची मनमोकळेपणाने चर्चा केली आहे.

• **पादशहानामा—** अब्दुल हमीद लाहोरी याने हा ग्रंथ लिहिला आहे.महमद अमीन, लाहोरी, महमद वारीस असे तीन वेगवेगळे लेखक आहेत.

• **शहाजहाननामा—** इनायतखान हा या ग्रंथाचा कर्ता होय.या सर्व लेखकात लाहोरी हा अबुल फझलच्या तोडीचा इतिहासकार मानला जातो.

• **आलमगीरनामा—** मिर्झा महमद कासीम याने औरंगजेबाच्या पहिल्या दहा वर्षाचा इतिहास मांडला आहे.[६]

• **मासिरे आलमगीरी—** साकी मुस्तेद्खान याने या ग्रंथाची निर्मिती केली आहे. सरकारी कागदपत्रे व पुराव्याच्या आधारे हा ग्रंथ लिहिला गेला.स्वत: लेखक सम्राट औरंगजेबाबरोबर चाळीस वर्षे राहिला.

• **मुतखब—उल—लुबाब—** खाफीखानाने हा ग्रंथ लिहिला आहे. औरंगजेबाच्या कारकीर्दीचा व नंतर येणाऱ्या बादशहाची माहिती या ग्रंथात आढळते

मराठ्यांचा इतिहास याच कालखंडात ढवळून निघाला.शिवशाही व पेशवाई असे या दोन्ही काळातील अनेक बखरी लिहिल्या आहेत.उदा.शिवाजी महाराजांचे चरित्र सांगणारी सभासद बखर,श्घ कलमी बखर इत्यादी पेशवेकाळातील भाऊसाहेबांची बखर आहे.अशा ऐतिहासिक घटना स्मरणाने लिहून ठेवण्याच्या घटना नोंदीना शकावली म्हटलेजाई. वि.का. राजवाडे, खरे, गो.स.सरदेसाई, वा.सी.बेंद्रे इ.संशोधकानी मराठेशाहीची हजारो कागदपत्रे प्रसिद्ध केली.

मुघल बादशहाच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात युरोपियन प्रवासी भारतात आले. त्यांनी लिहिलेला वृतांत हा ऐतिहासिक साधन म्हणून ओळखला जातो. बर्नीयन, टव्हेनिअर, मनूची, खाफीखान, थवेनोट इ.या प्रवाशाचा वृत्तांत राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. अबे केरे हा फ्रेच प्रवासी १६८८ च्या सुमारास सुरत, गोवा, दमन, राजापूर इ.ठिकाणी गेला होता.त्याने प्रवास वर्णनात शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या जीवनातील घटनांच्या नोंदी दिल्या आहेत.थोमन निकोलस व हेन्री आक्झेडन या दोघांनी १६७२—७४ साली रायगडला भेट दिली.या भेटीचा वृतांत आपल्या डायरी मध्ये लिहून ठेवलेला आहे.आक्झेडन हा प्रत्यक्ष महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी हजर होता. जॉन

फायर याने मुंबई, ठाणे, वसई, कल्याण, जुन्नर, कारवर व दक्षिणेतील स्थळांना भेटी दिल्या.

थोडक्यात— मध्ययुगीन भारताच्या इतिहासात साधनांना अनन्यसाधारण असे महत्व आहे.साधनाशिवाय कोणत्याही राजघराण्यांचा इतिहास लिहिता येत नाही.मध्ययुगीन काळ हा मुघल बादशाहीचा काळ म्हणून ओळखला जातो.

याकाळात मुस्लीम राजवटीचा इतिहास समाजापुढे मांडला आहे. त्याकाळातील बादशहाच्या पदरी असलेल्या समकालीन इतिहासकारांनी बादशाहीच्या राजवटीतील सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनाचा उल्लेख आपल्या चरित्रा मधून साकारलेला आहे. अमीर खुस्रो, जियाउद्दीन बरणी, तारीख—ए—फिरोजशाही या ग्रंथात बल्बन पासून फिरोजशहा तुघलकापर्यंतचा इतिहास साकारलेला आहे.

सोळावे शतक हे मुस्लीम राजवटीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे मानले जाते. या कालखंडात बाबर, हुमायून, जहागीर, अकबर व औरंगजेब बादशहा या राज्यकर्त्यांचा इतिहास आत्मचरित्रताच्या माध्यमातून जगा पुढे मांडलेला आहे. अकबरनामा, ऐन—ए—अकबरी, बाबरनामा, हुमायूननामा इत्यादी वाड्मय व परकीय साधनाचा देखील उपयोग मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत होते. इतिहासलेखन करत असताना साधने दुवे म्हणून फार उपयुक्त ठरतात.

**तळटीपा :**

१. नेवासकर, कुलकर्णी, मध्ययुगीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ १,२

२. पवार जयसिंगराव, भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ १४८, १५०, १५१

३. भामरे राजेंद्र, देवकाते बाळासाहेब, मध्ययुगीन भारताचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे पृष्ठ १०.

४. कित्ता, पृष्ठ १२, १३, १५.

◆◆◆

# डॉ. महंमद इक्बाल : एक थोर भारतीय राजकीय विचारवंत

**प्रा. डॉ. शहाजहान शेख**
इतिहास विभाग प्रमुख
आझाद महाविद्यालय, औसा

**प्रस्तावना (पूर्वायुष्य) :-**

जन्म : १८७३, मृत्यू : १९३८ डॉ. इक्बाल हे एक उर्दु कवी, तत्त्वज्ञ, राष्ट्रवादी आणि राजकीय विचारवंत होते ते तत्कालीन मुस्लिम विचारांचे प्रतिनिधित्व करणारे एक प्रज्ञावंत होते.त्यांनी मुस्लिमधर्मीय लोकांना स्वतंत्र मुस्लिम राज्य निर्माण करण्यासाठी प्रोत्साहीत केले. त्यांची अनेक वर्षे युरोपात राहुन पाश्चात्य दर्शन आणि भौतिकवादी सिध्दांताचा मूलभुत अभ्यास केला. परंतु त्यांच्यावर मुस्लिम परंपरा आणि मुसिलम तत्त्वज्ञान यांचाच प्रभाव अधिक होता. साहजिकच, पुढील काळात ते इस्लामधर्माचे कट्टर पुरस्कर्ते बनले.

मुस्लिमांचे पवित्र कुराण हे इक्बाल यांच्या विचारांचे प्रेरणास्थान होते. त्यांनी मुस्लिम लोकांना सक्रिय आणि कर्मप्रधान प्रवृत्तीचा अवलंब करण्याचा आग्रह केला. निष्क्रिय चिंतनात कोणताच फायदा होत नाही, असे सांगुन जागरुकतेने प्रार्थना करणारा मुसलमान हा निद्रिस्त मुसलमानापेक्षा श्रेष्ठ ठरतो असे सांगितले त्यांच्या विचारांमध्ये .सातत्याने हिंदू धर्माविषयीचा तिरस्कार स्पष्ट पणे दिसून येतो. त्यांनी मूर्तीच्या समोर  जागरुक हद्य स्पष्ट करण्यास काफीर असे संबोधले होते. भारतामध्ये इस्लामधर्मीयांमध्ये जगृती घडवुन तत्कालीन हिंदुस्थानचे विभाजन कण्याची प्रेरणा त्यांनी मुस्लिमांना दिली होती.

**१) इक्बाल यांचे सामाजिक विचार :-**

महंमद इक्बाल यांच्या सामाजिक विचारांमध्ये साम्राज्यवाद आणि भांडवलशाल्ही ला विरोध तसेच समाजवादाचे समर्थन आणि राष्ट्रवादी चिंतन यांचा समावेश होतो. त्याचा मागोवा पुढील प्रमाणे घेता येईल.

**२) साम्राज्यवाद आणि भांडवलशाहीला विरोध :-**

युरोपमधील राष्ट्रांची प्रगतिशीलता आणि क्रियाशिलता  यांचे अनुकरण करणे त्यांचा योग्य वाटत होते. परंतु युरोपातील भांडवलशाही इक्बाल यांना मान्य नव्हती, कारण त्यांचा संपत्तीच्या समान वाटपावर विश्वास होता. म्हणून ते असे म्हणत की, "ईश्वराने (म्हणजे अल्लाने) सर्व प्राण्यांसाठी पृथ्वीची निर्मिती केली असून पुंजीवाद किंवा भांडवलशाही आणि जमीनदारी व्यवस्था ही दैवी नियमांच्या विरुध्द आहे. त्यामुळे ईश्वराला संपूर्ण संपत्तीचा स्वामी मानुन त्यांनी मानवाला अशा संपत्तीचा ट्रस्टी किंवा विश्वस्त मानले."

आपल्या एका कवितेत इक्बाल असे म्हणतात. की, "लोकांनी जागृत व्हा आणि गरीबजनतेला

आपल्या अधिकारापासून वंचित करु नका. कारण, या श्रीमंतांनी गरीब लोकांवर जे अन्याय केले ते दूर करण्यासाठी श्रीमंतांच्या बंगल्याच्या भिंती तोडा आणि त्यासाठी गरीब आणि गुलाम जनतेमध्ये, आत्मविश्वास निर्माण करुन भांडवलशाही नष्ट करा. संगमरवराच्या देवाच्या मूर्तीची पुजा करण्यापेक्षा गरिबांच्या झोपडीतील मातीची पुजा करा." असा संदेश इक्बाल यांनी जनतेला दिला त्यांचा साम्यवादाला कट्टर विरोध होता. साम्यवादास असलेल्या त्यांच्या या विराधचे यथार्थ दर्शन त्यांच्या पवित्र मशरिग कवितेमध्ये पडुन गेले त्यानी लेनिनला सरकार वडलेला कैसर असे संबोधले आहे. कारण साम्यवाद ही इस्लामच्या तत्त्वांविरुध्द आहें, असे त्यांचे मत होते.

**३) समाजवादाचे समर्थन :-**

खरे पाहता इक्बाल यांना अर्थशास्त्र आणि समाजशास्त्राबद्दल मुळीच आशा नव्हती ते असे सांगतात की, मी मुस्लिम राज्याचा सर्वाधिकारी असतो तर सर्वप्रथम मुस्लिम राज्य हे समाजवादीराज्य म्हणुन जाहीर केले असते.

इक्बाल असे सांगतात की, पुंजीवाद किंवा भांडवलशाही व्यवस्था शोषणावर आधारित असून तिच्यामध्ये व्यक्ति विकासाला वाव नसतो, परंतु समाजवादी व्यवस्थेमध्ये व्यक्तिविकासाला वाव असतो. या कारणास्तव ते समाजवादांचे समर्थन करतात. परंतु त्यांना मार्क्सचा समाजवाद मान्य नाही. कारण मार्क्सचा समाजवाद धर्माला अफूची गोळी समजतो त्यामुळे इक्बाल हे भावात्मक दृष्टीने समाजवादाचे समर्थ करतात. बैध्दिक दृष्टीने नव्हे ! असे स्मिथचे मत आहे.

**४) राष्ट्रवादी चिंतन :-**

इक्बाल यांच्या समाजिक विचारांमध्ये राष्ट्रवादी चिंतन महत्त्वाचे ठरले आहे. राष्ट्रवादांसंबंधीच्या आपल्या एका कवितेमध्ये "सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा" असे म्हणताना "खाके वतन जर्रा मेरे लिये खुदा है" असे सांगून ते हिंदु-मुस्लिम एकतेचे समर्थ करतात, परंतु त्यांचा हा राष्ट्रवाद लवकरच सांप्रदायिक विचारानी घेरला गेला आणि राष्ट्रवादाचा अर्थ बहुसंख्य हिंदु समाजाचे दास्यत्व पत्करणे असा आहे. असे ते म्हणु लागले. त्यामुळे त्यांनी पृथक मुस्लिम राज्याचे समर्थन केले.

**५) इक्बाल यांचे राजकीय विचार :-**

डॉ. इक्बाल यांच्या राजकीय विचारांमध्ये मुस्लिम राज्याच्या समर्थनाला फार महत्त्व आहे. त्यांनी आपल्या सांप्रदायिक भावनांना खालील कारणांमुळे महत्त्व देऊन स्वतंत्र मुस्लिम राज्याचे समर्थन केले. १) त्यांच्या राजकीय विचारांवर हिंदुच्या बहुमताचे दडपण आले होते. ब्रिटिशपूर्व काळात मोगल शासनपर्वामध्ये हिंदु-मुस्लिमांमध्ये सतत संघर्ष घऊन आले होते. मोगलांची सत्त असल्यामुळे या संघर्षात मुस्लिम वरचढ ठरत असत. त्यामुळे जर भारतात हिंदूचे राज्य प्रस्थापित झाले तर हिंदू लोक मुस्लिमांचा बदला घेतील, अशी भीती त्यांना वाटत होती.

२) दुसरे कारण म्हणजे त्यांच्यामध्ये निर्माण झालेली जागतिक इस्लामवादाची भावना होय. त्यांना जगातील सर्व मुस्लिमांचे संघटन आवश्यक वाटत होते. परंतु "राष्ट्रवादी" ही त्यामधील एक महत्त्वाची अडचण होती. कारण, अशा राष्ट्रवादी भावनेमुळे एका देशातील मुस्लिम हे दुसऱ्या देशातील मुस्लिमापेक्षा स्वतःला वेगळे समजत होते. त्यामुळे त्यांनी भारतातील मुस्लिमांसाठी स्वतंत्र राज्याचा पुरस्कार केला.

३) डॉ. इक्बाल यांना काँग्रेस पक्षाचे ध्येय-धोरण मान्य नव्हते, कारण, ते काँग्रेस पक्षाला राजा-महाराजांची संस्था मानीत होते, तसेच त्यांना हिंदूच्या बरोबर राज्यात एकत्रित राहण्यापेक्षा ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वतंत्र मुस्लिम राज्यात राहणेच इष्ट वाटत होते. त्यामागील कारण म्हणजे त्यामुळे हिदुंना मुस्लिमांचा बदला घेण्याची संधी मिळणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

पंजाब, उत्तर-पश्चिम सीमाप्रांत, सिंध आणि बलुचिस्तान मिळुन एक स्वतंत्र मुस्लिम राज्य व्हावे, असे न जमल्यास उत्तर-पश्चिम भाताचे मिळन स्वतंत्र मुस्लिम राज्या ब्रिटीश साम्राज्यांतर्गत निर्माण व्हावे या विचाराने त्यांनी समर्थन केलें. गोलमेज परिषदेत झालेल्या सांप्रदायिक निर्णयाचे डॉ. इक्बाल यांनी स्वागत केले. कारण त्यामध्ये हिंदुस्थानचे धार्मिक आधारावर विभाजन करण्याचे ठरविण्यात आले होते. आणि मुस्लिमांच्या हिताच्या दृष्टीने असे विभाजन योग्य आहे, असे डॉ. इक्बाल यांचे मत होते. या गोलमेज परिषदेने स्वतंत्र पाहिस्तानाच्या निर्मितीचे बीज पेरले, असे म्हणता येईल.

**निष्कर्ष :-**

काही विद्वानांच्या मते राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे डॉ. इक्बाल यांचे मतपरिवर्तन होऊन त्यांनी स्वतंत्र पाकिस्तानची मागणी का केली, असा प्रश्न उभा राहतो. त्यांचे उत्तर देताना आपण ऐवढेच सांगू शकतो की, डॉ. इक्बाल हे प्रथम मुस्लिम होते, त्यामुळे त्यांनी इस्लाममधील मुलभूत तत्त्वांना तसेच मुस्लिम परंपरा व तत्त्वज्ञान यांना प्राधान्य देऊन नंतर इतर बाबींना तसेच कार्यास महत्त्व दिले. त्यांनी मुस्लिमांच्या कल्याणासाठी आणि भविष्यात हिंदूकडून मुस्लिमांचा बदला किंवा सुड घेतला जाऊ नये म्हणून मुस्लिमांच्या स्वतंत्र राष्ट्राच्या किंवा पाकिस्तानच्या निर्मितीचा पुरस्कार केला.

**संदर्भ सूची :-**

१. बाचल वि.मा. श्रीरसागर व्ही.एस - भारतीय राजकीय विचारवंत, अनिरुध्द पब्लिशिंग हाऊस, पुणे, २२ पृ.क्र. ४२५

२. Shamloo – Speeches and Statements of Iqubal, Al-Minar Acadamy, Lahor, - 1948.

३. शांती मोटारे - वकील अलीम - स्वातंत्र लढा आणि भारतीय मुसलमान, लोकवांडमय, मुंबई, १९८५.

४. जलाल आयशा-पार्टीजन्स ऑफ अल्लाह, परमनंट ब्लॅड २००४

५. Smith W.C. - Modern Islam in India, Uniersal Library 1943.

६. फडके य.दी - स्वातंत्र्य अंदोलनातील मुसलमान ,समता प्रकाशन , पुणे. १९८६

◆◆◆

# महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक कार्य

**प्रा.डॉ. निलीमा राऊत**
डॉ. पंजाबराव देषमुख कला व
वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे हे भारतातील प्रगत विचारसरणीचे व सामाजिक सुधारणांसाठी नवोपक्रम राबविणारे राजे होते. १८६३ साली महाराष्ट्रातील कौळाणे येथील मराठा शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या या मुलाला बडोद्याच्या महाराणी जमनाबाई यांनी दत्तक घेतले.[१] १८७५ साली त्यांना बडोद्याचे राजेपद प्रदान केले. प्रोफेसर इलियट यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर १८८१ साली वयाच्या १८ व्या वर्षी राज्याभिषेक सोहळा झाल्यानंतर त्यांनी बडोद्याचे महाराज म्हणून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ केला.[२] १८८१ ते १९३९ या ५८ वर्षाच्या कालावधीत त्यांनी बडोदे संस्थानचा कायापालट करुन आधुनिक सुधारणावादी राज्य म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

माणूस हा जन्मत: शहाणा नसतो तर त्याला शिक्षण दिल्याने तो शहाणा बनतो, या विचाराचे पाईक असणारे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या १८७५ ते १९३९ या कालावधीत बडोदा संस्थानाचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविले. भारतातील अनेक संस्थानापैकी बडोद्याचे संस्थान हे प्रगतशील व प्रथम श्रेणीचे संस्थान होते.[३] त्यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान महत्वपूर्ण ठरते. महाराज सयाजीराजे यांनी सुधारणावादी व उदारमतवादी धोरणाने बडोदा संस्थानास शिक्षणाच्या गंगोत्रीचा प्रवाह वाहता केला.

महाराज सयाजीराव तिसरे सन १८७५ मध्ये गादीवर आले त्यावेळी संस्थानावर इंग्रज अधिकाऱ्यांची जबरदस्त पकड होती. काळाची पाऊले ओळखून ब्रिटीशांचे दास न होता प्रजेचे हित जेवढे करता येईल तेवढे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ब्रिटीशांची सत्ता हिंदुस्थानात स्थिरावणे हे केवळ राजकीय स्थित्यंतर नव्हते तर सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक, आर्थिक अशा अनेक टप्प्यातून हे स्थित्यंतर घडून आले. या सर्वांगीण बदलांच्या प्रवाहात अडकलेल्या समाजाची नव्याने पुर्नरचना करण्याचे आव्हान महाराज सयाजीरावांनी स्विकारले.[४]

शिक्षण हाच सर्व सुधारणांचा कणा असून आजच्या सद्यास्थितीतून आपला उध्दार होण्यासाठी तोच फक्त एकमेव मार्ग आहे असे महाराजांचे मत होते. शिक्षण विषयक अनेक सुधारणा त्यांनी आपल्या राज्यात आणि देशभरात घडवून आणल्या. देशाचा उत्कर्ष होण्याकरीता समाज नुसता साक्षर होवून चालत नाही तर ज्ञानात भर पडली पाहिजे. ज्ञान पाश्चात्य असो वा पोर्वात्य असो ज्ञानावर सर्वांचा हक्क सारखाच आहे.

१९८५ मध्येच सयाजीरावांनी आपले शिक्षण विषयक धोरण जाहिर केले होते.[५] ते पुढीलप्रमाणे प्रतिवर्षी ३० नविन शाळा उघडाव्यात, दरवर्षी शाळांच्या इमारतीसाठी ६०,००० खर्च करण्यात यावेत, स्त्री शिक्षणाच्या प्रगतीकडे अधिक लक्ष देवून, शक्यतो मुलींच्या

शाळांमधून स्त्री शिक्षकांची नेमणूक करावी. समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत शिक्षणाच्या प्रसाराचे प्रयत्न करणे, विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवणे, औद्योगिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरु करणे. विद्यार्थ्यांसाठी एक नविन वाचनालय तयार करवून घेणे, इंग्रजी भाषेमधून देशी भाषांमध्ये उत्तम ग्रंथांची भाषांतरे करवून घेण्याची व्यवस्था करणे जेवढी शक्य होतील तेवढी वाचनालये निर्माण करणे, एकूणच शिक्षणातून स्वातंष्याकडे अशी त्यांची वाटचाल दिसते. बडोदा ही एक प्रयोगशाळा समजून शिक्षणाचे सर्व प्रकारचे प्रयोग आपल्या राज्यात करुन बघीतले. या कार्यात त्यांना लोकमान्य टिळकांचा मोठा पाठिंबा होता.[६]

**मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

ब्रिटीश इंडियातील बडोदा राज्य शिक्षण क्षेत्रात कितीतरी पुढे होते. भारत स्वतंत्र झाल्यावर देशभरात ज्या धोरणाची अंमलबजावणी झाली किंबहून जे धोरण भारतीय संविधानाचा एक घटक बनले ते म्हणजे मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण होय. ही मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना महाराजांनी नोव्हेंबर १८९३ मध्ये अमरेली शहर आणि आजूबाजूच्या आदिवासी ९ खेडेगावांमध्ये राबविली. १८९३ साली शाळेत एक मैलाच्या परिघात राहणाऱ्या ७ ते १० वर्ष या दरम्यानच्या सर्व मुलींना या शाळेत येणे सक्तीचे करण्यात आले. सुरुवातीला शिक्षणाची मर्यादा मुलींसाठी इयत्ता तिसरी करण्यात आली. मुलींना सरकारी शाळेतच पाठवले पाहिजे अशी कोणतीही सक्ती केली नाही. सन १९०६ च्या कायद्याने हळूहळू सर्व राज्यात तिची अंमलबजावणी सुरु झाली. सन १९४५ मध्ये या योजने अंतर्गत बडोदे राज्यात २,६१४ शाळांमध्ये तीन लाख मुले—मुली शिक्षण घेत होती. संपूर्ण देशामध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण लागू करणारे बडोदा संस्थान हे देशातील पहिले राज्य ठरले. बडोदा राज्याप्रमाणे संपूर्ण भारतात मोफत आणि आवश्यक प्राथमिक शिक्षण ब्रिटीश सरकारने सुरु करावे, असा ठराव मार्च १९११ मध्ये नामदार गोखले यांनी मांडला होता. अर्थात बरेच प्रयत्न करुनही ब्रिटीश शिक्षणतज्ञांना ते शक्य झाले नाही.

समाजात सुधारणा करण्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षणाप्रमाणे उच्च शिक्षणाला प्राधान्य दिले. अनेकांना शिष्यवृत्ती देऊन शिक्षणासाठी परदेशात पाठवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली.[७] आणि त्यांची संस्थानात उच्च पदावर नेमणुक केली. औद्योगिक कला शिक्षणाकरीता 'कलाभूवन' ही संस्था स्थापन केली.

**शारीरिक आणि मानसिक शिक्षण :**

देशाच्या उत्कर्षासाठी ज्ञानप्रसार जितका अपरिहार्य आहे, तितकेच महत्वाचे रयतेचे आरोग्य आहे म्हणून प्राथमिक शिक्षणाइतकेच शारीरिक आणि मानसिक शिक्षणाकडे लक्ष दिले गेले होते. दक्षिण प्रांतापेक्षा गुजरातमध्ये पूर्वी शरीर संपत्तीकडे लोकांचे दुर्लक्ष होते. महाराष्ट्रीयन लोकांप्रमाणे गुजराती लोकांना व्यायामाची नैसर्गिक आवड नव्हती. यासाठी

प्रत्येक गावात व्यायामशाळा काढल्या गेल्या. शरीराच्या विकासाशिवाय मनाचा विकास माणसाच्या नैतिक सामर्थ्याला विघातक ठरतो, अशी महाराजांची धारणा होती. प्रजा सुसंस्कृत, नितीमान व आरोग्यवान व्हावी असे त्यांना वाटत असे. सर्व भविष्यकालीन घडमोडी घडवून आणण्याचे एकमेव साधन म्हणजे व्यायामशाळा होय. आरोग्य विषयक प्रश्न ज्यारितीने सोडवू शकू त्यावर आपल्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबुन आहे, असे त्यांचे ठाम मत होते.

शाळेत मुला—मुलींना क्रिडा शिक्षण सक्तीचे केले. पुरुषासाठी गावोगावी व्यायाम शाळा उघडल्या८, महिलांसाठी मोठ्या गावात व्यायाम शाळा काढल्या. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी कौशल्य शिक्षणाचे वर्ग शेतकी शाळा सुरु केल्या.

**स्त्री शिक्षणासाठी विशेष प्रयत्न :**

भारतीय समाज सुधारणा चळवळ ही तशी पाहता खरं तर स्त्री सुधारणा चळवळ आहे असेच म्हणावे लागते, कारण या समाज सुधारणा चळवळीचे मुख्य केंद्रस्थान हे हिंदुस्थानी स्त्री आणि तिचे प्रश्न हेच होते. स्त्रीयांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यात महात्मा फुले, महर्षी कर्वे, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, न्यायमुर्ती रानडे तसेच स्त्रीयांना घटनेने माणुसपणाचा अधिकार देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदिंचे योगदान मोलाचे आहे. या सर्वज समाज सुधारकांना वेळोवेळी मदत करणारे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री सुधारक म्हणून कार्यदेखील मोलाचे आहे.

युरोपीय देशांच्या प्रगतीचे मुळ हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत आहे असे महाराजांचे ठाम मत होते. म्हणुनच ते नेहमी हिंदुस्थानी शिक्षण आणि त्यातही स्त्री शिक्षणाविषयी प्रचंड आग्रही होते. त्यासाठी खास आदेश काढून मुलींसाठी शाळा सुरु केल्या. आर्थिक सहाय्य केले तसेच मुलींसाठी शिष्यवृत्तीही सुरु केली. म. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याला आर्थिक मदत केली.[९]

महाराष्ट्रातील कर्मठ लोकांकडून स्त्री शिक्षणासाठी फुले दाम्पत्याला होत असलेल्या छळाच्या पार्श्वभूमीवर बडोद्यातून महाराज सयाजीराव गायकवाड स्त्री शिक्षणासाठी देत असलेले प्रोत्साहन अनमोल होते.[१०]

महर्षी कर्वे यांना महिला विद्यापीठासाठी तसेच मुंबई विद्यापीठास ठरावीक काळासाठी दरमहा पाचशे रुपये देण्याचे त्यांचे आदेश आदि बाबी त्यांची दात्री शिक्षणाची तळमळ अधोरेखित करणाऱ्या आहेत.[११] स्त्री शिक्षण विषयी महाराजांचे विचार आणि तळमळ विलक्षण होती.

होळकर महाराजांना लिहिलेल्या पत्रातील त्यांचे स्त्री शिक्षणाविषयीचे विचार खरंच मुळातून वाचण्यासारखे आहेत. त्यात त्यांनी होळकर महाराजांच्या राणी साहेबांच्या शिक्षणाविषयी समाधान व्यक्त करताना, राणी साहेबांना शिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा आणि वेळ उपलब्ध द्यावात असेही सांगायला विसरले नाही. "It pays us to educate our ladies sensibly, women represent half the population of our country, and one cannot really do good without them".

**स्त्री शिक्षणाबद्दल त्यांनी विविध कायदे केले :**

व्हरनॅक्यूलर एज्युकेशन ॲक्ट १९१३ प्रमाणे स्त्री शिक्षणाच्या संदर्भात केलेले काही महत्वाचे कायदे खालीलप्रमाणे :—

१. विद्यार्थीनीची प्रकृती उत्तम राहण्यासाठी त्यांच्या शारीरिक शिक्षणावर शिक्षकांनी विशेष लक्ष ठेवले पाहिजे. शिक्षकांनी स्वत:च्या खास देखरेखीखाली त्यांच्याकडून योग्य तऱ्हेचा व्यायाम, खेळ आणि कसरत करुन घेण्यात यावी.

२. ज्या शिक्षकांना आरोग्य विज्ञानाचे उत्तम ज्ञान आहे त्यांनी आठवड्यातून एक तास त्यांच्या ज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांना करुन द्यावा.

३. शाळेच्या अभ्यास कामाव्यतिरिक्त मुलींना भरतकाम, शिवणकाम आणि विणकाम करावयाचे त्याला हरकत नाही. या शिक्षणाची सर्व जबाबदारी मुख्याध्यापिकेची राहील.

४. पाकशास्त्र, गरबा, पाकचिकित्सा इ. विषय शक्यतो मुख्याध्यापिकेने स्वत:च शिकवावेत आणि शाळेतील इतर शिक्षकांनाही त्या विषयाची माहिती असावी अशी व्यवस्था करावी. त्या काळात स्त्रीयांना घराबाहेर पडणेही मुश्किल असतांना समाजात मान्य होईल अशा शिक्षणाचा विचार सुरुवातीला त्यांनी केला.[१२]

शिष्यवृत्ती योजना : दहा वर्षावरील मुलींना शाळेकडे अधिकाअधिक वर्षे वळण्यासाठी प्रलोभन म्हणून शिष्यवृत्ती देण्याची योजना चालू करण्यात आली. राज्यात अनेक भागात ही योजना यशस्वी ठरली म्हणुन ती सुरु ठेवण्यात आली.

**अस्पृश्य आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय :—**

बडोदा संस्थानातील सर्वात दुर्लक्षित आणि शिक्षणापासून कोसो दूर असणाऱ्या समाजातील घटकांना मोफत शिक्षणाची सोय केली. ज्या काळात सरकारी खर्चाचे शिक्षण देण्याची हिंदुस्थानात नव्हे, तर जगात सोय नव्हती, त्या काळात महाराजांनी सोनगड भागातील अस्पृश्य आणि आदिवासीच्या मुलांसाठी सर्वप्रथम मोफत शिक्षणाची सोय केली. आदिवासींच्या शिक्षणासाठी 'काळीचरज' व 'वाघेर' या अत्यंत मागासलेल्या जंगली, डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या जातीनांही शिक्षण देण्याची योजना अंमलात आणली. बडोदा संस्थानातील सोनगढ, प्यारा, महुवा, वानकळ, तिळकवाडा व अनावळ अशा सहा ठिकाणी वसतीगृह व शाळा स्थापन केल्या.१३ ज्या विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची परिस्थिती नाही त्या विद्यार्थ्यांना महाराजांनी वसतीगृह व शिष्यवृत्तीची सोय केली. याचाच लाभ महर्षी कर्वे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मिळाला.

शिक्षण हे ठरावीक वर्गापूरते मर्यादीत न राहता समाजातील सर्व जाती—धर्माच्या लोकांना मिळाले पाहिजे या उद्देशाने मुस्लिम धर्मात पडदा पध्दत असल्यामुळे त्यांच्या धर्माप्रमाणे शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शाळेची स्थापना केली. मुस्लिमांच्या शिक्षणासाठी निरनिराळ्या ठिकाणी ८३ सरकारी १३ खाजगी उर्दु शाळा काढल्या.१४ एकंदर १०,९०० मुले शिक्षण घेवू लागले. जातीपातीचे बंधने न जोडता सर्वांनी शिक्षण घेवून शहाणे झाले

पाहिजे हे महाराज सयाजीराव यांचे ध्येय होते.

**परदेशी शिक्षणाची सोय :**

नाशिक, पुणे, सातारा, जळगाव, धुळे व कोल्हापुर येथील बहुजन समाजाच्या शैक्षणिक संस्थाना महाराजांनी मोठी मदत केली. तसेच इंग्लंड, अमेरिका व फ्रान्समधील अनेक शैक्षणिक संस्थाना देणग्या देवून मदत केली. प्रत्येक वर्षी पाच विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी परदेशात पाठविण्यासाठी त्यांनी निधी उपलब्ध करुन दिला. परदेशातील तंत्रज्ञानाचा फायदा आपल्या देशाला होण्यासाठी विविध क्षेत्रातील ज्ञान मिळविण्यासाठी, शास्त्राच्या अध्ययनासाठी अनेक विद्यार्थी परदेशात शिक्षणाला पाठविण्यासाठी त्यांनी आघाडी घेतली. शिक्षण घेऊन परत आल्यावर त्यांना अधिकाराच्या जागा दिल्या. बनारस विद्यापीठाला दोन लाखाची देगणी आर्थिक मदत म्हणून दिली.[१५]

**हिंदीचे शिक्षण सक्तीचे केले :—**

ज्ञान जर सर्वांना प्राप्त करुन घ्यायचे असेल तर ते देशी भाषेत असले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. आपल्या देशातील लोकांमध्ये एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यासाठी एक भाषा एक लिपी सर्वांसाठी असावी असे महाराजांना वाटत असे म्हणूनच बडोदा राज्यात हिंदीचे शिक्षण सक्तीचे केले.[१६]

**फिरत्या वाचनालयांची योजना :—**

महाराज हे स्वत: विद्येचे भोक्ते होते. अनेक विषयांचा अभ्यास त्यांनी वृध्दापकाळातही केला. वनस्पती शास्त्र, टिकाशास्त्र, फ्रेंच भाषा, तत्वज्ञान अशा विषयांचा अभ्यास त्यांनी आयुष्याच्या शेवटी केला, ज्ञानप्राप्तीची त्यांना खऱ्या अर्थाने अभिरुची होती. त्यामुळेच ते शेवटपर्यंत विद्यार्थी राहिले. लोकशिक्षण व ज्ञानप्रसारांसाठी त्यांनी फिरत्या वाचनालयांची योजना राबवली.[१७] त्यांनी संस्थानात गावोगावी वाचनालये स्थापन केली. त्यांनी या काळामध्ये इंग्लंड अमेरिकेसारख्या देशांना भेट दिली. तेथिल शिक्षण पध्दती आणि ग्रंथालय यांनी ते प्रभावित झाले. अशाच प्रकारची शिक्षण व्यवस्था आणि ग्रंथालये आपल्या देशातही निर्माण झाली पाहिजेत या दृष्टीने विशेष प्रयत्न करुन त्यासाठी त्यांनी ग्रंथालय तज्ञ बॉर्डन यांना भारतामध्ये आमंत्रित केले. ते दहा वर्ष बडोदा संस्थानांमध्ये ग्रंथालय प्रमुख म्हणून कार्यरत होते. संस्थानांमध्ये फिरती ग्रंथालये, ग्राम ग्रंथालये सुरु झाली. सयाजी वैभव या नावाने यशस्वी झालेल्या या योजनेत महाराजांचा व बडोद्याचा लौकिक वाढवला. जागतिक पातळीवर ही अभिनव योजना अद्वितीय ठरली. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी स्वत: ग्रंथालयषास्त्राचे षिक्षण घेतले होते. खऱ्या अर्थाने ते भारतीय ग्रंथालयषास्त्राचे जनक आहेत[१८]

सयाजीराव गायकवाड हे एक आश्चर्यकारक मिश्रण होते. भारताच्या वैचारीक बांधणी सामाजिक शैक्षणिक बांधणीत त्यांनी सर्वाधाने काम केले. आजही ते मार्गदर्शक आहे.

राष्ट्रातील प्रत्येक घटकाची सुधारणा केल्याने सर्व राष्ट्राची सुधारणा होते. या दृष्टीने प्रत्येक घटकात सुधारणा घडवून आणणारा हा राष्ट्रपुरुष भारतनिर्मात्या राष्ट्र पुरुषात श्रेष्ठ दर्जाचा मानला जाईल यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. डॉ. विश्वनाथ पांडूरंग दांडेकर, सयाजीराव गायकवाड, ठोकळ प्रकाशन, पुणे १९८५ पृ. २१
२. कित्ता पृ. २४
३. भालचंद्र चिंतामणी लेले, सयाजी गौरवग्रंथ, वैभव प्रेस. गिरगाव मुंबई १९३३ पृ. ४८
४. कित्ता
५. प्राचार्य रा. ज्ञा. गायकवाड, महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. १९७८ पृ. ५८
६. अ. ज. करंदीकर, क्रांतीकारक टिळक नि त्यांचा काळ, काळ प्रकाशन १९६९, पृ. ९२
७. कित्ता, पृ. ९८
८. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, सयाजी प्रकाशन, नाशिक २००८ पृ. ३४
९. दा. ना. आपटे, श्री महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र, खंड ३ मुंबई १९३६ पृ. १०२
१०. स्त्रियांचे उध्दारक महाराज सयाजीराव गायकवाड, डॉ. सुनिता खडसे, सामना वृत्तपत्र १० मार्च २०१९
११. कित्ता
१२. डॉ. विश्वनाथ पांडूरंग दांडेकर पृ.७४
१३. कित्ता पृ. ७८
१४. सयाजी गौरव ग्रंथ पृ. ९८
१५. कित्ता पृ. ९९
१६. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास पृ. ४९
१७. सयाजी गौरव ग्रंथ पृ. १०४
१८. कित्ता


◆◆◆

# भारतीय क्रांतीकारकांच्याकार्याचे परिक्षण

**प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर,**
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख
स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, लाखनी, जि.भंडारा—४४१८०४

**प्रस्तावना :**

सन १६०० मध्ये इंग्रज भारतात व्यापार करण्याच्या उद्‌देशाने आले. व्यापार करता करता भारताचे राजे बनले. 'व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले'. इंग्रज भारतात आले त्यावेळी दिल्लीच्या गादिवर जहॉगीर हा मोगल बादशाहा राज्य करीत होता. त्याच्याकडून व्यापारी सवलती मिळवून भारतभर व्यापार करू लागले. कालांतराने व्यापाराच्या कारणावरून इंग्रज व बंगालचा शासक सिरोजउद्‌दोला यांच्यात सन १७५७ ला प्लासीची लढाई झाली. या लढाईत इंग्रजांना विजय मिळाला व त्यांची हिंमत वाढली. त्यानंतर त्यांनी १७६४ ला बॅक्सारचे युध्द केले तेही त्यांनी जिंकले. अशाप्रकारे १७५७ च्या प्लॅसीच्या लढाईनी इंग्रजानी आपले पाय भारतात रोवले व बॅक्सारच्या लढाईनी ते मजबूत केले. हळूहळू संपूर्ण भारत गिळकृत करून भारतीय जनतेवर अन्याय करू लागले म्हणून सर्व भारतीय एकत्र येवून इंग्रजांच्या विरोधात उभे राहीले. इंग्रजांनी भारत सोडून जावे असे सर्व भारतीयांना वाटत होते आणि त्यासाठी सर्व भारतीय कार्य करीत होते. परंतू कार्य करण्याची प्रणाली ही वेगवेगळी होती. त्यामुळे इंग्रजांना भारतातून हाकलून लावण्यासाठी तीन विचार प्रवाहाचे लोक आपल्याला दिसून येतात, ते म्हणजे (१) मवाळवादी (२) जहालवादी आणि (३) क्रांतीकारी सर्वांचा उद्‌देश एकच होता. फक्त कार्य करण्याची पध्दत वेगळी होती. इंग्रज हे दडपशाही धारेणाचा अवलंब करून भारतीय मवाळवादी जहालवादी विचारांना दाबून टाकत. त्यामुळे भारतात क्रांतीकारी विचाराचा एक तरूण नवीन वर्ग उदयाला आला आणि तो म्हणजे क्रांतीकारी वर्ग होय.

**काकोरी कांड (इ.स. ९ ऑगष्ट १९२५) :—**

लखनौ जवळील काकोरी या गावाजवळ सरकारी खजीना घेऊन जाणारी रेल्वे गाडी ९ ऑगष्ट १९२५ रोजी रात्रीच्या वेळी क्रांतीकारकांनी लुटली याद्‌वारे क्रांतीकारकांना भरपूर पैसा प्राप्त झाला परंतू यातील जवळपास ४० क्रांतीकारक इंग्रजाच्या हाती लागले नंतर त्यांच्यावर खटला भरण्यात येवून काहींना जन्मठेप तर काहींना फाशीच्या शिक्षा देण्यात आल्या.

**सायमन कमिशन आणि लाला लजपतराय यांचा मृत्यु — नोव्हे. १९२८ :—**

भारतातील क्रांतीकारी आंदोलण आणि स्वराज्य पक्षाच्या कार्यामुळे, ब्रिटीश सरकार अतीशय अडचणीत आले होते. याशिवाय बहुसंख्ये भारतीय जनतेमध्ये ब्रिटीश विरोधी प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली होती. यामुळे, भारतीयांचा असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने आणि भारतात काही सुधारणा करण्याच्या उद्‌देशाने ब्रिटीश सरकारणे इ.स. १९२७ मध्ये सायमन कमिशनची नियुक्ती केली परंतू या कमीशनमध्ये सर्व सदस्य इंग्रजच होते.

त्यामध्ये एकाही भारतीयाचा समावेश केला नव्हता.

त्यामुळे भारतात काही सुधारणा करण्याच्या दृष्टीने सायमण कमिशन भारतात आलेत परंतू त्यात एकही भारतीय नसल्याणे भारतीयांना हा अपमान वाटला आणि या कमिशन पासून आपल्याला काहीच फायदा मिळणार नाही याची जाणीव भारतीयांना झाली त्यामुळे या सायमण कमिशनला विरोध करण्याचे भारतातील प्रमुख नेत्यांनी ठरविले. त्यामुळेच जेथे–जेथे हे कमिशन गेलेत तेथे या कमिशनच्या विरोधी अतीशय उग्र स्वरूपाची निदर्शेने करण्यात आली.

पंजाबमध्ये सुध्दा सामयण कमिशनचा विरोधी सन १९२८ मध्ये एक मोर्चा निघाला असतांना त्या मोर्चाचे नेतृत्व लाला लजपतराय करीत होते. परंतू या मोर्चावर इंग्रजानी लाठीमार केल्यामुळे त्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्या प्रसंगी जमलेल्या जनसमुदायासमोर शेवटचे भाषण देतांना लाला लजपतराय म्हणतात, ''माझ्या छातीवर बसलेले हे लाठीचे प्रहार म्हणजे इंग्रजी राज्याच्या दफणपेटीवर ठोकले जाणारे शेवटचे खिळ ठरेल.'' त्यानंतर नोव्हें. १९२८ मध्ये लालाजीचा मृत्यु झाला.

लालाजीच्या मृत्युमूळे बहूतेक सर्व भारतात अतिशय तीव्र रोषाची आणि उग्र स्वरूपाची भावना भारतीय जनमाणसात निर्माण झाली. क्रांतीकारकांनी तर लालाजीच्या वधाचा बदला घेण्याची प्रतीज्ञासुध्दा घेतली त्यामध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तीन प्रमुख क्रांतीकारक यामध्ये अग्रेसर होते. त्यानंतर या क्रांतीकारकांनी ''सोसॉलीस्ट रिपब्लीक आर्मी'' नावाची एक गुप्त क्रांतीकारी संघटना स्थापन केली आणि त्या माध्यमातून इंग्रज अधिकाऱ्याचे हत्याकांड करण्यास सुरूवात केली.

एप्रिल १९२९ रोजी भगतसिंगाने दिल्ली येथील केंद्रीय असेब्लीवर एक बॉब फेकला त्यामुळे संपूर्ण दिल्लीभर भितीयुक्त वातावरण निर्माण झाले परंतू नंतर भगतसिंगने स्वत:ला अटक करवून घेतली आणि त्यानंतर भगत सिंगला कोर्टात उभे करण्यात आले त्यावेळी भगतसिंगाने भारतीय क्रांतीकारांची या चळवळी उभारण्यामागे काय भुमीका आहे हे स्पष्ट केले. भगतसिंग म्हणतात, ''क्रांती म्हणजे रक्तपात नव्हे आणि व्यक्तीगत बदल्याची भावना सुध्दा नव्हे, क्रांती म्हणजे बॉब आणि पिस्तुलाचा धर्म नव्हे, तर आमच्या मते क्रांती म्हणजे वर्तमान वस्तुस्थिती आणि समाजव्यवस्था जी अन्यायावर आधारित आहे ती बदलली पाहीजे आणि अशा उच्च आदर्शासाठी आम्ही क्रांतीकारी चळवळी उभारूण स्वातंष्यासाठी स्वत:च बलीदान देत आहोत.

त्यानंतर इ.स. १९३१ मध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन्ही भारतीय क्रांतीकारकांना फाशी देण्यात आली. याच दरम्यान गांधी इर्विन करार घडून आला. परंतू गांधीजींनी या क्रांतीकारकांच्या सुटकेसाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे पुन्हः भारतातील वातावरण अतीशय तंग बनले होते.

**चंद्रशेखर आझाद (१९३१) :—**

भगतसिंगच्याच गटातील चंद्रशेखर आझाद हे एक प्रमुख नेता होते. इ.स. १९३१ मध्ये चंद्रशेखर आझाद यशपाल आणि सुरेंद्र पांडे हे तीघेही अदला बदल पोहचले आणि रशियाच्या मदतीने भारताच्या स्वांतष्यासाठी सशस्त्र कारवाई करावी असे चंद्रशेखराचे मत

होते याच दरम्यान अलाहाबाद मधील आल्फ्रेड पार्क मध्ये चंद्रशेखर आझाद आणि त्यांचे इतर साथीदार यांच्यात क्रांती विषयीची अतीशय गंभीर चर्चा सुरू असतांना अचानक त्या पार्कमध्ये इंग्रज पोलीस दाखल झालेत.

त्यानंतर इंग्रज पोलीसांनी गोळीबार करण्यास सुरूवात केली चंद्रशेखर आझादने सुध्दा इंग्रज पोलीसांना प्रतीकार केला परंतू शेवटी टिकाव न लागल्यामुळे चंद्रशेखरानी शेवटची गोळी स्वत:वर झाडली आणि त्यामध्ये त्यांचा अंत घडून आला.

**आझादहिंद फौज आणि सुभाषचंद्र बोस :—**

भारतातील क्रांतीकारी चळवळीचा नंतरचा काळ सुभाषचंद्र बोस आणि त्याच्या आझाद हिंद सेनेपासून सुरू होतो. सुभाषचंद्र बोस हे बंगालमधील जहाल विचारसरणीचे एक थोर क्रांतीकारक होते. इ.स. १९२० मध्ये त्यांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला यावेळी कॉंग्रेसवर गांधीजीचे वर्चस्व होते परंतू गांधीजींची विचारसरणी सुभाषचंद्र बोसाना पसंत नव्हती त्यामुळे त्यांनी सुरूवातीपासूनच भारताच्या स्वातंष्यासाठी इतर काही तरूण वर्गामध्ये आपल्या विचारांचा प्रसार करण्यास सुरूवात केली.

वास्तविक पाहता इ.स. १९३८ मध्ये सुभाषचंद्र बोस कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. परंतू गांधीजीसी न पटल्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. याचवेळी जगात दुसरे महायुध्द सुरू होते. आणि इंग्लंडने त्यात उडी घेतली होती. त्यामुळे इंग्लंडच्या अडचणीचा फायदा घेवुन प्रखर आंदोलण उभारावावे असे बोसांना वाटत होते. परंतू त्यांना भारतातून विशेष सहकार्य न मिळाल्यामुळे परकीय देशांच्या मदतीने आपण ब्रिटीश सरकारला प्रतीकार करावा असे त्यांना वाटले त्यामुळेच सुभाषचंद्र बोस जाने. १९४१ मध्ये जर्मनीला पोहचले आणि हिटलरची भेट घेतली. मुळातच हिटलर इंग्लंडचा शत्रु असल्याणे त्यांनी सुभाषचंद्र बोसांना मदतीचे आश्वासन दिले त्यानंतर बोसांनी दुसऱ्या महायुध्द काळातील इटली आणि जर्मनीच्या ताब्यातील भारतीय सैनिकांची एक मुक्तीसेना तयार केली.

याचदरम्यान जपानमध्ये स्थाईक झालेले भारतीय क्रांतीकारक रासबिहारी बोसांचे सुभाषचंद्र बोसांना जपानला येण्याचे निमंत्रण मिळाले. त्यानंतर सुभाषचंद्र बोस जपानला आले त्यापूर्वीच रासबिहारी बोसानी आझाद हिंद सेनेची पार्श्वभुमी तयार करूण ठेवली होती. नंतर सुभाषचंद्र बोसानी त्या लष्करी दलाची नव्याने पूर्नरचना करूण लढण्यासाठी सज्ज अशा आझाद हिंद सेनेची स्थापना केली. त्यानंतर सुभाषचंद्र बोसानी जपानच्या मददतीने प्रत्यक्ष भारतावर आक्रमण करण्यापूर्वी आझाद हिंद सैनिकामध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी एक प्रेरणादायक भाषण दिले त्यावेळी — सुभाषचंद्र बोस म्हणतात, ''आमची मायभुमी स्वातंष्यासाठी भुकी आहे, तुम्ही मला रक्त दया, मी तुम्हाला स्वातंष्य देतो.'' आणि हिच आमच्या मायभूमीची इच्छा आहे.

त्यानंतर इ.स. १९४४ मध्ये सुभाषचंद्र बोसानी जपानच्या मददतीने भारताच्या पुर्वेकडील इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशावर आक्रमण करण्यास सुरवात केली. काही प्रदेश सुध्दा आझाद हिंद सेनेने जिंकला. आझाद हिंद सेनेची भारताच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू असतांनाच इ.स. १९४१ मध्ये जपान आणि जर्मनीने शरणागती पत्करली त्यामुळे जपानी अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करण्याच्या निमित्याने सुभाषचंद्र बोस परत टोकीयोला जात

असतांना ऑगस्ट १९४५ मध्ये त्यांचा विमान अपघातात मृत्यु झाला. त्यानंतर आझाद हिंद सेनेला अपयश प्राप्त होऊण ब्रिटीश सकरारणे त्या सर्वांना पडकून त्यांच्यावर कठोर कारवाई केली. आझाद हिंद सेनेवर होणाऱ्या कठोर कारवाईमुळे भारतीय जनतेत प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली. आणि त्याचीच परिणीती म्हणजे नाविक आणि वायुसेनेतील विद्रोह होय.

**नाविक आणि वायुसेनेतील विद्रोह (१९४६) :—**

पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात इंग्रजांनी भारतीय सैनिकांना आपल्या हितासाठी आणि साम्राज्य रक्षणासाठी वापरले हाते. परंतू भारतीय सैनिकांना काही हक्क किंवा स्वातंष्य देण्याची इंग्रजांची तयारी नव्हती याच दरम्यान ब्रिटीश सरकारणे आझाद हिंद सैनिकावर कठोर कारवाई करण्यास सुरूवात केली. यामुळे भारतातील नाविक आणि वायुसेनेतील सैनिकामध्ये इंग्रजाविषयी प्रचंड असंतोष निर्माण झाला त्यामुळेच त्यांनी इ.स. १९४६ मध्ये ब्रिटीश सरकारच्या विरोधात विद्रोह करण्यास सुरूवात केली.

इंग्रजानी भारतीय सैनिकांचा विद्रोह मोडून काढला परंतू त्यांच्या लक्षात एक गोष्ट आली की, भारतातील सर्वसामान्य जनतेप्रमाणेच ज्यांच्या भरोषावर आपण राज्य करतोय त्या भारतीय सैनिकामध्ये सुध्दा स्वातंष्याची ज्वाला भडकली आहे. त्यामुळे आपल्याला जास्त काळ भारताला गुलामीत ठेवता येणार नाही. अशी तीव्र जाणीव इंग्रजांना झाली आणि त्यामुळेच तत्कालीन ब्रिटनचा प्रधानमंत्री ॲटली ने भारत स्वातंष्याची घोषणा केली.

**क्रांतीकारी आंदोलनाच्या अपयशाची कारणे :—**

भारताच्या स्वातंष्यासाठी उभारल्या गेलेल्या क्रांतीकारी चळवळींना अपयश प्राप्त झाले किंवा त्यांचा भारतात स्थाई प्रभाव पडू शकला नाही. भारतातील क्रांतीकारी आंदोलणाच्या अपयशाला जी प्रमुख कारणे वा परिस्थिती कारणीभूत ठरली त्याचा आढावा येणेप्रमाणे—

**१) केंद्रीय संघटनेचा अभाव :—**

भारतीय क्रांतीकारी आंदोलणामध्ये संपूर्ण भारत व्यापेल अशी एखादी केंद्रीय संघटना या आंदोलनामध्ये नव्हती. वेगवेगळया प्रांतातील क्रांतीकारक गुप्त संघटना स्थापन करूण ब्रिटीश सरकारला एकाच वेळी प्रतीकार न करता वेगवेगळया वेळी प्रतीकार करीत असत. त्यामुळे क्रांतीकारी चळवळीमधील शक्ती प्रतीकार यामुळे विभागला जात असे. त्यामुळे क्रांतीकारी चळवळींवर नियंत्रण ठेवणे ब्रिटीशांना शक्य झाले.

समजा क्रांतीकारकांनी एकखादी केंद्रीय संघटना स्थापन करूण या संघटनेच्या माध्यमातून एकाच वेळी ब्रिटीश सरकारला प्रतीकार केला असता तर, परीणाम वेगळा झाला असता, परंतू दुर्देवाने क्रांतीकारकांनी याकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांना अपयश प्राप्त झाले.

**२) सर्वसामान्य जनतेचा पाठींबा नाही :—**

क्रातीकारी आंदोलण उभारण्यामागे क्रांतीकारकांचे उद्दीष्ट अतिशय चांगले असले तरी हे आंदोलण हिंसेच्या आधारावर चालणारे असल्यामुळे भारतातील सर्वसामान्य जनतेमध्ये हे आंदोलण लोकप्रीय होऊ शकले नाही. फक्त काही सुशिक्षीत मध्यम वर्गानीच या क्रांतीकारी चळवळीचे नेतृत्व केलेत. परंतू सर्वसामान्य जनतेच्या पाठींब्याशिवाय कोणतेही आंदोलण यशस्वी ठरू शकत नाही. त्यामुळेच भारतीय क्रांतीकारकांना भारतातील सर्वसामानय

जनतेचा पाठींबा न मिळाल्यामुळे त्यांना अपयश येणे स्वाभावीक होते.

**३) भारतातील प्रमुख नेत्याचे सहकार्य नाही :—**

भारतीय क्रांतीकारी चळवळींना तत्कालीन भारतातील प्रमुख नेत्यांनी सहकार्य केले नाही किंवा क्रांतीकारी आंदोलणामध्ये सहभागी सुध्दा झाले नाही. भारतीय क्रांतीकारकांना या नेत्यांनी सहकार्य तर सोडाच साधी सहानुभूती सुध्दा दाखविली नाही. उलट सुरेंद्रनाथ बॅनर्जी सारखे नेते या क्रांतीकारकांच्या विरोधी कठोर कारवाई करावी अशा प्रकारचे प्रतीपादन ब्रिटीश सरकारला करीत होते. त्यामुळेच क्रांतीकारकांना अपयश प्राप्त झाले.

भारतातील या प्रमुख राजकीय नेत्यांनी क्रांतीकारी चळवळींना सहकार्य केले असते तर कदाचित परिणाम वेगळा झाला असता.

**४) ब्रिटीश सरकारची दडपशाही :—**

क्रांतीकारी आंदोलनाच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणजे ब्रिटीश सरकारची कठोर दडपशाही निती हे होय. भारतातील बऱ्याच क्रांतीकारकांना ब्रिटीश सरकारणे पकडून काहींना फाशी तर काहींना जन्मठेप तर काहींना हद्दपार अशाप्रकारच्या कठोर शिक्षा देवून क्रांतीकारी आंदोलण दडपण्याचा प्रयत्न केला. याशिवाय वर्तमानपत्रावर बंदी सभा मोर्चे यावरसुध्दा ब्रिटीश सरकारणे बंदी आणली. ब्रिटीशसरकारच्या कठोर दडपशाही धोरणामुळे नंतरच्या काळात क्रांतीकारकांना इतर भारतीय तरूणाचे सहकार्य मिळाले नाही. एवढेच नव्हे तर ते या चळवळीत सहभागी झाले होते तेही ब्रिटीश सरकारच्या दडपशाही नितीमूळे चळवळीपासून दूर जावू लागेल त्यामुळेच क्रांतीकारकांना अपयश प्राप्त झाले.

**५) शस्त्राचा अभाव :—**

भारतीय क्रांतीकारकांमध्ये शिस्तबध्द्ता, उत्साहीपणा आणि बलीदानाची प्रवृत्ती असली तरी हे आंदोलण शस्त्रावर फारमोठया प्रमाणात आधारीत होते परंतू क्रांतीकारकाजवळ गुप्तरूपात जी भारी शस्त्रे होती ती अतिशय कमी होती. बलाढय अशा ब्रिटीश सत्तेला टक्कर देण्यासाठी क्रांतीकारकाजवळ असलेली शस्त्रे फारच कमी असल्यामुळे क्रांतीकारी आंदोलणाला अपयश प्राप्त झाले. ब्रिटीशांची बरोबरी करण्याईतपत शस्त्राचा साठा जर क्रांतीकारकाजवळ राहला असता तर कदाचीत परिणाम वेगळा झाला असता.

**६) म.गांधीचा भारतीय राजकारणात प्रवेश :—**

इ.स. १९२० च्या दरम्यान भारतीय राजकारणात म.गांधीजीच्या उदयामुळे भारतातील क्रांतीकारी आंदोलणाला पायबंद बसला असे म्हटले जाते. गांधीजीचा क्रांतीकारी चळवळीना अतीशय विरोध होता. त्यामुळेच भारतीय राजकारणात प्रवेश केल्यानंतर भारताच्या स्वातंष्यासाठी गांधीनी अहिंसा तत्वाचा अवलंब केला आणि त्याच माध्यमातून अनेक चळवळी उभारण्यास सुरूवात केली. मुळातच क्रांतीकारी चळवळी पेक्षा गांधीजीच्या अहिंसावादी चळवळी विशेष धोकादायक नसल्यामुळे बहूसंख्य भारतीय जनतेनी गांधीजीना पाठींबा व्यक्त केला. त्यामुळेच क्रांतीकारकांना अपयश प्राप्त झाले इ. प्रमुख क्रांतीकारी चळवळीचा अपयशाला कारणीभूत ठरलीत.

**परिक्षण :—**

आधुनिक भारताच्या आणि भारतीय स्वातंष्याच्या इतीहासात क्रांतीकारी चळवळीना

अतिशय महत्वाचे स्थान आहे. क्रांतीकारकांच्या कार्यावरून आपल्याला योगदानाची कल्पना येवू शकते. तत्कालीन राष्ट्रवाद भारतीय असंतोष आर्थिक आणि नैसर्गिक संकट आणि राजकीय दहशत इ. परिस्थितीमुळे भारताच्या स्वातंष्यलढयात क्रांतीकारी चळवळीचा उदय झाला.

परंतू भारतीय क्रांतीकारकांना इंग्रजानी खुणी, डाकू, अतिरेखी अशा प्रकारच्या सज्ञा लावू भारतीय क्रांतीकारकाच्या कार्याचा इंग्रजांनी निषेध केला आहे. ब्रिटीशांच्या टिकामध्ये काही अशी सत्यता असली तरी ते पूर्णरूपाने खरे वाटत नाही कारण की ब्रिटीशांनी भारतात आपली सत्ता टिकविण्यासाठी प्रसंगी हिंसेच्या मार्गाचा सुध्दा अवलंब केला आहे. अगदी त्याच आधारावर सनदशिर मार्गाने भारताला स्वातंत्र मिळणे अतीशय कठीण आहे. याची जाणीव काही भारतीय तज्ञाना झाल्यामुळे त्यांनी हातामध्ये शस्त्र घेण्याचे ठरविले आणि त्यातूनच भारताच्या स्वातंष्यासाठी क्रांतीकारी आंदोलणाला सुरूवात केली. ब्रिटीशाच्या विरोधी कोणी आपल्या हक्काविषयी जर त्यांनाच झुंज दिली तर ते इंग्रजांना आवडत नव्हते तरी, क्रांतीकारकांनी सुध्दा ब्रिटीशांना हिंसेच्या मार्गाच्या आधारावर प्रतीकार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच ब्रिटीशांनी आपल्या मर्जीनूसार भारतीय क्रांतीकारकांना वेगवेगळया संज्ञा दिल्या आहे.

इंग्रजांनी भारतीय क्रांतीकारकांच्या कार्याचा निषेध केला असला तरी, त्यामध्ये विशेष असे काही वाटत नाही. कारण की इंग्रज हे परकीय होते परंतू भारतातील काही मवाळ पुढाऱ्यांनी भारतीय क्रांतीकारकांच्या कार्याचा निषेध केला आहे. एवढेच नव्हे तर भारतीय क्रांतीकारकांची कार्य व्यवहारीक नसून अनैतीक होते असे म्हटले आहे. वास्तवीक पाहता भारताच्या स्वातंष्यासाठी क्रांतीकारकांनी जी भुमीका बजावली त्यावरून क्रांतीकारकांच्या कार्याविषयी कोणालाही शंखा व्यक्त करण्याचा अधिकार नाही. जहाल गटाला सुध्दा भारतीय क्रांतीकारकांचा मार्ग पसंत नव्हता. परंतू त्यांनी क्रांतीकारकांच्या कार्याचा निषेध केला नाही. आपण जर आपली थोडी नजर जगाच्या इतीहासाकडे फेकली तर, बलशाली जुलमी सत्तेच्या पायाखाली भरडल्या जाणाऱ्या राष्ट्रात क्रांतीकारी चळवळीचा उदय झाल्याची बरीच उदा. आपल्याला दिसतील. आपल्या हक्कासाठी किंवा स्वातंष्यासाठी ज्यावेळी सनदशील विधायक मार्ग कुचकामी, निकामी ठरतात. त्यावेळी हिंसेच्या मार्गाचा अवलंब करावाच लागतो. फ्रान्स, इटली, रशिया इ. देशामध्ये अशा क्रांतीकारी चळवळीचा उदय होऊन त्या देशातील विचारवंतानी, नेत्यांनी, क्रांतीकारी चळवळीचे स्वागत करून समर्थन सुध्दा दिले परंतू भारतात भारतीय क्रांतीकारकांना समर्थन तर दूरच साधी सहानुभूतीसुध्दा भारतीय नेत्यांनी दाखविली नाही. ही भारतीय इतिहासाची फार मोठी शोकांतिका समजली जाते.

राष्ट्रकार्यासाठी स्वतःच्या घरादाराचा व सुखी संसाराचा त्याग करूण स्वातंष्यलढयात उडी घेतली आणि देशाच्या स्वातंष्यासाठी त्यांनी स्वतःचे बलीदान सुध्दा केले यामध्ये किती राष्ट्रभक्ती सामावलेली होती याची आपण कल्पना करू शकत नाही. आश्चर्याची गोष्ट अशी की, लंडन येथे कर्झन वायलीला गोळया मारल्या, बद्दल काही भारतीय नेते मदनलाल धिंग्राला दोष देत होते तर काही इंग्रज उलट मदनलाल धिंग्रची प्रशंसा करीत होते.

एकंदरीत क्रांतीकारकाच्या कार्याचे जर आपण बारभाईने परिक्षण केले तर त्यांच्या कार्याचे महत्व आपल्याला समजू शकते. एका ब्रिटीश अधिकाऱ्याने असा हिंसक मार्ग हा पत्करला असे बारिद्र घोषांना विचारले असता त्यांनी दिलेल्या उत्तरावरून क्रांतीकारकांच्या योगदानाची कल्पना येते.

बारिद्र घोष म्हणतात, ''खुण, दरोडे आणि लुटमार यामुळे स्वातंष्य मिळेल असे आम्हाला मूळीच वाटत नाही. परंतू मातृभुमीच्या रक्षणासाठी स्वत:चे बलीदान देवून तशाप्रकारचा एक आदर्श आम्हाला जनतेपुढे निर्माण करावयाचा आहे. तसेच भारतीय जनतेचा रोष परकीय सत्तेच्या लक्षात आणून त्या सत्तेचे लक्ष भारतीयांच्या स्वातंष्याकडे वेधने'' हाच आमचा प्रमुख उद्देश या चळवळी उभारण्यामागे होता.

वास्तविक पाहता बलशाली जुलमी सत्तेसी जशास तसे वागलयाशिवाय ती सत्ता नमत नाही असे म्हटले जाते. ॲनी बेझंटने भारतीय क्रांतीकारकांना ''वाट चुकलेले तरूण'' असे म्हटले आहे. एकंदरीत भारतीय क्रांतीकारकांना काही परिस्थीतीमुळे अपयश प्राप्त झाले असते तरी, स्वातंष्य आंदोलणातील त्यांचे महत्व नाकारता येत नाही. क्रांतीकारी चळवळी मुळेच काही प्रमाणात का होईना, भारतीय जनतेत उत्साह आणि राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. दुसऱ्या महायुध्द काळातील क्रांतीकारकाची भूमीका लक्षात घेता क्रांतीकारकांमूळेच शेवटी देशाला लवकर स्वातंष्य मिळाले. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. क्रांतीकारकांच्या कार्याबाबद बोलतांना डॉ.मुजूमदार म्हणतात, ''सशस्त्र उठाव हे क्रांतीकारकांचे साहस नसून ते केवळ एक साधन होते आणि तेही नाईलाजाने पत्करले होते. स्वातंष्य लढयातील भारतीय क्रांतीकारकांचे योगदान निश्चितच मौलीक स्वरूपाचे होते.'' असे म्हटले आहे.

**संदर्भ सूची :—**

१) डॉ. आठल्ये वि.भा. — 'आधूनिक भारताचा इतिहास' सन १७६१ ते १९७१, संजय ठाकरे प्रकाशन, प्रथम आवृत्ती २००९.
२) डॉ.कोलारकर; श.गो. — 'आधुनिक भारत' (१७६ ते १९५०), श्री मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती २००४
३) आचार्य धनंजय — 'भारताचा इतिहास' सन १७६१— १९७१, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती २००९.
४) डॉ.वैद्य सुमन आणि कोठेकर शांता — 'आधूनिक भारताचा इतिहास'सन१९२०—१९४७, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर,चौदावी आवृत्ती जाने. २०१७

◆◆◆

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन

**प्रा.डॉ.निलीमा राऊत**
डॉ. पंजाबराव देशमुख कला व
वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

भारतातील अनेक संतांनी व विचारवंतानी भारतीय स्त्री विषयक विचार मांडलेले असले तरी राष्ट्रसंताच्या भारतीय स्त्री विषयक विचारातील सुक्ष्मता, विस्तृतता व पुरोगामीत्व त्यात आढळत नाही. भारतीय स्त्रीकडे पाहण्याचा महाराजांचा दृष्टीकोन अत्यंत प्रामाणिक, शास्त्रशुध्द व पुरोगामी स्वरुपाचा आहे. त्यांनी भारतीय समाजात स्त्रीचे स्थान कसे होते, कसे आहे व कसे असावे हयाचे अत्यंत समर्पक व सविस्तर विवेचन ग्रामगीतेतून केले व त्यातून भारतीय स्त्रीच्या आदर्श व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविले आहे. आजपर्यंत होवून गेलेल्या कोणत्याही संताने सक्रीय रुपाने न केलेले महिलोन्नतीचे कार्य त्यांनी केले.

तुकडोजी महाराजांनी स्वातंष्यपूर्व व स्वातंष्योत्तर कालखंड अनुभवला. स्वातंष्यपूर्व कालखंडातील भारतीय संस्कृतीचे स्त्री जीवनात उमटलेले पडसादही त्यांनी जवळून पाहिले. आणि स्वातंष्योत्तर काळातील भारतीय संस्कृतीतून हळूहळू दूर जाणारी स्त्री ही त्यांनी न्याहाळली. आणि हयातून स्त्रीच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्यांतून समन्वयातून एक आदर्श भारतीय स्त्री ग्रामगीतेतून सादर केली.[१]

कोणताही देश वा राष्ट्र स्त्री जातीला मागे ठेवून स्वतः पुढे जावू शकत नाही. ज्या देशात स्त्रीच्या शक्तीकडे दुर्लक्ष केले जाते त्या देशाची अर्धीशक्ती वाया जाते. जो देश स्त्रियांची उपेक्षा करतो त्या देशाच्या सामाजिक जीवनाचे अध:पतन अटळ असते. हे इतिहासाने सिध्द केले आहे. म्हणूनच भारतीय स्त्रीला पारतंष्याच्या बंधनातून मुक्त करण्याचा विचार तुकडोजीने मांडलेले आहे.

**स्त्री समाजाचे भुषण —** महाराजांचे सामाजिक अवलोकन अतिशय सुक्ष्म होते. त्यांच्या सामाजिक सुक्ष्मावलोकनात त्यांना पुरुषांपेक्षा स्त्रीयांमध्येच अधिक चातुर्य लक्षणे आढळलीत. यासंबंधी सांगतांना ते म्हणतात —

निरीक्षोनी जी जी घरे पाहिली। तेथे सरसता अनुभवा आली।
चातुर्य लक्षणे अधिक दिसलीमहिलामाजी ।।

असे असुनही काही अडाणी लोक स्त्रीला पुरुषांच्या तुलनेत हीन लेखतात. अर्थात हा स्त्रीजातीवर होणारा फार मोठा अन्याय व अत्याचार आहे.[२]

स्त्री ज्याप्रमाणे आपल्या कुटूंबाचा उद्धार करते त्याचप्रमाणे ती आपल्या राष्ट्राचे सुखस्वप्न साकार करण्यास समर्थ असते. स्त्री शिक्षणांने सुसंस्कृत बनविल्यास ती पुरुषांपेक्षा जास्त कुशलतेने कार्य करुन दाखविल याची महाराजांना जाणीव होती.[३] म्हणून ते लोकांना आव्हान करतात. लोकहो शिकवा तिला। जमल्यास जीवनाची कला पुरुषांहुनी ती थोर पाहिजे अशी ग्वाही का? स्त्री पुरुषांपेक्षा थोर होईल याचे पुरावे कशाला हवे! तिला जर

निर्भय केले तर निश्चितच ती आपल्या क्षेत्रात दैदिप्यमान प्रगती करुन दाखविल्याशिवाय राहणार नाही. ते म्हणतात — 'निर्भय हो यह देश की माता मंगल किर्ती कराने' स्त्रीला निर्भय करुन तिच्या उन्नतीसाठी स्फुर्तिस्थान निर्माण करण्याची आवश्यकता ते प्रतिपादन करतात.[४]

**स्त्री शिक्षणाचे महत्व —** राष्ट्रसंताचा मुख्य हेतू ग्रामराज्य असल्याने ग्रामराज्य यशस्वीतेसाठी मुला—मुलींचे जीवन जगविणारे शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे पण मुलीच्या शिक्षणाला परिवाराला अधिक महत्व दिल्या जात नाही. शिक्षण म्हणजे स्त्रियांच्या मुक्तीचे पहिले पाऊल आहे. मुलींना शिकविणारी स्त्री शिक्षिका नसल्याने महात्मा फुल्यांनी सावित्रीबाईला शिकविले व त्या मुलींच्या पहिल्या शिक्षिका झाल्या. तुकडोजी महाराजांनी स्त्री शिक्षणाची गरज ओळखून स्त्रियांच्या सर्वांगिण विकासासाठी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला आहे.

मुलींनाही शिक्षणाची दारे उघडी असणे अत्यावश्यक आहे. हे ग्रामगीतेतील महिलोन्नती स्पष्ट करते. मुलास विविध उच्च ज्ञान द्यावे। तैसेचि मुलीनांही मिळवावे। हेळसांड करु नये। हे जाणावे समाजाने। महाराजांनी स्त्रियांच्या केवळ प्राथमिक शिक्षणाचाच नव्हे तर उच्चतम शिक्षणाचाही पोटतिडकीने पुरस्कार केलेला आहे.

महिलांना उच्चतम शिक्षण :— महिलांचे उच्चतम शिक्षण लाभावे व ते कसे असावे हे सांगतांना राश्ट्रसंत म्हणतात —

शिक्षणांत असावे जीवनाचे स्थान। समाजविकास ज्यास आवडे। त्याने शिकवावे मुलींना धडे। लिहीता वाचता येईल एवढे। तरी शिक्षण आवश्यक। तैसीच शिकवावी टापटीप। गाणे, बोलणे, वागणे अनुरुप घर पाहताची कळावे आपोआप महिला ते।।

राष्ट्रसंतानी आदर्श महिला ज्यातून निर्माण होतील अशाच शिक्षणाचा पाठपुरावा केला आहे. कला संगीत व गृहविज्ञान या विषयाचे शिक्षण सुरुवाती पासूनच मुलींना लाभावे त्यासाठी आवश्यक असलेली साहित्य सामग्री निर्माण करण्यात यावी.[५]

**सह शिक्षण —** सहशिक्षणामुळे स्त्री पुरुषांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होते. मुलामुलींच्या सहशिक्षणांस त्यांनी संमती दर्शविलेली आहे. परंतु सहशिक्षणाचा अवलंब करतांना नैतिक भाव जागृत राहण्याची गरज त्यांनी प्रतिपादीत केली आहे.[६]

म्हणोनि सहशिक्षणहि नाही वाउगे। जरी नैतिक भाव राहती जागे
शिक्षणी जागृत ठेवजे सर्वांगे। काम नेत्या वडिलांचे।।

**स्त्रीयांचे शारीरिक शिक्षण —** स्त्रीयांच्या बौध्दिक विकासाबरोबरच बलसंवर्धन करणाऱ्या शारिरीक बलाची व मनोबलाची अत्यंतीक आवश्यकता आहे. म्हणूनच महाराजांनी मुलींच्या शारिरीक शिक्षणाच्या व व्यायामाचा आवर्जुन पुरस्कार केलेला दिसतो.[७]

पुर्वी स्त्रियांचे क्षेत्र चूल व मुल इथपर्यंतच मर्यादित होते. त्यामुळे शारिरीक शिक्षणाची किंवा स्त्री संघटनाची आवश्यकता जाणवत नव्हती. पण आपल्या कर्तृत्वाने समाज जीवनातील विविध क्षेत्रे तिने व्यापलेले आहेत. चार भिंतींची कोंडी फोडून घराबाहेर पडावे लागते. त्यामुळे

तिचे जीवन असुरक्षित बनलेले आहे याची जाणीव ठेवूनच आणि काळाची गरज ओळखून ज्याप्रमाणे मुलांच्या संघटना असतात तशाच स्त्रियांच्याही संघटना असाव्यात असे ते सांगतात.

**स्त्री संघटनेचे महत्व —** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अत्यंत परखड विचार स्त्री संघटनेबाबत मांडले आहेत. युवक संघटनाप्रमाणेच स्त्री संघटनाही असाव्यात आणि त्या संघटनांच्या माध्यमातून अनेक विधायक कार्ये आयोजित केलीत व विध्वंसक प्रवृत्तीचा संहार व्हावा यासाठी महाराज स्त्री सभा संमेलनांची व मेळे समुदायाची आवश्यकता प्रतिपादन करतांना ग्रामगीतेच्या २० व्या अध्यायातील १०२ व १०६ ओ. मध्ये ते म्हणतात.

जैसी मुलांची संघटीत सेना।
तैसी स्त्रियांची असावी संघटना।
आपल्या सुख, दुःखाच्या भावना।
प्रकटवाव्या सभा—संमेलनी।[८]

महिलांच्या संघटन शक्तीतून त्यांच्यात अन्यायाविरुध्द प्रतिकाराची शक्ती निर्माण होते. स्त्रियांनी स्वतः संघटीत होवून समाजात विविध कार्यक्रमाद्वारे पुढे यावे व आपल्या अस्मितेला जपावे. स्त्रियांचे मेळावे आयोजित केल्याने त्यांच्या कलागुणांना चालना मिळते याची त्यांना जाणीव होती व म्हणूनच त्यांनी संघटनेचे महत्व प्रतिपादन करुन श्री गुरुदेव सेवाश्रमात महिलामंडळाची स्थापना केली. या मंडळातील महिला श्रीमती विमलताई ठकार व त्यांच्या काही उत्साही कार्यकर्त्या यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रिविकासासाठी गावोगावी स्त्रियांचे वर्ग घेवून आवश्यक शिक्षण मिळू लागले. या वर्गाची पाहणी करण्यासाठी स्वतः राष्ट्रसंत जात व त्यांना योग्य मार्गदर्शन करुन प्रोत्साहन देत असे.[९]

तिचा विशेष गौरव करतांना महाराज आरंभीच सांगतात

"जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाचे उध्दारी"
ऐसी वर्णिली मातेची थोरी, शेकडो गुरुहुनही ।।
मातेच्या स्वभावे मुलाची घडण । त्यास उज्ज्वल ठेवी तिचे वर्तन ।
स्त्रीच्या तेजावरील पुरुषांचे मोठेपण । ऐसे आहे ।।

आजपर्यंत स्त्रीयांचे महत्व अनेक प्रकारे वर्णन केलेले आहे. पुत्री, पत्नी, माता म्हणून तिच्यावर अनेक जबाबदाऱ्या येतात. भारतात तिने अनेक नररत्ने जन्माला घातली आहेत. आपल्या कर्तृत्व शक्तीतून केवळ आपल्या मुलाला वाचविले असे नाही तर राष्ट्रही तिने बलदंड करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीशक्ती अभूतपूर्ण, अद्वितीय व असामान्य स्वरुपाची आहे. स्त्री ही राष्ट्राची अर्धी शक्ती आहे. त्यामुळे तिला स्थैर्य प्रदान करणे आवश्यक आहे[१०]

"आईना अबला म्हणे कुणी, धरुनि त्याच्या मनगटा" हे सांगणाऱ्या राष्ट्रसंतानी स्त्री कोणत्याही बाबतीत पुरुषापेक्षा कमी नाही हे दाखवून तिचे स्थान काय? तिच्या अफाट शक्तीमुळे —

याच गुणे “मातृदेवे भव”। वेदाने आरंभीच केला गौरव ।
नररत्नाची खाण अपूर्व । मातृजाती म्हणोनिया ।।

प्रत्यक्ष वेदांनी देखील तिचे पाविष्य वर्णिले असून “मातृदेवो भव” ह्या उद्‌गाराने वेदांमध्ये तिचा गौरव करुन प्रथम स्थान दिले आहे. अपत्यांची पहिली गुरु त्याची माता आहे[११]

**स्त्री ही संस्कारचक्राची सूत्रधार —**

स्त्री ही पुरुषांप्रमाणे समाजजीवनातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. स्त्री शिवाय पुरुषांच्या जीवनाला पूर्णता नाही. इतकेच नव्हे तर प्रपंचाला ही पूर्णत्व नाही. स्त्री शिवाय संसार म्हणजे आत्मा निघून गेलेी कुडी, रस पिळून घेतलेला उस, स्त्रीपुरुष हे संसाररथाची चाक असल्याचा उल्लेख महाराज करतात —

म्हणोनी रथाची दोन्ही चाके । मजबूत करावी कातोनी सारखे ।
तरीच संसारगाडी सुखे । सुखावेल ग्राम जीवनाची ।

स्त्री व पुरुष हे दोन्ही एकाच रथाची चाके आहेत. ज्याप्रमाणे एका चाकाने रथ पुढे जावू शकत नाही. तसे एकट्या पुरुषाने संसार चालू शकत नाही. स्त्री संसाररुपी रथ चालविण्यास सहकार्य करते. तिच्या तंत्राने संसाराचे चक्र चालत असते.[१२]

**स्त्री नवरत्नाची खाण —**

तुकडोजी महाराजांनी स्त्रीचा उल्लेख नरनारी रत्नांची खाण असा केला आहे.

नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाती म्हणोनिया ।।
प्रल्हादाची कयाधू आई । छत्रपतीची जीजाबाई ।
कौसल्या, देवकी आदी सर्वही । वंदिल्या ग्रंथी ।।

खरोखरच भारतीय स्त्री ही खऱ्या अर्थाने नरनारी रत्नांची खाणच आहे. माता कयाध ूच्या पोटी सर्वत्र देवाचा साक्षात्कार शोधणारा प्रल्हादासारखा देवभक्त जन्माला आला. माता जिजाईच्या पोटी महाराष्ट्रात स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवणारे शिवाजी अवतिर्ण झाले. प्रभु रामचंद्र कौशलेच्या पोटी अवतरले आणि कंसासारख्या दुष्ट राजाचा संहार करणारा कृष्ण देवकीच्या पोटी जन्मास आला. इतकेच नव्हे तर भारतीय संस्कृतीमध्ये सीता, सावित्री, द्रौपदी, गांधारी ह्यांच्या सारख्या श्रेष्ठतम स्त्रीयांही अवतरल्या.[१३] या भारतीय स्त्रीयांचे महात्म वर्णन करतांना महाराज म्हणतात —

काय देव देवता भिन्न केल्या, ऋषिपत्या नव्हत्या सांभाळील्या ।
काय महिलांत स्वाधी नाही झाल्या? पहा पुराणी मागच्या ।।

इतकेच नव्हे तर स्त्रियांनी वेदासारखे अद्वितीय ग्रंथ लिहीले प्रसंगी ब्रम्हवादही केला. विविध प्रकारच्या कला आणि विद्या मध्ये प्राविण्यही प्रदर्शित केले.[१४] स्त्रिया एवढे करुन थांबल्या नाहीत तर स्त्रियांच्या कर्तृत्वाविषयी सांगतांना ते पुराणकथांचे व इतिहासाचे दाखले देवून म्हणतात.

काय स्त्रियांनी युध्द नाही केले?।
पतिपुत्रा प्रोत्साहन नाही दिले?
काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिले ब्रिदासाठी?

शिवरायाला घडविणारी सामर्थ्यवान जिजाऊ। ब्रिटीशांच्या अन्यायाला तोंड देण्यासाठी जिवाची पर्वा न करता प्रचंड गडावरुन घोडयासह उडी घेणारी राणी लक्ष्मीबाई। प्राणांहून अब्रुला जपणाऱ्या राजपूत स्त्रियांसह 'जोहर' पत्करुन आसक्त अल्लाउदीनला झुकविणारी राणी पद्मिमी। राज्यावर येणारे हुमायुचे संकट टाळण्यासाठी त्याला राखीच्या पवित्र बंधनात जखडून समेट घडवून आणणारी राणी कर्णवती। तसेच पती निधनानंतर सती न जाता राज्यरक्षणासाठी युध्दाचे प्रशिक्षण घेणारी अहिल्याबाई होळकर। या साऱ्या स्त्रिया भारतीय संस्कृतीचे स्वर्णिस घटक आहेत.[१५]

स्त्रीचे सभ्य आचरण तिचे उत्तम वर्णन मृदुवाणी, विद्‌वत्ता या सर्व गुणांमुळे ती समाजाचे भुषण ठरते. त्यामुळे तिला कमी लेखणे कदापी उचीत नाही. त्यांना पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये गुणसंपन्नता अधिक जाणवते. समाजस्थितीचे निरीक्षण करुन स्त्रियांच्या प्रगतीकडे पाहिले तर प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या एक पाऊल पुढेच अशी स्त्रियांची वाटचाल असल्याचे दिसून येते.[१६] पुरुषांपेक्षा तिच्यात कुठलाही गुणधर्म यत्‌किंचीतही
कमी नाही.

का म्हणा अबला तिला? ती शक्तीशाली नाही का?
काय कमी देवे केले। तिज मानवाहुनि सांग ना?

**निष्कर्ष :**

१. प्राचीन काळापासून आजतागायत समाजाने स्त्रिला नियंत्रणाखाली ठेवल्याने तिच्या व्यक्तिमत्वाचा, उपजत गुणांचा विकास झाला नव्हता. परंतु आज ती विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने, कर्तृत्वाच्या तेजाने तळपू लागली आहे. राष्ट्रसंत तुकडोजींचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यापक होता. त्यांनी व्यक्त केलेली भविष्यवाणी आज खरी ठरली आहे. राष्ट्रसंतानी अशाच प्रकारच्या कर्तृत्ववान व समर्थ अशा स्त्रीचे चित्र रेखाटून भारताच्या नव्या घडणीत तिचा सक्रीय सहभाग असावा असे आपले स्वप्न ग्रामगीतेतून साकारले आहे.

२. महीलोन्नतीचा सर्वव्यापक दृष्टीकोन बाळगणाऱ्या महाराजांच्या विशाल व प्रांजळ अंत:करणाचे व स्त्रीविषयीच्या त्यांच्या उदार .ष्टीकोणांचे सहज दर्शन घडते.

३. आजपर्यंत राष्ट्रसंताच्या पूर्वीच्या अनेक विचारवंतानी स्त्रीयांच्या प्रश्नाविषयी सहानुभूती दाखविलेली आहे. मात्र राष्ट्रसंतानी स्त्रीयांकरीता केवळ सहानुभूती न ठेवता त्यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी कृतीशील प्रयोगांचा अवलंब केलेला दिसून येतो.

४. त्यांचे हे प्रयोग विज्ञानयुगाला अनुसरून शास्त्रशुध्द आणि पुरोगामी विचारसरणीतून व्यक्त झालेले दिसतात.

५. महाराजांनी भभारतीय स्त्री जीवनांतील अनिष्ठ परंपरांच्या विरुध्द समाज जीवनात फार मोठी जागृती निर्माण केली.

६. नव्या भारताच्या घडणीसाठी पुरुषांइतकेच स्त्री शक्ती देखील आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी स्त्री सुधारणासंबंधी काळोजित व अभिनव विचार मांडून समाज जीवनात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. माधव राजगुरु (संपादित) ग्रामगीता, महाराष्ट्र राज्य संशोधन मंडळ, पुणे, १ मे २०००, पृ. २१३

२. जुल्फी शेख, राष्ट्रसुंत तुकडोजी महाराज, मध्यमा प्रकाशन, नागपूर, जून २००७.

३. सुभाष सावरकर, ग्रामगीता रहस्य स्पंद ३ (जनक्रांतीची दिशा) मराठी जनसाहित्य प्रकाशन, अमरावती, आक्टोंबर २००६, पृ. ८४

४. रा.तु. भगत, सुभाष सावरकर (संपादित) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००९, पृ. ११५

५. कित्ता

६. शोभा जाधव, राष्ट्रसंत तुकडोजी चरित्रामृत, मोहनबाबा प्रकाशन, वर्धा, प्रथम आवृत्ती २००५, पृ. ५७.

७. कित्ता, पृ. ५९

८. राम घोडे, संत तुकाराम — संत तुकडोजी तुलनात्मक दर्शन, राजीव प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९८८, पृ. ९०

९. कित्ता

१०. कित्ता, पृ. ९३

११. नमिता शेंदरे, राष्ट्रसंत स्त्री दर्शन, ओम प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९९, पृ. ७८

१२. कित्ता

१३. सुनंदा खेरडे, संत ज्ञानेश्वर ते राष्ट्रसंत तुकडोजी, श्री प्रज्ञा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००१, पृ. १०१.

१४. कित्ता, पृ. २०३

१५. कित्ता

१६. सुभाष सावरकर, राष्ट्रसंत आणि ग्रामगीत, मराठी जनसाहित्य प्रकाशन, अमरावती, आक्टोबर २०००, पृ. ११२.


◆◆◆

*Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# मराठेकालीन वेटबिगारी

**प्रा. शिंदे एच. ए.**
(इतिहास विभाग)
सरस्वती महाविद्यालय केज जि. बीड

वेटबिगारी ही पध्दती प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आहे वेटबिगारी पध्दती हे सरजामशाहीचे प्रतिक आहे ही प्रथा सार्वत्रिक होती. ज्या वेळी भारतात राजेशाही प्रणित समाज अस्तित्वात होता. त्या वेळी प्रजेकडून तिचे संरक्षण करण्याच्या बदल्यास करवसुली केली जात असे ज्या समाजातील व्यक्तीला हा कर देण्याची ऐपत नसे त्या कराऐवजी त्या बदल्यात कांही काळापुर्ती व घटकांना विनावेतन काम करावे लागत असे ही जी विनावेतन काम करण्याची पध्दती होती त्या पध्दतीला 'विष्टी ' असे म्हणत विशिष्टी हा शब्द संस्कृत आहे मोत्सवर्तने जे वेटबिगारी करत आसत त्यांना वेटेकरी किंवा बिगारी असे म्हटले आहे. याचा अर्थ वेटबिगारीत सक्ती आली. एका अर्थाने ते सक्तीचे काम होते सक्ती ज्या ठिकाणी आसते त्या ठिकाणी आपोआपच पिळवणुक होते थोडक्यात प्रजेकडुन सक्तीने विनावेतन काम करुन घेण्याची पध्दत म्हणजेच वेटबिगारी होय.

मराठेकाळात वेटबिगारीची प्रथा अर्थातच अस्तित्वात होती. मुसलमान काळापासून ते पेशवाईच्या अंतापर्यन्त ही प्रथा समाजात अस्तित्वात असल्याचे दिसुन येते शिवकाळात ही प्रथा अस्तित्वात होती पण ती प्रथा समजून घेण्यासाठी पुरेशी साधने उपलब्ध होत नाहीत. म्हणूनच आपणास ही प्रथा समजून घेण्यासाठी पेशवेकालीन संदर्भ साधनांचा आधार घ्यावा लागतो. तत्कालीन काळातील वेठबिगारीचे स्वरुप पुढील प्रमाणे आपणास सांगता येईल.

**मराठेकालीन वेठबिगारीचे स्वरुप :-**

**१) वेटबिगारी करवून घेण्याचा अधिकार :-** मराठेकाळात वेटबिगारी करवुन घेण्याचा अधिकार हा सरकार (छत्रपती ) पंतप्रधान (पेशवा) सरदार, प्रशासकिय अधिकारी, वतनदार, इनामदार, मोक्सेदार, पाटील देवस्थानचे प्रमुख निरनिराळया पेठेचे अधिकारी, देशमुख देशपांडे, इ. ना होता. वेटबिगारीत विनावेतन सेवा किंवा काम करुन घेतले जात असे याशिवाय पारंपारीक व्यावसाय, धंदे करणाऱ्या ज्या जाती होत्या त्या जाती ज्या वस्तुचे उत्पादन करीत आसत त्या उत्पादीत वस्तू वेटबिगारीच्या बदल्यात मोबदला म्हणून करा ऐवजी घेतल्या जात आसत यामध्ये या कारागीरांच्या मधुन वस्तू व सेवा घेण्यात आल्या.

**२) वेटबिगारी कोण होता / कोण करत :-**

मराठेकाळात ज्यांच्याकडुन संपतीचे व विनावेतन तर कधी मोबला देऊन वेटबिगारी घेतली जात असे त्यामध्ये प्रामुख्याने शुद्र आणि अतिशुद्र समावेश आसल्याचे दिसुन येते.

**१) शुद्र बलुतेदार आणि आलुतेदार :-**

सुतार, लोहार, चांभार, कुंभार, नाव्ही, माळी, साळी, गोंधळी, तेली, तांबोळी, भट, गुरव, तराट, शिंपी, ठाकूर, घडशी, भरुड, गौंड, परिट, इ. चा समावेश असे.

**२) अतिशुद्र बलुतेदार:-**

महार, मांग, चांभार इ.

**३) तत्सम लोक:-**

बकाल, ठाकूरी, अनाळी, खल कवाठळ इ. अशा प्रकारच्या लोकांकाडून वेठबिगारी म्हणजेच विनावेतन काम करुन घेण्याची पध्दत मराठेकालीन समाजात अस्तित्वात होती. व तीच पध्दत पेशवेकाळातही अस्तित्वात होती.

**३) वेठ बिगारीच्या कामाचे स्वरुप :-**

मराठेकाळात आणि प्रामुख्याने पेशवाई जवळपास सर्व प्रांतात वेटबिगारीची पध्दत अस्तित्वात होती

१. वेटबिगार बांधकामासाठी किंवा किल्ल्याची दुरुस्ती, पोलीस स्टेशन, पाणी पुरवठयाची धरणे इ. साठी वेटबिगार वापरले जात आसत.

२. हजीर बेगारमध्ये निरनिराळया प्रकारची पिके, लाकडे किंवा इ. सरकारी कामासाठी वेटबिगारी घेतली जात असे.

३. निरनिराळया ठिकाणी जी सरकारच्यामालकीची गवताची कुरणे आसत त्यांच्या कापणीसाठी सरकार वेटबिगार घेत आसत.

४. खाजगी व सरकारी कार्यालयात किरकोळ कामासाठी

५. कुजूर कामामध्ये जी कामे निघत त्यासाठी वेठबिगार होत आसत

६. निरनिराळया ठिकाणच्या सरकारी चौकी आसत तेथे वेटबिगार घेतली जात आसत त्यांना चौकी वेटबिगार म्हणत आसत.

७. वेटबिगार ही इनामदाराच्या घरच्या बांधकामासाठी व त्यांच्या सर्व प्राकरच्या कामासाठी वेटबिगार घेतले जात आसत.

सरकार आपल्या प्रांतात व प्रदेशात वेटबिगारी लागू करीत आसे वेटबिगारीत सरकारी बांधकाम पाणी पुरवठा सरकारी कार्यालयातील कामे इ. साठी लागू करीत आसत त्याच बरोबर सरकारी मालाच्या जमीनीची मशागत लावणी पेरणी इ. साठी सुध्दा वेटबिगार त्या काळात घेत आसत.

**४) सरकारी आज्ञेनुसार मागणीनुसार वेटबिगारी :-**

सरकारी आज्ञेशिवाय व सरकारी मागणीशिवाय वेटबिगारी घेता येत नाही कारण सरकारच वेटबिगारी घेत आसे शिवाय ज्या वेळेस सरकारच्या परवानगीने वेटबिगारी घेतली जात असे तेव्हा ती वेटबिगारी राबवणारी यंत्रणा आसली पाहिजे.

**५) सरकारी मागणीप्रमाणे खेडयातील पाटलांन मार्फत वेटबिगारी :-**

तत्कालीन प्रशासनातील महत्वाचा घटक खेडे हा होता. तो दोन प्रकारात विभागला होता (एक) सरकारी खेडे व (दुसरे ) म्हणजे सरकारच्या ताब्यात नसलेले खेडे खेडयाचा प्रमुख हा पाटील आसे पाटील हा सरकारच्या प्रशासन यंत्रणेतील अत्यंत महत्वाचा घटक जो वार्षीक महसुल गोळा करित आसे आणि वेटबिगारी सुध्दा घेत आसे.

पाटील हा सरकार व रयत यांच्यामधील दुवा होय, त्यामुळे तो सरकारी मागणीप्रमाणे गावच्या प्रजेवर वेटबिगारी लादत आसे पण त्याच बरोबर त्यांच्यावर वेटबिगारीचा जादा बोजा पडणारनाही याची ही काळजी घेत आसे कांही वेळेस वेठबिगारीच्या ज्यादा त्रास होत असे अशा वेळी पाटील वेटबिगारी माफ व्हावी म्हणून प्रत्यन्त करीत असत. पाटलास स्थानिक अधिकाऱ्यांच्या वेटबिगारीची मागणी पुर्ण करावी लागत आसे या बदल्यात त्यास इनाम जमिन सरकार तर्फे दिली जात असे थोडक्यात पाटील हा सरकार तर्फे राबविल्या जाणाऱ्या वेटबिगारीच्या यंत्रणेतील प्रमुख व्यक्ती होय.

**६) पेशवेकालीन वेटबिगारी :-**

प्रामुख्याने पेशवेकाळात वेटबिगारी सरकार तर्फेच लादली जात असे गावगाडयातील शुद्र जाती अतिशुद्र जाती आणि तत्सम जातीवर वेटबिगारी लादली जात असे संपुर्ण गावच्या गाव या वेटाबिगारी खाली येत असे गावचा पाटील सरकारी अधिकारी यांना वेटबिगारीच्या संदर्भात अज्ञा पाळावी लागत असे बहुतेक पणे मराठेकालीन वेटबिगारी आणि पेशवेकालीन वेटबिगारी यांच्यात कांहीच बदल आढळून येत नाही.

**७) वेटबिगारी संबधी सरकारचे धोरण :-**

प्रजेचे पालन करणे संगोपण करणे व आपल्या राज्यात सुख व समृध्दी निर्माण करणे तसेच प्रजेला वेटबिगारी देत आसतांना काही त्रास होतो का वेटबिगारी सांगीतल्या पेक्षा जास्त घेतली जाते का अशा कितीतरी गोष्टीकडे लक्ष दयावे लागत आसे वेटबिगारीचे प्रत्येक्षात अमलबजावणी करणारे अधिकारी आसत ते मात्र वेटबिगारी जास्त घेत आसत अशा वेळी सरकार दखल घेत असे व अधिकाऱ्यांना समज दिला जात असे.

**८. वेटबिगारी ही शिस्त व योग्य घेण्यावर सरकारचा कटाक्ष :-**

एका बाजूला सरकारी अधिकाऱ्याच्या हडेलहप्पी धोरणामुळे जी परिस्थिती निर्माण होत असे व त्यामुळे रयत निघून जात असे त्या गावावर जादाकर बसवून वेटबिगाराच्या गैर हजेरीत ती कामे मजूर लावून करुन घेत आसत तर काही वेळेस वेटबिगारी माफ करण्यासाठी पैसेही घेतले जात आसत याचाच अर्थ असा होतो की, वेटबिगारी शिस्तीप्रमाणे व योग्य रितीने घेतली पाहिजे यावर सरकारचा कटाक्ष असे.

**९) वेटबिगारी आणि जाती संस्था यांचा संमध :-**

मराठेकालीन वेटबिगारीचा उल्लेख कागदपात्राच्या मध्ये बेगार किंवा बेर असा होतांना दिसतो वेटबिगारी करणारे वेटे, बेगारी, राबते रयत होय वेटबिगारी आणि जाती संस्था यांचा संमध होता कारण वेटबिगारी शुद्र अतिशुद्र जातीच्या कडून घेतली जात असे करांच्या बदल्यात वेटबिगारी घेणे हा राजांचा किंवा सरकारचा एक हक्क्च होवून बसला होता. शक्य तो शुद्र व अतिशुद्र जातीमधून वेटबिगारी घेतली जात असे.

**१०) वेटबिगारीच्या त्रासाने शेतकऱ्याचे नुकसान :-**

मराठे काळात वेटबिगारीच्या त्रासाने सर्वात जास्त नुकसान कोणाचे झाले असेल तर त्या वेळेच्या शेतकऱ्याचे शेतीच्या कामात येणाऱ्या आडथळयांमुळे पर्यायाने शेतीच्या उत्पादनावर सुध्दा त्याच परिणाम झाल्याचे दिसून येते रयत गावसोडून गेल्यामुळे शेतीच्या कामात खंड पडत असे अशा तक्रारी सारख्या होताना दिसतात. लावणी, पेरणी, संचणी, मशागत वेळेवर होत नाही असे दिसून येते याच बरोबर वेटबिगारीच्या प्रथेमध्ये सक्तीचे विनावेतन काम लादण्यात आल्याने लोकांची पिळवणूक होणार ही गोष्ट स्पष्टच जाणवते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. मराठेकालीन सामाजिक व आर्थिक संस्था - प्रा. गायकवाड, सरदेसाई, हनमाने
२. मराठै कालीन आर्थिक, सामाजीक, राजकिय व शासकिय संस्था- प्रा. जाधव, सावंत
३. मराठयांचा इतिहास - प्रा. डॉ. पी.ए. गवळी
४. मराठयांचा इतिहास - प्रा. कोलारकर

◆◆◆

*Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# पेशवेकालिन निवडक स्त्रिया व त्यांचे कार्य

**प्रा.डॉ. जाधवर बी.डी.**
इतिहास विभाग प्रमूख
बलभीम महाविद्यालय बीड.

**प्रस्तावणा :-**

जगाच्या इतिहासाचा मागोवा घेतल्या नंतर असे दिसुन येते की, पृथ्वीच्या पाठीवर आनेक देश आस्तीत्वात असून त्या देशात वेगवेगळी राज्य आहेत होती. मग त्या देशात जर्मनी, रशिया इंग्लंड अमेरिका भारत, चिन कालांतराने उदयास आलेला पाकिस्तान या देशात स्वकीयांचे आस्तीत्व टिकवण्यासाठी आनेक चळवळी, आंदोलने झालेली होती. त्या चळवळीत किंवा राजकीय, सामाजिक,आर्थीक, धार्मीक, सांस्कृतीक क्षेत्रातील परिवर्तनात त्या त्या देशातील पूरुष वर्गाने आपले योगदान देऊनआपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा देशाच्या इतिहासात उमटवला होता. तशा प्रकारचा आपल्या कार्याचा ठसा त्यात्या देशातील महिलांनी सुध्दा आपल्या कार्याच्या माध्यमातून उमटवला होता. एकदर इतर देशाच्या सामाजिक आर्थिक राजकीय, धार्मीक समाज जिवनाचा विचार केला तर त्यामध्ये स्त्रियांचे कार्य मोठे आसल्यचे दिसते. म्हणून इतर देशाचा विचार येथे आपण करणार नाही परंतू भारताचा विचार केला तर यादेशाचा इतिहास हा तिन कालखंडात विभागलेला आहे. त्य कालखंडापैकी प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड, आणि आधूनीक कालखंड, या तिन्ही काळात या देशात आनेक उलथापालथी किंवा परिवर्तन झाल्याचे दिसून येते. या परिवर्तनाचा आढावा घेतला तर त्यासाठी फक्त पूरुषांनीच आपली शक्ती किंवा बोध्दीक परिश्रम घेतले होते असे नसून या परिवर्तनाच्या चळवळीत मोठ्याप्रमाणावर आनेक कर्तबगार महिला सुध्दा सहभागी झालेल्य होत्या. प्राचीन कालखंडात ज्य महिलांनी पूरुषांच्या बरोबरीने कार्ये केले त्यांची नोंद मात्र त्या काळातील इतिहासाने घेतली आहे. हे आपणास मान्य करावा लागेल. तरी पण प्राचीन काळात स्त्रियांना फारसे स्वातंत्र्य नव्हते. मौर्यकाळ, सातवहान काळ, गुप्तकाळ, हर्षवर्धन काळ, शुंगकालखंड या काळात आनेक निर्बंध आसले तरी पुरुषी कार्ये करुन स्त्री शक्तीने आपल्य योगदानाची नोंद इतिहासात केली होती.

प्राचीन कालखंडानंतर आपण मध्ययुगीन कालखंडाचा विचार केला तर इ.स.१२०० नंतरच्या काळात मुस्लीम राज्यकर्त्यांचे आगमण भारतीय भूमीत झाले. त्यांच्या आगमणा बरोबरच त्यांची संस्कृती त्यांचा धर्म, रुढी, परंपरा, या सुध्दा भारतामध्ये रुझल्य होत्य पूढे इ.स. १२०० मध्ये कुतुबूध्दीन ऐबकाने सुलतानशाहीची स्थापणा करुन या देशात सुलतानी राजवट निमार्ण केली परंतू त्यांच्या राजवटीत स्त्रीयांना आपेक्षीत स्वातंत्र्य दिले नाही. कालांतराने मात्र परिवर्तन होऊन सुलतानी राजवटीमध्ये सुध्दा रझीयासुलतान सारख्या धाडसी स्त्रीने सत्ता हाती घेवुन मोठे परिवर्तन घडवून आणले होते. त्याची साक्ष आपणास मध्ययूगीन भारताचा इतिहास देतो. सुलतान काळानंतर मोगल कालखंडात सुध्दा नूरजहांन नावाच्या स्त्रीने राज्यकारभारात हस्तक्षेप

करुण आपल्या योगदानाची नोंद इतिहासाने घेतली हे तिने दाखवून दिलेले आहे.

वरिल दोन्ही कालखंडाचा आढावा घेतला असता असे दिसते की दोन्ही कालखंडात कमी जास्त प्रमाणात तत्कालीन महिलांनी किंवा स्त्रीयांनी मोठे कार्य केलेले होते. त्याच प्रमाणे आपणास आधूनिक कालखंडातील शिवकाळ आणि पेशवे काळ या दोनही कालखंडात सुध्दा सामाजिक आर्थिक राजकीय क्षेत्रात कार्य केलेले आहे. त्या पैकी पेशवे कालीन स्त्रीयांच्या कार्याचा वस्तुस्थितीचा संक्षीप्त आढावा खालील प्रमाणे या शोधनिबंधात घेतला जानार आहे. तो खालिल प्रमाणे.

**पेशवे कालखंड व राजकारणातील स्त्रीयांचे योगदान:-**

इ.स. १७०७ ते १८१८ हा मराठ्याच्या इतिहासात हा काळ पेशवाईचा कालखंड म्हणुन ओळखला जातो. कारण इ.स. १७०७ मध्ये मोगलबादशहा औरंगजेबाचे निधन झाले आणि मोगली राजवटीचा ऱ्हास होऊन पेशवाईचा उदय झाला बाळाजी विश्वनाथ हे कोकणस्थ ब्राम्हण होते. शाहूच्या मर्जीने त्यांना पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली त्यामुळे त्याला पेशवाईचे संस्थापक असे म्हटले जाते इ.स. १७१३ मध्ये पेशवाई असतीत्वात आली आणि आनेक कर्तबगार पेशव्यांनी ज्याप्रमाणे आपले नाव इतिहासात अजरामर ठेवले तसेच पेशवे कालीन काही स्त्रीयांनी पण विविध क्षेत्रात काम करुण काही प्रमाणात परिवर्तन घडवून आनले होते. आशा स्त्रीयांच्या कार्याचा आढावा या शोधनिबंधात घेतला आहे.

**राधाबाई पेशवे :-**

पेशवे घराण्याचे किंवा पेशवाईचे संस्थापक म्हणून बाळाजी विश्वनाथ भट्ट यांचे नाव पूढे येते. बाळाजी विश्वनाथ हे १६८९ मध्ये कोकणातून घाटावर आले व नंतर १७१३ मध्ये त्यांना पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली तेव्हा राधाबाई कोकणातच होत्या परंतु त्यांच्या आंगी पतिचे गुण, पराक्रम राजकारण कूशलता या गोष्टी रुजलेल्या होत्या. त्यामूळे पेशवाईतील स्त्रीयांपैकी एक कर्तबगार स्त्री म्हणून राधाबाईचे नावलौकीक होते. त्यांना वेगवेगळ्या भाषेचे ज्ञान होते. त्यामूळे त्या सातत्याने पत्रव्यवहाराच्या माध्यमातून आपले मत पेशव्यांना कळवत असत. पेशवाईच्या वैभवात आपली तरुणपिढी बिगडू नये. ती चैनी विलासी होऊ नये म्हणुन त्य दक्षता घेत असत. आपल्या मुलांना वेगवेगळे शिक्षण मिळाले पाहिजे या साठी त्य सतत प्रयत्न करत होत्या. या शिवाय त्यांना राजकारणाची जाण सुध्दा होती. त्यांनी राजकारण जाणून घेतले होते थोरले बाजीराव व चिमाजी आप्पा हि मंडळी काही कारणास्तव पूण्याबाहेर गेली आसेल तेव्हा त्या कारभार चालवत असत. या शिवाय कौटुंबीक जबाबदारी धार्मीक परंपरा या सर्वांचे त्या पाईक होत्या त्यांचे सल्ले किंवा मार्गदर्शन खूप महत्वाचे होते. त्यांनी आपल्या मुलांना पत्रामध्ये केलेले उपदेश किंवा सल्ले फार महत्वाचे होते. त्यांनी घेतलेले निर्णय अतिशय धोरणात्मक होते बाळाजीचे गुलवती या स्त्री बरोबर आसलेले प्रेम समजले तेव्हा त्यांनी पेशवे कुलाची बदनामी होऊ नये म्हणून सवतीमत्सर बाजूला ठेवून गुलवतीचा मुलगा (लेकवले ) त्यास भिकाजी शिंदे हे नाव देऊन पूणे शहारात त्यांनी शिंदे आळीची स्थापणा केली. पूढे

बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यू नंतर त्यांनी चिमाजी आप्पाच्या मदतीने राज्यकारभार पाहिला. त्या कूशागृ आणि चौकस बुध्दीच्या होत्या. त्यांना जवळपास ७५ वर्षाचे आयुष्य लाभले होते. त्यांनी केलेल्या संस्कारामुळे पेशवा पहिला बाजीराव यांचे नाव जगातील ऐकमेव अपराजित सेनापतीत गनले गेले. राधाबाईनी आपले पती आणि मुले यांना योग्य सल्ला आणि मार्गदर्शन केले त्यामूळे त्यांना आपली कर्तबगारी जगासमोर खंबीर पणे मांडता आली. त्यामूळे पेशवा नानासाहेबांनी आजी राधाबाईची चांदी तुला केली. व तो सर्व पैसा राज्यातील वेगवेगळया देवस्थानाना दिला. यामुळे राधाबाई सतत समाधानी होत्या. आशी वरिल थोर कर्तबगार पेशवा स्त्री  राधाबाई वयाच्या ७५ व्या वर्षी म्हणजे १९ एप्रील १७५३ रोजी त्यांचे निधन झाले.

**नानासाहेबांची पहिली पत्नी गोपीकाबाई पेशवे :-**

इ.स. १७३० मध्ये थोरले बाजीराव पेशवे यांचा मुलगा नाना साहेब आणि गोपीकाबाई यांचा विवाह झाला होता. विवाहा नंतर इतिहासातील नोंदीचा आधार घेऊन असे म्हटले जाते की, गोपिकाबाई या नानासाहेबाबरोबर मोहिमेवर जात असत या विषयीचे सर्व मार्गदर्शन त्यांना त्यांच्या आजेसासू राधाबाईने केले होते. या शिवाय वाचण लेखन सणसमारंभ इत्यादी विषयी त्या मार्गदर्शन करत आसत. त्यामुळे राधाबाईच्या निधना नंतर पेशव्यांच्या घराण्यातील वडिलकीचा वारसा गोपीकाबाईकडे जातो घरातील समजदार आणि जेष्ठ स्त्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. पहिले बाजीराव पेशव्यांचे निधन इ.स. १७४० मध्ये झाल्या नंतर छत्रपती शाहूने पेशवाईची वस्त्रे नानासाहेब पेशव्याकडे दिली. तेव्हा पासून त्या नानासाहेबा सोबत राज्यकारभारात लक्ष घालत होत्या. त्यांच्याकडे सर्वगुण असल्यमुळे नानासाहेब यांच्याशी राज्क्कारभारा विषयी चर्चा करत असत. त्यामूळे नानासाहेबांच्या गैरहजरीत त्य पूणे परगण्याचा कारभार पाहत आसत. त्यामुळे पेशवे दरबारातील सरदार मंडळीवर त्यांचा मोठा वचक होता. कारण त्यंचा स्वभाव हा अतिशय लहरी होता. या कर्तबगार मातेच्या पोटी ज्या पंचरत्नाचा जन्म झाला होता. त्यापैकी विश्वासराव, १७४२, माधवराव १७४५, यशवंतराव १७४७ , मोरेश्वर १७५० नारायणराव १७५५ हि त्यांची पाच अपत्य होती.

गोपीकाबाई नानासाहेब  सोबत एखादे वेळी स्वारीवर गेल्या नाहीत तर नानासाहेब त्यांचे साठी काही मौल्यवान नजराणा पाठवत असत म्हणजे नानासाहेबांचे त्यांच्यावर खूप प्रेम होते. त्याचे एक उदाहरण असे आहे. गोपीकाबाईना डोळ्याचा त्रास होत होता तो होऊ नये म्हणून रांजनगावच्या गणपतीला नानासाहेब नवस बोलले व तो त्यांनी नंतर फेडला पण होता.

त्या नानासाहेबा समवेत असताना रघूनाथरावांची काळजी घेण्यास सांगत असत. त्यांना फारसे राजकारण समजले नाही पाहिजे हि भूमीका नानासाहेबांची होती. त्यामूळे त्यांना मोडीलीपीच्या ज्ञानापासून त्यांनी दूर ठेवले होते. पत्नी गापीकाबाईचा राजकारणातील हस्तक्षेप नानासाहेबांना मान्य नव्हता त्यामुळे पेशव्यांच्या घरातील वातावरण कलूषीत झाले होते त्या वातावरणाचा थोडा विसर पाडावा म्हणून पैठण येथील वाखरे सावकाराच्या मुलीशी २७ डिसेंबर १७६० मध्ये नानानी विवाह केला याचा गोपीकाबाईना

मोठा धक्का बसला. नानांनी त्यांच्या दूसऱ्या पत्नीचे नाव राधाबाई असे ठेवले होते. या दरम्यानच्या काळात विश्वासराव व सदाशिवभाऊ पाणीपतच्या युध्दावर होते. त्यांची चिंता सातत्याने त्यांना सतावत होती. शेवटी निवडक सरदार आणि पेशवे परिवारासह नानासाहेब पाणीपताकडे निघाले परंतू त्यांच्या निघण्यास मोठा विलंब झालेला होता मराठ्यांच्या आणि पेशवे कुटुंबाच्या दुर्दैवाने भेलसा येथील मुक्कामीच पाणीपत वरिल मराठ्यांच्या पराभवाची बातमी त्यांना समजली तेव्हा आतिशय निराश आवस्थेत दोन मोती गळाले आणि सत्तावीस मोहरा हरवल्या असे उद्गार नानासाहेबांनी काढले होते चिल्लर खुर्दा यांचा तर विचार नाही. याने नानाची प्रकृती फार ढासळली होती. शेवटी भाऊ -भाऊ असा आक्रोश करत २३ जून १७६१ मध्ये नानांनी आपला प्राण सोडला त्यावेळी माधवराव आणि नारायणराव वयाने फार लहान होते त्यामुळे गोपीकाबाई सती गेल्या नाहीत. मात्र येसू ही खासेचाकरीन मात्र सती गेली त्यामुळे तिचा मुलगा बाबुसिंगचा विवाह गोपीकाबाईंनी दहा वर्षानंतर लावला होता.

पेशवे रावटीला व पेशवे घराण्यातील कर्तबगार पूरुषांना व स्त्रीयांना योग्य मार्गदर्शन करणारी अत्यंत निर्भीड स्वभावाची स्त्री गोपीकाबाई हि मुलगा विश्वासराव, सदाशिवभाऊ व नानासाहेब पेशवे पती यांचे कालांतराने झालेले निधन यामूळे पार खचून गेल्या होत्या. त्यामूळे पेशवाईत कर्ता पूरुष शिल्लक राहीला नाही. त्यामूळे रघूनाथरावा पेशवाईची जबाबदारी घेउन आता आपणच पेशवे होणार आहोत या कल्पनेत ते वावरु लागले परंतू जनमत हे त्यांच्या पाठीमागे नसल्या कारणाने २० जुलै १७६१ रोजी नानासाहेबांचे पूत्र माधवराव यांना पेशवाईची वस्त्रे बहाल केली परंतू कालातराने गोपीकाबाईने राज्यकारभारात लक्ष घालू नये असे माधवरावाना वाटू लागले यावरुन असे स्पष्ट होते की पेशवाईच्या राजकारणात कमी जास्त प्रमाणात स्त्रियांचा हस्तक्षेप होता.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. डॉ. कर्वे स्वामी, स्त्री विकासाच्या पाऊलखूणा, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, ऑगस्ट - २००३

२. नानिवडेकर मेघा, महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००६

३. डॉ. पाटील लिला, भारतीय स्त्री जीवन मेहता पब्लिकेशन पुणे, १९९०

४. शिरगावकर इरावती स्त्री जीवनातील स्थित्यंतर भारतीय इतिहास संकलन समिती मुंबई, १९९२

५. डॉ. व्हटकर ज्योती ज. मराठा व पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्री दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ पुणे, मार्च -२०१०


◆◆◆

# आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या

**डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भामरे**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता.जि.धुळे

**संक्षिप्त गोषवारा (Abstract) :-**

आदिवासी समाजाच्या समस्या या साध्या व सरळ नाहीत. आजही आदिवासी समाज अनेक समस्यांना समोरो जात आहे. आदिवासी समाज शतकानुशतके हलाखीचे जीवन जगत आला आहे. दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, निकृष्ठ राहणीमान, कुपोषण, बेकारी यासारख्या समस्या आदिवासी समाजाच्या जीवनात आढळून येतात. आदिवासी समाज म्हणजे एक प्रेक्षणीय वस्तु नाही की जिचा संशोधनात्मक अभ्यास व्हावा किंवा जिचे केवळ निरीक्षण व्हावे. असे करणे म्हणजे आदिवासींना अपमानीत करण्यासारखे होईल. म्हणून आदिवासी समाज मानवी समाजव्यवस्थेचाच एक अविभाज्य भाग मानून आदिवासींना विश्वासात घेऊन त्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सभ्य समाजात आदिवासींचे होणारे एकात्मीकरण हे सक्तीचे न राहता ते आदिवासींच्या इच्छेनुसार असावे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आदिवासींचे एकात्मीकरण करतांना त्यांना भावनिक, मानसिक व सांस्कृतिक इजा पोहचु नये याची दक्षता घेतली पाहिजे.

थोडक्यात, आदिवासींची जीवन पध्दती, सांस्कृतिक संरचना, अर्थव्यवस्था आणि कला विश्वाचे संरक्षण करुनच आदिवासी समाजाच्या समस्या सोडविता येतील असा विचार यात अभिप्रेत आहे.
प्रस्तुत 'आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या' या शोधनिबंधात अभ्यासकाने आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीज शब्द - (Key Words) :-**
आदिवासी समाज, सामाजिक, सांस्कृतिक समस्या

**प्रस्तावना व अभ्यासाचे महत्व :-**

मानव समाजात विविध समस्या आहेत. जगात असा कोणताच समाज नाही की ज्याच्या कोणत्याच समस्या नाही. आदिवासी समाजाचे जीवन अगदि संकटमय अवस्थेत व्यतीत होत आहे. शेकडो वर्षापासून उपेक्षित असलेल्या या समाजातील समस्यांकडे अलीकडच्या काळात लक्ष पुरविले जात आहे असे अभ्यासकास वाटते. आदिवासी समाज आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय समस्यांना तोंड देत आहे. आदिवासी समाजासमोर असलेल्या या समस्या नवीन नाहीत. या समाजाच्या समस्याची पाळेमुळे प्राचीन काळापासून या समाजात रोवली गेली आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रयत्न होऊन देखील आदिवासी समाजाचे कष्टचर्य संपलेले नाही किंवा त्यांच्या समस्या कमी झालेल्या नाहीत. आदिवासी समाजाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आदिवासी समाजातील समस्या मुलभूत व सार्वत्रिक स्वरुपाच्या आहेत. आदिवासी समाज हा आजही आपल्या अन्न, वस्त्र व निवारासारख्या मुलभूत प्रश्नांची सोडवणूक करु शकला नाही असे अभ्यासकास वाटते. आदिवासी समाजात निर्माण होणाज्या समस्या जटिल आहेत. निरक्षरता, अज्ञान, दारिद्रय, बेकारी, बालमृत्यु, अनारोग्य, कुपोषण, व्यसनाधीनता व नैसर्गिक अरिष्टासारख्या समस्यांशी आदिवासी समाज नेहमी झ ुंजतांना दिसतो. या समस्या आदिवासींच्या आचार-विचार, राहणीमान, प्रथा-परंपरा, सभ्यता, धर्म, ललीत कला इत्यादींशी

संबंधीत आहेत. बाह्य लोकांच्या सांस्कृतिक प्रभावामुळे ते आपल्या मुळ संस्कृतीपासून दूर जात आहेत. आर्थिक बाबतीत त्यांचे सर्वप्रकारचे शोषण होत आहे. त्यामुळे आर्थिक शोषण आणि दारिद्रयाची समस्या निर्माण झाली. कर्जबाजारीपणामुळे ते सावकाराच्या जाळ्यात सापडले आहेत. पुरेसे आणि पौष्टीक अन्न न मिळाल्यामुळे त्यांच्या अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण झालेल्या अभ्यासकास दिसून येतात. त्यांच्यात मद्यपान, वेश्यावृत्ती इत्यादी समस्या निदर्शनास येतात. सर्वच आदिवासी जमातीच्या समस्या या सारख्या नाहीत. काही आदिवासी जमातीत परिवर्तनाची गती फारच मंद आहे. तर काही आदिवासी जमातीमध्ये परिवर्तनाची गती जास्त आहे. म्हणून परिवर्तनातून निर्माण झालेल्या समस्यांचे स्वरुप हे भिन्न आहे. एकाच भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी जमातींच्या समस्यांमध्ये भिन्नता दिसून येते. आदिवासी समाजातील समस्यांचे स्वरुप हे भिन्न असले तरी काही समस्या या सर्वच आदिवासी समाजात सामान्य आहेत. अशा सामान्य असणाऱ्या आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे अभ्यासकास वाटते.

भारतातील सर्वच आदिवासी समाजाच्या दारिद्रय निरक्षता, कर्जबाजारीपणा, दुरावा, शेती विषयक आणि शोषण इत्यादी समस्या आहेत. या समस्यांमुळे त्यांचा विकास होण्यात अडथळे निर्माण झाले आहेत असे अभ्यासकाचे ठाम मत आहे. प्रस्तुत घ्आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्याङया शोधनिबंधात आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्यांचे अध्ययन केले आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्ट :-**

१) आदिवासी समाजाच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे.

२) आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक समस्यांचे अध्ययन करणे.

**अभ्यासाचे गृहितकृत्य :-**

आदिवासी समाज आजही अनेक समस्यांना सामोरा जात आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यासकाने विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला असुन शोध निबंधातील विवेचन दुय्यम सामग्रीवर अवलंबुन आहे. यासाठी विविध ग्रंथ, पुस्तके इत्यादींचा उपयोग केला आहे.

**विश्लेषण :-**

भारतातील इतर समुदायापेक्षा आदिवासी समाजाची पार्श्वभूमी वेगळी आहे. म्हणून आदिवासी समाजाच्या समस्यांची कारणे आणि त्या समस्यांचे स्वरुप वेगळे असल्याचे आढळून येते. आदिवासी समाज हा एका विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात राहतो. त्यांची सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परिस्थिती ही इतर लोकांपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे इतर समाजापेक्षा आदिवासी समाजाच्या समस्या या वेगळ्या आहेत. आदिवासी समाजात समस्या निर्माण होण्यासाठी नैसर्गिक, प्रशासकीय व बाह्य घटकांनी चालना दिल्याचे आढळुन येते. काही समस्या आदिवासी जनतेच्या परंपराप्रियता किंवा सनातनी विचारधारेच्या प्रभावानेही निर्माण झाल्याचे अभ्यासकास दिसुन येते. आदिवासी समाजाच्या पांरपारीक आणि स्थिर जीवनात बराच बदल होत आहे. या सर्व कारणांमुळे आदिवासी समाजाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या प्रस्तुत घ्आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्याङया शोधनिबंधातुन अभ्यासक मांडत आहे, त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) आदिवासी समाजाच्या सामाजिक समस्या - (Social Problems of Tribal Society)**

**१) दारिद्रयाची समस्या (Problems of Poverty) :-**

'अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजांची पुर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्रय होय.' आदिवासी समाजाची दारिद्रय ही एक अत्यंत महत्वाची समस्या आहे. आदिवासी लोकांचे पारंपारिक व्यवसाय आहेत. या व्यवसायातुन विशेष उत्पन्न मिळत नाही ते आपल्या मुलभुत गरजांची देखील पुर्तता करु शकत नाही. त्यामुळे आजही बहुतांश आदिवासी लोक गरीब आणि दारिद्रयात खितपत पडले आहेत. त्यामुळे ही देशातील संपुर्ण आदिवासी समाजाची महत्वपुर्ण अशी समस्या आहे. दारिद्रय ही आर्थिक समस्या आहे. त्याचप्रमाणे सामाजिक समस्यादेखील आहे. ही समस्या व्यक्तीला मिळणाऱ्या अल्प उपन्नामुळे निर्माण होते. उत्पन्न अल्प असल्यामुळे व्यक्ती आपल्या जीवनावश्यक गरजांची पुर्तता करु शकत नाही. अल्प किंवा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींचा जीवनस्तर हा कनिष्ठ असतो. दारिद्रयाची समस्या निर्माण होण्यास आर्थिक कारणाबरोबरच सामाजिक कारणेदेखील जबाबदार आहेत. दारिद्रयाच्या समस्येतून गुन्हेगारी, आत्महत्या, घटस्फोट, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती, बालगुन्हेगारी इत्यादी सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून दारिद्रय ही केवळ आर्थिक समस्याच नाही तर ती एक सामाजिक समस्यादेखील आहे. दारिद्रयातुनच व्यक्तीगत आणि सामाजिक विघटन घडून येते असे अभ्यासकास वाटते.

आदिवासी समाजात दारिद्रयाची समस्या किती भिषण आहे याची कल्पना येते. आदिवासी समाजातील दारिद्रय नष्ट व्हावे म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने विविध उपाययोजना केल्या आहेत. परंतु आदिवासींना या उपाययोजनांची माहिती नसते. आदिवासींच्या कल्याणाकरीता येणारा पैसा हा लाभार्थी आदिवासीपर्यंत कधी पोहचत नाही. इतर लोक त्या योजनांचा फायदा घेतात. त्यासंदर्भात कुणी तक्रारदेखील करीत नाही. म्हणून आदिवासी लोक वर्षानुवर्ष दारिद्रयातच खितपत पडलेले आढळतात असे अभ्यासकास वाटते.

**२) निरक्षरतेची समस्या - (Problem of Illiteracy) :-**

"एखादी गोष्ट समजुन घेऊन लिहिण्या, वाचण्याची क्षमता म्हणजे साक्षरता, अशी साक्षरतेची एक ढोबळ व्याख्या केली जाते. अर्थातच या क्षमता ज्यांच्याजवळ नाही तो निरक्षर होय." आदिवासी क्षेत्रांमध्ये शिक्षणाच्या प्रसारामुळेच आदिवासींचा संपुर्ण विकास होऊ शकतो. अज्ञानाच्या अंधारास दुर करुन प्रकाशाचा, चैतन्याचा उदय होणे म्हणजे शिक्षणाचा प्रसार होय. शिक्षणामुळेच लोकांमध्ये आपल्या भोवतालच्या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक घटनांची माहिती प्राप्त होते आणि त्या संदर्भात लोक जागृत होतील. म्हणून शिक्षणाचे विशेष महत्व आहे असे अभ्यासकाचे ठाम मत आहे. आदिवासींमध्ये प्रचंड प्रमाणात निरक्षरता आहे. आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे अल्प प्रमाण आहे. परिणामी शासनाने त्यांच्यासाठी विविध योजना पुर्णपणे व खऱ्याअर्थाने त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. निरक्षरतेमुळे आदिवासींचा सामाजिक विकास होऊ शकलेला नाही. निरक्षरतेमुळे त्यांच्यात अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा, अंधविश्वास आणि वाईट संस्कार आढळतात. अज्ञानामुळे त्यांचे जीवन अंध:कारमय झाले आहे.

**३) व्यसनाधीनता :-**

आदिवासी समाजातील बहुतांशी लोकसंख्या पारंपारीक व्यवसायात गुंतलेली आहेत. त्यात मद्यनिर्मिती त्यांचा पारंपारीक व्यवसाय आहे. अज्ञान, आरोग्य जागृतीचा अभाव यामुळे आदिवासी व्यसनाधीनतेकडे वळतात. त्यामुळे त्यांचा अपेक्षित सामाजिक विकास होऊ शकलेला नाही असे अभ्यासकाचे मत आहे.

**४) अंधश्रध्दा व जुन्या पध्दती :-**

आदिवासींची संस्कृती प्राचीन संस्कृती म्हणून ओळखली जाते. पारंपारीकता हा त्यांचा जीवनशैलीचा घटक आहे. आधुनिक काळातदेखील आदिवासी समाज पांरपारीकतेशी चिकटुन आहेत. उदा. जादू - टोणा, अंगारे-धुपारे,

ताईत, चेटकीन इ. प्रकारच्या अंधश्रध्दा आदिवासी पाळतात. अंधश्रध्देच्या मानसिकतेत अडकलेली असल्यामुळे त्यांचा सामाजिक विकास खुंटलेला आहे.

**५) राहणीमानाचा निम्नस्तर :-**

भारतातील प्रगत समाजाशी आदिवासींची तुलना केल्यास ही बाब स्पष्ट होते की, त्यांचा जीवनमानाचा दर्जा खालावलेला आहे. निकृष्ठ दर्जाचा आहार, कुपोषण, पारंपारीकता, निरक्षरता, उत्पन्नाची अपुरी साधने इ. कारणांमुळे त्यांच्या जीवनावश्यक गरजादेखील पुर्ण होऊ शकत नाहीत. परिणामी त्यांच्या सामाजिक विकासात अडथळे निर्माण झालेले आहेत.

**ब) आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक समस्या -** (Cultural Problems of Tribal Society)

**१) बालविवाहाची समस्या :-**

पुर्वी आदिवासी समाजात बालविवाहाची समस्या नव्हती. परंतु हिंदू समाजाच्या संपर्कामुळे आदिवासींमध्ये बालविवाहाचे प्रचलन झाले. मुलामुलींचे बालवयात विवाह होत असल्यामुळे बालमृत्यू, बालमातामृत्यूचे प्रमाण वाढलेले दिसते.

**२) युवागृहाचा ऱ्हास :-**

आदिवासी समाजात युवागृहाचे फार महत्व आहे. परंतु बाह्य संस्कृती तसेच औद्योगिकरण, शहरीकरणाच्या प्रभावाने युवागृहाचा ऱ्हास होत आहे. जी संस्था सामाजिक व संस्कृती मुल्य रुजविण्याचे काम करीत असे आज ती जवळ जवळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. आजच्या तरुणपिढीला युवागृहाचे महत्व वाटत नाही. या युवागृहाच्या पतनामुळे सांस्कृतिक जीवनावर फार मोठा आघात झाला आहे असे अभ्यासकाचे स्पष्ट मत आहे.

**३) सांस्कृतिक भिन्नतेची समस्या :-**

ब्रिटीश सत्ताधारी लोक तसेच जमिनदारांच्या संपर्कामुळे आदिवासींमध्ये एक प्रकारचा न्युनगंड निर्माण झाला. या लोकांनी आदिवासींची सुधारणा घडवून आणण्याचे ठरविले परंतु प्रत्यक्षात मात्र अनेक आदिवासींना ख्रिस्ती बनविले. काही आदिवासींनी हिंदु धर्मात प्रवेश केला. कारण हिंदु धर्मात प्रवेश केला तर आपली प्रतिष्ठा वाढेल अशी त्यांची समजून होती. परंतु या धर्मांतराचा परिणाम असा झाला की, स्वतःच्या परंपरा, रुढी, चालीरीती व संस्कृती परक्या वाटु लागल्या व परकीयांच्या चालीरीती त्यांना आदर्श व अनुकरणीय वाटू लागल्या. अशी सांस्कृतिक तणाव व विरोधाची भावना निर्माण झाली.

**४) भाषेची समस्या :-**

आधुनिक समाजाच्या संपर्कात आलेल्या आदिवासींनी सभ्य समाजाच्या भाषेचा स्विकार केला व स्वतःच्या भाषेचा त्याग केला. त्यामुळे आदिवासींचे स्वतःच्या भाषेवरचे प्रेम उडाले व काही लोक तर आपली भाषा पुर्णपणेच विसरले. भाषा म्हणजे विचार व संस्कृती यांचे संचारण करण्याचे एक साधन होय. भाषा ही प्रतिकरुप असते. भाषा बदलली की प्रतिके व अर्थही बदलतात. प्रत्येक समाजाची संस्कृती तिच्या भाषेद्वारे व्यक्त होते. परकीय भाषेचा स्विकार व आपल्या भाषेचा त्याग म्हणजे आपल्या स्वाभाविक स्वसंस्कृतीचा हळूहळू त्याग करणे होय. इतरांच्या जीवन पध्दतीशी पुर्णपणे समरस न होता स्वतःच्या परंपरागत जीवन पध्दतीचा त्याग केलेले आदिवासी एक सांस्कृतिक पोकळीमध्ये जीवन जगत आहेत. ही सांस्कृतिक पोकळी अनेक प्रकारच्या आंतरीक प्रश्नांना जन्म देते.

**निष्कर्ष :-**

भारतीय आदिवासी समाज आजही अनेक समस्यांना सामोरा जात आहे. शासनाने आदिवासींच्या विकासासाठी केलेल्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होतांना दिसत नाही. त्यामुळे आदिवासींची आर्थिक समस्या कायम आहे. घटनात्मक तरतुदी असल्या तरी आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास फारसा झालेला नाही. आदिवासींमध्ये अज्ञान व निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. आदिवासींची व्यसनाधीनता कमी झालेली दिसत नाही. आदिवासींमध्ये अज्ञान, मागासलेपणा, दारिद्रय, बेरोजगारी, अल्प वेतन यामुळे आर्थिक विकास झालेला नाही. एकंदरीत घ्आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक समस्याङ्या अभ्यासासाठी जे उद्दिष्ट अभ्यासकाच्या डोळ्यासमोर होते, त्यानुसार संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता जो निष्कर्ष आढळला तो निष्कर्ष या अभ्यासासाठी धरलेले गृहितक सिध्द करते असे ठामपणे सांगता येते.

**शिफारशी :-**

१) आदिवासी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करण्याकरिता संसाधने विकसित व समृध्द करणे.

२) आदिवासींच्या विविध भाषा, लिपीच्या विकासासाठी उपाययोजना कराव्यात.

३) आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत.

४) आदिवासी समाजाला त्यांच्या स्थानिक बोलीभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे.

५) आदिवासी संस्कृतीचे जतन करणे.

६) आदिवासींना इतर समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांच्यात जनजागृती करणे.

७) आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासासाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

८) आदिवासी समाजातील मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहीत करणे.

**संदर्भ :-**


१) गारे गोविंद - घ्महाराष्ट्रातील आदिवासी जमाती - सामाजिक व सांस्कृतिक मागोवाङ, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे

२) गारे गोविंद - घ्भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृतीङ, आदमी प्रकाशन, पुणे

३) लोटे रा. ज. - घ्आदिवासी समाजाचे समाजशास्त्रङ, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर, दुसरी आवृत्ती-जुलै-२०१०.

४) जाधव सुधाकर एल. - घ्भारतातील आदिवासी समाजङ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, ९ मे २०१२.

५) आगलावे प्रदिप - घ्आदिवासी समाजाचे समाजशास्त्रङ, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर-१०, पाचवे पुनर्मुद्रण - ऑक्टोबर-२०१२

६) खडसे भा.कि. - घ्भारतीय समाज आणि सामाजिक समस्याङ, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई.

७) महाजन जयश्री, बडगे सागर - घ्आदिवासी समाज : प्रश्न आणि आव्हानेङ, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे

८) आगलावे प्रदिप - घ्भारतीय समाज संरचना आणि समस्याङ, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती-२००३.

९) आदिवासी लोकांशी केलेली चर्चा.


◆◆◆

*Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# वैश्वीकरण एवं लोक प्रिय संस्कृति - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ.दिलीप कुमार सोनी**
सहायक प्राध्यापक समाजशास्त्र
शासकीय कन्या स्त्राकोत्तर महाविद्यालय, सीधी मध्यप्रदेश

सारांश

संपूर्ण विश्व को एक अर्थव्यवस्था तथा बाजार बनाया जाना तथा लोकप्रिय संस्कृति इन दोनों को जोड़ने में एक महत्वपूर्ण भूमिका निभाती है एक दृष्टिकोण के अनुसार उपभोक्ता वरदान है क्योंकि लोकप्रिय संस्कृति लोगों में भौतिक वस्तुओं की इच्छा जागृत करती है किंतु एक दूसरा उपभोक्तावाद की प्रवृत्ति को बढ़ावा देने वाले के रूप में देखता है और इसीलिए शोषणकारी मानता है। **सोरोस वैश्वीकरण को** वैश्विक वित्तीय बाजारों के विकास अंतराष्ट्रीय निगम के विकास तथा राष्ट्रीय अर्थव्यवस्थाओं पर उनके प्रवुद्ध में वृद्धि के अर्थ के रूप में लेते हैं। (2000:1) **दूसरे शब्दों में** इसे अंतरराष्ट्रीय व्यापार में बाधाओं जैसे शुल्क निर्यात शुल्क तथा आयात कोटा आज में कमी किए जाने के द्वारा वस्तुओं तथा सेवाओं के उत्पादन के वैश्विक वितरण के रूप में समझा जाता है

एक लोकप्रिय विचार के अनुसार वैश्वीकरण की उत्पत्ति आधुनिक युग में विकास एवं संपर्क शीलता के एक परिणाम के रूप में द्वितीय विश्वयुद्ध की समाप्ति के पश्चात हुई उसके बाद जो कुछ भी हुआ वह देशों की सीमाओं के आर-पार व्यापार विचारों तथा संस्कृति का परस्पर भिन्न में था हालांकि एक विरोधी तक इसकी उत्पत्ति को प्राचीन सभ्यता के साथ जोड़ता है तथा सिंधु घाटी सभ्यता एवं सुमेरिया सभ्यता के बीच उमरिया सभ्यता के बीच के व्यापारिक संबंधों की ओर इशारा करता है इसके बाद ग्रीस मिस्र रोमन साम्राज्य सहित इसी प्रकार अनेक अन्य देशों के बीच व्यापार होने लगा था या व्यापार की आवश्यकता थी कि विभिन्न व्यवसायिक मार्गों जिसका रेशम मार्ग एक उदाहरण है को विकसित किया जाए |

अन्द्रे गुंडर फ्रैंक के अनुसार , "उस समय 1500 ई. के बाद श्रम तथा वैश्विक व्यापार के एक विश्व व्यापार विश्वव्यापी विभाजन के साथ मात्र एक ही वैश्विक अर्थव्यवस्था थी" ( 1998:52 ) जबकि जेंरी बेंटले का तर्क है कि 1580 के पूर्व व्यापारिक नेटवर्क यूरेशिया एवं उप सहारा वाले अफ्रीका के लगभग समस्त क्षेत्रों तक पहुंच चुका था तथा वाणिज्य की बड़ी मात्रा में कृषि एवं औद्योगिक उत्पादन के विशिष्ट करण को प्रोत्साहित कर दिया था (1999: 7) | वास्तव में जहां सन 1500 के बाद भी बाद की अवधि पर "सही मायने में वैश्विक इतिहास की एक वैश्विक युग के उद्घाटन के रूप में दृष्टि डालते हुए कुछ लोग वैश्वीकरण के विस्फोट को सन 1492 के साथ जोड़ते हैं जब क्रिस्टोफर कोलंबस ने मसालों की खोज में अमेरिका को ठोकर मार दी थी और सन 1498 के साथ भी जब वास्कोडिगामा ने अफ्रीका के चारों ओर एक परिक्रमा को पूरा कर लिया था और अरब तथा वेनिस के मसाला व्यापारियों से एकाधिकार को छीन लिया था "। ( बेंटले 1996 : 768 - 969)।

19वीं शताब्दी में हुई औद्योगिक क्रांति वैश्वीकरण के इतिहास के प्रमुख अवधियो में से एक थी, वह इसलिए क्योंकि इस दौरान उत्पादों की मात्रा एवं गुणवत्ता में महत्वपूर्ण वृद्धि हुई थी तथा इसके कारण अधिक निर्याती एवं वेहतर व्यवसायिक संबंधों को आधार प्राप्त हुआ । यह उपनिवेशवाद एवं साम्राज्यवाद था, जिसने व्यापार में आगे और अधिक योगदान दिया और फिर ,प्रथम विश्व युद्ध के साथ ही 'वैश्वीकरणपूर्व' के नाम से ज्ञात अवधि का समापन हो गया।

वैश्वीकरण जैसा कि आधुनिक अर्थो मे इसे समझा जाता है कि विश्व युद्ध के बाद अस्तित्व में आया युद्ध के पश्चात विश्व के नेताओं ने बाधाओं को समाप्त किए जाने तथा संपूर्ण विश्व के विभिन्न देशों के बीच व्यवसायिक संबंधों को प्रोत्साहित किए जाने का निर्णय लिया इसके अलावा भारत श्रीलंका तथा इंडोनेशिया जैसे देशों के द्वारा स्वतंत्रता प्राप्त कर लिए जाने के साथ ही राष्ट्रों के बीच आर्थिक सहयोग की आवश्यकता अनिवार्य हो गई।

अगला कदम था संयुक्त रास्ट्र संगठन की स्थापना किया जाना और इसके बाद अगला कदम था संयुक्त राष्ट्र संगठन की स्थापना किया जाना और इसके बाद विश्व व्यापार संगठन एवं अंतर्राष्ट्रीय मुद्रा कोष का गठन किया जाना अंतरराष्ट्रीय मुद्रा कोष वैश्वीकरण के चार आधारभूत पहलुओं की पहचान करता है। ( आई एम एफ 2000 )

1 . व्यापार एवं लेनदेन: बीसवीं सदी के प्रारंभ होने के साथ ही अंतरराष्ट्रीय वाणिज्य एवं व्यापार फला फूला मुख्यतः उन्नत हो चुके परिवहन एवं संचार विशिष्ट आर्थिक क्षेत्रो सरकारों तथा देशों के बीच कर संबंधी प्रतिस्पर्धाओं के कारण।

2 . पूंजी का प्रवाह : ऐसे माल सेवाओ तकनीकों तथा और कहीं अधिक महत्वपूर्ण रूप से पूंजी के सीमा पर आवागमन में होने वाली वृद्धि के कारण हुआ जिससे संपूर्ण विश्व की राष्ट्रीय अर्थव्यवस्था में आर्थिक रूप से निरंतर एक दूसरे पर आश्रित होती चली गई इसे आर्थिक वैश्वीकरण के रूप में संदर्भित किया जाता है जिसमें उत्पादन बाजारों प्रतिस्पर्धा तकनीक निगम तथा उद्योगों को शामिल किया जाता है। ( जोशी 2009)

3. जनता का आवागमन : वैश्वीकरण के परिणाम स्वरूप देशों एवं राष्ट्रों के बीच अंतर सांस्कृतिक संपर्क संभव हो सका है शादी यात्रा तथा पारगमन के लिए अंतरराष्ट्रीय अप्रवासन इन सब ने लोगों को वैश्विक नागरिक के रूप में बदल दिया है।

4. ज्ञान का वितरण सूचना तक पहुंच : इंटरनेट पर दोनों अर्थात एक उत्पाद होने तथा वैश्वीकरण के उत्प्रेरक होने के रूप में निगाह डाली जा सकती है|

हालांकि एक बेहतर समाज के लिए हम वैश्वीकरण पर निम्नलिखित मुख्य श्रेणियों के अंतर्गत चर्चा कर सकते हैं –

1. आर्थिक : "सांगवान 2000" के अनुसार आर्थिक वैश्वीकरण से वस्तुओं एवं सेवाओं के सीमा पार व्यापार अंतर्राष्ट्रीय पूंजी के प्रवाह तथा तकनीकों के व्यापक एवं तीव्र प्रसार के बढ़ते हुए पैमाने के एक परिणाम

के रूप में वैश्विक अर्थव्यवस्थाओं की बढ़ती हुई परस्पर निर्भरता से है । यह बाजार की सीमाओं के निरंतर जारी विस्तार एवं साझा एकीकरण को प्रतिबिंबित करती है तथा सहस्राब्दी के मोड़ पर संपूर्ण विश्व में आर्थिक विकास के लिए एक अपरिवर्तनीय प्रवृत्ति है सभी प्रकार की उत्पादक गतिविधियों तथा बाजारीकरण दोनों में सूचनाओं का तेजी से बढ़ता हुआ महत्व आर्थिक वैश्वीकरण की दो प्रमुख प्रेरक शक्तियां है।

2. सांस्कृतिक : सांस्कृतिक वैश्वीकरण विचारों अभिवृत्तियो एवं मूल्यों का सीमाओं के आर पार तीव्र गति से होने वाला आदान-प्रदान है सन 1960 के दशक के प्रारंभ में कैनेडियाई साहित्यिक आलोचक मार्शल मैक्लुहान 'वैश्विक ग्राम' शब्द को लोकप्रिय बनाया था ताकि उस प्रभाव का वर्णन किया जा सके जो विश्व को तक्षण संपर्क करने एवं विचारों का आदान प्रदान करने की योग्यता से प्राप्त हो सकेगा विचारों को साझा किया जाना सामान्यता विभिन्न संस्कृतियों एवं जीवन शैली से संबंधित लोगों को अधिक परस्पर संपर्कशीलता एवं अंतः क्रिया की ओर ले जाता है जिसके सकारात्मक तथा नकारात्मक दोनों ही परिणाम हो सकते हैं परिणाम स्वरूप जैसे-जैसे तकनीक ने इस प्रक्रिया को गति प्रदान की वैसे ही इस में भारी मात्रा में विवाद भी उत्पन्न हो गए हैं।

3. राजनीतिक : वैश्विक परिस्थितिकी परिवर्तनों पहले से कहीं अधिक एकीकृत वैश्विक अर्थव्यवस्था तथा अन्य वैश्विक प्रवृत्तियो के साथ वैश्विक स्तर पर राजनीतिक गतिविधियों में निरंतर वृद्धि हो रही है। बी एम मोघातम के अनुसार राजनीतिक वैश्वीकरण से आशय बहुपक्षवाद ( जिसमें संयुक्त राष्ट्र संघ एक प्रमुख भूमिका निभाता है ) की दिशा में एक उभरते हुए अंतरराष्ट्रीय सरकारी अमले की दिशा में तथा राष्ट्रीय एवं अंतरराष्ट्रीय गैर सरकारी संगठनों जो सरकारों पर निगरानी रखने का कार्य करते हैं तथा जिन्होंने अपनी गतिविधियों एवं प्रभाव में वृद्धि कर ली है की ओर बढ़ती हुई प्रवृत्ति से है (2005 : 35)

भारत के मामले में विदेशी मुद्रा की कमी के परिणाम स्वरूप उत्पन्न एक प्रमुख संकट के बाद अर्थव्यवस्था को 90 के दशक के प्रारंभ में खोला गया था उसके बाद किए गए नए आर्थिक सुधारों को उदारवाद निजी करण तथा वैश्वीकरण के शीर्षको के अंतर्गत रखा गया। इस प्रकार से एलपीजी मॉडल का उद्देश्य था भारतीय अर्थव्यवस्था को सर्वाधिक तीव्र गति से विकसित हो रही तथा विश्व में सर्वाधिक प्रतिस्पर्धा पूर्ण अर्थव्यवस्था बनाया जाना योजना के भाग के रूप में प्रारंभ किए गए बड़े उपायों में वित्तीय सुधारों के अलावा शामिल थे अवमुल्यन विनिवेश औद्योगिक लाइसेंसिंग राज्य का समाप्त किया जाना प्रत्यक्ष विदेशी निवेश की अनुमति प्रदान किया जाना तथा आयतों पर मात्रात्मक प्रतिबंध को समाप्त किया जाना संस्कृति के क्षेत्र में भारत को भी अनावृत होने का अवसर प्राप्त हुआ सांस्कृतिक वैश्वीकरण के एक भाग के रूप में मीडिया के अंतरराष्ट्रीय गतिशीलता जिसने आर्थिक उदारीकरण का अनुसरण किया ने केवल टेलीविजन की प्रस्तुतियों तथा राज्य संचालित टेलीविजन के बीच प्रतिस्पर्धा के साथ-साथ हॉलीवुड की फिल्मों एवं हिंदी फिल्मों के बीच प्रतिस्पर्धा को जन्म दे दिया। अर्जुन अप्पू दुरई ने प्रसिद्धि पूर्वक तर्क दिया कि वैश्वीकरण के परिणाम स्वरूप "संस्कृति जागरूक चयन अवचित्य एवं प्रतिनिधित्व के लिए एक क्षेत्र बन चुकी है " (2006:44) जहां भारतीय

प्रवासियों ने संस्कृतियों के सीमा पार आदान-प्रदान में एक महत्वपूर्ण भूमिका निभाई वहीं भारतीय संस्कृति का अमेरिकी करण वैश्विक विनिमय का एक उत्पाद भी था।

**वैश्वीकरण के प्रभाव** : निःसंदेह वैश्वीकरण संपूर्ण विश्व में बढ़ती हुई प्रतिस्पर्धा को जन्म दे दिया है। ऐसे लाभदायक पहलू है जो उत्पादकता एवं क्षमता में वृद्धि करते हैं प्रतिस्पर्धा एवं पढ़ते हुए बाजार का क्षेत्र विशेषज्ञता तथा श्रम कि उन्नत विभाजन की ओर ले जा सकता है पैमानों एवं संभावनाओं की ऐसि अर्थव्यवस्थयें भी विद्यमान है जिनका लागतो तथा मूल्यों पर लाभदायक प्रभाव पड़ता है तथा जो आर्थिक विकास के लिए शक्तिशाली संवेग प्रदान करती हैं दूसरी ओर वैश्वीकरण की लागत विभिन्न स्तरो पर संघर्ष को जन्म दे सकती है विशेष तौर पर इसलिए क्योंकि वैश्वीकरण के लाभार्थियों में से अनेक आर्थिक सहयोग एवं विकास हेतु संगठन के ( ओ ए सी डी ) अमीर राष्ट्र रहे हैं तीव्र गति से विकसित हो रही अर्थव्यवस्था विशेष तौर पर एशियाई के द्वारा अमीर देशों के एक समूह में प्रवेश किए जाने किंतु अफ्रीका लैटिन अमेरिका तथा यहां तक कि कुछ पूर्वी एवं मध्य यूरोपीय देशों के भी और अधिक पिछड़ जाने के साथ ही शुद्ध परिणाम अभिसरण नहीं हो रहा है बल्कि इसके बजाय आए का विश्वव्यापी क्षेत्र आओ रहा है वितरण का मुद्दा मानक संबंधी एक बड़ी चुनौती एवं वैमनस्य का स्रोत बन जाता है कुछ क्षेत्रीय एवं वैश्विक अस्थिरताये भी मौजूद हैं जिनकी जड़ें अर्थव्यवस्थाओं की पारस्परिक निर्भरता में समाई हुई है यह स्थानीय आर्थिक उतार चढ़ाव तथा किसी ऐसे देश के संकट में क्षेत्रीय एवं यहां तक कि वैश्विक प्रभाव के साथ प्रकट होती है।

सकारात्मक बिंदु

1 बेहतर संगठित बाजार : किसी भी विकासशील अर्थव्यवस्था के लिए संगठित एवं प्रभाव उत्पादक बाजारों का होना अनिवार्य होता है यदि ऐसे इच्छुक ग्राहक मौजूद हो जो ऐसे गुणवत्ता युक्त उत्पादों एवं सेवाओं को खरीदने के लिए भुगतान करने को तैयार हो जो बिक्री के लिए उपलब्ध है तो ऐसे संतुलन को बनाए रखा जा सकता है जो एक कुशल बाजार को सुविधाजनक बनाता है मुक्त अर्थव्यवस्था एवं बेहतर व्यापार के साथ उत्पादों सेवाओं का बाह्यस्रोत संभव है तथा उसके द्वारा यदि संभव हो तो गुणवत्ता में भी सुधार भी और वह भी घटी हुई लागत पर। एक विक्रय मूल्य का परिणाम बढ़ी हुई मांग तथा क्रय शक्ति हो सकता है।

2 प्रगतिशील प्रतिस्पर्धा : जितने अधिक उत्पादक होंगे प्रतिस्पर्धा के अनुसार वस्तुओं एवं सेवाओं की गुणवत्ता भी उतनी ही बेहतर होगी और ऐसी किसी भी परिस्थिति से मात्र उपभोक्ता का लाभ होगा जैसे-जैसे व्यापार अंतरराष्ट्रीय सीमाओं को पार करता गया वैसे-वैसे अधिकाधिक विकल्प उपलब्ध होते गये तथा मानक ऊंचे होते गए यह कि प्रत्येक उत्पादक अपने उत्पाद में सुधार करने की एक सतत प्रक्रिया के अधीन बना रहेगा तथा कई बार किमतो को भी घटायेगा।

3 मुक्त वाणिज्य एवं व्यापार को प्रोत्साहन : विभिन्न दोहरे करो शुल्को तथा पुंजी पर नियंत्रण को समाप्त किए जाने परिवहन लागत में कमी लाए जाने तथा बुनियादी ढांचे को विकसित किए जाने से मुक्त

व्यापार को संभव बना दिया है इसके अलावा वैश्वीकरण का परिणाम अन्य देशों में अनेक व्यवसाय में संचालन को स्थापित किए जाने अथवा क्रय कर लिए जाने के रूप में भी सामने आया है जब कोई विदेशी कंपनी किसी देश में निवेश करती है संभवत किसी कारखानों अथवा शॉपिंग मॉल का निर्माण करके तो इसे आगत निवेश कहा जाता है तथा कंपनियां जो अनेक देशों में संचालन करती है को बहुराष्ट्रीय निगम अथवा अंतरराष्ट्रीय निगम कहा जाता है उदाहरण के लिए अमेरिका की फास्ट फूड श्रृंखला मैकडॉन्लड एक बहुराष्ट्रीय निगम है जिसके पास 119 देशों में लगभग 30,000 रेस्टोरेंट है अंतर्राष्ट्रीय निगम विकास को गति एवं अर्थव्यवस्था को प्रगति प्रदान करते हैं।

नकारात्मक बिंदु

1. परस्पर निर्भरता : सभी अर्थव्यवस्था एक साथ संबद्ध है अतः जब भी किसी एक बाजार में गिरावट आती है तो विश्व की अर्थव्यवस्था धराशाई हो जाती है उदाहरण के लिए जब अमेरिका के बाजार किसी आपदा में गिर जाते हैं तो अन्य देश भी प्रभावित होते हैं क्योंकि अमेरिका की क्रय शक्ति समाप्त हो जाती है।
2. आर्थिक प्रभुसत्ता की हानि : प्रायः ये शक्तिशाली देश बहुराष्ट्रिय संस्थाएं तथा अंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थान होते हैं जो अंततः किसी देश की अर्थव्यवस्था पर नियंत्रण प्राप्त कर लेते हैं और इसके परिणाम स्वरूप राष्ट्रीय प्रभुसत्ता निरंतर एवं व्यवस्थित आधार पर छिंड हो जाती है ऐसे निराशा बाद राष्ट्रवाद लोकलुभावनबाद अज्ञात जनों से नफरत तथा कट्टरपंथी एवं असहमति पूर्ण राजनीतिक आंदोलनों के उद्भव का कारण रहा है
3. शोषण : अंतरराष्ट्रीय कानूनों का कठोरता पूर्वक परिवर्तन किए जाने के अभाव का अर्थ है कि अंतरराष्ट्रीय निगम आर्थिक रूप से अपेक्षाकृत विकसित देशों में इस प्रकार से कार्य संचालन कर सकते हैं जिससे आर्थिक रूप से अधिक विकसित देशों में अनुमति प्रदान की जा सकती इस बात का जोखिम बना रहता है कि खराब कार्य परिस्थितियां लागू कर दी जाए और स्थानीय श्रमिकों को कम मजदूरी दी जा जाए।

REFERENCE


1. Appudurai, Arjun, modemity at large : cultural Dimensions of globalization , University of Minnesota press ,Minneapolis,2006
2. Bentley J.H.,"AHR Forum: Cross – Cultural Interaction and periodization in word history , American Historical Review, vol. 101,1996,pp.749-70.
3. "Asia in World History" , Education about Asia Vol.4,1999,pp.5-9
4. Brower, M. and Leon, W., The consumer's Guide to Effective Environmental Choices : Practical advice form the union of concerned scientists, Three Rives Press , New York ,1999.

5. Borwn, L.R., Eco Economy : Building an Economy for the earth ,W.W.Norton & Company Inc., New York ,2001
6. Frank ,A.G., ReOrient : Global Economy in the Asian Age ,University of California press ,
7. Gardner, G.and Berkeley ,1998stern P., Environmental Problem and Human behavior (2nd edn), Person custom Publishing , Boston, MA,2002,
8. joshi, Rakesh Mohan, International Business, Oxford University Press, New Delhi,2009.
9. Kanner, A.D. and Gomes, M.E. "The All-counsuming Self", in T. Roszak,M.E. Gomes and A.D. Kanner (eds), Ecopsychology : Restoring the Earth ,Healing the Mind, Sierra Club Books, San francisco, CA,1995.
10. Mckibben, b., The End of Nature, Anchor Books, New York,1989.

◆◆◆

*Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

# हुंडा-एक सामाजिक समस्या

**प्रा.डॉ.आर.डी.खताळ**

कला व विज्ञान महाविद्यालय, गढी

ता.गेवराई, जि.बीड (महाराष्ट्र) ४३११२२

**प्रस्तावना :**

हुंड्याची प्रथा ही भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात अनादी काळापासून अस्तित्वात असलेली दिसून येते. यावरुन समाजातील स्त्रीचे स्थान, स्त्रीला समाजात असणारी किंमत याविषयी समाजाची मानसिकता लक्षात येते. हुंडा देणे आणि घेणे ही परंपरेने अस्तित्वात असलेली अनिष्ठ प्रथा आहे. हुंड्यापायी छळ होऊन अनेक तरुण मुलींना वैवाहिक जीवन संपवावे लागलेले दिसून येते. यामुळे समाजात विविध अडचणींना सामोरे जावून जीवन जगावे लागत आहे. यातून कुटूंबाची दुर्दशा, मुला-माता-पित्यांची ताटातूट होणे आणि वैवाहिक जीवनातून बाहेर पडलेल्या मुलींचे प्रश्नही निर्माण होताना दिसतात. म्हणूनच हुंडा ही एक प्रमुख सामाजिक समस्या ठरताना दिसून येते.

आजच्या काळात भारतात हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा मानला जातो. हुंडा ही लग्नाच्या वेळी मुलीच्या आई-वडिलाकडून मुलांच्या आई-वडिलांना कुटुंबाला देन्यात येणारी भेट होय, ही भेट पैसे, मालमत्ता किंवा वस्तू-सोने अशा स्वरुपात घेतली जाते. युरोप, आशिया, आफ्रिका आणि जगाच्या अन्य भागात हुंडा पध्दतीचा मोठा इतिहास आहे. भारतात याला हुंडा किंवा दहेज या नावाने ओळखले जाते. वधूच्या कुटुंबातर्फे नकद किंवा वस्तूच्या स्वरुपात हे वराच्या कुटुंबाला वधू बरोबर दिले जाते. आजच्या काळात हुंडा नावाचा राक्षस सर्वत्र पसरलेला आहे. भारतात तर हुंडा पध्दतीचे प्रस्थ अधिकाधिक वाढताना दिसते. भारतात सध्या सरासरी एक तासाला एक या प्रमाणे महिला हुंडा संबंधी कारणांनी मरण पावते आणि वर्ष २००७ ते २०११ या काळात अशा प्रकरणात अधिक वाढ झालेली आहे. विविध राज्यातून २०१२ मध्ये हुंडा बळीबाबतची ८२३३ प्रकरणे समोर आली होती.

**हुंडयाचा अर्थ :**

हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ च्या अधिनियमातील कलम २ अन्वये हुंडा या शब्दाची व्याख्या

मॅक्सी रॉडीन यांच्या मते, "हुंडा म्हणजे विवाहाच्या वेळी वराला त्याच्या पत्नीकडून मिळालेली संपत्ती होय." विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई-वडिलांना अथवा अन्य कोणत्याहीय व्यक्तीने किंवा तत्पूवी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी अप्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षतणे दिलेली किंवा देण्याचे माण्य केलेली कोणतीही संपत्ती अथवा मूल्यवान रोख असा आहे. परंतू त्यामध्ये ज्या व्यक्तिना मुस्लीम व्यक्तिगत कायदा लागू आहे अशा व्यक्ती च्या बाबतीत दहेज किंवा मेहेर यांचा समावेश होत नाही

**संशोधनाचा उद्देश :**

भारतातील हुंडा या सामाजिक समस्येच्या स्वरुपाची ओळख करुन घेणे .

**संशोधनासाठीचे गृहितके :**

भारतात हुंडयाची समस्या अस्तित्वात असून अलिकडच्या काळात या समस्येने उग्र स्वरुप धारण केलेले आहे.

**संशोधन पध्दती :**

'हुंडा-एक सामाजिक समस्या' या शोध निबंधाच्या मांडणीसाठी वर्णनात्मक आणि विशेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन केलेले आहे.

**हुंडयाची कारणे :**

भारतात हुंडा पध्दती रुढ होण्याची विविध कारणे आहेत. त्यातील काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे

१) सामाजिक प्रतिष्ठा

२) अज्ञान आणि अंधश्रध्दा

३) पारंपारिक विचारधारा

४) श्रीमंतीची ओढ

५) मुलांच्या शिक्षणावर झालेल्या खर्चाची भरपाई

६) सुखी-संपन्न जीवनाची आवड

७) सामाजिक मान्यतेची परंपरा

८) धार्मिक मान्यतेची प्रथा/वधु मुल्याची प्रथा

९) अंर्तविवाहाचा नियम

१०) अनुलोम विवाहाची प्रथा

११) नवीन संसाराची मांडणी

१२) स्त्रीसाठी विवाहाची अनिवार्यता

१३) मुलीतील कुरुपता

१४) नुकसान भरपाईचे तत्व

१५) भावनिकता

**हुंडयाचे परिणाम :**

हुंडयांच्या प्रथेचे व्यक्ती, कुटूंब समाजावर दूरगामी परिणाम होताना दिसतात. यातील प्रमुख परिणाम खालीलप्रमाणे-

१) आर्थिक पिळवणूक

२) मानसिक अस्थिरता/छळ

३) शारिरीक दुष्पपरिणाम/छळ

४) विजोड विवाहाच्या प्रथेला प्रोत्साहन

५) विवाहाचे बाजारीकरण

६) घटस्फोटाच्या प्रमाणात वाढ

७) आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ

८) वेश्यावृत्तीला प्रोत्साहन

९) अनेक मुलींच्या हत्त्याच्या प्रमाणात वाढ.

१०) मुलींच्या संख्येत घट

**उपाय योजना -**

अलिकडच्या काळातील हुंडयात वाढत्या प्रमाणावर उपाययोजना म्हणून खालील उपाय सागता येतील.

१) सामाजिक आंदोलनाची उभारणी

२) शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार

३) कुटुंबियांच्या मानसिकतेत बदल

४) मुलीच्या शिक्षणावर अधिकाधिक भर

५) स्त्री जागृती/साक्षरता

६) सामाजिक मानसिकतेत बदल

७) मुलींकडे पाहण्याच्या दृष्टीकोणात बदल

८) हुंडा- प्रतिबंधक कायद्याची कडक अमंलबजावणी

९) स्त्री मुक्ती आंदोलनाची उभारणी

**समारोप :**

आधुनिक काळात भारतीय समाजात हुंडा-एक प्रमुख सामाजिक समस्या बनत आहे. दैनंदिन वर्तमान पत्रात,मानसिकता, पाक्षिकात नियतकालिकात, त्रैमासिकात, स्थानिक दैनिकात हुंड्याबद्दलच्या बातम्या पाहावयास मिळतात यातील काही बातम्या तर गंभीर स्वरुपाच्या असतात हुंड्यासाठी पती कडून पत्नीचा छळ, हुंड्यामुळे आत्महत्या, खून, मारामारी इत्यादी वाइट घटना घडताना दिसतात. विशेषतःसुशिक्षित मुलीमध्ये विचार कमी आणि भावना अधिक दिसून येतात यातून अनेक अनिष्ठ घटना घडतात यासाठी हुंडयांच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर प्रभावी उपाय योजना राबविल्यास यावर नियंत्रण येण्यास मदत होऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) प्रा.एस.एन गंदेवार-भारतीय सामाजिक समस्या

२) प्रा.माणिक माने - भारतातील समकालीन सामाजिक समस्या

३) प्रा सुमन पाटे - सामाजिक विघटन व समस्या

४) प्रा.खडसे, प्रा.सुमन-पाटे, भारतीय समाज

५) प्रा.एस.एन. गंदेवार - भारतीय समाज : वादातीत विषय आणि समस्या

◆◆◆

# नैतिक मूल्यांच्या ऱ्हासामुळे भारतीय कुटुंबव्यवस्था अडचणीत

**डॉ.मारोती कोल्हे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

बॅरी. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा, कळमेश्वर, नागपूर

**सारांश :–**

19 व्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतीय समाजात मूल्यव्यवस्थेत बदल झालेला दिसून येतो. भारतात आधुनिकीकरणाची सुरुवात झाल्याने पारंपारिक मुल्यांचे महत्व कमी होऊ लागले आहे. पारंपारिक समाजव्यवस्थेत जात, धर्म, वंश, व्यक्तीचे वय इ. घटकाच्या आधारे व्यक्तीचा दर्जा आणि भूमिका निश्चित होत असे परंतु परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे परंपरागत मूल्य व्यवस्थेत बदल घडून आला. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव इ. नवीन मूल्यांना मान्यता मिळाली. शिक्षण, कर्तृत्व व्यक्तीची पात्रता या घटकांच्या आधारावर दर्जा आणि भूमिका निश्चित होवू लागल्या. अशा प्रकारे नवीन मूल्यांच्या प्रभावामुळे पारंपारिक मूल्यव्यवस्थेत वृध्दांना जो महत्वाचा दर्जा आणि भूमिका प्राप्त होता त्यांच्यावर आघात झालेला दिसून येतो. अशाप्रकारे नवीन मूल्यांच्या परिवर्तनामुळे भारतीय कुटुंब व्यवस्थेत देखील बदल होत आहे.

**प्रस्तावना :–**

उच्च सांस्कृतिक वारसा असलेल्या भारत देशातील कुटुंबव्यवस्था रक्ताच्या नात्यांएवढीच प्राथमिक शिक्षण देणारी व ज्यात भूत वर्तमान व भविष्यातील अशा तीन पिढीतील सदस्य एकत्र राहतात अशी आहे. एकत्र असणे व राहणे ही मानवाची गरज असून संयुक्त कुटुंबपध्दती ही भारतीय संस्कृतीचे भूषण मानल्या जाते. कुटुंब हे बालकाचे सामाजिकरण घडवून आणणारे एक माध्यम आहे. जन्मानंतर बालकाचा सर्वात प्रथम संबंध कुटुंबाशी येतो. कुटुंबाद्वारेच त्यांची बाहय जगाशी ओळख होते. कुटुंबामुळेच व्यक्तीची जैविक, भावनिक, मानसिक, सामाजिक, नैतिक, धार्मिक, आर्थिक, मनोरंजनात्मक व शैक्षणिक जडण–घडण होत असते. पूर्वी भारतात संयुक्त कुटुंबपध्दती अस्तित्वात होती. परंतु औद्योगिकरण, शिक्षण, आधुनिकता, व्यक्तीस्वातंत्र्य इत्यादी कारणामुळे एकत्र कुटुंबपध्दतीस तडा जाऊ लागला आहे. आता विभक्त कुटुंब पध्दती पाहण्यास मिळत आहे. महागाई, लोकसंख्या वाढ, जागेची कमतरता, व्यक्तीस्वातंत्र्य इत्यादीमुळे लहान कुटुंब सुखी कुटुंब आता योग्य व सर्वमान्य झाले आहे. परंतु शिक्षण, भौतिक सुखाचा हव्यास, पैशाचे अवास्तव महत्व, स्व अस्तित्वाचे महत्व इत्यादीमुळे लहान कुटुंबात देखिल तणाव निर्माण होऊन कुटुंबविघटन होण्याचे प्रमाण वाढतांना दिसून येत आहे.

**कुटुंब विघटन म्हणजे काय ?**

सर्वसामान्यपणे 'कुटुंबाचे विघटन' म्हणजे घटस्फोट होय. म्हणजेच विवाहाने समाजमान्य पध्दतीने कुटुंबाची निर्मिती होते. तर घटकस्फोटाने त्याच कुटुंबाची समाप्ती होते. किंवा पती–पत्नीने कायदेशीर मार्गाने विभक्त होणे म्हणजेच कुटुंब विघटन होय. असे म्हणता येईल. पिढीसंघर्ष हा कुटुंब स्वास्थास नेहमीच हानीकारक, आंतरपिढी व अंतरपिढी संघर्ष कुटुंब विघटनास कारणीभूत असल्याचे दिसून येते.

आंतरपिढी संघर्ष म्हणजे एकाच पिढीत होणारे मतभेद, संघर्ष, टकराव, वाद किंवा विरोध होय तर अंतरपिढी संघर्ष म्हणजे दोन किंवा भिन्न अनुक्रमिक पिढयामधील दिसणारा असा मतभेद जे संघर्षाची स्थिती निर्माण करते.

आंतरपिढी व अंतरपिढी संघर्षामुळे कुटुंबसदस्यांमध्ये संघर्ष निर्माण होऊन वाद विकोपाला जाऊन ते सदस्य विभक्त होण्यास परावृत्त होतात. आंतरपिढी संघर्षामध्ये पती–पत्नी, भाऊ–बहीण इत्यादी मध्ये वादाची परिस्थीती उद्भवते, तर अंतरपिढी संघर्षामध्ये आई–वडील व त्यांची मुलं, तसेच आजी–आजोबा व नातवंड यांच्या मधील होणाऱ्या संघर्षाचा समावेश होतो. कुटुंब विघटन कुठल्याही पिढीमुळे झाले तरीही कुटुंबरचना बिघडते हे नक्की.

सदोष सामाजिकरण मानसिक संरचनेत अंतर, साधनांच्या उपलब्धतेततील असंतुलन, सामाजिक परिवर्तनाचा असमान प्रभाव, नागरीकरण, खाजगीकरण, औद्योगिकरण पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव, महत्वाकांक्षेत वाढ, शिक्षण संरचनेतील बदल, आदर्श व मूल्यांतील संघर्ष इत्यादी विविध कारणांमुळे कुटुंब संरचनेत बिघाड किंवा विघटन दिसून येते.

वरील सर्व कारणांपैकी तरुण पिढीत होणारा मूल्यांचा ऱ्हास हे एक महत्वाचे कारण दिसून येते.

**मूल्ये म्हणजे काय ?**

डॉ. राधा कमल मुखर्जीच्या मते, ''समाजाने स्वीकारलेली व मान्यता दिलेली जीवन प्रणाली'' म्हणजे मूल्ये होय. म्हणजेच ज्या जीवनशैलीत मानवाच्या इच्छा उद्‌दीष्टांना पूर्ण करण्याची समाजाने स्वीकृत करुन मान्यता दिलेली असते त्याला मूल्ये म्हणतात.

मानवी समाजात मूल्यांची प्रतिके काळानुरुप बदलणारी असते. कारण बदलत्या जीवनप्रणालीनुसार जुने व नवीन मूल्यांच्या प्रतिकांमध्ये सुवर्णमध्य साधला गेला तरच संघर्षाची स्थिती निर्माण होण्यापासून थांबते, नाहीतर पारंपारिक किंवा जुनी मूल्ये व नवीन मूल्यांमध्ये संघर्ष निर्माण होतो व नात्यांमध्ये अंतर निर्माण होते. निती—नियमांच्या आधारे मूल्यांची प्रतीक व्यवस्था टिकविण्यासाठी मनुष्य स्वत:चा वेळ, पैसा, श्रम खर्ची घालत असतो कारण मनुष्यांचा मूल्य व प्रतिकांवर विश्वास असते. मानवी जीवनातील शिस्त व एकात्मता टिकविण्यासाठी स्वयंशासित मूल्यव्यवस्था निर्माण करीत असतो.

**पारंपारिक कौटुंबिक भारतीय मूल्ये :—**

थोऱ्या मोठयांचा आदर, दया, करुणा, प्रेम, माया, काळजी, निर्भयता, सहिष्णुता, सर्वसमावेशकता, संधीची समानता, नम्रता, एकनिष्ठता, प्रामाणिकपणा, नैतिकता, संवेदनशीलता, त्याग इत्यादी अशी अनेक सामाजिक व वैयक्तिक मूल्ये आहेत जी अगदी प्राचीन काळापासून भारतीय समाजात दिसून येत आहेत. या मूल्यांच्या आधारावरच कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्य निर्भर असते. ही मूल्ये जितक्या जास्त प्रमाणात व्यक्तीजवळ असतील तितकी ती व्यक्ती नम्र व सुशील बनते. अशी व्यक्ती कुटुंब व समाज एकसंध ठेवण्यास मदत करीत असते. उदा. घरातील वडीलधाऱ्या मंडळींना मान देणे. त्याची जवाबदारी सांभाळणे त्यांची सुश्रुषा करणे काळजी घेणे ही मूल्ये त्यांच्या मुलांमध्ये असलीच पाहिजे. त्याचप्रमाणे जीवनसाथी व घरातील इतर कुटुंबातील सदस्यांसोबत समानतेची वागणूक देणे. जीवनसाथी सोबत एकनिष्ठ राहणे इत्यादी सर्व नैतिकतेची प्रेमाची मदतीची मूल्ये कुटुंबसंस्था अबाधित ठेवण्यास मदत करतात.

**आधुनिक कुटुंबातील लोप पावलेली मूल्यव्यवस्था !**

अलिकडच्या आधुनिक प्रगत जलद समाजात व्यक्तीस्वातंत्र्य, भौतिक सुखाला आलेले आतोनात महत्व, पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव, स्व अस्तित्वाचा अतिरेकी कट्ट, पैशाचे महत्व अतिचिकीत्सक वृत्ती इत्यादीमुळे जुनी कौटुंबिक मूल्ये लोप पावत आहेत.

* आजच्या आधुनिक कुटुंबात पती—पत्नी मधील एकनिष्ठतेची, विश्वासाची जागा, अविश्वास व व्यभिचाराने घेतलेली दिसून येते. त्यामुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. आजच्या मेट्रो शहरातील कुटुंबात घरात टि.व्ही., सोफा, फ्रिज, वॉशिंग मशीन, कुलर इत्यादी भौतिक वस्तूंना जागा असते. परंतु वृध्द आई—वडील किंवा सासू—सासऱ्यांना जागा नसते. जागेअभावी त्यांना वृध्दाश्रमात ठेवण्याचा पर्याय शोधला जातो.
* आधुनिक कुटुंबात जुन्या चालीरिती, संस्कृती, विचार, ज्ञान, नवीन विचार, पाश्चात्य संस्कृती, नवीन चालीरिती इत्यादी रुजविण्याच्या प्रयत्न होतांना दिसून येतो.
* प्रगत समाजातील कुटुंबामध्ये मोबाईल, टि.व्ही., कम्प्युटर इत्यादीमुळे परस्पर संवादाची कमी दिसून येते. त्यामुळे गैरसमज व इतर समस्या निर्माण होतांना दिसून येतात.
* मॉडर्न कुटुंबातील सदस्यांमध्ये एकमेकांसोबत जुळवून घेण्याची सहनशीलतेची कमी दिसून येते, ज्यामुळे कुटुंबातील कुठलाही सदस्य इतर सदस्यांचा अपमान करण्यास कमी करत नाही.
* शिक्षण व भौतिक साधनांच्या अतिवापरांमुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये आंतरिक ओढ, आपुलकी, माया, प्रेम न दिसता औपचारिक संबंध दिसून येतात.

* आजच्या आधुनिक कुटुंबात पूर्वीचे सणावारांचे, संस्कृतीचे पावित्र्याचे महत्त्व जाऊन त्यांना आता सेलीब्रेशनचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.
* व्यस्त आई—वडीलांमुळे कुटुंबातील मुलांचे योग्य सामाजिकरण होत नसल्याचे दिसून येते.

**समारोप :—**

वरील स्पटीकरणावरुन असे दिसून येते की, आजच्या प्रगत समाजातील कुटुंबात नैतिकतेचा, सहनशिलता, त्याग इत्यादींचा अभाव दिसून येतो. परिणामी कुटुंब विघटन, घटस्फोट, वृध्दांच्या समस्येत वाढ, कौटुंबिक हिंसा, एकमेकांप्रति अविश्वास, अंतर्गत कलह इत्यादी कौटुंबिक समस्यांचे प्रमाण वाढतांना दिसून येतात. त्याचप्रमाणे कुटुंबातील सदस्यांमध्ये मानसिक शांततेचा अभाव, चिडचिडेपणा दिसून येतो. एकूणच भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा असलेली व मूल्यांवर आधारलेली कुटुंबव्यवस्था विविध कारणांच्या प्रभावामुळे मूल्यांच्या ऱ्हासामुळे अडचणीत येतांना दिसून येत आहे.

## संदर्भसूची


1) काचोळे दा. धो. (2005) भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन.

2) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, खडसे भा. कि. 2004, हिमालय पब्लिशिंग हाऊस गिरगाव, मुंबई.

3) भारतीय सामाजिक समस्याएँ, एस चंद्रकुमार राय 2004, अर्जुन पब्लिकेशन हाऊस दिल्ली.

4) भारतातील सामाजिक समस्या नागपूर, विद्याप्रकाशन, पी. के. कुलकर्णी, 1998.

5) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, नागपूर

श्री साईनाथ प्रकाशन, प्रदीप आगलावे, 2009


◆◆◆

# पंचायत राज्य व्यवस्थेअंतर्गत महिलांचे सक्षमीकरण

**डॉ.प्रा.अश्विनी अविनाश खापरे,**
(सहयोगी प्राध्यापक)
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय,मोहपा,ता.कळमेश्वर, जि.नागपूर.

ग्रामीण विकास हा राष्ट्रीय विकासाचा मूलभूत प्राथमिक घटक आहे. ग्रामीण भागाचा आधार कृषी व्यवसाय हा आहे. कृषी व्यवसायातूनच ग्रामीण भागातील जनतेच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला आणि म्हणूनच ग्रामीण विकास साधायचा असेल तर कृषी व्यवसायाला केंद्रबिंदू समजत असताना, या व्यवसायाशी निगडीत मनुष्य वर्गाचा विचार होणे अभिप्रेत आहे. ग्रामीण समाज जीवनाचा मागोवा घेतला तर या समाजात पुरुषप्रधान संस्कृती आहे. शेतात दिवसभर काबाडकष्ट करून नंतर जेव्हा हा शेतकरी आपल्या कुटुंबात जातो तेव्हा घरात स्त्रियांचे प्रमाण भरमसाठ असल्याचे निदर्शनास येते. परंतु या सर्व स्त्रिया शिक्षणापासून आणि पर्यायाने विकासापासून वंचित असलेल्या दिसून येतात.

पुरुष जो निर्णय घेतील त्या निर्णयाशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न या स्त्रियांकडून केला जातो आणि म्हणूनच त्या स्वत:चा विचार करताना दिसत नाही आणि त्यामुळे त्या सक्षमही होऊ शकत नाही.

२१व्या शतकातही राजकीय आणि सामाजिक .ष्ट्या महिलांमध्ये कोणत्याही पद्धतीची सजगता आलेली नाही. त्यादृष्टीने स्त्री सक्षमीकरणाची समस्या एक शोकांतिका ठरते. भारतीय राज्यघटनेत ७३ व ७४व्या घटना दुरुस्ती च्या माध्यमातून पंचायत राज्य स्तरावर स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा मुद्दा प्रामुख्याने समोर आणला गेला. शहरी व ग्रामीण भागात सुशिक्षित व असुशिक्षित वर्गाकडून स्त्रियांवरचे अन्याय व अत्याचार सातत्याने वाढीस लागले आहे. खालच्या स्तरावरील समाज व उच्च वर्गातील लोक यांच्यात सातत्याने विषमता जाणवत आहे.

पंचायत राज्य व्यवस्था व स्त्री सक्षमीकरण या दोन्ही योजनेत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही भागीदारी जर मिळाली तर त्याचा लाभ स्त्रियांसाठी निश्चित झाल्याशिवाय राहणार नाही, यातून पुढीलप्रमाणे स्त्रियांचे अधिकार निर्धारित केले जाते.

- सर्व स्तरावर स्त्री व पुरुषांसाठी समान योजना आणि त्याच्या अंबलबजावणीत दोघांनाही समान संधी.
- कुटुंब नियोजन सेवांमध्ये योग्य सूचना आणि मार्गदर्शन याशिवाय आवश्यक तशी स्वास्थ्य सुविधा, सुलभता.
- स्वयंरोजगाराच्या माध्यमातून समान आर्थिक संधी प्राप्त करण्यासाठी आत्म सहाय्यता व असहकार दलाची स्थापना, सामाजिक सुरक्षा कार्यक्रमाद्वारे पुरविली जावी.
- शेतीसाठी कर्ज व्यापार सुविधा
- औद्योगिक सुलभता आणण्यासाठी भूमी पुनर्वसन योजना.

- भूमी व कृषी सुधारणेत समानतेचा व्यवहार.
- साफ—सफाई, पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि वाहतूक इत्यादींमध्ये समान वसुलीची योजना.

या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी म्हणून तसेच स्त्री व पुरुष समानता यावी म्हणून पुढील प्रमाणे काही दक्षता घेण्याची गरज आहे.

**१. आर्थिक सक्षमीकरण**

कोणत्याही प्रकारच्या सक्षमीकरणात सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे आर्थिक घटक होय. जोपर्यंत आर्थिक मुबलकता येत नाही तोपर्यंत सक्षमीकरण शक्य नाही. भारतीय स्त्रियांच्या बाबतीत आज पर्यंत सक्षमीकरण का झाले नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे तिचे इतरांवर असलेले परावलंबित्व होय. लहानपणी वडिलांच्या आधारे, प्रौढपणी पतीच्या आधारे आणि वृद्धपणात मुलांच्या आधारे स्त्रीने जीवन व्यतीत करावे अशीच समाज तिच्या कडून अपेक्षा करतो. त्यामुळे तिला स्वत:च्या पायावर उभे करावे अशी मानसिकता समाजामध्ये आहे. परिणामत: स्त्री ही सातत्याने परावलंबी राहीली आणि म्हणूनच तिचा सतत अपमान व अन्यायही झाला.

पंचायत राज्य व्यवस्थेमुळे स्त्रियांना राजकीय अधिकाराची प्राप्ती झाली. पंचायत राज्यात तिला ५० टक्के आरक्षण मिळाले, त्यामुळे तिला राजकीय हक्कांची जाणीव झाली. आज पुरुषांच्या बरोबरीने महिला शेती, बॅकांमध्ये, पतसंस्थांमध्ये खातेदार म्हणून काम पाहतात.

आज कोणत्याही क्षेत्रात आर्थिक व्यवहार करताना महिलांची संमती आवश्यक मानली जाते परिणामत: महिलांचे आर्थिक सक्षमीकरण घडून येते.

**२. आरोग्यविषयक सक्षमीकरण**

पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया शारीरिकदृष्ट्या कमजोर असून त्यांना अबला असे संबोधण्यात येते मात्र निश्चितपणे हा गैरसमज आहे. स्त्रिया या अधिक काटक आणि मानसिक.ष्ट्या कणखर आहेत. पुरुष आणि महिला यांच्या श्रमाची तुलना करता महिला अधिक श्रम करतात.

२१व्या शतकातील महिला घर आणि नोकरी दोन्हीही जबाबदारीने सांभाळताना दिसतात आणि म्हणूनच त्यांना पौष्टिक व जीवनसत्व निपून आहार देणे गरजेचे आहे. परंतु त्या स्वत:साठी न करता कुटुंबासाठी मात्र उत्कृष्ट भोजन बनवितात त्यामुळे बऱ्याच दा त्या स्वत:कडे दुर्लक्षही करतात आणि म्हणूनच ग्रामीण भागात महिलांमध्ये आजाराबद्दल जागरुकता कमी व अंधश्रद्धा जास्त जाणवते. त्यामुळे त्यांच्या कामाच्या ठिकाणी सु.ढ आरोग्याची व्यवस्था राखणे व त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. असे झाल्यास महिला सक्षमीकरण झाल्याशिवाय राहणार नाही.

**३. कौटुंबिक सक्षमीकरण**

कौटुंबिक सक्षमीकरणाची आवश्यकता ग्रामीण भागात जास्त आहे. आजही ग्रामीण भागात संयुक्त कुटुंब व्यवस्था दिसून येते. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने शहरी कुटुंबाच्या तुलनेत ग्रामीण भागात कुटुंबांतील सदस्यांची संख्या जास्त असते. त्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांवर कामाचा भार जास्त पडतो. त्याचप्रमाणे कुटुंबात घेतले जाणारे निर्णय स्त्रियांना माहीतही नसतात, त्याचा परिणाम तिच्या मानसिकतेवर होतो. स्त्री, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था बघत असेल तर तिला कुटुंबात मानाचे स्थान मिळणे आवश्यक आहे, तिला तिचे खरे स्थान प्राप्त करून दिल्यास ती कौटुंबिक पातळीवर देखील सक्षम झाल्याशिवाय राहणार नाही.

**४. सामाजिक सक्षमीकरण**

भारतीय समाज हिंदू संस्कृतीवर आधारित असल्याने सहजच स्त्रियांना कुटुंबात दुय्यम स्थान प्राप्त होते. परिणामत: सामाजिक स्तरावर स्त्रियांना गृहीतच धरले जाते. ही फार मोठी शोकांतिका असून ७३ व ७४व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज्य व्यवस्थेत स्त्रियांना सु.ढ व अधिकारसंपन्न बनविण्याची मुभा दिलेली आहे. या अनुषंगाने महिला ग्रामीण स्तरावर देखील सक्षम होतील एवढेच नव्हे तर स्त्रियांमध्ये राजकीय व सामाजिक जागृती निर्माण होईल. त्या सामाजिक स्तरांवर आपले महत्वाचे स्थान निर्माण करू शकतील, सत्तेची परंपरागत चौकट मोडून त्यांना महत्त्व प्राप्त होईल.

भारतीय समाज व्यवस्थेत सुरुवाती पासून स्त्रियांच्या कार्या बाबत उदासीनता होती, परंतु पंचायत राज्य व्यवस्था लागू झाल्यापासून स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्या सर्वच क्षेत्रात आत्मनिर्भर झाल्या आहे. आज स्त्रियांनी असे कोणतेही क्षेत्र शिल्लक ठेवले नाही की जात तिचा सहभाग नाही.

७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज्य व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. मुख्य म्हणजे पंचायत राज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. पंचायत राज्याचे कार्य व जबाबदारी स्पष्ट करणारे ११ परिशिष्ट भारतीय संविधानात जोडण्यात आली आहे. पंचायत राज व्यवस्थेला करावी लागणारी २९ विषयांची कार्यसूची ही देण्यात आली आहे. त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्थेत अनुसूचित जाती व जमातीसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे. पंचायत राज्य व्यवस्थेमुळेच स्त्रियांना ५० टक्के आरक्षण प्राप्त झाले आहे.

पंचायत राज्य व्यवस्थे मुळे ग्रामीण भागातील चित्र बदलू लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे. संधी मिळताच स्त्रियांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखविली आहे. ग्रामपंचायतीच्या सभासदा पासून सरपंच, जिल्हाध्यक्ष, महापौर, मंत्री, मुख्यमंत्री आणि पंतप्रधान तसेच राष्ट्रपती या पदापर्यंत स्त्रिया पोहोचल्या आहेत. पंचायत राज्य व्यवस्थे मुळे शहरी स्त्रियां सोबतच ग्रामीण भागातील दलित आणि आदिवासी स्त्रिया राजकारणात सक्रिय झाल्या आहेत. गावाचा विकास, पाणी समस्या, शाळा, रस्ते, दारूबंदी या सर्व समस्यांबाबत कष्ट करून त्यांची कर्तुत्व सिद्ध करण्याची तयारी आहे.

पंचायत राज्य व्यवस्था आणि स्त्री सक्षमीकरण यासंदर्भात खालील निष्कर्ष प्रामुख्याने सांगता येतील.

१. ७३वी घटना दुरुस्ती झाल्यानंतर त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्थेत महिलांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.
२. विविध व्यावसायिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या टक्केवारीत वाढ झाली.
३. व्यावसायिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा पंचायतराज व्यवस्थेत सहभाग वाढला.
४. स्थानिक, गरजू लोकांच्या आशा अपेक्षांची जाण स्त्रियांच्या भूमिकेतून महत्त्वपूर्ण ठरली.
५. ९० टक्के स्त्रियांना निवडणूक लढविण्यात कोणतीही अडचण भासत नाही.
६. महिलांचा निवडणुकीत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रात पोषक वातावरण निर्माण झाले.
७. भारतातील सर्वच राज्यांमध्ये महिलांसाठी आरक्षित जागांच्या व पदांच्या बाबतीत वाढ झाली.
८. पंचायत राज्यव्यवस्थेत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही भागीदार झाल्या.
९. लोकशाही विकेंद्रीकरण यासाठी पंचायत राज्य व्यवस्थे अंतर्गत महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले ते सर्व यशस्वी ठरले.

७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज्य व्यवस्थे अंतर्गत महिलांच्या घटनात्मक दर्जात वाढ झाली हेच तिच्या यशस्वीतेचे आणि सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. यामुळे लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयत्न यशस्वी झाला असून भारतीय लोकशाही देखील अधिक घट्ट झाली.

**संदर्भसूची :—**

१. लोकशाहीची नवी क्षितिजे — राजाराम पाटील, सुविचार प्रकाशन, पुणे.
२. पंचायत मार्गदर्शक — डॉ. नीलम गोरे, स्त्री आधार केंद्र, पुणे.
३. ग्रामीण समाजशास्त्र — गुरुनाथ नाडगोंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ४. पंचायत राज सहभागिता — डॉ. श्रीनाथ शर्मा, आदित्य पब्लिकेशन, मध्य प्रदेश (पृष्ठ क्रमांक ११३ व ११४)
५. ग्रामप्रशासन — डॉ. सतीश ठोंबरे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद (पृष्ठ क्रमांक १३ व १४)
६. पंचायत राज्य आणि सामुहिक विकास — डॉ. लो.गो. देवगावकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (पृष्ठ क्रमांक ५)
७. पंचायत राज एक विश्लेषणात्मक परामर्श — डॉ. बी.जी. नांदेडकर, सागर प्रकाशन, पुणे (पृष्ठ क्रमांक १४२)

◆◆◆

# भारतीय राजकारण : धर्मनिरपेक्षता

**प्रा.डॉ.अर्जुन उबाळे**
राज्यशास्त्र विभाग
श्री.आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी,
ता.कन्नड, जि.औरंगाबाद

'धर्मनिरपेक्षता' हा शब्द 'सेक्युलॅरिझम' या इंठाजी शब्दाचे मराठी रूपांतर म्हणून वापरला जातो. निधर्मी किंवा धर्मातीत राज्य असेही शब्द वापरले जातात. 'धर्मनिरपेक्षत राज्य' हा शब्दप्रयोग आज सर्रासपणे वापरला जातो. एखादे राज्य व शासन हे धर्मनिरपेक्ष आहे म्हणजे त्या राज्याचा असा एखादा धर्म नाही. धर्म ठांथाला प्रमाण म्हणून त्यावर आधारलेले असे राज्य नाही. धर्म अनेक आहेत तसेच धर्मठांथ अनेक आहेत. ऐवढेच नाही तर एकाच धर्माचे अनेक पंथ आहेत. अशा परिस्थितीत धर्मामध्ये भेदभाव न करणारे शासन वा राज्य हे धर्मनिरपेक्ष शासन म्हणता येईल.

**ऐतिहासिक पार्श्वभुमी :-**

युरोपची प्राचीन संस्कृती ठाीक व रोमन देशात आाढळून येते. या नगर राज्यात राजसत्ता, महाजनसत्ता, धनिकतंत्र, प्रत्यक्ष लोकशाही इत्यादी शासनाचे प्रकार प्रचलित होते. तसेच खिश्चन धर्माच्या उदयापूर्वी धर्म हा देवताप्रधान स्वरूपाचा होता. त्यात निसर्गाची व निरनिराळ्या देवतांची पुजा होती. प्रत्येक नगरराज्यात राजमान्य अशी देवता होती. ख्रिश्चन धर्माच्या उदय व प्रसारानंतर ग्रीकमधील काही लोकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. त्याचा परिणाम राजाचा धर्म आणि प्रजेचा धर्म यात भिन्नता झाली. त्यामुळे राजाकडून लोकांचा छळ होऊ लागला. राजनिष्ठा व धर्मनिष्ठा यांच्यात संघर्षाला सुरवात झाली. नंतरच्याकाळात युरोपातील अनेक देशांच्या राजांनी व लोकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. परंतु नंतर राजा आणि पोप यांच्यात संघर्ष सुरू झाला. मॅकॅव्हलीने राजकारण आणि धर्म यात अंतर दाखवुन राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे तो मुक्त आहे असे सांगितले. राजा आणि पोप यांचा संघर्ष चौदाव्या शतकात चालू होता.

ख्रिश्चन धर्मात प्रबोधनाच्या चळवळीने सुधारणेची चळवळ सुरू झाली. याने धर्मसत्तेतील दोष दाखवुन चर्चवर राज्यसंस्थेचे प्रभुत्व आणि धर्मसंस्थेचे केंद्र पोप असु नये तर बायबल असावे. यातूनच ख्रिश्चन धर्मात प्रोटेंस्टंट पंथ उदयाला आला. पुढे कॅथॉलिक व प्रोटेस्टंट असे पंथ निर्माण होऊन संघर्ष सुरू झाला. यातुन पुढे राजा कॅथॉलिक पंथचा असेल तर प्रोटेस्टंट लोकांचा धार्मिक छळ होऊ लागला. युरोपात धर्मसुधारणा होऊनही खऱ्या अर्थाने धार्मिक सहिष्णुता आली नव्हती. परंतु या चळवळीचा परिणाम असा झाला की, भिन्न-भिन्न धार्मिक पंथ निर्माण झाल्यामुळे धर्मसहिष्णुता असणे आवश्यक होते.[१] यावरून हेच स्पष्ट होते की, राज्य हे कोणत्याही धर्माला बांधील न राहता धर्मनिरपेक्ष असावे.

**धर्मनिरपेक्षतेचा उदय :-**

पोप आणि चर्चचे अधिकारी धर्माच्या नावावर अत्याचार करीत होते. राजासुद्धा या धार्मिक बंधनातून मुक्त नव्हता. मॅकव्हेलीच्या मते, "राजकारण आणि धर्म यात अंतर दाखवुन राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे तो मुक्त आहे असे सांगितले" धर्म ही व्यक्तीच्या आत्म्याची श्रद्धा असल्यामुळे

व्यक्तीगत बाब आहे. प्रत्येक व्यक्तीने कोणत्या धर्माचे पालन करावे हे त्याने ठरवावे. तसेच राजकारण आणि धर्म यांची जशी फारकत होणे गरजेचे आहे तसेच शासन कोणत्याही धर्माची बांधीलकी मानणार नाही. तसेच शासनाचे अधिष्ठान कोणताही धर्मठांथ वा प्रेषितांच्या आज्ञा यावर आधारित राहणार नाही. यातूनच पुढे धर्मनिरपेक्षतेचा विचार मांडण्यात आला. "अमेरिका स्वतंत्र राष्ट्र घोषित झाल्यावर अमेरिकेच्या संघराज्याची घटना तयार करीत असतांना घटनाकारांनी राज्यघटनेत राज्यसंस्था धर्मसत्तेपासून विभक्त राहील."[२] असा विचार स्विकारण्यात आला. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेचा विकास झाला. कारण ही क्रांती स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वासाठी होती. फ्रेंच क्रांती धार्मिक तत्वासाठी वा पारलौकिक सुखासाठी नव्हती.

**राजकारण आणि धर्मनिरपेक्षता :-**

भारतातील धर्मनिरपेक्षता उदय व विकास युरोपीय देशातील धर्मनिरपेक्षतेपेक्षा भिन्न पद्धतीने झालेला आहे. भारतात प्राचीन काळापासून भिन्न-भिन्न धर्माचे पंथाचे लोक येऊन वास्तव्य करून राहिलेले आहे. भारतातील धार्मिक भिन्नता इतर कोणत्याही देशातील धार्मिक भन्नतेपेक्षा व्यापक व गुंतागुंतीची आहे. भारताच्या राज्यघटनेत कोणत्याही धर्माला "र'ाजधर्म" म्हणून मान्यता दिलेली नाही. राज्यसत्ता कोणत्याही एका धर्माशी बांधिल नाही. परंतु धार्मिक स्वातंत्र्य मान्य केलेल आहे. भारतातील शासनाने सर्वधर्मसमभाव या तत्वाचा स्वीकार केलेला आहे.

ऐतिहासिकदृष्टया पाहता सेक्यूलर या संकल्पनेत धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यात फारकत अभिप्रेत आहे. धर्मगुरूने केवळ धार्मिक बाबतीत नियंत्रण ठेवावे. राजकीय कारभारात हस्तक्षेप करू नये हा मूळ विचार यात धर्म नाकारण्याचा हेतु नसून धर्मगुरूची सत्ता धार्मिक बाबीपुरतीच मर्यादित करण्याचा विचार आहे. राज्याची ध्येयधोरणे व कायदा कानून हे विशिष्ट धर्माच्या आदेश-उपदेशांशी बांधिल नसणे या अर्थानेच धर्मविहीन व धर्मनिरपेक्षता हे शब्द वापरले पाहिजे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर धर्मनिरपेक्षतेचा विचार प्रभावीपणे मांडण्यात येऊ लागला. भारताची राज्यघटना तयार करणाऱ्या घटना परिषदेने धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना मान्य केली. परंतु राज्यघटनेत "धर्मनिरपेक्ष राज्य" हा शब्द वापरला नाही. भारतीय घटनेत धर्मनिरपेक्षतेची कल्पना मूलभूत हक्कांच्या प्रकरणात व्यक्त झाली आहे. १९७६ साली संविधानात झालेल्या ४२ व्या विशोधनाने प्रास्ताविकेत "धर्मनिरपेक्ष" या विशषणाचा भारतीय राज्यव्यवस्थेसाठी प्रथमच वापर केला.[३] तत्पुर्वी धर्मनिरपेक्ष शब्दाचा स्पष्टपणे उल्लेख घटनेत नव्हता. परंतु घटनेच्या कलम २५ ते २८ धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क या कलमा अंतर्गत धर्मनिरपेक्ष बाबी आलेल्या होत्या.

पाश्चिमात्य देशात धर्मनिरपेक्षतेच्या पूर्वी राज्यकर्त्यांचे व्यवहार हे स्वधर्मीयांशी आपलेपणाने बंधुत्व म्हणून व्यवहार केला. परंतु इतर धर्मीयांशी मात्र विरोधी म्हणून परका म्हणून, दुश्मन, दुय्यम म्हणून व्यवहार केलेला होता. इंग्लंडमध्ये १८२९ साली कॅथॉलिक मुक्ती कायदा संम्मत झाला. या कायद्यामुळे कॅथॉलिक पंथियांना प्रोटेस्टंट पंथियांच्या बरोबरीचे स्थान राजकारणात मिळाले. १८५७ पर्यंत यहुदी धर्मियांना ब्रिटीश पार्लमेंटमध्ये प्रवेश नव्हता.[४] यावरून हे स्पष्ट होते की, केवळ इतर धर्मियांनाच वाईट पद्धतीने वागविले असे नाही तर एकाच धर्मातील दुसऱ्या पंथाच्या लोकांनासुद्धा त्रास

झाला. धर्मनिरपेक्ष शासन हे देशाीतल लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत असते. देशाचे ऐक्य व संरक्षण सामाजिक कल्याण या बाबी महत्वपुर्ण आहे. पारलौकीक गोष्टीला बाजुला सारून धर्मनिरपेक्ष /इहवादी शासनाची विधायक लोककल्याणकारी भूमिका सतत घ्यावी लागते. आपल्या घटनेमध्ये जी पायाभूत आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी तत्व आहेत. त्यात धर्मनिरपेक्षतेला अत्यंत महत्वाचं स्थान आहे. धर्म ही समाजाला एकत्र ठेवणारी शक्ती आहे. तशीच ती समाजाचे विघटन करणारी सुद्धा आहे. भारताच्या इतिहासात पाकिस्तान निर्मितीव्दारे विघटनाचा अनुभव आला. त्या अनुभवाची पुनरावृत्ती पुन्हा पुन्हा घडु नये म्हणून जी उपाययोजना केली ती धर्मनिरपेक्षता होय. भारताच्या संदर्भात धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध पाखंडीपणा धर्मविहीनता नसून सर्व धर्माच्या सहिष्णु सहअस्तित्वाव्दारे समता, स्वातंत्र्य, बंधुता, शांतता, न्याय या दिशेने वाटचाल करण्याचा तो एकमेव मार्ग आहे. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात,'' भारत धर्मनिरपेक्ष आहे. म्हणजे तो आत्म्याचे अस्तित्व नाकारतो किंवा मानवी जीवनात धर्माचे स्थान गौण ठरवुन पाखंडीपणाला उत्तेजन देते असे नव्हे... तर कोणत्याही धर्माचे अधिपत्य भारताच्या राज्यसत्तेवर नाही, कोणत्याही धर्माला इथे अव्दितीय स्थान व दर्जा नाही व आंतरराष्ट्रीय व्यवहारात कोणत्याही धर्माला इतर धर्माहून वेगळी वर्तणुक दिली जाणार नाही.५ धर्मनिरपेक्ष राज्य प्रत्येक व्यक्ती समुहाला धार्मिक स्वातंत्र नागरिक म्हणून व्यवहार करतांना धर्माचा विचार केला जात नाही. तसेच जिथली राजसत्ता कोणत्याही धर्माशी बांधील, कोणत्याच धर्माला चालना देत नाही व धार्मिक क्षेत्रात अनावश्यक हस्तक्षेप करीत नाही असे राज्य. भारतीय संविधानाने सर्व व्यक्तीसमुहांना धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे. आपल्याला हवा तो धर्म आचरण्याचे व त्या धर्माचा प्रसार करण्याचे हक्क प्रत्येक व्यक्तीस दिलेले आहेत. तसेच नव्या धर्माची स्थापना सुद्धा करण्याचा हक्क आहे. विल्फ्रेड कॅटवेल स्मिथ म्हणतात, "प्रत्येक व्यक्तीकडून, मग ती कोणत्याही धर्माची असो व कोणत्याही धर्माची नसो. नितांत निष्ठा व विश्वास जी राज्यसंस्था मिळविते, टिकविते व मिळवीत राहण्यास पात्र ठरते. अशा राजसंस्थेला धर्मनिरपेक्ष म्हणता येईल."[६] असे धर्मनिरपेक्ष राज्यासंबंधी प्रतिपादन केले. भारताला हवा असलेला धर्मनिरपेक्ष समाज हिंदु, मुस्लिम, शीख, इसाई हे सगळे आधी भारतीय आहेत आणि नंतर आपल्या धर्माचे अनुयायी, हा इथल्या धर्म निरपेक्षतेचा प्राणभुत विचार आहे. धर्माच्या नावाने कोणालाही भेदाभेद, विषमता अस्पृश्यता पाळता येत नाही.

**मुलतत्ववाद्यांची भूमिका :-**

भारतीय राजकारणात नव्वदीच्या दशकात धर्माचा राजकारणासाठी मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला राष्ट्र व देशापेक्षा महत्वपूर्ण धार्मिक समुदाय हाच राजीकय निष्ठांचा केंद्रबिंदु म्हणून वाटचाल होतांना दिसते. जमातवाद हा देशाच्या एकात्मतेला व अखंडतेला नेहमी घातकच राहणार. या देशात हिंदु धर्मियांचा इतर अनेक धर्मियांशी संघर्ष होतो. हिंदु-मुस्लिम, हिंदु-शिख, हिंदु-ख्रिश्चन, हिंदु-दलित यांच्यातील कोणत्या ना कोणत्या समुदायाशी नेहमी संघर्ष होत राहतो. हिंदु-मुस्लिम दंगली हा देशात नित्य घडणारा प्रकार होऊन बसला आहे. हिंदुच्या मनांत मुल्सिमांविषयी अविश्वास आणि मुस्लिामांच्या मनात हिंदु पासुन असुरक्षिततेची भावना तीव्र असल्याचे वारंवार दृष्टीपत्तीस येते.[७] या

देशात हिंदु-मुस्लिम दंगली राजकारणी लोक मतासाठी जाणीवपूर्वक घडवून त्याचा फायदा घेतात. फेब्रुवारी २००२ मधील गुजरात येथील गोंध्रा हत्याकांड करून दंगलीच्या नावाखाली खरे तर तो नरसंहार झाला. इंदिरा गांधीच्या हत्येनंतर शिखांच्या कत्तली झाल्या तोही नरसंहार होता, १९९३ मधील मुंबईतील बॉम्बस्फोट ने सुद्धा अनेक लोकांचा नरसंहार केला. खऱ्या अर्थाने आज हिंदु-मुस्लिम या दोघांसाठी आणि इतर धर्मियासाठी सुद्धा धर्मनिरपेक्षते खेरीज अन्य पर्याय नाही.

धर्मनिरपेक्षता हे भारतीय संविधानाचे पायाभूत वैशिष्ट्ये आहे. अशी स्पष्ट भूमिका सर्वोच्च न्यायालयाने मार्च १९९४ च्या बोम्मबई खटल्यात घेतली होती. राज्यसंस्थेने विविध धर्मासंबंधी असलग्न रहावे असा अभ्रिपाय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. धार्मिक स्वातंत्र्याचा उपभोग घेत असतांना समाजातील व्यवस्था नितीमत्ता व लोकांचे आरोग्य यांना धोका पोहचता कामा नये. तसेच धर्माच्या नावाखाली देशद्रोही कारवाया, गुन्हे वा समाज विघातक कृती करण्याची मोकळीक देण्यात आलेली नाही. धर्माच्या नावाने सतीप्रथा, बालहत्या, गुलामी, अस्पृश्यता, स्त्रियांना दुय्यम दर्जा इत्यादीसारख्या प्रथा चालू ठेवता येणार नाहीत. इत्यादी प्रकारच्या व रूढीपंरपरांना सविंधानाने बेकायदेशीर ठरविले.

सरकार व पक्षीय राजकारण पाहिले असता पुढील बाबी लक्षात येतात. १९८० नंतर सांप्रदायिकतेचे स्तोम अतानात वाढलेले दिसते. राजकीय पक्षाची स्वार्थी भूमिका दिसुन येते. १) १९८४ सूवर्ण मंदिर प्रकरण, २) शहाबानो प्रकरण, ३) मज्जित प्रकरण १९९२, ४) गुजरात दंगल २००२ ५) त्रिशुल वाटप प्रकरण या सर्व प्रकरणात सरकारची व पक्षाची भूमिका तोकडी पडते.

संविधानाच्या आधाराने देशात जो समाज निर्माण होणार आहे त्या समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीला कुठलाही भेदभाव, जातिभेद, धर्मभेद, लिंग, वंश, प्रांतभेद, भाषाभेद न करता समान नागरिकत्व, सामाजिक समानता, आर्थिक व राजकीय न्याय, आचार-विचार, विश्वास, उपासना करण्याचे स्वातंत्र्य मानवी प्रतिष्ठा सांभाळून प्रत्रेक व्यक्तीला बंधुतेच्या भावनेने वागविले जाईल. या देशातील प्रत्येक नागरिक मूलभूत हक्कांनिशी या देशात वावरेल याची हमी संविधानाने दिलेली आहे. हे स्वातंत्र्य प्रत्येकाला त्याच्या धर्माचं आचरण करण्याचं, पालन करण्याचं त्याचप्रमाणे धर्मांचा प्रचार करण्याचंही स्वातंत्र्य आहे. तसेच सर्व धर्मियांना त्यांच्या धर्मसंस्था स्थापन करण्याचा, त्यासाठी मालमत्ता संपादन करण्याचा, त्यांचा कारभार पाहण्याचा एवढेच नव्हे तर धार्मिक शिक्षण देण्याचा अधिकार देण्यात अला आहे.[८] खऱ्या अर्थाने या कलमाने धर्माच्या नावाने जो जुलुम अन्याय, भेदभाव होत होता, त्यातुन व्यक्तीची मुक्तता, होऊन त्याला धार्मिक स्वातंत्र्य मिळाले आहे.

घटनेमध्ये नागरिकांची मूलभूत कर्तव्य दिलेली आहेत. त्याचा संबंध धर्मनिरपेक्षतेशी आहे. प्रत्येक नागरिकाने या देशामध्ये एकता व बंधुता जोपासण्याचा आणि सामायिक संस्कृती जतन करण्याचा, वृंद्धीगत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुसांद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खरोखरच प्रत्येक नागरिकाने या कर्तव्याचे पालन केल्यास देशामध्ये जे वेगवेगळ्या भेदावरून संघर्ष आणि हिंसा होते ती टाळता येईल. ज्या धर्मांध, जात्यांध शक्ती आज जोमाने कार्याला लागलेल्या आहेत. त्यांचा बंदोबस्त होईल.

**धार्मिक अल्पसंख्याक :-**

भारतात हिंदु बहुसंख्याक असून मुस्लिम,ख्रिश्चन, पारशी, शीख, जैन इत्यादी धर्मांचे अनुयायांचे अल्पसंख्याक गट आहेत. त्या प्रत्येक गटाला भारतीय संविधानाने धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. भारताची राज्यघटना धर्मनिरपेक्ष असल्यामुळे राज्यव्यवस्थेचा असा कोणताही धर्म नाही. कलम २९ व ३० मध्ये अल्पसंख्याकांना त्याचा धर्म त्यांची भाषा, संस्कृती एवढेच नव्हे तर त्यांची लिपी जतन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.[९] म्हणजेच भारतीय संविधानाने धार्मिक आधारावर व्यक्ती व्यक्तीत भेदभाव न करण्याची हमी दिली आहे. तसेच या समुहांना राष्ट्रीय प्रवाहात आणले आहेत.

भारतासाठी धर्मनिरपेक्षता ही ऐतिहासिक गरज आहे. तसेच परिस्थितीजन्य गरज आहे. भारतातील काही राज्यांमध्ये तर सर्वधर्मिय जवळजवळ सारख्या संख्येन आहेत. गोव्यामध्ये हिंदु आणि ख्रिश्चन, केरळमध्ये हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, इशान्येकडील पाच राज्यामध्ये ख्रिश्चन बहुसंख्य आहेत. काश्मीरमध्ये मुस्लिम बहुसंख्य आहेत. ही परिस्थीती भारतामध्ये असल्यामुळे आम्हांला धर्मरिपेक्षतेशिवाय दुसरा पर्याय नाही.

आज धार्मिक मुलतत्ववाद देशात वाढतांना दिसतोय मात्र त्यामुळे धार्मिक आणि धर्मांध यांच्यात अंतर करणेच बंद झाले आहे. एखादी व्यक्ती धार्मिक असू शकते. मात्र अशी व्यक्ती धार्मिक मुलतत्ववादीच आहे. अशी समजुत धर्मरिपेक्षतावादी करून घेत असतात. धर्मरिपेक्षतेची बाजु मांडणारी ती उचलून धरणारी मंडळी बहुतेक मार्क्सवादी असायची या मंडळीचा देवावर विश्वास नसतो. त्यांचा बुद्धिप्रामाण्यवाद सर्व सामान्य लोकांच्या आकलना पलिकडचा असतो. त्यामुळे धर्मांधतेला रोखण्याची त्यांची धडपडही अपुरी पडते. भारतात धर्मनिरपेक्षतेची बीजे रोवण्याचे काम संविधानाच्या अंमलबजावणीपासून सुरू आहे. परंतु राजकारणी लोक धर्मांधता आणि धर्मनिरपेक्षता यांच्यात समाजाचे विभाजन करून लोकांच्या धार्मिकतेचा फायदा घेऊन त्याचे रूपांतर आपल्या मतपेटीत करतात.

देशातल्या प्रत्येक नागरिक, प्रत्येक स्त्री-पुरूष जेव्हा जागृत होईल तेव्हा केवळ कायद्यानं सुधारणा करण्याची गरज पडणार नाही तर तो स्वत:चे हित सांभाळण्यास समर्थपणे पुढे येईल.

**फुल आंबेडकरांना अभिप्रत धर्मनिरपेक्षता :-**

महात्मा फुले समोर शतकानुशतके चातुर्वण्याधिष्टित समाजव्यवस्थेतील शुद्रातिशुद्र हा वंचित समाज होता. तो सामाजिक गुलामगिरीने पिडीत जीवन जगत होता. या भयावह गुलामगिरीत सामाजिक, आर्थिक, शोषणाबरोबरच त्याचे शारीरिक, मानसिक, व धार्मिक शोषणही होत होते. शुद्रतिशुद्र माणुसपणालाच मुकले होते. धर्मसंस्थेने त्यांची ही अवस्था केली. म्हणून त्यांना त्यांची माणुसपणाचे हक्क प्राप्त करून देण्यासाठी पारंपारिक धर्मसंस्थेवर आघात करून नव्या सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी करावी लागली. "आपलं देण्याचं माप आणि घेण्याचं माप एकच असलं पाहिजे"[१०] सार्वजनिक सत्यधर्माचा एक प्रकारे गाभा सांगितला हा सार्वजनिक सत्यधर्म मानवकेंद्री होता. एका अर्थी धर्मरिपेक्षतेच्या संकल्पनेचे ते प्रारूपच होते. भारतीय समाजव्यवस्थेत ब्राम्हण हे भूदेव म्हणजेच पृथ्वीवरचे ईश्वरच मानले जात. महात्मा फुले यांनी या पुरोहित शाहीवरच हल्ला केला. "जे का रंजले

गांजले त्यास म्हणे जो आपुले तोच साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा."[११] या स्वरूपातील धर्म तुकारात महाराजांनी सांगितला. जो धर्म रंजल्या गांजल्यांच्या कल्याणासाठी उत्थनासाठी असेल त्यात गुलामी शोषण नसेल तो धर्म नाकारण्याचे कारण नाही. त्यात धर्मांधवृत्ती असणार नाही. महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्मात सर्वधर्मसमभावाची संकल्पना अंतर्भुत आहे. "ब्राम्हणा" धर्म माणासाला माणसासारखे जगण्याचा हक्कच नाकारण्याऱ्या धर्माला महात्मा फुले यांनी धिक्कारले परंतु, निर्मिकाचा व त्याच्या सत्यधर्माचा त्यांनी पुरस्कार केला.[१२] तात्पर्यंत महात्मा फुले यांना अपेक्षित असलेली धर्म व धर्मनिरपेक्षता या प्रकारची असणे आवश्यक वाटले. "भारतीय समाजरचनेच्या दृष्टीने सामाजिक विषमता, हेच शोषणाचे कारण होते. म्हणून जातिव्यवस्थेच्या निर्मुलनाचा सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने अठाक्रम द्यायाला हवा, अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका होती."[१३]

तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यावर आधारित राष्ट्राची उभारणी करून धर्मनिरपेक्षतेला ते पुरकच आहेत. आणि भारतीय राज्यघटनेची व कायद्याची अंमलबजावणी करतांना शासनाचे कचखाऊ धोरण स्विकारून चालणार नाही.

या देशातील धर्मनिरपेक्ष राजकीय शक्ती भारतीय सविंधानातील सरनाम्यात आणि संविधानातील वेगवेगळ्या अनुच्छेदात आशयरूपाने प्रतिबिंबित झालेली धर्मनिरपेक्षता खऱ्या अर्थाने राजकीय सामाजिक वर्तनव्यवहारात आमलात आणण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ :-**


१) डॉ.पु.ग.सहस्त्रबुद्धे, इहवादी शासन, केसरी प्रकाशन, पुणे- १९७२, पृ.१३५.

२) कुंभार नागोराव. संपा. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? प्रबोधन प्रकाशन लातूर, पृ.४

३) भोळे भा.ल.भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुन २००३, पृ.६६.

४) कुंभार नागोराव, संपा. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? प्रबोधन प्रकाशन लातूर पृ.३३.

५) भोळे भा.ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुन २००३, पृ.६२.

६) कित्ता, पृ.६२

७) कित्ता, पृ.५४०

८) डॉ.अशोक चौसाळकर संपादक, धर्म-समाज आणि राजकारण, लोकवाड्मय गृह, मुंबई२००४, पृ.१३६,१३७.

९) कित्ता, पृ.१३७

१०) कित्ता, पृ.१२९

११) कित्ता, पृ.१२९

१२) डॉ.सदा कऱ्हाडे, धर्म निरपेक्षता आणि भारत, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००७, पृ.१८१.

१३) कित्ता, पृ.१७६.


◆◆◆

# अण्वस्त्र निर्मिती जगासमोरील समस्या

**प्रा. डॉ. शिवाजी दिवान**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड

**प्रस्तावनाः**

जगावर वर्चस्व निर्माण करणाऱ्या हेतूने विकसित राष्ट्रांनी अण्वस्त्र निर्मितीवर भर दिला. यामध्ये अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या देशांचा समावेश होतो. परंतु दुसऱ्या महायुध्दाच्या शेवटी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासकी या दोन शहरांवर केलेल्या अनुबॉम्ब हल्ल्यामुळे जी प्रचंड जीवित आणि वित्तहाणी झाली. त्यावरून संपूर्ण जगाला अण्वस्त्राच्या विध्वंसक क्षमतेची साक्ष पटली. आणि जगातील राष्ट्रांनी शांतता प्रस्थापित होण्यासाठी अण्वस्त्र बंदी बाबत अनेक करार केले. वास्तविकरित्या मात्र या करारांचे पालन फारच कमी राष्ट्रांनी केले. याच्या उलट अण्वस्त्र निर्मितीवरच मोठ्याप्रमाणात विकसित राष्ट्रांनी भर दिला. यातून जगात अशांतता निर्माण होऊ लागली. अविकसित व विकसनशील राष्ट्रांनी विकसित राष्ट्रांकडून अण्वस्त्रांची खरेदी केली. यातून जागतिक पातळीवर अण्वस्त्र निर्मितीची जीवघेणी समस्या निर्माण झाली.

जगाच्या पाठीवर महासत्ता म्हणून विकास पावलेल्या (अमेरिका व सोव्हियत रशिया) या दोन्ही राष्ट्रांजवळ अण्वस्त्रांचे साठे असल्याने या दोन्ही महासत्तांमध्ये समतोल निर्माण होवू शकला. शीतयुध्दाच्या काळात ४६ प्रसंग असे उद्‌भवले जेंव्हा अमेरिका आणि सोवियत संघ यांच्यात अणुयुध्द होण्याची शक्यता निर्माण झाली होती, परंतु अण्वस्त्रांच्या साठ्यामुळे दोन्ही देशात अणुयुध्दाचा धोका टळला. यावरून हे स्पष्ट होते. अण्वस्त्रांचा प्रत्यक्षात वापर होण्यापेक्षा ते जवळ असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे संरक्षण होते त्याचबरोबर इतर राजकीय लाभ उठविता येतात. परिणामी अण्वस्त्र हे युध्दाचे साधन ठरण्यापेक्षा राजकीय साधन म्हणून अधिक उपयोगात आणले जात आहे.

**अण्वस्त्र निर्मितीची कारणे :** राष्ट्रा-राष्ट्रांमधील भिती आणि असुरक्षिततेचे वातावरण अणवस्त्र स्पर्धेसाठी पोषक परिस्थिती निर्माण करते. भिती आणि असुरक्षितता हे कधीही न संपणारे चक्र आहे. या भितीपोटी राष्ट्रे संरक्षणावर लक्ष केंद्रित करतात. यातून आधुनिक शास्त्रास्त्रांची निर्मिती व नवीन संशोधनावर भर दिला जातो. एका राष्ट्राने संरक्षण खर्चात वाढ केली की, भितीपोटी दुसऱ्या राष्ट्रालाही संरक्षण खर्चात वाढ करावी लागते. यातूनच अण्वस्त्रांची मोठ्या प्रमाणात निर्मिती होते. आर्थिक फायद्याच्या दृष्टिकोनातून महासत्तांनी केलेला शस्त्रास्त्राचा व्यापार शस्त्रास्त्र स्पर्धा वाढविण्यासाठी कारणीभूत ठरला शस्त्रास्त्रांच्या व्यापारातील अमेरिका, रशिया, इग्लंड, फ्रान्स, इटली हे मोठे खेळाडू आहेत. शस्त्रास्त्र व्यापारातील त्यांचा वाटा खालीलप्रमाणे आहे.

'दहशतवादाचा' धोका आज संपूर्ण जगाला भेडसावत आहे. या दहशतवाद्यांनी शस्त्रास्त्रांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातूनच अमेरिकेसारख्या राष्ट्रांकडून शस्त्रास्त्रे प्राप्त केली असून त्याचा वापर दहशत निर्माण करण्यासाठी केला. अमेरिकने पाकिस्तानला एफ-१६ आत्याधुनिक विमाने, हार्पून नावाची क्षेपणास्त्रे विकली तर भारताने रशियाकडून सुखॉय-३० नावाची लढाऊ विमाने, आणि फ्रान्सकडून घमिराजङ नावाची विमाने खरेदी केली. यामुळे अमेरिका, रशिया, फ्रान्स या राष्ट्रांचा जरी काही प्रमाणात आर्थिक फायदा झाला असला तरी भारत आणि पाकिस्तानमध्ये मात्र शस्त्रास्त्र स्पर्धा वाढीस लागली हे मात्र खरे.

**अण्वस्त्र स्पर्धेचे परिणाम :**

A) अण्वस्त्र स्पर्धेमुळे जागतिक स्तरावर अनेक परिणाम झाले. शस्त्रास्त्रामुळे युध्दाचा धोका निर्माण झाला. ज्या राष्ट्रांमध्ये संरक्षणावर अधिक खर्च केला जातो. लष्करी सामर्थ्य वाढविण्यावर भर दिला जातो. तयाठिकाणी लष्करी अधिकाऱ्यांचा प्रभाव साहजिकच वाढलेला असतो तिथे लष्करशाही प्रस्तापित होण्याचा धोका असतो. असे हुकूमशहा राष्ट्राला युध्दाच्या दिशेने घेवून जातात. उदा. जपान व पाकिस्तान इत्यादी होत.

B) अण्वस्त्र खरेदी ही प्रचंड खार्चिक प्रक्रिया आहे. यासाठी राष्ट्रांना मोठी किंमत चुकवावी लागते. यामुळे गरीब आणि श्रीमंत राष्ट्रातील दरी वाढत आहे. शस्त्रास्त्र स्पर्धेची झळ अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेलाही सहन करावी लागली. सन १९६५ ते १९७० च्या काळात झालेल्या व्हियतनाम युध्दात अमेरिकेचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. संरक्षणावर केलेला भरमसाठी खर्च हा सोविएत रशियाच्या विघटनाला कारणीभूत ठरला. शस्त्रास्त्र स्पर्धेचे आर्थिक परिणाम भारत आणि पाकिस्तानलाही सहन करावे लागत आहेत. एकीकडे दोन्ही देशातील गरिबी, बेरोजगारी, उपासमार, लोकसंख्या वाढत आहे. तर दुसरीकडे संरक्षणावरचा खर्च वाढत आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था तर डबघाईला आली आहे. पाकिस्तान आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या पाच टक्के भाग संरक्षणावर खर्च करत आहे. हेच चित्र बहुतांश विकसनशील राष्ट्रांमध्ये दिसून येते. उत्तर कोरियाची जनता गेल्या अनेक वर्षापासून भीषण दुष्काळाचा सामना करत आहे. तर तेथील साम्यवादी शासन अण्वस्त्रांच्या विकासावर अब्जावधी रूपये खर्च करत आहे. सन १९९० च्या दशकानंतर दहशतवादाच्या वाढत्या प्रभावाच सामना करण्यासाठी अनेक राष्ट्रांनी आपल्या संरक्षण खर्चात वाढ केली आहे.

C) अण्वस्त्र निर्मिती व खरेदी यावर होणारा खर्च हा समाज कल्याणकारी योजनांमध्ये कपात करून उभारला जातो. त्यामुळे आरोग्य, शिक्षण, गरीबी निर्मुलन, गृहबांधणी यासारख्या समाज कल्याणकारी क्षेत्रावर पुरेसा पैसा खर्च होत नाही. विकसनशील राष्ट्रात ११० राष्ट्रांचा समावेश होतो. या राष्ट्रामधील ८०० दशलक्ष जनता गरीबी, उपासमार आणि शारीरिक वेदनांचा सामना करत आहे. सद्यस्थितीत जगामधील विकसनशील राष्ट्रे आपल्या एकूण उत्पन्नाच्या पाच ते पंधरा टक्के उत्पन्न राष्ट्रीय संरक्षणासाठी राखून ठेवतात. त्यामुळे सामाजिक विकसाच्या योजनांना पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जात नाही.

थोडक्यात अण्वस्त्रांची निर्मिती ही जगासमोरील सर्वात मोठी समस्या बनलेली आहे. प्रथमतः विकसित

राष्ट्रांनी आर्थिक मिळकत आणि राजकीय दबाव यासाठी अण्वस्त्रांची निर्मिती केली आणि आपल्या गटातील देशांना ती घेण्यास भाग पाडले, परंतु अण्वस्त्रांच्या व शस्त्रास्त्रांच्या मोठ्या प्रमाणावरील निर्मितीमुळे दहशतवादासारखे प्रश्न निर्माण झाले. यातून अनेक देशांचे आतोनात नुकसान झाले. अमेरिकेसारख्या राष्ट्रालाही याच्या परिणामांना सामोरे जावे लागले. एकूणच परिस्थिती लक्षात घेता हे स्पष्ट होते की, अण्वस्त्रांच्या निर्मितीमुळे जागतिक पातळीवर अशांतता प्रस्तापित होवून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधुनिक क्षेपणास्त्रामुळे लांब पर्यंत लक्ष्य गाठणे शक्य झाले आहे. त्यामुळे विध्वंसाचे प्रमाण, जीवित व वित्तहाणीचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. एकंदरीतच अण्वस्त्र निर्मिती ही जगाला शांततेकडून अशांततेकडे घेवून जात आहे.

**संदर्भ :**

१) Vinaykumar Malhotra, International Relations (New Delhi), Anmol Publication, २००३.

२) Adi Doctor, International Relations, New Delhi, Vikas Publication, १९७०.

३) Johri J.C., International Relations and Politics, Theoretical Perspective, New Delhi, Sterling, Publication, १९८१.

४) देवळाणकर शैलेंद्र-आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, २०१४.

५) कुलकर्णी वि.जी. व सोमवंशी, आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

◆◆◆

Power of Knowledge Peer Review Journal,Volume:I, Issue:III Oct. to Dec. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# महात्मा गांधीजीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन

**डॉ संजय गोपाळराव ठवळे**
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय
मोहपा जि. नागपूर ४४१५०२

सत्य व अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी खरोखरच युगप्रवर्तक पुरुष होते या युगपुरुषाने जीवनाच्या सर्वच अंगांना स्पर्श केला आहे महात्मा गांधीजीचे तत्वज्ञान जणकल्याणकारी आहे. महात्मा गांधीजीच्या संपूर्ण जीवनाला कलाटणी देणारा प्रसंग दक्षिण आफ्रिकेतील लढा होय महात्मा गांधीनी दक्षिण वर्णभेदाच्या विरोधात अहिंसात्मक पद्धत्तीने आवाज उठवुन सत्याग्रहाची सुरुवात केली. त्याचप्रमाणे तात्कालिन दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदी शिक्षण व्यवस्थेच्या विरोधात लढा दिला याचीच परिणीती म्हणुन १९०४ मध्ये फिनिक्स आश्रमाची स्थापना केली या फिनिक्स आश्रमात त्यानी टॉलस्टॉय व रस्कीनच्या शिक्षण विषयक प्रयोगाचा व तत्वाचा वापर केला पुढे १९०९ मध्ये इंग्लंड — दक्षिण आफ्रिकेला जात असताना ''हिन्द स्वराज्य'' हे पुस्तक लिहले यात त्यानी आपले शिक्षणविषयक विचार व्यक्त केले आहे.

बऱ्याचदा शिक्षण म्हणजे अक्षरज्ञान असा अर्थ घेतला जातो परंतु शिक्षणाचा खरा उद्देश नाही याला फार तर ज्ञान मिळविण्याचे साधन म्हणता येईल एखाद्याला ज्ञान मिळुनही शहाणपण येईलच असे नाही आणि गांधीजी तर माणसात शहाणपण येणे यातच शिक्षणाचे यश मानीत. त्यामुळे शिक्षण हे चारिष्य निर्माण करणारी, व्यक्तिमत्व फुलवणारी एक जिवंत प्रक्रिया असली पाहिजे असे म्हणत. टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० पासून भारतीय स्वातंष्य चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडे आले व भारतीय स्वातंष्य लढा त्यांच्या व्यक्तिमत्व व कार्याभोवती केंद्रीत झाला भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील गांधीजी हे एक असे व्यक्तिमत्व होते की ज्यांचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशातील जनते पर्यंत पोहचले त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू आहेत स्वातंष्य योद्धा, अस्पृश्योद्धारक, समाज सुधारक, राजकीय विचारवंत, अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ इत्यादी अल्बर्ट आईन्सटाईन गांधीजी बद्दल म्हणतात ''भावी पिढ्यांचा यावर विश्वास बसनार नाही की हाडामासाचा असा एक माणुस खरोखरच पृथ्वी तलावावर होता'' असे गांधीजीचे व्यक्तिमत्व व कार्य होते.

गांधीजीना बलशाली भारत बनवायचा होता स्वराज्य प्राप्त झाल्यावर झेंडा बदलला की शिक्षण ही बदलले पाहिजे या मताचे गांधीजी होते म्हणुन स्वातंष्य प्राप्तीच्या काळात व स्वातंत्र्यानंतर भारतात कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे? चारित्र्य संपन्न, स्वावलंबी आणि स्वतंत्र वृत्तीची नवीन पिढी घडवून नवा भारत कसा निर्माण करता येईल या प्रश्नासंबंधी ते सतत चिंतन करीत असत चिंतनातून महात्मा गांधीच्या शिक्षण विषयक विचाराचा उगम झाला ब्रिटिशांच्या काळात भारतात सुरु असलेली मेकॉले प्रणित शिक्षण व्यवस्था निरुपयोगी आहे व सदोष आहे प्रशासनाला उपयोगी पडणारे कारकून तयार करणे,

भारतीय समाज व्यवस्था नष्ट करणे हा या व्यवस्थेचा मुख्य हेतु होता मेकॉले प्रणित शिक्षण व्यवस्था ही विद्यार्थ्यांच्या सृजनशिल शक्तीवर आघात करणारी आहे असे महात्मा गांधीचे मत होते साध्यापेक्षा साधनाना महत्व देणारी शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्याचा नैतिक विकास करु शकत नाही कारण यातुन बाहेर पडणारे विद्यार्थी त्यांच्या वासना व विकारावर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ असतात विद्यार्थ्यांना निरर्थक ओझे वाहावयास लावणारी ही व्यवस्था त्यांच्यात सेवावृत्ती व जबाबदारीची जाणीव निर्माण करु शकत नाही ब्रिटिश काळातील शिक्षण व्यवस्थेत सामाजिक वास्तव्य व राष्ट्रीय आकांक्षाचे प्रतिबिंब उमटलेले नसल्यामुळे ही व्यवस्था समाज, देश व विद्यार्थ्यी यांच्या उपयोगाची नाही मेकॉले प्रणित शिक्षण व्यवस्थेत समाजाची आव्हाने पेलण्याची क्षमता नाही महात्मा गांधी ''हिन्द स्वराज्य'' मध्ये लिहतात ''मेकॉलेनी ज्या शिक्षणाचा पाया घातला तो खरा म्हणजे गुलामगीरीचा पाया होता'' गांधीजीनी देशाच्या शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन करणारे क्रांतिकार विचार मांडले त्यानी शिक्षणाचा अर्थ, शिक्षणाचे प्रयोजन, शिक्षणाचे माध्यम, अभ्यासक्रम पाठयपुस्तके, शिक्षक, विद्यार्थी बाळ शिक्षण, पौढ शिक्षण, स्त्रि—शिक्षण, दलितांचे शिक्षण व धार्मिक शिक्षण इत्यादी शिक्षणाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारे नाविन्यपुर्ण विचाार मांडले.

गांधीजीना दु:ख, दारिद्र, अन्याय आणि दृष्टरुढी परंपरा यानी ग्रासलेले, भयग्रस्त व निराशामय मानवी जीवन बदलवून शांती, सत्य, प्रेम, स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारलेली शोषण विहीन, वर्गविहीन समाजरचना निर्माण करायची होती अशी समाजरचना निर्माण करण्याचे व ती सदैव स्वयंशासित, स्वावलंबी, चेतन्यमय आणि विकसनशील ठेवण्याचे सर्वश्रेष्ठ साधन शिक्षणच असू शकते शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे व्यक्ती व समाज जीवनास नवे वळण व दिशा देण्याचे प्रभावी माध्यम आहे गांधीजी म्हणतात शिक्षण हे काही साध्य नव्हे तर ते एक साधन आहे ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू तेच खरे शिक्षण केवळ उपजीवीका व संपत्ती हा शिक्षणाचा हेतु अत्यंत गौण आहे.

शिक्षण हे मानवाची जडण—घडण करण्याचे शास्त्र व कला आहे म्हणुन शिक्षणाचा उद्देश लिहिण्या—वाचण्याची किंवा पोट भरण्याची कला अवगत करणे यापूरता मर्यादित न ठेवता व्यक्तिमत्वाचा सुसंवादी व पूर्ण विकास हाच असला पाहिजे शिक्षणाने मानवाचा शारीरिक, बौद्धिक, अध्यात्मिक विकास होण्यासाठी प्रेरणा मिळल्या पाहिजे पुस्तकी शिक्षणावर भर देणाऱ्या, श्रमाचा तिरस्कार करणाऱ्या आणि समाजापासून आपण वेगळे असल्याची प्रवृत्ती निर्माण करणाऱ्या प्रचलित शिक्षणाच्या संदर्भात ते म्हणत व्यक्तीच्या संपूर्ण विकासाकडे दुर्लक्ष करुन त्यांची एकांगी वाढ होण्यास हातभार लावण्याचा प्रयत्न म्हणजे शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टांची मोडतोड करण्यासारखे होय ज्ञानदान करणाऱ्या शिक्षण संस्था समाजा पासुन दुर असून चालणार नाही तर त्याना जीवनाच्या गरजा, अशा—आकांक्षा लक्षात घेऊन पूर्ती करण्यासाठी सदैव कृतीशील राहवे लागेल गांधीजीना शिक्षण संस्थातून विद्यार्थी व

शिक्षकाने केवळ एकत्र राहणे अभिप्रेत नव्हते तर त्याने समाज विकास कार्यक्रम हाती घेणारे समुह बनणे महत्वाचे वाटत होते असे झाले तरच शिक्षण आर्थिक दृष्ट्या उत्पादन कौशल वाढविण्याचे साधन होईल नवीन शिक्षण पद्धती राबविण्यासाठी गांधीजीनी ''अखिल भारतीय तालीम संघ'' नावाची संस्था स्थापन केली व देशभर अनेक ध्येयवादी कार्यकर्त्याद्वारे ती राबवण्याचे कार्य सुरु केले.

जे शिक्षण तज्ञ होऊन गेले, शिक्षण तज्ञांनी आपले शैक्षणिक विचार मांडले त्यात महात्मा गांधीचे नाव अग्रस्थानी आहे महात्मा गांधीनी शिक्षणाला राष्ट्र विकासाचा आत्मा मानला भावी पिढयांच्या सशक्त समृद्ध जीवनासाठी आणि राष्ट्र उभारणीस उपयोगी ठरणाऱ्या जबाबदार नागरिकांची निर्मिती ज्या शिक्षण व्यवस्थेत होईल अशा व्यवस्थेची आखणी गरजेची असल्याने गांधीजीनी आपल्या चिर्तनाची दिशा जीवन शिक्षण पद्धती प्रमाणे केल्याचे दिसुन येते केवळ कारकुन निर्माण करणाऱ्या लॉर्ड मेकॉले प्रणित शिक्षण पद्धतीची मीमांसा भारतीय संदर्भात करुन ते थांबले नाही तर संभावनाना त्यानी सक्षम विचारांचे अधिष्ठान प्राप्त करुन दिले गांधीजीचा हा प्रयत्न म्हणजे नव्या शिक्षण व्यवस्थेच्या योजनेचे प्रयत्नच होय ''अपूर्णत्वाकडुन पूर्णत्वाकडे जाणाचा प्रवास म्हणजे शिक्षण'' ही शिक्षणाची स्वामी विवेकानंद यांची व्याख्या म्हणजे गांधीजीची ''नई तालीम'' होय.

गांधीजीना स्वयंभू शिक्षण विचार विकसित करावयाचा होता त्यासाठी त्यांनी ''नई तालीम'' ही संकल्पना मांडली राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करताना त्यानी भारतातील तात्कालीन परिस्थिती, इंग्रजांचे धोरण आणि भारतीय शिक्षण संस्थापुढील आव्हाने या सर्व बाबींचा विचार करुन नवा विचार विकसित केला या शिक्षण विचारामध्ये स्वावलंबन आत्मसन्मान आणि श्रमप्रतिष्ठा ही तीन मुल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला.

आधुनिक भारताच्या नवनिर्माणात राजाराममोहन रॉय यांच्या पासुन ते स्वातंष्यवीर सावरकर, विवेकानंद, डॉ. बाबासाहेब, महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, राम मनोहर लोहिया, दीनदयाल उपाध्याय आदी महापुरुषानी मौलिक योगदान दिले आहे त्यापैकी महात्मा गांधी याचे योगदान राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रात महत्वाचे आहे त्यामुळे आपण त्याना ''राष्ट्रपिता असे संबोधतो महात्मा गांधी यानी ''हिन्द स्वराज्य'' या ग्रंथामध्ये आधुनिक भारताच्या — नवनिर्मितीचा विचार मांडला आहे राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रात कृषी उद्योग, आणि शिक्षण या क्षेत्रातील भारतीय दृष्टीकोन त्यानी प्रामुख्याने मांडला आहे १९३६ मध्ये लिहिलेल्या ''नई तालीम'' या पुस्तकामध्ये त्यानी शिक्षण विचार मांडले आहेत ''नई तालीम'' हा त्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत विचार म्हणुनही ओळखला जातो.

३१ जुलै १९३७ च्या हरिजन मध्ये गांधीजीनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले त्यांचे शिक्षण विषयक विचार म्हणजेच ''वर्धा शिक्षण विषयक'' विचार होते कृषी प्रधान भारताच्या अर्थव्यवस्थेला गती देणाऱ्या उद्देशाने निर्माण करण्यात आलेल्या या पद्धतीला ''वर्धा शिक्षण पद्धती'' म्हणुन संबोधिले जाते या शिक्षण पद्धतीत काही दोष असेल तरी

तात्कालीन परिस्थितीला अनुसरुन ही शिक्षण पद्धती होती मात्र त्यानी आपल्या शिक्षण योजनेतुन स्वावलंबनाचा मार्ग दाखविला कृतीतुन शिक्षणांचे महत्व त्यानी सांगितले वर्तमान शिक्षण पद्धत देखील याच कृतीतुन शिक्षणावर आधारित आहे.

महात्मा गांधी यानी लॉर्ड मेकॉले यांच्या वसाहतवादी शैक्षणिक विचारांचे आकलन करुन त्याबाबतचे परखड चिंतन 'नई तालीम' या संकल्पनेत केले आहेत गांधीजीचा शिक्षण विचार शिक्षण आणि राष्ट्रजीवन यांना जोडणारा आहे विकास आध्यात्मिक तसेच व्यक्तिमत्वाच्या विकासातील बौद्धिक आध्यात्मिक या तीनही दृष्टीने अत्किमत्वाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारा आहे आपण सर्वानी मिळून राष्ट्रजीवन बदलवायचे आहे असा त्यांचा स्वच्छ सुस्पष्ट आणि पारदर्शी विचार होता.

लोकमान्य टिळकांनी त्यांच्या चतु:सूत्रीमध्ये स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि परकीय मालावर बहिष्कार या चार कल्पना मांडल्या होत्या गांधीजीनी टिळकांच्या स्वदेशीचे रुपांतर खादी मध्ये केले राष्ट्रीय शिक्षणाचे रुपांतर नई तालीम या संकल्पनेत केले याचा अर्थ असा की गांधीजीनी स्वयंभू शिक्षण विचार विकसित करायचा होता त्यासाठी महात्मा गांधीनी नई तालीम ही संकल्पना मांडली मकरंद परांजपे ''डीकॉल नाशजिंग हिन्द स्वराज्य'' या ग्रंथात म्हणतात की गांधीजीना वसाहतवादी शिक्षणाचा विचार बदलावयाचा होता व त्याऐवजी राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करायचा होता.

असा राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करताना त्यांनी भारतातील तात्कालीन परिस्थिती, इंग्रजाचे धोरण आणि भारतीय शिक्षण संस्था पुढील आव्हाने या सर्व बाबींचा विचार करुन नवा विचार विकसित केला काळाच्या प्रवाहात विचार करता असे दिसते की महात्मा गांधीनी आपल्या नई तालीम या शिक्षण विचारामध्ये स्वावलंबन, आत्मसन्मान आणि श्रमप्रतिष्ठा ही तीन मुल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला गांधीजीना प्रत्येक विद्यार्थ्यास स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करावयाचे होते स्वावलंबन हाच आमचा निर्धार आहे आणि आम्हीच आमच्या यशाचे शिल्पकार आहोत अशा व्यक्तिमत्वाच्या अस्मितेमधील स्वच्या जागरणाचा विचार आणि या स्वचे रुपांतर समाज व राष्ट्रजीवनामध्ये करण्याच्या प्रयत्न गांधीजीनी केला.

गांधीजीचा शिक्षण विचार मन, मस्तिष्क, मेंदू आणि हात याना जोडणारा होता माणसाच्या बुद्धिमत्तेचा संपुर्ण विकास व्हावा त्याच्या हाती निर्माणाचे सामर्थ्य यावे, श्रमप्रतिष्ठा प्राप्त व्हावी त्याचे अंत:करण स्वच्छ व्हावे त्याच्या हृदयातून येणारा हुंकार आणि आतला आवाज हा त्याला स्वाभिमान आणि अस्मिता प्रदान करणारा असावा असे गांधीजीनी वाटत होते त्यांच्या मते हाताने श्रमदान करावे मनाने समाजातील दुर्बलाचा विचार करावा आणि बुद्धिच्या विवेकाने संबंध राष्ट्रजीवन उजळवून टाकावे असे स्वावलंबी शिक्षण गांधीजीना अभिप्रेत होते त्यांच्या या शिक्षणामुळे व्यक्ती आणि सभोवतीचा निसर्ग, शिक्षण संस्था समाज शिक्षण आणि राष्ट्रजीवन यांना एकत्रित जोडणे शक्य होणार होते त्यामुळे गांधीजीनी मुल्याधारित शिक्षणावर भर दिला शिक्षणाचे आध्यात्मिकरण व्हावे, अशी त्यांची भूमिका होती

भारतीय प्रश्नाना भारतीय उत्तरे शोधण्याचा प्रयत्न ''नई तालीम'' या संकल्पनेतून केला आहे.

शिक्षण ही गुरु आणि शिष्य यांच्यातील आंतरक्रिया असते गांधीजी शाळा व महाविद्यालयांना ''टेम्पल ऑफ नॉलेज'' म्हणजे ज्ञान मंदिरे मानत ज्ञानाचे ग्रहन करताना या मंदिराचे पाविष्य जपले गेले पाहिजे या विचाराचे गांधीजी होते मात्र आज शिक्षणाच्या पवित्र मंदिरात हे पाविष्य जपले जात आहे काय? आजची शाळा महाविद्यालये ज्ञानाची व संस्काराची केंद्रे बनवण्याऐवजी व्यापाराची केंद्र बनत चालली आहेत आज गुरु—शिष्याच्या नात्यात बदल झाला आहे समाजाचा, सरकारचा व शिक्षकांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे आजचे शिक्षण बेकारी निर्माण करणारे कारखाने आहेत शिक्षण घेऊन रोजगार मिळेल याची शक्यता नाही आजच्या शिक्षणात ना कौशल्य आहे ना रोजगार मिळवून देण्याची हमी आहे गांधीजीच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा विचार झाला असता तर देश विकासाकडे निश्चितच गेला असता तरुणांना रोजगार मिळाला असता तरुण स्वउद्योगाकडे वळले असते आजच्या शिक्षणातून मुलांना लिहिता वाचता येत नाही जीवन व्यव्हार कळत नाही शिक्षण पद्धतीत बदल व्हावा असा जेव्हा विचार पुढे येतो तेव्हा मात्र गांधीजीच्या मुलउद्योगी शिक्षणाचा, स्वयंपूर्णता शिक्षणाची व वर्धा शिक्षणाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही गांधीजीच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे मूळ जर आपण शोधण्याचा प्रयत्न केला तर शिक्षण हे काय करुन मिळते पुस्तकातुन नाही हाच विचार पुढे येतो गांधीजीच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा भरच स्वावलंबनावर व कृतीवर होता शिक्षणातुन विद्यार्थी स्वावलंबी बनला पाहिजे असे गांधीजीना वाटायचे.

शिक्षणाच्या बाबतीत महात्मा गांधीजीचे विचार खुपच स्पष्ट आहेत विद्यार्थ्याच्या विकासासाठी त्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास करणे अतिशय आवश्यक आहे असे ते म्हणत आणि म्हणुनच त्यांचे शालेय शिक्षण सुरु करण्या अगोदर त्याना प्राथमिक स्वरुपाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे विद्यार्थ्यांना सत्य, प्रेम, अहिंसा व सत्याग्रह अशा जीवनावश्यक सामाजिक मुल्यांचे शिक्षण शालेय शिक्षणाबरोबरच दिल्या गेले पाहिजे ज्यामुळे एका प्रकारची सुनियंत्रित अशी समाजरचना व शिस्तशीर असा समाज निर्माण होऊ शकेल.

वरील सर्व बाबींचा आपल्या काळात विचार केला असता असे लक्षात येईल की आपण हळूहळू गांधीवादी तत्वापासून दुर जात आहोत शाळेत विद्यार्थ्यांना भाषा, गणित, सामाजिक शास्त्र व शास्त्र हा विषय शिकवीत असताना विद्यार्थ्यांच्या अंगभुत गुणांना कुठेच वाव मिळत नाही तसेच त्यांच्या सुप्त गुणांना देखील बाहेर आणण्याकरिता व्यासपीठ सुद्धा नाही त्यामुळे त्याना व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही विद्यार्थी फक्त शालेय ज्ञानच ग्रहण करीत असतो व जीवनाच्या तिसऱ्या वर्षापासुनच १७ व्या वर्षापर्यंत तो शालेय परिसरातच असतो तो जेव्हा बाहेर पडतो व मॅट्रिकच्या भरवशावर आपल्या पायावर उभा राहण्याचा विचार करायला लागतो तेव्हा त्याला असे वाटते की तो पांगळा झालेला आहे

स्वत: कोणत्याच प्रकारचे उत्पन्नाचे साधन उभे करु शकत नाही अशा वेळस त्याच्या मनात नैराश्य निर्माण होणे स्वाभाविकच आहे रोजगार विनिमय केंद्रात नाव नोंदवून बेरोजगाराच्या संख्येत वाढ करण्याशिवाय पर्याय राहत नाही आणि म्हणुनच आदरणीय बापूंचे तत्व विचारपुर्वक सर्वानीच हाताळणे आवश्यक झालेले आहे.

सर्व क्षेत्राचे उगमस्थान शिक्षण आहे भारताचा शिक्षण प्रसार गाजरगवता प्रमाणे झाला आहे हिरवे तर दिसते पण आतुन प्रवास करताना दाह झाल्याशिवाय राहत नाही शिक्षण दर्जेदार होण्यासाठी यातील सारेच घटक गांधीजीच्या विचाराने भारावलेले असावे खऱ्या शिक्षणाचे सार म्हणजे मानवाता प्रगट करणे होय गांधीजीचे हे विचार आजच्या विद्यार्थ्याच्या मनात रुजतील तेव्हा भारत जगाचे ज्ञान मंदिर बनेल.

**संदर्भ सूची**


१) Dr. Mehta Chandrakant-Relevance of Mahatma Gandhi

२) नवभारत (मासिक) डिसेंबर २०१२

३) सत्याग्रह विचार धारा (मासिक) जानेवारी २०१३

४) डॉ. बोबडे प्रकाश — भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक

५) भोळे भा. ल — आधुनिक भारतातील राजकीय विचार पिंपळापूरे प्रकाशन नागपूर २००३

६) डॉ. बाळ पद्वाल — महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार श्री मंगेश प्रकाशन नागपूर २०१०

७) लाखे चंद्रशेखर — सामुदायिक विकास व विस्तार शिक्षण श्री मंगेश प्रकाशन नागपूर

८) भगत रा. तु — शिक्षणातील थोर विचारवंत चैतन्य प्रकाशन कोल्हापूर २००१


◆◆◆

# दक्षिण आशियातील राजकारण आणि सार्क संघटनेतील भारताची भूमिका

**प्रा. डॉ. अरुण पेंटावार**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि. बीड

**सारांश :**

दक्षिण आशियातील एक महत्वाची विभागीय व्यापार संघटना म्हणून सार्क संघटनेचा उल्लेख केला जातो. या संघटनेत भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, भूतान, नेपाळ, अफगाणिस्तान आणि मालदीव अशा आठ राष्ट्रांचा समावेश होतो. परस्पर सहकार्य आणि दृष्टिकोनातुन १९८५ साली सार्क संघटनेची स्थापना करण्यात आली. दक्षिण आशियातील एक महत्वाची प्रादेशिक संघटना सार्क ने आपल्या विभागीय सहकार्याच्या माध्यमातुन जागतिक राजकारणामध्ये एक महत्वाचे स्थान निर्माण केलेले आहे. भारत हे दक्षिण आशियातील एक महत्वाचे विकसनशील राष्ट्र असल्यामुळे व एक मोठी बाजारपेठ म्हणून संपूर्ण जागतिक राजकारणात भारताने सार्क संघटनेच्या माध्यमातुन जागतिक राजकारणावर आपला प्रभाव निर्माण केलेला आहे. दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करण्यामध्ये, दक्षिण आशियात मुक्त व्यापार व सहकार्य, राष्ट्रा-राष्ट्रांमधील राजकीय प्रश्न सोडविण्यात, दक्षिण आशियातील विभागीय सहकार्य व ऐक्य प्रस्थापित करण्यात भारताची भुमिका ही महत्वाची राहीलेली आहे.

**मुख्य शब्द (Key Words) :** दक्षिण आशिया, राजकारण, सार्क संघटना.

**प्रस्तावना :-**

शितयुध्दोतर काळातील जागतिक राजकारणातील एक महत्वाचे केंद्र म्हणून दक्षिण आशियाचा उल्लेख केला जातो. दक्षिण आशिया हा क्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील एक मोठा उपखंड आहे. या उपखंडात भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, भूतान, नेपाळ, अफगाणिस्तान आणि मालदीव अशा आठ राष्ट्रांचा समावेश होतो. यासोबतच चीन, म्यानमार यासारख्या मोठ्या राष्ट्रांचाही उल्लेख याठिकाणी केला जातो. सद्यकाळात दक्षिण आशियाच्या राजकारणावर इतर मोठ्या राष्ट्रांचा प्रभाव दिसुन येतो.यात अमेरिका, रशिया, चीन, ब्रीटन यासारख्या राष्ट्रांनी दक्षिण आशियाच्या विकासासाठी श्रीमंत राष्ट्रे प्रयत्नशील आहेत. जागतिक राजकारणावर पकड निर्माण करण्यासाठी दक्षिण आशिया हा उपखंड अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळेच जागतिक महासत्तांबरोबरच दक्षिण आशियातील सार्क संघटना, भारत व पाकिस्तानसारख्या राष्ट्रांनी दक्षिण आशियाचे महत्व ओळखुन जागतिक राजकारणावर आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. याच दृष्टिकोनातुन १९८५ साली सार्क संघटनेची स्थापना करण्यात आली. दक्षिण आशियातील एक महत्वाची प्रादेशिक संघटना सार्क ने आपल्या विभागीय सहकार्याच्या माध्यमातुन जागतिक राजकारणामध्ये एक महत्वाचे स्थान निर्माण केलेले आहे.

भारत हे दक्षिण आशियातील एक महत्वाचे विकसनशील राष्ट्र असल्यामुळे व एक मोठी बाजारपेठ म्हणून

संपूर्ण जागतिक राजकारणात भारताने सार्क संघटनेच्या माध्यमातुन जागतिक राजकारणावर आपला प्रभाव निर्माण केलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातुन दक्षिण आशियातील राजकारण, सार्क संघटनेतील भारताची भुमिका या प्रमुख बाबींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१) दक्षीण आशियातील राजकारणाचा अभ्यास करणे.

२) सार्क संघटनेविषयी माहिति जाणून घेणे.

३) सार्क संघटनेतील भारताच्या भूमिकेचा अभ्यास करणे

**संशोधन पध्दती व स्त्रोतः**

प्रस्तुत शोधनिबंधलेखनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी व्दितीय स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, मासिके, वर्तमानपत्रे व विविध वेबसाईटवरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**दक्षिण आशिया आणि सार्क (SAARC) एक दृष्टिक्षेप :-**

दक्षिण आशिया हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला उपखंड आहे.दक्षिण आशिया उपखंडात भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, भुतान, नेपाळ आणि मालदीव अशा सात राष्ट्रांचा समावेश होतो.याशिवाय चीन व म्यानमार सारखी राष्ट्रे देखील दक्षिण आशियातील राजकारणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपला प्रभाव पाडत असतात. जगाच्या एकुण लोकसंख्येपैकी २२ टक्के लोकसंख्या दक्षिण आशियात आहे व जगातील एकुण उत्पन्नाचा वाटा १.३ टक्के आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांना अनेक सामाजिक, आर्थिक समस्यांचा आणि नैसर्गिक आपत्तींचा सामाना करावा लगत आहे.या समस्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात एकसमानता असुन भौगोलिक जवळीकतेमुळे एका राष्ट्रातील समस्यांचा दुसऱ्या राष्ट्रांवर त्वरीत प्रभाव होतो.या समस्या सोडविण्यासाठी विभागीय सहकार्याची गरज होती.त्यातुन दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रादेशिक सहकार्याद्वारे विकास करण्यासाठी एखादी संघटना असावी हा विचार जोर धरु लागला. आर्थिक विकास, सामाजिक प्रगती, परस्परांविषयीचा विश्वास वाढविणे, विविध क्षेत्रात एकमेकांना सहकार्य करणे ही उद्दिष्टे डोळयासमोर ठेऊन दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (South Asian Association for Regional Co-Operation) उदयास आली.

दक्षिण आशियाचा विकास साध्य करण्यासाठी १९८५ मध्ये दक्षिण आशियाई विभागीय सहकार्य संघटनेची म्हणजे (SAARC) सार्क ची स्थापना करण्यात आली.सार्कची विविध उद्दिष्टे आहेत व महत्वाचे म्हणजे सार्क संघटनेतील सदस्य देश विकसनशील देशांच्या गटात मोडतात.त्यांचे विकासात्मक, सामाजिक, आर्थिक स्वरुपाचे प्रश्न बहुतांश प्रमाणात सारखेच आहेत.प्रत्येक सार्क देशाचा पश्चिमात्य देशांशी कोणत्या न कोणत्या स्वरुपात संबंध आलेला आहे.या समानतेतुनच सार्क संघटना अस्तित्वात आली.सार्क स्थापनेचा मुख्य आधार सहकार्य हा आहे.द्विपक्षीय व वादग्रस्त मुद्यांना सार्कच्या व्यासपिठावर स्थान नाही १९८९ पासुन

सार्कने एक स्वतंत्र ब्रिद घेऊन त्यावर स्वतंत्रपणे कार्य करण्याचे निश्चित केले आहे.

अलीकडील काळात सार्क संघटनेने जागतिक राजकारणात आपले महत्व सिध्द केले असुन दक्षिण आशियाई राष्ट्रे आज एक महत्वाची बाजारपेठ ठरलेली आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपिठावर तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, भुतान, मालदीव आणि अफगाणिस्तान या सार्कमधील राष्ट्रांचे महत्व वाढलेले आहे. विभागीय राजकारणामध्ये तसेच व्यापारामध्ये सार्क संघटनेचे महत्व वाढलेले आहे.

**दक्षिण आशियातील राजकारण व सार्क संघटनेतील भारताची भूमिका :-**

आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात दक्षिण आशियाई राष्ट्रांचा प्रभाव वाढत आहे. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ हि राष्ट्रे जागतिक राजकारणाचा केंद्रबिंदु ठरत आहेत. दक्षिण आशियाई राष्ट्रांनी राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक विकासाच्या क्षेत्रात मोठी झेप घेतलेली आहे. दक्षिण आशिया या उपखंडातील भारत हा एक मोठा देश आहे.भारताला संपन्न अशी भौगोलीक स्थिती, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. विपूल लोकसंख्या, लोकशाही शासनप्रणाली, संघराज्य पध्दती आदि वैशिष्ट्ये लाभलेली आहेत. एक सार्क सदस्य देश म्हणून सार्क संघटनेत भारताला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. दक्षिण आशियाच्या तीन द्विपकल्पांमध्ये भारताचे स्थान मध्यवर्ती आहे. भारताला सार्क या संघटनेच्या माध्यमातुन दक्षिण आशियातील राजकारणामध्ये किंवा क्षेत्रामध्ये पुढील भुमिका पार पाडायची आहे.

**१) दक्षिण आशियात मुक्त व्यापार व सहकार्य वाढविणे :-**

दक्षिण आशियाई राष्ट्रांनी सार्कच्या स्थापनेचा घेतलेला निर्णय हा राजकारणाचा भाग असला तरी १९८५ नंतरच्या जागतिक राजकारणामध्ये विभागीय व्यापारसंघाचे महत्व दाखवुन देणारा आहे. १९८५ पासुनच सार्क राष्ट्रांमध्ये परराष्ट्र सचिव, मंत्री आणि राष्ट्रप्रमुख पातळीवर सतत बैठका, परिषदा होत आहेत आणि यातुन राजकीय, आर्थिक सहकार्य आणि मुक्त व्यापाराच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येत आहेत. दक्षिण आशिया हा जगातील सर्वात गरीब समजल्या जाणाज्या विभागांपैकी एक आहे.लोकसंख्या जास्त असल्यामुळे दक्षिण आशियातील देशांमध्ये गरीबी आणि बेकारीचा प्रश्न मोठा आहे.दक्षिण आशिया एक संघटित शक्ती म्हणून पुढे यावे अशी भारताची इच्छा आहे.विभागीय सहकार्याच्या प्रस्तावाकडे पाहण्याचा भारताचा दृष्टीकोण हा सकारात्मक राहिला आहे.दक्षिण आशिया मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) ची अंमलबजावणी २००७ पासुन करण्यात आलेली आहे.

**२) राष्ट्रा-राष्ट्रांमधील राजकीय प्रश्न सोडविणे :-**

दक्षिण आशियामधून भारत आणि त्यांच्या शेजारील राष्ट्रांमध्ये राजकीय सिमावाद, वांशिक व इतर विविध कारणांवरुन संघर्ष आहेत.ते संघर्ष सोडविण्यासाठी राष्ट्रांमध्ये परस्परविश्वास निर्माण होणे आवश्यक आहे. असा विश्वास आर्थिक, राजकीय आणि व्यापारी सहकार्यामधुन निर्माण होऊ शकतो, अशी भारताची भुमिका असल्यामुळे सार्कच्या निर्मितीला भारताने पाठिंबा दिलेला आहे. भारताच्या मते दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि व्यापारी सहकार्य वाढविणे हे सार्कचे मुख्य उद्दिष्ट आहे.त्यामुळे या

संघटनेचा वापर सदस्य राष्ट्रांमधील संघर्षमय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी होऊ नये.सार्कच्या माध्यमातुन दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक आणि व्यापारी सहकार्याच्या माध्यमातुन राजकीय प्रश्न सोडविले जावे अशी भारताची भुमिका आहे.

**३) दक्षिण आशियाचे नेतृत्व करणे :-**

दक्षिण आश्यितील सार्क राष्ट्रांच्या तुलनेचे सर्वच क्षेत्रामध्ये भारत हा प्रगतीशील राष्ट्र आहे. त्यामुळे सार्क संघटनेचा, दक्षिण आशियाई राष्ट्रांचा विकास हे फक्त भारताच्या पुढाकारानेच शक्य आहे. दक्षिण आशियात भारताला वडिलबंधुची (Big Brother) ची भुमिका पार पाडावी लागेल याची जाणिव भारताचे पहिले पंतप्रमधान पंडित जवाहरलाल नेहरुपासुन ते नरेंद्रमोदींपर्यंत सर्वच पंतप्रधानांना आहे. त्यामुळेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथविधी समारंभासाठी सार्कमाील सर्वच राष्ट्रप्रमुखांना निमंत्रीत केलेले होते.यामध्ये सर्वच राष्ट्रप्रमुखांनी दक्षिण आशिया व सार्कच्या विकासावर चर्चा केली आहे.दक्षिण आशियामध्ये श्रीलंका व मालदिव ही दोन राष्ट्रे सोडली तर इतर सर्व राष्ट्रांच्या सिमा या भारताला लागुन आहेत. यातुन परस्परावलंबीत्वाची भावना दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये विकसित झालेली आहे.भारताने स्वातंत्र्यापासुनच पुढाकार घेऊन दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या विकासात महत्वाची भुमिका बजावलेली आहे.

**४) दक्षिण आशियातील राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे :-**

आज दक्षिण आशियातील सार्क देशांचा प्रदेश हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रदेश म्हणून ओळखला जातो. दक्षिण आशियातील अनेक राष्ट्रे आर्थिक मंदीच्या छायेखाली वावरत आहेत. या पार्श्वभुमीवर सार्कच्या माध्यमातुन सर्व राष्ट्रे एकत्र यावेत व आपली ताकद वाढवावे अशी भारताची इच्छा आहे.दक्षिण आशियातील इतर राष्ट्रांच्या तुलनेने भारत हे एक विकसीत राष्ट्र असल्यामुळे अन्य सदस्य देशांपेक्षा भारताचे सार्कमधील स्थान महत्वाचे आहे. दक्षिण आशियातील राष्ट्रांमध्ये व्यापारी सहकार्य व त्यात संतुलन राहिल्यास सर्व देशांसाठी ते लाभदायी ठरु शकते या दृष्टीनेही सार्क संघटनेमधील भारताची भुमिका महत्वाची आहे.

**५) दक्षिण आशियातील विभागीय सहकार्य व ऐक्य प्रस्थापित करणे :-**

सन १९९० च्या दशकात शीतयुध्दोत्तर काळात भारताने विभागीय सहकार्य आणि ऐक्य प्रस्थापित करण्यावर विशेष भर दिलेला आहे. शीतयुध्दोत्तर काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट म्हणून दक्षिण आशियातील विभागीय सहकार्याकडे पाहिले जाते. भारतीय परराष्ट्र धोरणाला नवी दिशा प्राप्त करुन देणाज्या प्रसिध्द गुजराल सिध्दांत (Gujrals Doctrine) मध्ये विभागीय सहकार्यावर भर देण्यात आला आहे. कोणतीही अपेक्षा न करता भारताने आपल्या शेजारील राष्ट्रांना आर्थिक मदत आणि सहकार्य करावे हे गुजराल धोरणामधील मुख्य सुत्र होते. या सुत्रानुसार भारताने नेहमी शेजारील देशांसोबत सहकार्याची भूमिका घेतलेली आहे. एक विभागीय महासत्ता म्हणून उदयास येण्यासाठी भारताला आपल्या शेजारील राष्ट्रांचे समर्थन आवश्यक आहे.

**६) संरक्षणावरील खर्च कमी करणे :-**

सार्कमधील भारत व पाकिस्तानसारखे देश संरक्षणावर प्रचंड खर्च करत आहेत, त्याचा परिणाम

दक्षिण आशियातील अन्य राष्ट्रांवर होत आहे. दक्षिण आशियातील या दोन मोठ्या देशांनी संरक्षणावरील खर्च कमी केल्यास अन्य राष्ट्रांमध्ये परस्पर विश्वासाची भावना निर्माण होईल. शेजारील राष्ट्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढेल. सर्वच राष्ट्रांमधील गरिबी, दारिद्रय दुर करण्यासाठी संरक्षणावरील खर्च कमी करुन विकास कामांवर या राष्ट्रांनी प्रामाणिकपणे खर्च केला पाहिजे तरच सार्कराष्ट्रांची प्रगती होईल असे भारताला वाटते. यादृष्टिने भारताने अनेकवेळा सार्क संघटनेच्या माध्यमातुन पुढाकार घेतलेला आहे इतर राष्ट्रांनी सहकार्य केल्यास दक्षिण आशियाचा विकास होईल.

**७) दळणवळण क्षेत्रात आधुनिकीकरण करणे :-**

ब्रिटीश काळात मालदीव वगळता सर्वच देशांना रस्ते, रेल्वे व जलमार्गाने जोडले गेले होते.नेपाळ व भूतान वगळता अन्य देशांमध्ये सागरी व्यापारास गती देणे शक्य आहे. या देशांमध्ये रस्ते, रेल्वे, जल व विमान मार्गांचे अत्याधुनिकीकरण सार्क संघटनेच्या माध्यमातून झाल्यास दक्षिण आशियाई क्षेत्र हे जगात एक प्रमुख आर्थिक सत्ता म्हणून महत्वाची भूमिका पार पाडु शकते. यामध्ये भारत एक मोठे राष्ट्र असल्यामुळे या दळणवळण क्षेत्राच्या कार्यात भारताची भूमिका अत्यंत महत्वाची राहणार आहे.

**८) आर्थिक परावलंबन दुर करणे :-**

दक्षिण आशियातील सर्व राष्ट्रे कृषिप्रधान आहेत या राष्ट्रांमध्ये अन्न धान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते.सार्क राष्ट्रांना अनेक वेळा नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लाते.अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात अन्न धान्याची गरज भागविण्यासाठी कृषी क्षेत्राच्या विकासाची गरज आहे.या दृष्टीनेही सार्क स्वावलंबनासाठी महत्वाची भुमिका पार पाडु शकते. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी भारताची भूमिका महत्वाची आहे. कारण विकसित राष्ट्रांमध्ये सार्क देशांच्या व्यापाराचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे सार्क राष्ट्रांना दुसज्या राष्ट्रांवर अवलंबुन राहावे लागत आहे हे वाढते आर्थिक परावलंबन दुर करण्यासाठी सार्क संघटनेच्या माध्यमातुन भारताला दक्षिण आशियामध्ये महत्वाची भूमिका पार पाडावयाची आहे.

**९) दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करणे :-**

अलीकडील काळात दक्षिण आशिया हे एक अशांततेचे केंद्र बनले आहे. दहशतवाद, मुलतत्ववाद, वांशिक संघर्ष, माओवाद, इत्यादी प्रश्नांमुळे संपूर्ण दक्षिण आशियात अशांतता निर्माण झालेली आहे.दहशतवाद संपविण्याचे मोठे आव्हान भारतासह सार्कसमोर आहे.दिनांक १२ व १३ ऑगस्ट १९८६ च्या ढाका येथील परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेत दहशतवादाच्या निर्मुलनाबाबत विस्ताराने चर्चा झाली.सार्क संघटनेच्या व्यासपिठावरुन दहशतवाद, वांशिक संघर्ष संपविण्यसठी प्रयत्न आवश्यक आहेत.कारण सार्कचे यश व भारताची प्रगती हे या क्षेत्रातील शांततेवरच अवलंबुन आहे.या दृष्टीने भारत दक्षिण आशियामध्ये एक महत्वाची भुमिका पार पाडु शकते.

## निष्कर्ष (Conclusion) :-

समकालीन जागतिक राजकारणामध्ये दक्षिण आशियाला विशेश महत्व आहे. दक्षिण आशिया उपखंड हे जागतिक महासत्तांचे प्रभावक्षेत्र बनलेले आहे. रशिया व चीनच्या वाढत्या शक्तिसामर्थ्याला शह

देण्यासाठी अमेरीकेने भारतासोबत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केलेले आहे. त्यामुळे जागतिक राजकारणात अमेरिकेला दक्षिण आशिया व त्यातही भारताची भूमिका महत्वाची वाटते.

- दक्षिण आशिया उपखंडातील प्रत्येक राष्ट्रांचे सार्वभौमत्व, स्वतंत्र अस्तित्व, अंतर्गत बाबींत अहस्तक्षेप, शांततामय मार्गाने परस्पर वादग्रस्त प्रश्न सोडविणे यामध्ये भारताची भूमिका महत्वाची ठरणार आहे
- दक्षिण आशियात शांतता, स्वातंत्रता व आर्थिक विकासासाठी परस्पर सहकार्य करणे यासाठी सार्क देशांची भूमिका महत्वाचे आहे.
- दक्षिण आशियातील देशांमध्ये असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्ती व मनुष्यबळाचा उपयोग परस्पर विकासासाठी करण्यासाठी सार्कची भूमिका महत्वाची ठरणार आहे.
- दक्षिण आशियातील राजकारणावर मजबुत पकडत निर्माण करणे हे भारताच्या विकासासाठी, राष्ट्रीय हितसंबंधासाठी, राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी महत्वाचे ठरणार आहे.
- दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक व व्यापारी सहकार्याच्या माध्यमातुन राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी भारताला दक्षिण आशियातील राजकारणात एक महत्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे.

**संदर्भ सूची :-**

१) शीतल जैन, प्रमुख राष्ट्रोंकी विदेश निती, रितु पब्लिकेशन्स, जयपूर २०११

२) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण, सातत्य आणि स्थित्यंतर प्रतिभा प्रकाशन, पुणे २०१०

३) डॉ. विजय खरे, जागतिक राजकारणात भारत, के सागर प्रकाशन, पुणे २००८

४) डॉ.बी.सिंह गहलौत, भारतीय विदेशनीति, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००४

५) J.N. Dixit, Indias Foreign policy and its neighbors, Gyan Publishing House, New Delhi, २००१

६) डॉ.शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण : प्रमुख प्रश्न, विद्या प्रकाशन औरंगाबाद, २००५

७) डॉ.शैलेंद्र देवळाणकर, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, २००४

८) डॉ.बी.एल.फडिया, अंतराष्ट्रीय राजनिती, सिध्दांत एवं समकालिन राजनितिक मुद्दे, साहित्य भवन, पब्लिकेशन्स, आगरा, २००९

◆◆◆

# ग्रामसभांचे ग्रामविकासातील योगदान

**सा.प्रा.डॉ. सांगळे भगवान श्रीपती**
लोकप्रशासन विभाग
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड.

**प्रस्तावना:घटनात्मक दर्जा आणि महत्व**

भारतीय संसदेने १९९३ साली केलेल्या ७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामसभेला घटनात्मक दर्जा दिला आहे. ग्रामसभा हे भारतीय संसदीय लोकशाहीचे सर्वात लहान रूप आहे (Gramsabsabha is a mini Democracy Institute). त्यामुळे ग्रामसभेच्या सशक्तीकरणावर भारतीय संसदीय लोकशाहीची परिदृढता अवलंबून आहे. ग्रामसभेद्वारेच स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर होऊ शकते. ग्रामसभा झाली तरच शासनाच्या ग्रामविकासाच्या लाखोरूपयांच्या विविध योजना सामान्य आणि तळागाळातील लोकांपर्यंत जाऊ शकतात. फक्त ग्रामसभेतचमातृत्व अनुदान योजना, जननी सुरक्षा योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ योजना, असंघटीत कामगारांसाठी जनश्री विमा योजना, आम आदमी विमा योजना,विशेष घटक योजना, जवाहर विहिर योजना इत्यादी योजनांचे लाभार्थी निपक्षपातीपणे आणि सर्वसंमतीने निवडले जाऊ शकतात. शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना, ग्रामीण गोदाम योजना, राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजना,इत्यादींची सर्व ग्रामस्थांना माहिती मिळू शकते. ग्रामसभेद्वारेच शासनाच्या अमूर्त ग्रामविकास योजनांना मूर्तरूप दिले जाऊ शकते. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ६२ नुसार ग्रामपंचायतीच्या हिशोबांचे वार्षिक विरणपत्रक, मागील वर्षाचा अहवाल, पुढील वर्षाकरिता योजिलेल्या कामाचा आरखडा, हिशोब तपासणीसाचे चुका व इतर बाबीबद्दल टिपण ग्रामसभेपुढे ठेवावयाचे असते. त्यावरून ग्रामपंचायतीने आपला कारभार योग्य किंवा अयोग्यरितीने केला आहे, हिशोब योग्य पध्दतीने ठेवले आहेत किंवा नाहीत, वगैरे बाबीवर प्रकाश पडत असतो. थोडक्यात ग्रामसभेद्वारेच ग्रामोध्दार साधला जाऊ शकतो. ग्रामसभाच गावाच्या सर्वांगिण विकासाची आणि देशाच्या समतोल विकासाची गुरूकिल्ली आहे. आजही भारतातील ७२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असतांना तेथील ग्रामसभा टाळल्या जात असतील, त्या कागदोपत्रीच होत असतील किंवा कायद्याचे बंधन म्हणून एक औपचारिकता पूर्ण केली जात असेल तर सर्वांनीच लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

''भारतीय संविधानाच्या कलम २४३ नुसार 'ग्रामसभा' म्हणजे ग्रामपातळीवरील ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या एखाद्या गावाशी संबंधित मतदार यादीत ज्यांची नांवे नोंदवण्यात आलेली असतील अशा व्यक्तींची मिळून बनलेली संस्था होय. ग्रामसभा गावपातळीवर राज्याचे विधीमंडळ कायद्याद्वारे निर्धारीत करील अशा शक्तींचा वापर करू शकेल व अशा कर्तव्यांचे पालन करू शकेल.'' गावातील प्रत्येक मतदार हा ग्रामसभेचा सदस्य असल्यामुळे तो कोणतीही निवडणूक न लढविता ज्याप्रमाणे आमदार विधीमंडळात व

खासदार संसदेत भाग घेतात त्याप्रमाणे ग्रामसभेत प्रश्न विचारू शाकतो, चर्चेत भाग घेऊ शकतो, गावातील विविध योजनांच्या अंमलबजावणी संबंधी, लाभार्थी निवडीसंबंधी माहिती मागू शकतो. त्यासाठी ग्रामसभेची कार्यपध्दती समजून घेणे गरजेचे आहे.

**उद्येश :**

१. ग्रामसभेचा घटनात्मक दर्जा आणि महत्व अभ्यासणे.

२. ग्रामसभेची ग्रामविकासातीलभूमिकाअभ्यासणे.

३. ग्रामसभेची कार्यपध्दती समजून घेणे.

४. ग्रामसभेची वास्तव स्थिती अभ्यासणे.

**अभ्यासाची गृहितके :**

१. ग्रामसभा गावाच्या सर्वांगिण विकासाची गुरूकिल्ली आहे.

२. ग्रामसभेच्या सशक्तीकरणावर संसदीय लोकशाहीची परिदृढता अवलंबून आहे.

३. ग्रामसभेमुळेग्रामपंचायत कारभारात पारदर्शकता येते.

**संशोधन पध्दती:—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक आणि दुयम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**ग्रामसभेच्या बैठकी :—** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ७ (१) नुसार प्रत्येक वित्तीय वर्षात ( १ एप्रिल ते ३१ मार्च ) ग्रामसभेच्या निदान चार बैठका झाल्याच पाहिजेत. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक दि. ३० सप्टेंबर २००० नुसार '' २६ जानेवारी, १मे, १५ ऑगस्ट आणि २ ऑक्टोबर या दिवशी ग्रामसभा झाल्या पाहिजेत.'' उर्वरित दोन बैठका सोयीनुसार घेण्यात याव्यात. गरज भसल्यास सहापेक्षा जास्त बैठकाही घेता येतील. परंतु दोन बैठकीतील अंतर तीन महिन्यापेक्षा जास्त असू नये. या बैठका सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंचाने बोलवावयाच्या असतात. यापैकी एक जरी बैठक घेतली नाही तरी सरपंचाला किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंचाला पदावर राहण्याचा अधिकार राहात नाही. तसेच ग्रामसभा बोलावण्यात ग्रामसेवकही प्रथम दर्शनी दोषी आढळल्यास निलंबित केला जाईल. या संबंधी कांही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याविरूध्द अपिल होत नाही, परंतू मुंबई हायकोर्टात अर्ज करता येतो.

**ग्रामसभेचा अध्यक्ष :—** ग्रामसभेच्या पहिल्या आणि प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरूवातीला होणाऱ्या बैठकीचा अध्यक्ष हा सरपंच असेल. व त्यानंतर होणाऱ्या बैठकीचा अध्यक्ष हा सरपंच व त्याच्या गैरहजेरीत उपसरपंच असेल. तर दोघांच्याही गैरहजेरीत उपस्थित असलेल्या एखाद्या ग्रामपंचायत सदस्याची किंवा ग्रामसभा सदस्याची बैठकीचा अध्यक्ष म्हणून ग्रामसभा सदस्य निवड करतील. परंतू गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामसभा बोलाविली असेल तर नेमलेला शासकीय अधिकारीच सदर ग्रामसभेचा अघ्यक्ष असेल.

**गणसंख्या :—** ग्रामसभेचे कामकाज चालवण्यासाठी कोरम १०० मतदार किंवा लोकसंख्येच्या १५ टक्के यापैकी कमी अशा संख्येच्या सभासदांचा असतो. परंतु यातून अनेक पळवाटा शोध ल्या जात असल्यामुळे किमान ५०० मतदार किंवा लोकसंख्येच्या ४० टक्के सभासद उपस्थित असणे अनिवार्य करावे.

**कार्यपध्दती:—** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ७ (५) नुसार अनिवार्य सहा ग्रामसभांसाठी प्रत्येक बैठकीपुर्वी सात दिवस अगोदर गावात सार्वजनिक ठिकाणी नोटीस लावली पाहिजे. नोटीसीमध्ये बैठकीची तारीख, वेळ, ठिकाण व बैठकीपुढे येणारे विषय नमूद केले पाहिजेत. तसेच चार दिवस अगोदर आणि गामसभेच्या दिवशी बैठकीबद्दल गावात दवंडी दिली पाहिजे. सहापेक्षा जास्त बैठकीसाठी चार दिवस अगोदर ही प्रक्रिया पूर्ण करावी. बैठकीत सूचना मांडणारांनी बैठकी अगोदर दोन दिवस त्या सरपंचाकडे दिल्या पाहिजेत. ग्रामसभेसाठी कोरम पूर्ण झाल्यानंतर अध्यक्षाने संसदीय कामकाज पध्दतीनुसार कामकाज चालवून सदर ग्रामसभेचे ध्येय पूर्ण करावे. त्यासंबंधीचे इतिवृत्त ग्रामसेवकाने लिहून ठेवावे. आणि पुढील कार्यवाही पार पाडावी. (अधिक माहितीसाठी पहा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ७ (५) इ.)

**वास्तव स्थिती :—** इ. स. २००८ ते २०१० या कालावधीत संशोधकाने महाराष्ट्रतील बीड जिल्हयाचा वरील सैध्दांतिक तरतूदींच्या अनुषंगाने सर्वेक्षणात्मक अभ्यास केला आहे. नमुना पाहणीत जिल्हयातील निवडक अशा ६० गातील ३०० नागरिकांना आणि ६० ग्रामसेवकांना प्रश्नावलीद्वारे कांही प्रश्न विचारण्यात आले होते. या संशोधनात समोर आलेली वास्तव स्थिती कांही थोडया प्रमाणात पुढे मांडली आहे.

गावच्या सरपंचांनी प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामसेवकांच्या साहयाने गावांतील सर्व प्रौढ नागरिकांचा समावेश असलेल्या सहा ग्रामसभा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ०७ नुसार घेणे बंधनकारक आहे. या ग्रामसभेतच गावाच्या विकास आराखडयाला मंजुरी घेतली पाहिजे. विविध योजनांचे लाभार्थी ग्रामसभेत निवडले पाहिजेत. त्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आला होता की, तुमच्या गावात वर्षातून सहा ग्रामसभा घेतल्या जातात का? त्याचे स्पष्टीकरण खालील तक्त्याद्वारे केली आहे.

**अनिवार्य सहा ग्रामसभा आणि वास्तव**

| अ.क्र. | उत्तरदाते | नागरिक संख्या | शे.प्रमाण | ग्रामसेवक संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | होय | ५१ | १७ | ५३ | ५३.३३ |
| २. | नाही | २४९ | ८३ | ०७ | ११.६६ |
| ३. | एकूण | ३०० | १०० | ६० | १०० |

**स्रोत : सर्वेक्षण**

नमुना पाहणीत वरील तक्त्यांतून ८३:नागरिकांच्या, तर ११.६६: ग्रामसेवकांच्या मते

त्यांच्या गावात वर्षातून सहा ग्रामसभा घेतल्या जात नाहीत. ज्या घेणे शासनाने बंधनकारक केलेले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. जोपर्यंत प्रत्यक्षात ग्रामसभा होत नाहीत तोपर्यंत गावच्या कारभारात पारदर्शकता येणार नाही. ग्रामसभा कागदोपत्री दाखविणे, नागरिकांच्या खोटया सहया करणे. झेंडावंदनासाठी जमलेल्या नागरिकांच्या सहया घेणे, आपल्या बाजूच्याच १०० नागरिकांच्या सहया घेणे इत्यादी अनेक प्रकारे ग्रामसभा झाल्याचे कागदोपत्री दाखवून शासनाची व जनतेची दिशाभूल केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे.

गावासंबंधी धोरण ठरवतांना अंतिम अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत. त्यासाठी वर्षातून किमान ६ ग्रामसभा घेणे बंधनकारक केले आहे. परंतु सरपंच आणि ग्रामसेवकडून लोक ग्रामसभेला येत नाहीत असा सूर ऐकवण्यात येतो. त्यासंबंधी सत्यता तपासून पाहण्यासाठी ग्रामसभेची सूचना ७ दिवसापूर्वी दवंडी पिटवून गावकऱ्यांना दिली जाते का ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्याचे स्पष्टीकरण खालील तक्त्याद्वारे केले आहे.

**७ दिवसापूर्वी दवंडी पिटवून ग्रामसभेची सूचना**

| अ.क्र. | उत्तरदाते | ग्रामसेवक संख्या | शेकडा प्रमाण | नागरिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | होय | ५५ | ९१.६६ | ६३ | २१ |
| २ | नाही | ०५ | ८.३३ | २३७ | ७९ |
| ३ | एकूण | ६० | १०० | ३०० | १०० |

**स्रोत : सर्वेक्षण**

जोपर्यंत जास्तीत जास्त नागरिकांचा गावच्या कारभारात सक्रीय सहभाग वाढत नाही तोपर्यंत सार्वजनिक हित साधले जाऊन पारदर्शकता येणार नाही. म्हणून गावासंबंधीचा प्रत्येक निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला पाहिजे. गावातील सर्व साक्षर, निरक्षर लोकांना समजण्यासाठी दंवडी देणे गरजेचे असते. नमुना पाहणीत वरील दोन्ही तक्त्यांतून २१:नागरिकांच्या, तर ९१:ग्रामसेवकांच्या मते त्यांच्या गावात ग्रामसभेची सूचना ७ दिवसापूर्वी दवंडी पिटवून गावकऱ्यांना दिली जाते. साहजिकच ग्रासेवकांनी ही माहिती खोटी दिली आहे असे निदर्शनास येते. कारण नागरिक आणि कर्मचारी यांच्या उत्तरात खूप मोठी तफावत आहे.

शासनाने ठरवून दिलेली पध्दत न वापरल्यामुळे ग्रामसभेस लोकांचा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. म्हणून ग्रामसेवक आणि नागरिक या दोघांनाही प्रश्न विचारण्यात आला होता की, आपल्या गावातील बहुसंख्य लोक ग्रामसभेस उपस्थित असतात का? त्यांचे स्पष्टीकरण खालील तक्त्यांद्वारे केली आहे.

**ग्रामसभेस नागरिकांची उपस्थिती**

| अ.क्र. | उत्तरदाते | ग्रामसेवक संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ५८.३३ |
| २ | नाही | २५ | ४१.६६ |
| | एकूण | ६० | १०० |

**स्रोत : सर्वेक्षण**

प्रश्न— आपण ग्रामसभेस उपस्थित असता का ?

**ग्रामसभेस नागरिकांची उपस्थिती**

| अ.क्र. | उत्तरदाते नागरिक | संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नियमित | ५४ | १८ |
| २ | कधीतरी | १७३ | ७३ |
| ३ | कधीही नाही. | ५८ | २४ |
| | एकूण | ३०० | १०० |

**स्रोत : सर्वेक्षण**

नमुना पाहणीत गावातील लोकांना ग्रामसभेत रस नाही. कारण त्यांच्याकडून सक्तीने कर वसूली केली जात नाही. त्यामुळे शासनाच्या योजना गावात राबवण्यात आल्या आणि त्यासाठीचा निधी खर्च झाला किंवा हडप केला तरी त्यांना प्रत्यक्ष झळ बसत नाही. नमुना पाहणीत वरील दोन्ही तक्त्यांतून ग्रामसभेस नागरिकांची मोठया प्रमाणात अनुपस्थिती जाणवते. त्याचे कारण एक तर त्यांना माहितीच मिळत नाही आणि माहिती मिळाली तर आपल्याला काय करायचे आहे. कशाला कुणाचा रोश ओढवून घ्यायचा असे म्हणून नागरिक ग्रामसभा टाळतात. तसेच जे नागरिक उपस्थित असतात त्यांचेही म्हणने कोणी ऐकायला तयार नसते. असा अनुभव संशोधकाने ग्रामसभेस उपस्थित राहून घेतला आहे.

शासनाच्या विविध योजनांची माहिती लोकांना होणे गरजेचे आहे. तसे झाले तरच गरजू लाभार्थ्यांचा विकास होऊन शासनाचा ग्रामीण विकासाचा उद्देश साध्य होवू शकतो. यासंबंधी ग्रामसेवकांना प्रश्न विचारण्यात आला की, शासनाच्या विविध योजनांची माहिती लोकांना कशी देता? त्याचे स्पष्टीकरण पुढील तक्त्याद्वारे केले आहे.

**शासनाच्या विविध योजनांची लोकांना माहिती कशी मिळते**

| अ.क्र | उत्तरदाते | ग्रामसेवक संख्या | शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोटीस बोर्डावरून | १० | १६.६६ |
| २ | ग्रामसभेतून | ४५ | ७५ |
| ३ | वैयक्तीक भेटून | ०० | ०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आपोआप माहिती मिळते | ०० | ०५ |
| ५ | मौन | ०० | ८.३३ |

**स्रोत: सर्वेक्षण**

**शासनाच्या विविध योजनांची लोकांना माहिती कशी मिळते**

| अ.क्र | उत्तरदाते | नागरिक संख्या | शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोटीस बोर्डावरून | ३६ | १२ |
| २ | ग्रामसभेतून | ४५ | १५ |
| ३ | वैयक्तीक भेटून | ६० | २० |
| ४ | माहिती दिली जात नाही | १५९ | ३०० |
| | एकूण | ५३ | १०० |

**स्रोत : सर्वेक्षण**

शासनाच्या विविध योजनांची माहिती लोकांना होणे गरजेचे आहे. तसे झाले तरच गरजू लाभार्थ्यांचा विकास होऊन शासनाचा ग्रामीण विकासाचा उद्येश साध्य होवू शकतो. नमुना पाहणीतील तक्ता क्र. ५.४४ व ५.४५ वरून असे निदर्शनास येते की, ७५ टक्के ग्रामसेवक ग्रामसभेतून शासनाच्या विविध योजनांची माहिती लोकांना देतो असे म्हणतात. तर १५ टक्के लोक ग्रामसभेतून शासनाच्या विविध योजनांची माहिती आम्हाला मिळते असे सांगतात. ५३ टक्के लोक शासनाच्या विविध योजनांची माहितीच दिली जात नाही असे सांगतात.

**निष्कर्ष :** ग्रामसभेद्वारेच ग्रामोध्दार साधला जाऊ शकतो. ग्रामसभाच गावाच्या सर्वांगिण विकासाची आणि देशाच्या समतोल विकासाची गुरूकिल्ली आहे. आजही भारतातील ७२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असतांना तेथील ग्रामसभा टाळल्या जात असतील, त्या कागदोपत्रीच होत असतील किंवा कायद्याचे बंधन म्हणून एक औपचारिकता पूर्ण केली जात असेल तर सर्वांनीच लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे.कल्याणकारी राज्यात शासन ग्रामीण भागातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी अनेक योजना राबवत असते. मात्र दि.२३ जाने. २०१० च्या दै. सकाळमधील बातमीनुसार अनेक ग्रामसेवक गावात फिरकतच नसल्याचे दिसून आले आहे. शासनाच्या अनेक योजनांचा बट्ट्याबोळ झाला आहे. तर दि. १० जाने.२०१० च्या दै. सकाळ मधील व दि. १६ व १९ जाने.२०१० च्या दै. लोकमत मधील बातमीनुसार गेवराई तालुक्यात भडंगवाडी व इतर २५ गावात तांडा व दलित वस्ती सुधारणा योजनेतून २५ लाख रूपयांची बिले काम न करताच उचलण्यात आल्याचे प्रकरण उजेडात आले आहे.

**उपाय योजना :—**

१) अनिवार्य ग्रामसभंचे दृकश्राव्य चित्रीकरण बंधनकारक करून त्याआधारे शासनाने ग्रासभांचे पर्यवेक्षण करावे

२) सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यामध्ये सामाजिक जाण आणि विकासात्मक दृष्टिकोनाची जोपासना करावी.

३) नागरिकांमध्ये ग्रामसभेविषयी जनजागृती आणि निर्भय वातावरण निर्माण करणे अत्यावश्यक वाटते.

४) भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी निवृत्त सैन्याधिकारी, न्यायाधिश यांचे चौकशी पथक नेमून दोषींना तात्काळ व कठोर शिक्षा करावी. तसेचग्रांमपंचायतीचा जमाखर्च दरमहा संकेतस्थळावर टाकण्याचे बंधनकारक करावे.

५) सरपंच व ग्रामपातळीवरील कर्मचाऱ्यांची अद्ययावत कार्यसूची गावाच्या दर्शनी भागात लावून तिच्या अंमलबजावणीची वेळोवेळी खातरजमा करावी. सर्व कर्मच्याऱ्यांची ग्रामसभेला उपस्थिती अनिवार्य असावी.

**सारांश** : अपुरे प्रशिक्षण, स्वार्थी राजकारण, गावातील गटबाजी, हक्क व कर्तव्याविषयी उदासिन, भयग्रस्त, हतबलजनता. वरिष्ठाकडून वेळेवर आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव अशा परिस्थितीत सरपंच आणि ग्रामसेवकांना काम करावे लागते. ग्रामसेवक कार्यस्थळी न राहता, नोकरी टिकविण्याच्या अणि अतिरिक्त कमाईच्या दृष्टिकोनातून नियम आणि कायद्यांना बाजू (बगल) देऊन सरपंचाशी संगणमताने काम करताना दिसून येतात. त्यांच्यामध्ये विकासात्मक दृष्टिकोन निर्माण करून शासकीय पैसा आणि गावातील मनुष्यबळाचा ग्रामसभेद्वारे सदुपयोग केला तर ग्रामीण विकास लवकर होऊन भारत विकसीत देश आणि महासत्ता बनेल.

**संदर्भसूची :—**

१. भारताचे संविधान ( मराठी आवृत्ती ), विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार, १९९६.

२. मुंबई ग्रामपंचायत अघिनियम १९५८ ( २७ वी आवृत्ती ), चौधरी लॉ हाऊस , पुणे २००८.

३. पारदर्शी पंचायतराज प्रशासन, म. शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग२००६.

४. प्रा. के. आर. बंग. भारतीय स्थानिक स्वशासन, मंगेश प्रकाशन, नागपूर २००५.

५. संशोधकाचे संशोधन.

◆◆◆

# शारीरिक शिक्षण व खेळांची आवश्यकता व महत्त्व

**डॉ.तनपुरे विश्वंभर श्रीराम**
शारीरिक शिक्षण विभाग
मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, ता.जि.जालना

*सारांश*

*मानवालाआपले आयुष्य निरोगी ठेवण्याकरिता शारीरिक हालचालीचे व्यायाम, करणे गरजेचे असून, शरीर निरोगी, चित्त प्रसंन व दिर्धकाल जगण्यासाठी शारीरिक शिक्षण आणि खेळ अत्य्यंत महत्वाचे आहे. खेल आणि आरोग्याचा सहसंबंध आहे व नित नव नाविन्यपूर्ण हालचाली माणसाला आवडते, ज्यामुळे त्याला शरीराला निरोगी ठेवण्यास मदत मिळते, प्रस्तुतलेख शारीरिक शिक्षणाचे व क्रीडा विषयाची आवश्यकता आणि महत्व काय आहे या बद्दल लेखकाने मांडणी केली आहे.*

शारीरिक शिक्षण

शारीरिक शिक्षण हा मानवी शरीराच्या शरीराशी संबंधित एक शैक्षणिक अभ्यासक्रमआहे.हे सामान्य आणि मानसिक आरोग्य सुधारणे, एकाग्रता, जागरूकता आणि सकारात्मक मूड यासारखे मानसिक फायदे प्रदान करते.पारंपारिक खेळ शिकवणे यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची क्रियाकलाप वाढविण्याची प्रेरणा मिळू शकते आणि वेगवेगळ्या संस्कृतींबद्दल शिकण्यास मदत होऊ शकते. उदाहरणार्थ, युनायटेड स्टेट्समध्ये लेक्रोसबद्दल शिकत असताना, विद्यार्थ्यांना पूर्वोत्तर युनायटेड स्टेट्स आणि पूर्व कॅनडाच्या मूळ अमेरिकन संस्कृतीबद्दल देखील शिकू शकेल जिथून खेळाचा उगम झाला. पारंपारिक (किंवा देशी नसलेले)खेळ शिकवण्यामुळे इतर विषयांमधूनही शैक्षणिक संकल्पना समाकलित करण्याची संधी मिळते.

पारंपारिक खेळ अशा लोकांसाठी फायदे आणि आव्हाने जोडतात जे सहसा सहज विचलित होतात, असंघटित आहेत किंवा पारंपारिक खेळांमध्ये कमी रस आहे ज्यामुळे शारीरिक शिक्षण वर्ग शक्य तितक्या लहान मुलांच्या गटापर्यंत प्रवेशयोग्य बनण्यास मदत होते.शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आणि सर्वांगीण आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे.

खेळांचे अर्थ

खेळ म्हणजे शारीरिक श्रम आणि कौशल्य यांचा समावेश असलेला क्रियाकलाप आहे ज्यात एखादी व्यक्ती किंवा कार्यसंघ करमणुकीसाठी दुसऱ्या किंवा इतरांशी स्पर्धा करते.पुरुषांसाठी सर्वांगीण विकास आणि निरोगी आयुष्य जगण्यासाठी खेळ महत्त्वाचा आहे.खेळामध्ये सर्व प्रकारच्या स्पर्धात्मक शारीरिक क्रियाकलाप किंवा खेळांचा समावेश आहे जे प्रासंगिक किंवा संघटित सहभागाद्वारे कमीतकमी भागातील सहभागींना आनंद प्रदान करताना शारीरिक क्षमता

आणि कौशल्यांचा वापर करणे, देखभाल करणे किंवा सुधारित करण्याचे उद्दीष्ट आहे आणि काही बाबतीत प्रेक्षकांसाठी करमणूक आहे.

खेळ सामान्यत: नियमांच्या किंवा रीतीरिवाजांच्या संचाने नियंत्रित केला जातो, जो निष्पक्ष स्पर्धा सुनिश्चित करतो आणि विजेत्याच्या सातत्याने निर्णय घेण्यास परवानगी देतो. गोल करणे किंवा प्रथम रेषा ओलांडणे यासारख्या शारीरिक घटनांद्वारे विजय निश्चित केला जाऊ शकतो. तांत्रिक कार्यक्षमता किंवा कलात्मक छाप यासारखे उद्दीष्ट्य किंवा व्यक्तिपरक उपायांसह क्रीडा कार्यक्षमतेचे घटक बनविणारे न्यायाधीश हेदेखील निर्धारित करु शकतात.

बऱ्याच स्पोर्टिंग ॲक्टिव्हिटीज आहेत त्यामध्ये घोडे रेसिंग, बेसबॉल, गोल्फ, गोलंदाजी, कुस्ती, फुटबॉल इ, तसेच तिरंदाजी, कबड्डी, खोखो, लंगडी, रस्सिकूद, मैदानी खेळ, आदी.

शारिरीक शिक्षण व खेळाची आवश्यकता व महत्त्व

१. नैसर्गिक विकासासाठी उपयुक्त

२. मजबूत आणि निरोगी शरीर

३.आत्मविश्वास वाढवते

४.शिस्तीचा विकास

५. जीवनात चरित्र विकसन करिता

६.समाजात जागृतीसाठी उपयुक्त

जन्मपूर्व अवस्थेपासून वृद्धावस्थेपर्यंत मनुष्याच्या शरीराचा नैसर्गिकरित्या विकास होतो.जेव्हा हा नैसर्गिक विकास काही शारीरिक व्यायामासह असतो तेव्हा शरीराच्या उर्जा पातळीत सुधारणा होते.संतुलित भावनिक विकास केवळ चांगल्या शरीराचे आरोग्य आणि विकासासह शक्य आहे.

मजबूत आणि आरोग्य शरीर

शारीरिक शिक्षणाद्वारे आपण आपले शरीर मजबूत आणि निरोगी बनवू शकतो.सशक्त शरीराचे महत्त्व काही कठोर शारीरिक किंवा मानसिक कार्य केल्यावर आपल्याला मिळणाया आनंदात असते. सशक्त व्यक्तीसाठी कष्ट करणे ही कंटाळा येत नाही.मजबूत आणि निरोगी शरीर विविध आजारांपासून स्वतःचे रक्षण करू शकते

- आत्मविश्वास वाढवते

  "आरोग्य शरीरात आरोग्य देतात". निरोगी शरीर म्हणजे परमात्मापर्यंत पोहोचण्याचा प्रवेशद्वार होय.
- मजबूत आणि निरोगी शरीर वाढीस शक्ती देऊ शकते आणि आत्मविश्वास वाढवते.
- शिस्तीचा विकास

  शारीरिक शिक्षणामुळे केवळ आत्म-शिस्तच विकसित होत नाही तर मनुष्यात बाह्य शिस्त राखण्यास देखील मदत होते.

- आयुष्यभराच्या अन्नाइतकेच शिस्त घेणे देखील महत्त्वाचे आहे. स्वतः ची शिस्त वेगवेगळ्या क्रियाकलापांद्वारे आणि कलांद्वारे क्रियात येते आणि त्याद्वारे आयुष्यात रस निर्माण होतो.
- सुसंघटित जीवनशैली माणसाला आनंदी आणि शांततेत जगण्याच्या दिशेने नेईल.
  जीवनात अक्षरांक बांधणी
- संपूर्ण मनुष्य होण्यासाठी जीवनात ऊर्जा, चारित्र्य आणि सौंदर्य या तीन गुणांची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची आहे. शारीरिक शिक्षणाद्वारे चारित्र्य चांगल्या प्रकारे विकसित केले जाऊ शकते.
- असल्याने, शारीरिक शिक्षण व्यक्तीची उर्जा आणि जीवन तयार करते; म्हणूनच व्यक्तिमत्वात चरित्र निर्माण होतो.
- समाजातील जागरूकतेसाठी सहाय्यक

निष्कर्ष

शारीरिक शिक्षण समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहे.शारीरिक शिक्षणामध्ये संघाची भावना खूप महत्वाची आहे. कार्यसंघ हे एक केंद्र आहे जेथे त्या व्यक्तीस इतर लोकांसह सहकार्याचे महत्त्व जाणून घेण्याची संधी मिळते.तो केवळ स्वतःसाठीच नाही तर समाजासाठीही आनंद निर्माण करतो. अशाप्रकारे समाज, राष्ट्र आणि जगाला वाहिलेले लोक शारीरिक शिक्षणाद्वारे तयार होऊ शकतात.

संदर्भ:

प्रो. अजमेर सिंग, व अन्य, ओलम्पिक अभियान, कल्याणीपब्लिशर, लुधियाना पंजाब

बुशर, चार्ल्स ए, "Foundation of Physical Education" 8th Ed. The CV Mosby Co., St. Louis 1979.

वेयमेन एम्नेस आर."Education through Physical Education". 3rd Ed, Lea &Febiger, Philadelphia, 1934.

◆◆◆